म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७१९
९४५८



REFBK-0009759

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११८६

आ का श वा णी प्र का श न क्र मां,

महाराष्ट्र धर्माचे प्रणेते






जन्म २९ मार्च १९०५]

[मृत्यु २४ मार्च १९५७


महाराष्ट्र-धर्माचे प्रणेते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22388 वि: निबंध
क्रमांक 1186 नों: दि: 22/4/88



के. पु. म. लाड यांच्या स्मरणार्थ


मुंबई आकाशवाणी केंद्रावर मार्च १९५८
मध्ये योजिलेल्या व्याख्यानांचा संग्रह





पब्लिकेशन्स डिव्हिजन,
माहिती व नभोवाणी खातें, दिल्ली ८

फाल्गुन १८८० (Phalgun 1880)
मार्च १९५९ (March 1959)



किंमत : रु. १·५० न. पै.
Price : Rs. 1·50

LAD MEMORIAL LECTURES
(MARATHI)

मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणें २.
प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, दिल्ली ८.

आदरांजलि

प्रशासक व विद्वान् या नात्यानें कै. पुरुषोत्तम मंगेश लाड यांनीं जी महान् सेवा केली तिच्या स्मृतीसाठीं ही स्मारक-व्याख्यानमाला आम्हीं आंखली आहे.

आतांपर्यंत चांगले प्रशासक व विद्वान् अनेक होऊन गेले आहेत. परंतु कै. लाडांच्या ठिकाणीं या दोन्हींचा वैशिष्ट्यपूर्ण संगम झालेला होता त्याहिपेक्षां त्यांची उच्च दर्जाची सचोटी, उत्साह, कर्तव्यनिष्ठा, ज्वलंत देशभक्ति यांमुळें त्यांचें व्यक्तित्व असामान्य ठरलें. कै. लाडांसारखे निष्ठावान् व कर्तृत्ववान् सनदी नोकर आपल्याला आणखी लाभले तर बरें होईल.

प्राचीन भारतीय विद्या (इंडॉलॉजी), बौद्ध धर्म किंवा संतवाङ्मय या विषयांवर नामवंत व्यक्तींचीं संशोधनपर व्याख्यानें दर वर्षीं ठेवण्याचा विचार आहे.

कै. लाड यांच्या परिचितांनीं व सर्व जनतेनें या व्याख्यानमालेचें स्वागत केलें, ह्याचा मला आनंद वाटतो.

बा. वि. केसकर
आकाशवाणी, मुंबई केंद्र

ध्वनिक्षेपण दिनांक २९ मार्च १९५८

• • •

अनुक्रमणिका

पृष्ठ क्र.

आदरांजलि : डॉ. बा. वि. केसकर, मंत्री, माहिती व नभोवाणी खातें

• पुष्प पहिलें : श्रीज्ञानेश्वरांची अमृतवाणी २

उद्घाटक : श्री. य. ब. चव्हाण; वक्ते : प्रा. शं. दा. पेंडसे

• पुष्प दुसरें : संत एकनाथ २१

अध्यक्ष : रे. एम्. ओ. मॅस्करेन्हॅस; वक्ते : प्रा. न. र. फाटक

• पुष्प तिसरें : तुकारामांचे अभंग ४२

अध्यक्ष : श्री. मामा वरेरकर; वक्ते : प्रा. वि. भि. कोलते

• पुष्प चौथें : रामदासांचें जीवनकार्य ६४

अध्यक्ष : प्रा. कृ. पां. कुलकर्णी; वक्ते : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• पुष्प पांचवें : मराठी संत कवियित्री ९३

अध्यक्ष : प्रा. वा. ल. कुलकर्णी; वक्त्या : डॉ. कमलाबाई देशपांडे

• पुष्प सहावें : मराठी संतांचें सांस्कृतिक कार्य १२२

अध्यक्ष : प्रा. अनंत काणेकर; वक्ते : प्रा. गं. बा. सरदार

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २२३८८ वि: निबंध
क्रमांक ११८६ दि. २५८
ग्रं. क्र. ८७५९

कै. पु. मं. लाड व्याख्यानमाला

श्री. यशवंतराव चव्हाण

उद्घाटनाचें भाषण

आज एक महत्त्वाचा कार्यक्रम आम्हीं सुरू करीत आहोंत. संत वाङ्मयासंबंधानें विचार केलेल्या अनेक विद्वानांचे विचार लोकांच्यापर्यंत पोंहोंचविणें आणि शक्य तर ते विचार इतर भाषिकांच्यापर्यंत नेऊन पोहोंचवणें हा त्याचा उद्देश आहे. परंतु त्याचबरोबर हें काम अशा प्रसंगाला अनुसरून करण्यांत येत आहे कीं त्यामुळें त्याचें औचित्य आपल्या सर्वांच्या लक्षांत येईल.

ही व्याख्यानमाला श्री. लाड यांच्या स्मरणार्थ आम्हीं सुरू करतों आहोंत. आणि श्री. लाड यांचा संतवाङ्मयाचा अभ्यास हा सर्वश्रुत आहे. महाराष्ट्रापुरतें बोलायचें झालें तर असें निश्चितपणानें म्हणतां येईल कीं ज्यानें संतवाङ्मयाचा अभ्यास केलेला नाहीं त्याला विद्वानच कदाचित् म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक विद्वानाला आपली विद्वत्ता सिद्ध करण्यासाठीं संतवाङ्मयाचें वाचन केलें पाहिजे, चिंतन केलें पाहिजे आणि एवढेंच करून चालणार नाहीं तर त्यासंबंधाचें कांहींतरी लेखनहि केलें पाहिजे. श्री. लाड यांचा या क्षेत्रांतला अधिकार फार मोठा होता. मुंबई सरकारनें तुकारामाचें जें व्यासंगपूर्ण चरित्र तयार करून प्रसिद्ध केलें आहे तें काम श्री. लाड यांनीं केलें एवढेंच नव्हे तर त्यांच्या स्फूर्तीमुळें, त्यांच्या आग्रहावरून झालेलें आहे, ही गोष्ट आपणां सर्वांना माहीत आहे. मला व्यक्तिशः श्री. लाड यांच्या संबंधानें या प्रसंगीं दोन शब्द बोलले पाहिजेत. कारण श्री. लाड मुंबई सरकारचे एके काळीं प्रमुख अधिकारी होते. चीफ सेक्रेटरी म्हणून त्यांनीं काम केलें आहे. आणि म्हणून लाडांचा मुंबई सरकारवर आणि मुंबई राज्यांतल्या जनतेवर कांहीं विशिष्ट अधिकार आहे.

एक विद्वान् लेखक, एक विद्वान् टीकाकार, व्यासंगी अधिकारी, निष्णात राज्यकारभारी या नात्यानें त्यांची आठवण आपणां सर्वांना राहणार आहे. परंतु मी जवळजवळ २२–२३ वर्षांपूर्वी माझ्या विद्यार्थिदशेमध्यें ते सातारा जिल्ह्याचे न्यायाधिकारी असतांना माझ्या गांवीं दिलेलें संतवाङ्मयावरचें अत्यन्त सुंदर व्याख्यान आजहि माझ्या डोळ्यांपुढें उभें राहातें. आणि दुःखाची गोष्ट एवढीच कीं

त्या २२–२३ वर्षांनंतर त्यांच्या त्या व्यासंगाच्या विषयावर महाराष्ट्रांतले अधिक विद्वान लोक आपले विचार एका व्याख्यानमालेंत गुंफत आहेत. पण ते गुंफतात तें त्यांच्या मृत्यूच्या स्मरणानिमित्तानें एवढी एकच दुःखाची गोष्ट तुम्हां आम्हां सर्वांना लागणार आहे. आपल्यापुढें भाषण करणाऱ्या विद्वानांच्यामध्यें आणि आपल्या-मध्यें मी फारसें थांबणें योग्य होणार नाहीं. या निमित्तानें मी माझी श्री. लाडांसंबंधींची भावनांजलि अर्पण करण्याकरतां इथें उभा राहिलों आहें. आणि एक अत्यंत उपयुक्त आणि औचित्यपूर्ण अशी एक व्याख्यानमाला सुरू होत आहे याचाच तुम्हां आम्हां सर्वांना आनंद आहे.

ध्वनिक्षेपण दिनांक
२४ मार्च, १९५८

आकाशवाणी
मुंबई केंद्र

• • •

पुष्प पहिलें

श्रीज्ञानेश्वरांची अमृतवाणी

शंकर दामोदर पेंडसे

भारतीय आकाशवाणीनें कै. पुरुषोत्तम मंगेश लाड यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ प्रस्तुत व्याख्यानमालेचें आयोजन केलें आहे. श्री. लाड हे मराठी वाङ्मयाचे अभ्यासक व उपासक होते. त्यांच्या सदय आणि भाविक अन्तःकरणाला या वाङ्मयांतील व्यापक मानवी प्रेमाचें पराकाष्ठेचें आकर्षण वाटत असे. या दृष्टीनें प्रस्तुत व्याख्यानमालेची ही स्थायी योजना त्यांच्या आत्म्याला परम संतोष देईल यांत शंका नाहीं.

श्री. लाड यांनीं लिहिलेल्या 'तुकारामचरित्रा'चा जो भाग प्रसिद्ध झाला आहे त्यावरून त्यांच्या गाढ व्यासंगाची व सूक्ष्म अभ्यासाची कल्पना येते. तुकोबांचें संपूर्ण चरित्र लिहून त्यांच्या अभंगांचें तात्त्विक विवेचन श्री. लाड यांच्या हस्तें झालें असतें तर मराठी संतवाङ्मयाच्या विवेचक ग्रंथांत एक बहुमोल भर पडली असती. तुकोबांविषयीं श्री. लाड यांना फार आदर वाटत असे. किंबहुना तुकोबांना त्यांनीं आपल्या गुरुस्थानीं मानलें होतें. "मानवधर्मांत सुधारकांचा अग्रणी बनलेल्या"[१] तुकोबांच्या साधनमार्गाविषयीं लिहितांना, "माझ्या चुकीच्या अनुमानांनीं मी त्या संत गुरुरायावर अन्याय तर करीत नाहीं ना, याची सारखी चिंता वाटते."[२] असें ते म्हणतात. तुकोबांविषयीं त्यांचा आदर व श्रद्धा, त्यांची सत्यनिष्ठा आणि हळुवार मन, या उद्‌गारांत व्यक्त झालें आहे. श्री. लाड यांची ही सात्त्विक भावना लक्षांत घेऊन, त्यांचे आध्यात्मिक गुरु तुकोबा यांनीं "जयानें घातली मुक्तीची गवांदी, मेळविली मांदी वैष्णवांची"[३] असे यथार्थ उद्‌गार ज्यांच्याविषयीं काढले आहेत त्या श्रीज्ञानेश्वरांच्या पुण्यस्मरणानें या स्मारक-व्याख्यानमालेला प्रारंभ करणें सर्वच दृष्टींनीं उचित होणार आहे. ज्ञानेश्वरांचें चरित्र आणि

---

१ मानव-धर्मांत सुधारकांचा अग्रणी – श्रीतुकारामचरित्र. (पु. मं. लाड) ५६

२ माझ्या चुकीच्या अनुमानांनीं... चिंता वाटते. श्रीतुकारामचरित्र. (पु. मं. लाड) ९३

३ जयानें घातली मुक्तीची गवांदी:सकलसंतगाथा (तुकोबांचे अभंग) इंदिरा प्रेस ३८४१

आपल्या अमृतवाणीनें त्यांनीं सांगितलेलें जीवनाचें तत्त्वज्ञान आजच्या व्याख्यानांत थोडक्यांत पाहावयाचें आहे.

ईश्वराच्या कृपेनें मानवजातीच्या कल्याणाकरितां ज्या थोर विभूति मधून-मधून जन्माला येतात त्यांच्यामध्यें ज्ञानेश्वरांची गणना केली पाहिजे. त्यांचे वडील विठ्ठलपंत हे पैठणजवळील आपेगांवच्या कुळकर्ण्याचे चिरंजीव होते. या घराण्यांतील नाथपरंपरेचे व कृष्णभक्तीचे संस्कार झाल्यामुळें ते लहानपणापासूनच विरक्त वृत्तीचे होते. पैठणला शास्त्राध्ययन व गायत्रीपुरश्चरण झाल्यानंतर विठ्ठलपंत तीर्थयात्रेला निघाले व अनेक क्षेत्रें केल्यानंतर इंद्रायणीच्या तीरावरील आळंदी या प्रसिद्ध शैवक्षेत्रांत ते आले. तेथील सिद्धेश्वरासमोरील अश्वत्थवृक्षाखालीं ध्यान-धारणा करणारा हा तपस्वी व तेजस्वी तरुण, आळंदीचे कुलकर्णी सिद्धोपंत यांच्या दृष्टीस पडला. त्याच्या कुलशीलाची चौकशी केल्यानंतर सिद्धोपंतांनीं त्याला जावई करण्याचें ठरविलें व त्यांची कन्या रुक्मिणीबाई हिच्याशीं विठ्ठलपंत विवाहबद्ध झाले. पण कांहीं वर्षांनीं त्यांच्या विरक्त वृत्तीनें पुनः उचल खाल्ली एक दिवस कोणाला न कळवितां त्यांनीं गृहत्याग केला व काशीस जाऊन नृसिंहाश्रमस्वामींकडून त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. पति एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें कष्टी झालेल्या रुक्मिणीबाईंनीं, सिद्धेश्वरासमोरील ज्या अश्वत्थाखालीं तिचे पति तिच्या वडिलांच्या प्रथम दृष्टीस पडले त्याच अश्वत्थवृक्षाची सेवा आरंभिली. कांहीं वर्षें चाललेली त्यांची ही तपश्चर्या शेवटीं फळाला आली आणि विठ्ठल-पंतांचे गुरु नृसिंहाश्रम दक्षिणयात्रेला जात असतां त्याच अश्वत्थवृक्षाखालीं प्राप्त झाले. ईश्वराची विभूति असलेला आळंदीचा हा अश्वत्थ, मराठी वाङ्मयांत चिरंजीव झाला असून, 'जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ'[४] असा त्याचा प्रतीकात्मक उल्लेख तुकोबांनीं केला आहे. रुक्मिणीबाईंना 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिल्यावर स्वामींना सर्व वृत्तान्त कळला. आपण ज्यांना संन्यास दिला तेच विठ्ठलपंत रुक्मिणीबाईंचे पति आहेत व त्यांनीं पत्नीची संमति न घेतां संन्यास घेतला आहे हें लक्षांत आल्यावर, त्या धर्मज्ञ संन्याशानें विठ्ठलपंतांना पुनः गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. ती प्रमाण मानून, विठ्ठलपंतांनीं आळंदीस येऊन पुनः बारा वर्षें संसार केला व तेथेंच त्यांना निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई हीं चार अपत्यें झालीं. ज्ञानेश्वरांचा जन्म तेथें शके ११९७ च्या गोकुळ अष्टमीस झाला असें मानण्याकडेच बहुसंख्य विद्वानांचा कल आहे.

हीं मुलें लहानपणापासूनच बुद्धीनें तीक्ष्ण व तेजस्वी होतीं. बुद्धीची सूक्ष्मता, ग्रहणक्षमता आणि धारणाशक्ति प्रत्येकाची भिन्न असते, याचें कारण या गोष्टी

---

४ जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ, सकलसंतगाथा (तुकोबांचे अभंग)

इंदिरा प्रेस ३८४१

कांहींशा वडिलार्जित व बऱ्याचशा पूर्वजन्मांतील संस्काराप्रमाणें प्रत्येकाला प्राप्त झालेल्या असतात. ज्ञानेश्वरांच्या मागील तीन पिढ्या नाथपंथाच्या अनुग्रहीत, कृष्णोपासक आणि शुद्धाचरणी होत्या. त्यांचे वडील विठ्ठलपंत यांच्या ठिकाणीं विद्वत्ता, विरक्तता व साधुता ही त्रयी एकत्र झाली होती. त्यांनीं तीक्ष्ण बुद्धीच्या आपल्या मुलांना लहानपणापासूनच आपल्याजवळील ज्ञान देण्यास प्रारंभ केला होता आणि या मुलांचे पूर्वसंस्कार असे होते कीं, पूर्वजन्मींच्या ज्ञानाची त्यांना केवळ उजळणीच करावयाची होती. 'तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्"[५] अशी त्यांची स्थिति होती. सूर्यापुढें जसा त्याचा प्रकाश प्रकट होतो, त्याचप्रमाणें बाळपणींच त्यांच्या सिद्धप्रज्ञेसमोर सर्वज्ञता प्रकट झाली होती. रामदासांनीं वयाच्या बाराव्या वर्षीं विवाहांतून पलायन करून तपश्चर्या आरंभिली, शिवाजी-महाराजांनीं सोळाव्या वर्षीं हिंदवी स्वराज्याचा उद्योग सुरू केला, पहिल्या बाजीरावांनीं विसाव्या वर्षीं पेशवाईची जबाबदारी उचलली, हीं उदाहरणें पाहिलीं तर असें दिसतें कीं, पूर्वींच्या काळीं कर्तृत्वाला लवकर प्रारंभ होत असे. त्यांतहि आपत्तींत व दारिद्र्यांत वाढणारीं समजूतदार मुलें फार लवकर प्रौढ होतात, हा नेहमींचा अनुभव आहे. ज्ञानेश्वरांचे वडील आश्रमपतित झाल्यामुळें त्यांच्या कुटुंबावर ग्रामस्थांनीं कडक बहिष्कार टाकला होता. त्यांचें तोंड पाहणेंहि पाप आहे असें समजत. गांवाबाहेर झोपडी बांधून ते राहात आणि कोरान्न मागन कष्टानें उदर-निर्वाह करीत. त्यांच्या मुलांचा, संन्याशाचीं पोरें म्हणून लोक अवमान करीत. अशा स्थितींत आईबापांनीं या मुलांना अखंड अध्ययनांत व भगवद्भक्तींत गुंतवून ठेवून, आपल्या कौटुंबिक परिस्थितीचा, शक्य तितका कमी जांच त्यांना व्हावा असा प्रयत्न निश्चित केला असेल, हें लक्षांत घेतलें तर पूर्वजन्मार्जित व वडिलार्जित संस्कारांनीं ज्ञानेश्वर लवकर प्रबुद्ध झाले हें स्वाभाविक होय.

पण केवळ तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता यांमुळेंच ज्ञानेश्वरांना विभूतिमत्त्व प्राप्त झालेलें नाहीं. या दोन गुणांच्या जोरावर मनुष्य पैसा आणि प्रतिष्ठा प्राप्त करूं शकेल; पण शतकानुशतकें लोकांच्या आदराचा विषय होण्याकरितां कांहीं निराळ्या गोष्टींची आवश्यकता असते. ज्ञानेश्वरांच्या पूर्वपुण्याईमुळें त्यांच्या जीवनांत अशी एक घटना घडली कीं जिच्यामुळें त्यांचें संपूर्ण भावजीवन एका भव्योदात्त आणि आनंदमय भूमिकेवर आरूढ झालें व त्यांच्या प्रज्ञारूपी कल्प-वल्लीला असा कांहीं बहर आला कीं, तिला लागलेल्या फुलांफळांचा अनिर्वचनीय सुगंध, लक्षावधि लोकांच्या शुद्धान्तःकरणांत अनेक शतकें सारखा दरवळून राहिला आहे. आपलें जीवन विरून वायुरूप व्हावें आणि या सुगंधांत मुरून मिसळून जावें असें वाटण्याइतकें या सुगंधाचें विलक्षण आकर्षण आहे. ज्ञानेश्वरांच्या

---

५ तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्—भगवद्गीता अ.६ श्लोक ४३

जीवनाचा हा किमयागार म्हणजे त्यांचे गुरु श्रीनिवृत्तिनाथ होत आणि त्यांनीं दिलेला अनुग्रह ही ज्ञानेश्वरांच्या जीवनांतील महान् घटना होय.

ग्रामस्थांनीं घातलेल्या बहिष्कारानें कुटुंबाला होणाऱ्या त्रासामुळें, विठ्ठलपंत सहकुटुंब त्र्यंबकेश्वरीं गेले व तेथें ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालण्यास त्यांनीं प्रारंभ केला. असें करीत असतां एक दिवस निवृत्तिनाथ, वाघ मार्गें लागल्यामुळें जवळच्या गुहेंत शिरले. तेथें त्यांना गहिनीनाथांचें दर्शन झालें. त्यांच्या सहवासांत सात दिवस राहून व त्यांच्या अनुग्रहानें योगसामर्थ्य संपादून उन्मनी अवस्थेंतच निवृत्तिनाथ बाहेर आले. विठ्ठलपंतांना त्यांच्याकडून सर्व प्रकार कळल्यावर, आपलें काम झालें, मुलांची काळजी करण्याचें आतां कारण नाहीं असें समजून, आळंदीच्या ब्राह्मणांनीं सांगितल्याप्रमाणें देहान्त प्रायश्चित्त घेण्यास ते प्रयागला गेले व पत्नीसह आपले देह त्यांनीं गंगार्पण केले. गहिनीनाथांच्या आज्ञेप्रमाणें निवृत्तिनाथांनीं परंपराप्राप्त योगशक्ति जेव्हां ज्ञानेश्वरांच्या ठिकाणीं संक्रमित केली तेव्हां त्यांचा संपूर्ण कायापालट झाला. विश्वात्मक चैतन्याशीं ते समरस झाले. या चैतन्याची शक्ति त्यांना प्राप्त झाली आणि या महाराष्ट्र देशांत व मराठी वाङ्मयांत त्यांनीं मोठे चमत्कार घडवून आणले. त्यांच्या अंगीं असें बळ आलें कीं, रेड्याकडून वेद बोलवणें, मृताला सजीव करणें, भिंत चालविणें, इत्यादि चमत्कार सर्वत्र केवळ चैतन्य पाहणाऱ्या व त्या चैतन्याशीं एकरूप झालेल्या योगीराज ज्ञानेश्वरांना सहज करतां आले. पण त्यापेक्षांहि मराठी 'बोलींत अरूपाचें रूप दाखविण्याचा'[६] त्यांनीं केलेला चमत्कार आपण प्रत्यक्षच पाहात आहों. सहाव्या अध्यायाच्या उपसंहारांत, 'ज्ञानदेव म्हणे, मी चाडें। सद्गुरूंनीं केलें कोडें। माथां हात ठेविला ते फुडें। बीजचि वाइलें॥ म्हणऊनि येणें मुखें जें जें निघे। तें संतांच्या हृदयीं साचेंचि लागे।"[७] सद्गुरूंनीं माझ्या मस्तकावर हात ठेवून मोठा चमत्कार केला. माझ्या मस्तकरूपी चाडयांत ब्रह्मबीज घातलें, त्याची फळरूपी अशी जी जी वाणी माझ्या मुखांतून निघते ती ती संतांना गोडच लागते. पंधराव्या अध्यायाच्या प्रस्तावनेंत ज्ञानेश्वर म्हणतात, "ही गुरुकृपा ज्याच्यावर होते त्याच्या वाणीला सुधेचा सागर बनविते. कोट्यवधि पूर्णचंद्र त्याच्या वक्तृत्वावरून ओवाळून टाकावे असें माधुर्य त्यांतील अक्षरांना येतें. सूर्योदयाबरोबर सगळीकडे प्रकाशच प्रकाश होतो त्याप्रमाणें त्यांची वाणी श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी करते. तिच्यापुढें नादब्रह्म खुजें वाटतें आणि कैवल्य तोकडें पडतें. त्याच्या वाग्वल्लीच्या विस्तारानें, श्रवणसुखाच्या मांडवांत, संपूर्ण विश्व, वसंतऋतूची बहार लुटते आणि 'ठावो न पवतां जेयाचा। मनेंसी मुरडिली

---

६ बोलां अरूपाचें रूप दावीन, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ६–३६

७ ज्ञानदेव म्हणे मी चाडे...साचेंचि लागे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ६–४९२, ९३

वाचा । तो देवो होय शब्दांचा । चमत्कारु ।।'[८] 'ज्याचा ठाव न लागल्यामुळें मनासहित वाणी परत फिरते तो परमात्मा याच्या वाणीचा विषय होतो असा चमत्कार घडून येतो. केवळ गुरुकृपेनें वाणीला हें सौभाग्य प्राप्त होतें. माझ्या गुरुमाऊलीचें मी एकुलतें एक तान्हें अपत्य असल्यामुळें, तिची कृपा मला मिळाली, आणि मी जें सहज बोललों तेंच गीतेचें व्याख्यान झालें. निवृत्तिनाथांच्या अनुग्रहाचें ज्ञानेश्वरांच्या जीवनांत केवढें मोठें स्थान होतें, हें त्यांच्या अशा अनेक उद्‌गारांवरून स्पष्ट दिसतें.

विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई या प्रेमळ मातापित्यांनीं आपल्या अपत्यांचा जेव्हां शेवटचा निरोप घेतला तेव्हां त्यांना वडील चिरंजीव निवृत्तिनाथ यांच्या स्वाधीन करून ते गेले. आपल्या मुलांना आपल्यामुळें बहिष्कृत व्हावें लागलें आहे, त्यांना अपमान व हालअपेष्टा सोसाव्या लागत आहेत या जाणिवेनें कष्टी झालेल्या मातापित्यांनीं आपल्या मुलांना घरांत अत्यंत ममतेनें वागविलें होतें. पित्याच्या आणि विशेषतः मातेच्या वात्सल्यानें कांठोकांठ भरलेले भावनापूर्ण उपमा-दृष्टान्त ज्ञानेश्वरींत सर्वत्र दिसतात याचें हेंच कारण आहे. 'माउली' ही सर्वच बाळांचें सर्वस्व असतें. पण माया आणि माउली या शब्दांचा ज्ञानेश्वरांनीं ठिकठिकाणीं केलेला उपयोग आपल्या हृदयाचा ठाव घेतो, आणि मातापिता कायमचीं सोडून जात असतां या मुलांनीं, 'माये' म्हणून फोडलेला टाहो अद्यापि आपल्या कानीं येतो. परमात्म्याला आणि तत्स्वरूप गुरूला, 'माउली' म्हणूनच ज्ञानेश्वरांनीं संबोधिलें आहे. मातपित्यांच्या मागें, वडील बंधु निवृत्तिनाथच या ज्ञानेश्वरादि भावंडांचे माता, पिता, गुरु, सर्व कांहीं झाले. सदैव उन्मनी अवस्थेंत असणाऱ्या या गुरुमाउलीनें, आपल्या अपत्याला–आपल्या धाकट्या भावाला–आपलें सर्वस्व दिलें. त्याचा मोठेपणा हाच आपला मोठेपणा मानला, कारण गुरु आणि शिष्य हे एकरूप झाले होते. ज्ञानेश्वरांच्या बौद्धिक शक्ति निवृत्तिनाथांकडून आलेल्या योगसामर्थ्यानें इतक्या वाढल्या होत्या, कीं, शुद्धिपत्र मिळविण्याच्या निमित्तानें पैठणच्या विद्यापीठांत झालेल्या वास्तव्यांत, संस्कृतांतील उपनिषदांपासून त्यांच्या कालापर्यंत झालेले अद्वैत तत्त्वज्ञानावरील सर्व संप्रदायांचे ग्रंथ त्यांनीं वाचले, स्वानुभवाशीं त्यांचा पडताळा घेतला, महाराष्ट्रांतील तत्कालीन परिस्थिति पाहिली आणि आपल्याला जगाला जें कांहीं सांगावयाचें आहे, त्याचें उत्कृष्ट माध्यम म्हणून भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलेल्या व महाभारतांत व्यासांनीं गुंफिलेल्या गीतेची निवड केली. पैठणहून परत येत असतां, नेवासें येथें गीतेचा भावार्थ स्पष्ट करणारा व मराठी वाङ्मयांत अमर झालेला आपला ग्रंथ शके १२१२ मध्यें त्यांनीं लिहिला. त्यालाच ज्ञानदेवी, ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदीपिका असें म्हणतात.

---

८ ठावो न पवतां जेयाचा...चमत्कारू, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १५–१५

ज्ञानेश्वरांच्या वेळीं महाराष्ट्रांतील वरिष्ठ वर्ग सुखासीनतेमुळें कर्तव्यच्युत झाले होते. समाजांत धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक विषमता सर्वत्र दिसत होती. या विषमतेमुळें व जन्मजात श्रेष्ठकनिष्ठतेच्या कल्पनांमुळें होणारा सामाजिक छळ आणि अपमान त्यांनीं स्वतःच अनुभविला होता. धर्म व धर्मशास्त्र न जाणतांहि धार्मिकतेचें ढोंग करणाऱ्या ब्राह्मणांनीं, त्यांच्या मातापित्यांना देहान्त प्रायश्चित्त सांगून घेतलेला बळीहि ते विसरले नव्हते. धर्म, कर्म, भक्ति, यज्ञ, संन्यास इत्यादि सर्व उच्च तत्त्वांचें स्वरूप लोकांनीं विकृत करून टाकलें होतें व बहुसंख्य समाजाला अध्यात्मज्ञानाचे दरवाजे बंद झालेले होते. या सर्व रोगांवर ' नित्य नूतन असणारें गीतातत्त्व '[९] हाच रामबाण उपाय आहे असें ज्ञानेश्वरांनीं ठरविलें व हें गीतातत्त्व मराठी भाषेंत विशद करून सांगितलें. सर्व रीतीच्या वैयक्तिक व सामाजिक दुःखांचें मूळ देह म्हणजेच मी व त्याचें सुख हेंच खरें सुख या देहाहंकारमूलक अज्ञानांत आहे हें लक्षांत घेऊन, रोगाच्या मुळाशींच ज्ञानेश्वरांनीं हात घातला. आत्म्याचें विश्वव्यापक, सर्वत्र सम असलेलें, सच्चिदानंदस्वरूप समजून घेणें हेंच मानवजातीच्या अंतिम हिताचें आहे व यांतच मनुष्याचें ऐहिक कल्याण, सुख व शांति सामावलेलीं आहेत, हें सर्वांना पटावें म्हणून, आतांपर्यंत वेदोपनिषदांत व संस्कृत भाषेंत गुप्त असलेली, सर्व विद्यांत श्रेष्ठ अशी जी अध्यात्म किंवा ब्रह्मविद्या, तिचे दरवाजे अंत्यजांपर्यंत सर्वांना ज्ञानेश्वरांनीं खुले करून दिले. आत्मानंदाचा, अविनाशी सुखाचा लाभ सर्वांना व्हावा म्हणून, ज्ञानेश्वरीच्या द्वारें मराठी भाषेंत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडला व आपल्या अनुभवाचें अमृत सर्वांना यथेच्छ प्राशन करावयास दिलें. गुरुकृपेनें आपणांस प्राप्त झालेला आनंद सर्व जगाला द्यावा म्हणून आपण ग्रंथरचना करीत आहों असें ज्ञानेश्वरांनीं स्वतःच सांगितलें आहे. ' जेयाचेनि उजियेडें–उघडति बुद्धिचे डोळे । जीउ दोंदावरी लोळे । आनंदाचिया ॥'[१०] (ज्ञा. १३-१७४) असें ' दिसो परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा । माजी विश्व ॥ '[११] (ज्ञा. १३–११६२) ' तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं । आनंदाचा आवारू । मांडूं जगा ॥'[१२] (ज्ञा. १३–११६०)

अमृतानुभवांतहि ज्ञानेश्वर म्हणतात, " हे सद्गुरो, जेथें हरि व हर हा नाम-रूपांचा भेद नाहींसा होतो, शिव आणि शक्ति एकमेकांला गिळून एकरूप होतात, वाच्य-वाचक भाव नाहींसा करून परावाणीहि जेथें लय पावते अशा अकृत्रिम,

---

९ नित्य नूतन देखजि गीतातत्त्व, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १–७१

१० जेयाचेनि उजियेडें...आनंदाचिया, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १३–१७४

११ दिसो परतत्त्व डोळा...विश्व, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १३–११६२

१२ तैसा वाग्विलास विस्तारूं...मांडूं जगा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १३–११६०

आपोआप होणाऱ्या भक्तीच्या, द्वैतरहित सहजस्थितीच्या एवढ्या मोठ्या आनंद-भूमिकेवर तूं मला नेलें आहेस कीं 'जेथें हा आनंद मींच एकटयानें मलाच द्यायचा व घ्यायचा आहे. "शिवशिवा समर्था स्वामी। येवढीये आनंदभूमी। घेपे दीजें एके आम्हीं। ऐसें केलें"॥[१३] "परि गा निवृत्तिराया। हातातळीं सुखविलें तूं या। तरी निवांतचि मियां। भोगावें कीं॥"[१४] 'माझ्या मस्तकावर हात ठेवून जें ब्रह्मसुख मला तूं दिलेंस तें मीं एकटयानेंच भोगावें, पण ईश्वरानें सूर्याला दिलेला प्रकाश किंवा चंद्राला दिलेलें अमृत आपोआपच सर्व जगाला प्राप्त होतें, त्याप्रमाणें मला आपण दिलेला आनंद मी बोललों नाहीं तरीहि जगाला मिळणारच आहे. कारण तो जगाकरितांच मला दिला आहे.'

ज्ञानेश्वरांचा वेदान्त असा आनंदमय आहे. रडका नाहीं. उलट रडें थांबवून उत्साहानें कार्यप्रवृत्त करणारा तो रसपूर्ण मोदक आहे. अविनाशी आनंदाची प्राप्ति सर्व जिवांना करून देण्याकरितांच तो अवतीर्ण झाला आहे. हा आनंद ब्रह्मविद्येमुळें, ब्रह्मज्ञानामुळें मिळतो आणि 'आनंद ब्राह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन.।'[१५] 'ब्रह्मानंदाच्या प्राप्तीनें मनुष्य निर्भय बनतो' हें प्रसिद्ध आहे. गीता हा ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या मतें ब्रह्मविद्येचा राजा आहे. अर्जुन स्वस्वरूपाच्या अज्ञानामुळें आणि देह म्हणजेच जीव या अन्यथा ज्ञानामुळें, मी वधिता व इतर वध्य आहेत असें समजून पापाच्या भयानें कर्तव्यच्युत झाला होता. त्याचे डोळे अश्रुपूर्ण आणि व्याकुळ झाले होते. काय करावें हें सुचेनासें झाल्यानें त्याला विषण्णता आली होती. ज्या अध्यात्मज्ञानानें कृष्णानें त्याची विषण्णता घालविली, रडें थांबवलें, शंका निरसन केल्या व उत्साहानें कर्तव्यप्रवृत्त केलें तेंच अध्यात्मज्ञान, तीच ब्रह्मविद्या, ज्ञानेश्वरांनीं मराठी भाषेंत महाराष्ट्राला सांगितली.

ही ब्रह्मविद्या, हें अध्यात्मज्ञान उपनिषदांत सांगितलें आहे. उपनिषद्रूपी कामधेनूचें हें दुग्ध श्रीकृष्णानें अर्जुनाला व सर्व जगाला गीतेच्या रूपानें प्राशन करावयास दिलें. म्हणून गीतेच्या दुसऱ्याच अध्यायांत कठोपनिषदाच्या आधारें, जीव, जगत् व जगदात्मा यांचें स्वरूप सांगून, जीवाचें देहातीतत्व, अमरत्व आणि व्यापक परमात्म्याशीं असलेलें एकत्व ज्ञानेश्वरांनीं पुढील ओंव्यांत सांगितलें आहे. "हें उपजे आणि नाशे। हें मायामय दिसे। येऱ्हवी तत्त्वता वस्तु असे। अविनाशचि।।"[१६] चैतन्याला जन्ममरण नाहीं. एकाच शरिरावर ज्याप्रमाणें बाल्य, तारुण्य, वार्धक्य

---

१३ शिवशिवा समर्था स्वामी...ऐसें केलें, अमृतानुभव (साखरेप्रत) ९–६५

१४ परि गा निवृत्तिराया...भोगावें कीं, अमृतानुभव (साखरेप्रत) १०–१

१५ आनंद ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन, तैत्तिरीयोपनिषत् २–९

१६ हें उपजे आणि नाशे...अविनाशचि, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१०५

१७ एया उपाधिमाजी गुप्त...स्वीकारिति, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१२६

या दशा येतात, त्याप्रमाणें एकच चैतन्य जीर्ण शरीरें टाकून नवीं शरीरें धारण करीत असतें.' 'एया उपाधिमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकरीति ।।'. [१७] विनाशी अशा नामरूपात्मक पिंडब्रह्मांडांत, अविनाशी व सर्व-व्यापक चैतन्य आहे, तेंच जीवाचें खरें स्वरूप आहे. ' हा लोकत्रयाकारु। तो जेयाचा विस्तारु। जेथ नामवर्ण आकारु। चिन्ह नाहीं।। जो सर्वदा सर्वगतु-जन्मक्षयां अतीतु। तेया केलेया हि धातु। कदा नव्हे ।।'[१८]. असें असतां " तूं धरूनि देहाभिमानातें। आणि दीठि सूनि एया शरीरातें। मी वधिता हे मरते। म्हणतु आहासि ।।"[१९] 'परंतु हा तुझा भ्रम आहे. " शरीराच्या लोपीं। सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं। म्हणौनि तूं हे नारोषी। भ्रांति बापा।। "[२०] शरिराचा नाश झाला तरी आपल्या चैतन्यस्वरूपाचा नाश कधींहि होत नाहीं. नाना शरीरें स्वीकारणारा हा चैतन्यनाथ, पुरुषोत्तम, परमात्मा, निःसीम, गुणत्रयरहित, अव्यक्त, अनादि, अविकृत, सर्वरूप, नित्य, अचल, शाश्वत व परिपूर्ण आहे. हें अविनाशी चैतन्य तुझें स्वरूप असून त्यानेंच हें सर्व विश्व व्यापलें आहे.' "अर्जुना ऐसा जाणावा। हा सकलात्मकु देखावा। मग साहाजें शोक आघवा। हरैल तुझा ।। " [२१] 'हीं सर्व भूतें जन्माआधीं अमूर्त होतीं, जन्मल्यावर मूर्त झालीं व नाहींशीं झालीं कीं पुनः अमूर्त होतील. म्हणून मध्येंच भासणारा हा मूर्त आकार स्वप्नासारखा आहे.' "परि मध्यें जे प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें। आकारू हा मायावशें। स्वस्वरूपीं ।। " [२२] " तैसें सकल हें मूर्त। जाण पायां मायाकारित। जैसें। आकाशीं बिंबत। अभ्रपटल। ऐसे आदींचि जे नाहीं। तया लागीं रुदसी काई। तूं अवीट हें पाही। चैतन्य एक ।।[२३]' " जें सर्वत्र सर्व देहीं। जेया करितांहि धातु नाहीं। तें विश्वात्मक तूं पाही। चैतन्य' एक। " [२४] येणारे जाणारे आकार विनाशी आहेत, हे आकार ज्यावर भासतात तें अविनाशी एकच एक चैतन्य सर्व देहांत व सर्व विश्वांत व्यापून राहिलें आहे. यालाच चैतन्याचा अद्वैतवाद म्हणतात.

जीव, जगत् व जगदात्मा यांच्या यथार्थ स्वरूपाचा हाच अद्वैतसिद्धांत, अद्वैतसंप्रदायांतील सर्व युक्तिवादांनीं ज्ञानेश्वरांनीं आपल्या वाङ्मयांत विस्तारानें विवेचिला आहे. स्वतःच्या यथार्थ स्वरूपाविषयीं अज्ञान व अन्यथाज्ञान यांमुळेंच

---

१८ हा लोकत्रयाकारु...कदा नव्हे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१३४, ३५
१९ तूं धरूनि देहाभिमानातें...म्हणतु आहासि, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१३७
२० शरीराच्या लोपीं...भ्रांति बापा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१४३
२१ अर्जुना ऐसा जाणावा...हरेल तूझा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१५१
२२ परि मध्ये जे प्रतिभासे...स्वस्वरूपीं, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१६६
२३ तैसें सकल हें मूर्त...चैतन्य एक, ज्ञानेश्वरी (साखरेप्रतं) २–१६८, ६९
२४ जें सर्वत्र सर्व देहीं...चैतन्य एक, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–१७७

मनुष्याला जरामरणादिकांचें भय व दुःख वाटतें. आपण देह नसून अविनाशी चैतन्य आहोंत आणि हेंच चैतन्य सर्वत्र भरलें आहे, असें स्वस्वरूपाच्या अद्वैताचें अविनाशित्वाचें आणि सर्वव्यापकत्वाचें ज्ञान झालें म्हणजे 'तरति शोकमात्मवित्'[२५] या आत्मवेत्त्या पुरुषाला शोक, मोह, दुःख, भीति, स्पर्श करूं शकत नाहींत. स्वतःच्या सच्चिदानंद स्वरूपांत तो स्थिर होतो. आपणच सर्व विश्व होऊन विश्वाएवढें व्यापक झालों म्हणजे आपण आपल्यावर जसें प्रेम करतों तसेंच विश्वावरहि आपोआप करतों. विश्वात्मक परमेश्वराचें हें जें स्वाभाविक प्रेम त्यालाच ज्ञानोत्तर भक्ति, प्रेमभक्ति, चौथी भक्ति, ज्ञाननिष्ठा किंवा ज्ञानी पुरुषाची सहजस्थिति असें म्हणतात.

सर्वत्र एकच एक चिन्मय परमात्माच असतां त्याच्या ठिकाणीं, त्याच्यापासून वेगळें, जड आणि विविधाकाराचें जग किंवा विश्व, त्याच्या मायेमुळें भासतें, तसेंच जीव वस्तुतः चिन्मय परमात्माच असतां देहाहंकारामुळें आपणांस वेगळा समजतो. अविद्येमुळें तो जीवपणाच्या भोंवऱ्यांत सांपडला आहे. आत्मज्ञानानें ही माया व अज्ञान नाहींशी झाली म्हणजे विश्व किंवा जगत् हें वस्तुतः जड नसून चिन्मय परब्रह्मच आहे आणि जीवहि देह नसून परब्रह्मच आहे असें समजतें. विश्व किंवा जग हें मायिक व भ्रामक आहे असें जेव्हां ज्ञानेश्वर म्हणतात, तेव्हां तें विश्व किंवा जग हें जड, विविध आणि परमात्म्यापेक्षां वेगळें आहे या आमच्या कल्पनेचें भ्रामकत्व, असत्यत्व सांगत असतात. जगविषयक खोट्या जडत्वकल्पनेचा अशा रीतीनें निरास केल्यानंतर, 'जग असिकी वस्तुप्रभा।'[२६] किंवा 'मी विश्वेसी विश्वात्मा।'[२७] हा विश्वाच्या किंवा जगाच्या खऱ्या चिन्मय स्वरूपाचा सिद्धान्त ते सांगतात. एका चैतन्यापेक्षां वेगळें असें जड विश्व किंवा जगत् निर्माणच झालेलें नाहीं. चंद्र व चांदणें, सोनें व अलंकार, जल व तरंग, हीं जशीं एकरूप आहेत त्याप्रमाणें चैतन्य आणि विश्व किंवा जगत्, हीं एकरूप आहेत. चैतन्यापेक्षां भिन्न असें जड विश्व किंवा जग, ज्या मायेमुळें किंवा अविद्येमुळें भासतें तिलाहि स्वतंत्र व खरें अस्तित्व नाहीं. 'इयें नाहीं हेंचि रूप।'[२८] आहे, एकच एक चैतन्याचें विश्व किंवा जग हें स्फुरण असल्यामुळें त्याला वेगळें काढून चैतन्य पाहावयाचें असा प्रकार नाहीं. कारण चैतन्यापेक्षां वेगळी अशी कांहीं वस्तु झालेलीच नाहीं. चैतन्याच्या दृष्टीनें अचित्, जड असें कांहीं निर्माणच झालेलें नाहीं. जें कांहीं आहे तें सर्व चैतन्यच आहे असा हा

---

२५ तरति शोकमात्मवित्, छांदोग्योपनिषद्, ७–१–३

२६ जग असिकी वस्तुप्रभा, अमृतानुभव (साखरेप्रत) ७–२८९

२७ मी विश्वेसी विश्वात्मा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ९–८४

२८ इयें नाहीं हेंचि रूप, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १४–८८

ज्ञानेश्वरांचा अद्वैत सिद्धान्त आहे. अशा रीतीनें जीवजगद्विषयक अज्ञान नाहींसें करून शेवटीं, 'अहं ब्रह्मास्मि।'[२९] आणि 'सर्वं खलु इदं ब्रह्म[३०]' हें ज्ञानहि नाहींसें होतें आणि या सापेक्ष ज्ञान–अज्ञानांच्या पलीकडे असणारें निर्विषय ज्ञान तेवढें शिल्लक राहतें. " ज्ञातृ ज्ञेय विहीन। नुसधेंचि जें ज्ञान। सुखा भरलें गगन। गाळीव जें ।। जें कार्य ना कारण। जेथा दुजें ना एकपण। आपणया जें जाण। आपणचि ।।'[३१] असें हें अद्वैत तत्त्व आहे.

सत्, चित्, आनंद हे सापेक्ष शब्दहि त्याला लागत नाहींत, इतकें तें निर्गुण, निराकार असल्यामुळें या वृत्तिशून्य ज्ञानाचें, 'सर्व शून्याचा निष्कर्षु।'[३२] या शब्दांनीं ज्ञानेश्वरांनीं वर्णन केलें आहे. एकच एक असून नानात्वानें दिसण्याची चैतन्याची शक्ति, चतन्यापेक्षां भिन्न नाहीं. कारण चैतन्यावांचून स्वतंत्र रीतीनें ती एकटी राहूं शकत नाहीं. बहु भासण्याच्या या शक्तीमुळें चैतन्याला शिवत्व येतें. दृश्यामुळें याला द्रष्टा म्हणतात. पण या सर्व द्वंद्वांच्या अतीत, निर्विषय ज्ञानस्वरूप अशी चिन्मय परमात्म्याची सहजावस्था आहे. या अवस्थेलाच अमृतानुभवांत, योगभूमिकेचें वर्णन करून 'निकराचा आत्मभाव'[३३] असें म्हटलें आहे व शिवशक्ति, द्रष्टा, दृश्य, ज्ञाता, ज्ञेय हा सर्व द्वंद्वात्मक व्यवहार एका चैतन्यांतच कसा चालला आहे, याचें काव्यमय वर्णन केलें आहे. चांगदेवांना पाठविलेल्या ६५ ओंव्यांच्या पत्रांतहि हेंच सांगितलें आहे व अभंगांतहि निर्गुण चैतन्यच विश्वरूपाने सगुण भासत असल्यामुळें 'सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।'[३४] असा सिद्धान्त केला आहे.

प्रकृतीच्या, वासनांच्या, शोक-मोहादिकांच्या बंधनांतून मुक्त होऊन मूळचें आत्मस्वातंत्र्य प्राप्त करून घेणें यालाच मोक्ष म्हणतात. हा चौथा परमपुरुषार्थ आहे. तो आत्मज्ञानानें मिळतो व हें ज्ञान होण्याकरितां आपुलालें चित्त शुद्ध करण्याची आवश्यकता असते. 'मोक्ष देईल ज्ञान। येथ कीर नाहीं आन। परि तेंचि थारे ऐसें मन। शुद्ध होआवें'[३५] आत्मज्ञान झालें तरी तें ठसावें, स्थिर व्हावें म्हणून मन शुद्ध करावें लागतें. निष्कामकर्म, भक्ति व योग हीं चित्तशुद्धिद्वारा आत्मज्ञानाचीं तीन साधनें आहेत. आत्मज्ञानानें प्राप्त होणाऱ्या मुक्ततेचें, मोक्षाचें ध्येय सर्वश्रेष्ठ मानण्यांतच भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. काम व त्याकरितां

---

२९ अहं ब्रह्मास्मि, बृहदारण्यकोपनिषद् १-४-१०

३० सर्वं खल्विदं ब्रह्म, छांदोग्योपनिषद्, ३-१४-१

३१ ज्ञातृ ज्ञेय विहीन...आपणचि, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १५-७७, ७८

३२ सर्व शून्याचा निष्कर्षु, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १३-८८५, अमृतानुभव १-२७

३३ निकराचा आत्मभाव, अमृतानुभव (साखरेप्रत) ७-१९२

३४ सगुण निर्गुण एकु गोविंदु रे, सकलसंतगाथा (इंदिरा प्रेस), ज्ञानेश्वरांचे अभंग ५

३५ मोक्ष देईल ज्ञान...शुद्ध होआवें, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १५-३५

अर्थ, यांनाच परमपुरुषार्थ मानणाऱ्या आसुरी संस्कृतीच्या लोकांनीं जगाला आज विनाशाच्या कांठावर आणलें आहे. जीवनांत अर्थकामांना निःसंशय स्थान आहे. 'अवसरोचित भोगावे सकल भोग।'[३६] असें ज्ञानेश्वरहि म्हणतात. पण या अर्थ-कामांनीं एका बाजूनें धर्माच्या व दुसऱ्या बाजूनें मोक्षाच्या मर्यादेंतच वावरलें पाहिजे, असें दैवी संस्कृतीचें सांगणें आहे. दैवी आणि आसुरी भावनांचा संघर्ष मनुष्याच्या मनांत आणि जगांतील सामाजिक व्यवहारांत सदैव चालला आहे. या संघर्षांत दैवी संस्कृतीच्या बाजूनें लढण्याचें कर्तव्य, जयापजयाची पर्वा न करतां करीतच राहिलें पाहिजे हा श्रीकृष्णाचा संदेश, 'म्हणौनि फलीं लागु। सांडोनि देहीं संगु। कर्में करावीं हा चांगु। निरोप माझा।'[३७] या शब्दांत ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्राला सांगितला; कारण ते निष्काम कर्मयोगाचे पुरस्कर्ते होते. 'तैसें इहिक तरी न नशे। आणि मोक्षु तो उरला असे।'[३८] असा ऐहिकाचा व परमार्थाचा उत्कृष्ट समन्वय त्यांच्या शिकवणीमध्यें झाला आहे. 'ही सकल लोकसंस्था। रक्षणीय सर्वथा।'[३९] असें त्यांचें निश्चित मत असल्यामुळें लोकसमाजाच्या धारणेचें तत्त्वज्ञान, कर्मयोगाच्या तिसऱ्या अध्यायांत यज्ञकल्पनेचें सूक्ष्म स्वरूप सांगून त्यांनीं स्पष्ट केलें आहे.

कर्म सोडूं म्हटल्यानें सुटत नाहीं, 'म्हणौनि जें जें उचित। आणि अवसरें करूनि प्राप्त। तें कर्म हेतुरहित। आचर तूं॥'[४०] हेतुरहित केलेलें, उचित व निःस्वार्थ कर्तव्यकर्म बंधक तर होत नाहींच पण निश्चित मोक्ष देतें. स्वधर्म म्हणजे आपल्या वर्णाप्रमाणें किंवा व्यवसायाप्रमाणें प्राप्त झालेलें कर्तव्यकर्म होय. 'हा स्वधर्म जो बापा तोचि नित्ययज्ञ जाण पां'।[४१] कर्तव्यकर्माच्या या धर्मालाच नित्य केला जाणारा यज्ञ म्हणतात. कर्तव्यकर्म हें नेहमीं इतर-व्यक्ति-सापेक्ष किंवा समाजसापेक्ष असतें, हें लक्षांत घेतलें म्हणजे कर्तव्यकर्माच्या या नित्य चालणाऱ्या यज्ञांत समाजधारणेचें तत्त्वज्ञान कसें आहे तें समजतें. हा नित्य यज्ञा यज्ञमंडपांत होम-हवनांनीं होणाऱ्या नैमित्तिक यज्ञाप्रमाणें स्थूल नाहीं, सूक्ष्म आहे. त्यामुळें लोक तो जाणत नाहींत. पण 'तुम्हां वर्णविशेषवशें। आम्हीं यजु स्वधर्मु विहिला असे। एयातें उपासा मग आपैसे। पुरती काम॥'[४२] असें ब्रह्मदेवानें प्रजा निर्माण केल्या तेव्हांच त्यांना सांगितलें. या ओंवींत स्वधर्म म्हणजे वर्णविशिष्ट

---

३६ अवसरोचित भोगावे भोग सकल, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१८८
३७ म्हणौनि फलीं लागू...निरोप माझा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–१७६
३८ तैसें इहिक तरी न नशे...उरला असे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) २–२३३
३९ ही सकललोक संस्था। रक्षणीयसर्वथा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१७०
४० म्हणोनि जें जें उचित...आचर तूं, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–७८
४१ हा स्वधर्म जो बापा–ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–८१
४२ तुम्हा वर्णविशेषवशें...पुरती काम, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–८८

कर्तव्यें आणि हीं कर्तव्यें म्हणजेच खरा यज्ञ हें स्पष्ट केलें आहे. व्रतनियम, उपासतापास, तीर्थयात्रा, काम्य कर्म, मंत्रतंत्र यांनाच केवळ धर्म समजणाऱ्या लोकांना 'हें सर्वथा न करावें। स्वधर्मयज्ञें यजावें। आदिपुरुषीं।'[४३] असें ते बजावून सांगतात. हेमाद्रीच्या व्रतखंडांत, वर्षाचीं दोन हजार व्रतें सांगितलीं आहेत. व्रतें, तीर्थयात्रा, ब्राह्मणभोजनें व पक्वान्नें यांनाच धर्म समजण्याच्या त्या काळांत असें सांगणें आवश्यकच होतें. समाजविषयक कर्तव्यकर्माच्या यज्ञावर आपली लोकसंस्था उभारली आहे. एकमेकांविषयीं आपलीं कर्तव्यें निष्काम बुद्धीनें करण्याचा स्वधर्म आचरिला तर तो कामधेनूसारखा होईल. ''तुम्ही समस्तभोगभरित' व्हाल. पण हे भोग तुम्ही एकट्यानेंच घेतां कामा नयेत. तसें कराल तर चोर म्हणून काळ तुमचें सर्वस्व हरण करील. म्हणून 'स्वधर्मे जें जें अर्जे। ते स्वधर्मेंचि विनियोगिजे। मग उरें तें भोगिजें। संतोषेसी॥' [४४] कारण यज्ञ करून शिल्लक राहिलेलें अन्नच पवित्र असतें.

आपल्या देहासहित सर्व संपदा यज्ञाचीं उपकरणें आहेत, म्हणून 'हें संपत्तिजात आघवें। हवनद्रव्य मानावें।'[४५] आणि सर्वात्मक परमेश्वराला अर्पण करावें. ही संपूर्ण सृष्टि व मानवसमाज एकमेकांकरितां केल्या जाणाऱ्या त्यागावर म्हणजेच यज्ञावर अधिष्ठित आहे. या यज्ञचक्रांतील आपला भाग जो उचलणार नाहीं, 'अघायुः इंद्रियारामों मोघं पार्थ स जीवति।'[४६] ज्ञानेश्वर म्हणतात, 'अजागलस्तनाप्रमाणें त्याचें जिणें व्यर्थ आहे.' अशा कर्तव्यच्युत अजागळांनीं समाजधारणा होत नाहीं. 'म्हणौनि तूं नियतु। सकल कामरहितु। होऊनियां उचितु। धर्मु राहाट॥ जे स्वकर्मा निष्कामता। अनुसरले गा पार्था। ते कैवल्य परम तत्त्वता। पावले जगीं!।'[४७] कर्माचा स्वरूपतः त्याग करण्यांत संन्यास नसून त्यांतील फलासक्ति टाकण्यांतच खरा संन्यास आहे, असें ज्ञानेश्वरांचें मत असल्यामुळें, ऐहिक कर्तव्यकर्म निष्काम बुद्धीनें करण्याचा धर्म व पारमार्थिक कैवल्य यांची अशी उत्कृष्ट सांगड त्यांनीं घातली आहे.

ज्ञानी पुरुषांनाहि 'कर्तृत्व असें उरलें, लोकांलागी।'[४८] कारण ते जसे वागतील त्याप्रमाणें इतर लोक वागतील. लोकनीतीचें म्हणजे लोकव्यवहाराचें शास्त्र अशा ज्ञानी व थोर पुरुषांच्या आचारणावरूनच निर्माण होत असतें. 'म्हणौनि कर्म न सांडावें।

---

४३ हें सर्वथा न करावें...आदिपुरुषीं, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–९१
४४ स्वधर्मे जें जें अर्जे...संतोषेसी, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१२५
४५ हें संपत्तिजात आघवें, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१३०
४६ अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ सजीवति, भगवद्गीता, ३–१६
४७ म्हणौनि तूं नियतु...पावले जगीं, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१५०, ५१
४८ कर्तृत्व असें उरलें, लोका लागीं, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१५५

विशेषें आचरावें लागे संती ॥' [४९] नाहीतर 'लौकिकस्थिति आघवी । नाशिली होईल ।'[५०] 'जे पुढतीपुढती पार्था । हे सकल लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । म्हणौनिया । मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकिकां नोहावें । लोकांप्रति ॥'[५१] कर्तृत्वाचा अभिमान नसला म्हणजे लोकसंग्रहाकरितां केलेलीं कर्मे बंधक होत नाहींत. म्हणून, 'निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ।'[५२] या श्लोकावर 'आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं । देइं आलिंगन वीरवृत्ति । समाधानें ॥ जगीं कीर्तिति रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी । येया भारापासौनि सोडवी । मेदिनी हे ।'[५३] असें भाष्य करून, ज्ञानेश्वरांनीं कर्मयोगाचा समारोप केला आहे. त्यांचें स्वधर्मरूप यज्ञाचें स्पष्टीकरण, त्यांचें सामाजिक व आर्थिक तत्त्वज्ञान, लोकसंस्थेच्या रक्षणाची त्यांची तळमळ, ऐहिकाची व पारमार्थिकाची त्यांनीं घातलेली सांगड, आणि कर्मयोगाचा त्यांनीं केलेला समारोप, या सर्व गोष्टी अभ्यासपूर्वक पाहिल्या म्हणजे संतवाङ्मय केवळ पारमार्थिक, निवृत्तिपर, निराशावादी, रडकें, दुबळें, व समाजपराङ्मुख आहे इत्यादि आक्षेप कसे निराधार आहेत, तें लक्षांत येतें, आणि महाराष्ट्रांतील भागवतधर्म–मंदिराचा पाया कसा मजबूत आहे, तेंहि समजतें.

कर्माप्रमाणें भक्तीचेंहि सूक्ष्म, उच्च व यथार्थ स्वरूप ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट केलें. ईश्वराच्या स्थूल मूर्तीची गंधफुलांनीं पूजा करणें हें खऱ्या पूजेचें केवळ लहानसें प्रतीक आहे. सगुणमूर्तीच्या ठिकाणीं चित्त एकाग्र करण्याचा तो अभ्यास आहे. पण ईश्वराची स्थूल व जड मूर्ति म्हणजे ईश्वर नव्हे. 'पैं स्थूलदृष्टि देखणें मातें । तें न देखणें जाणति निरुतें । जैसे स्वप्नीचेनि अमृतें । अमरां नव्हिजें ॥'[५४] 'स्थूलाकारीं नाशिवंतें । भरवसा बांधोनि चित्तें । पाहाति मज अविनाशातें । तरी कैसेनि दीसे ॥'[५५] स्थूल आकार म्हणजे परमात्मा किंवा परमेश्वर नव्हे, कारण आकार विनाशी आहे. सर्वव्यापक, अव्यक्त, अमूर्त असा ईश्वर, भूतमात्रांच्या हृदयांत आहे. त्याच्याविषयींचीं आपलीं कर्तव्यें निष्काम बुद्धीनें केल्यामुळेंच या सर्वात्मक परमेश्वराची खरी पूजा होते.' 'हें सर्व वासुदेव आहे;' अशा भावनेनें व्यवहार । केले तरच खऱ्या पूजेचें श्रेय मिळतें.' 'हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा,

---

४९ म्हणौनि कर्म न सांडावें, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१५९
५० लौकिका स्थिति आघवी, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१६७
५१ जे पुढतपुढती पार्था...लोकांप्रति, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१७०, ७१
५२ निराशीर्निर्ममो भूत्वा–भगवद्गीता ३–३०
५३ आतां कोदंड घेउनि हातीं, मेदिनी हे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ३–१८९, १९०
५४ पैं स्थूलदृष्टि देखणे मातें...भ्रमरा नव्हिजे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ९–१४४
५५ स्थूलाकारीं नाशिवंतें...कैसेनि दीसे, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ९–१५२

आणि हेच परमसेवा। मज सर्वात्मकाची ॥'[५६] 'तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म कुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागी।' [५७] सर्वात्मक आणि विश्वात्मक हीं विशेषणें ईश्वराला देण्यांत, त्याचें व त्याच्या पूजेचें यथार्थ स्वरूप सांगण्याचा हेतु आहे. देवघरांत किंवा देवळाच्या गाभाऱ्यांत असलेली मूर्ति म्हणजेच ईश्वर, या संकुचित व स्थूल कल्पनेचा निरास करून ईश्वराच्या सूक्ष्म व व्यापक स्वरूपाचें दर्शन लोकांना घडावें व त्यामुळें त्यांचे सर्व व्यवहार उन्नत व्हावे असा यांत उद्देश आहे. अहंकार व फलासक्ति न ठेवतां कर्तव्यकर्मे करावीं व अशा रीतीनें तीं धुऊन, स्वच्छ करून ईश्वराला अर्पण करावीं हीच खरी भक्ति आहे. या भक्तीनेंच भ्रमनिरास होऊन, व्यापक परमेश्वराचें खरें ज्ञान होतें. 'कर्मफल ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोधु उद्दीपें। तेथ रज्जुज्ञानें लोपे। व्यालशंका॥'[५८] 'स्वकर्माच्या लाखोलीं। मज पूजा करूनि भली। तेणें प्रसादे आकळी। ज्ञाननिष्ठेतें ॥ ते निष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लसें। तेया मजसी समरसें। सुखिया होय॥ '[५९] भक्तीच्या साधनेनें ज्ञाननिष्ठा प्राप्त झाली कीं भक्त ईश्वराशीं समरस व सुखरूप होऊन जातो. अशा रीतीनें 'जाति कुल वर्ण। हें आघवेंचि गा अकारण। एथ अर्जुना माझे पण सार्थक एक ॥'[६०] असा सर्वांना समत्वानें लेखणारा व उपलब्ध असलेला हा भक्तियोग आणि कर्मयोग याचें सूक्ष्म व यथार्थ स्वरूप सांगून, त्या दोन्ही योगांचा ज्ञानेश्वरांनीं उत्कृष्ट समुच्चय केला आहे.

ईश्वरदर्शनाची भक्तांची उत्कंठा व तळमळ, ध्यानावस्थेंत अनुभवाला येणारे नाद आणि वर्ण व साक्षात्कारानंतर होणारा अपार आनंद यांचीं वर्णनें ज्ञानेश्वरांनीं आपल्या अभंगांत केलीं आहेत. अनंत अवकाशांत आणि ध्यानावस्थेंत प्रतीत होणाऱ्या, नील, श्यामल वा कृष्ण वर्णांतून सगुण कृष्णाची कल्पना निघालेली दिसते. ध्यानावस्थेंत ऐकूं येणारा नाद म्हणजेच या कृष्णाची मुरली होय, निर्गुणाच्या या प्रशांत, तेजस्वी, श्यामसुंदर, कृष्णस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानंतर, त्यानें सगुण होऊन डोलावें व आपल्याशीं बोलावें म्हणून ज्ञानेश्वर एका नितांत सुंदर अभंगांत म्हणतात " तुझिये निढळीं कोटि चंद्र प्रकाशे। कमलनयन हास्यवदन हांसे। कृष्णा हाल कारे–कृष्णा डोल कारे। घडिये घडिये

---

५६ हें विहितकर्म पांडवा...मज सर्वात्मकाची, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–९०६
५७ तया सर्वात्मका ईश्वरा...तोषालागी, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–९१७
५८ कर्मफल ईश्वरीं अर्पे...व्यालशंका, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–२२८
५९ स्वकर्माच्या लाखोलीं...सुखिया होय, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–१२४७, ४८
६० जातिकुलवर्ण...सार्थक एक, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ९–४५६

गुज बोल कारे ॥"[६१] निर्गुणानें सगुण स्वरूपांत आपल्याला भेटावें ही भक्तांची उत्कट इच्छा यांत प्रकट झाली आहे.

"भक्तीमध्यें परमात्म्याच्या सगुण स्वरूपाच्या ठिकाणीं चित्त स्थिर करण्याचा अभ्यास असतो तर योगामध्यें, ध्यान-धारणादि साधनांनीं निर्गुणात्मस्वरूपांत चित्ताचा लय समाधि करून प्राप्त करावयाची असते. ज्ञानेश्वर स्वतः महान् योगी होते. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत जगदंबा कुंडलिनी कशी जागृत होते तें सांगितल्यावर 'प्रशांतात्मा विगतभीः ।' अशा योगिराजाचें वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनीं बोलांच्या ताटांत शांतरस ओगरिला आहे. ते म्हणतात–

भ्रुकुटिचक्रांतील चंद्रामृत कुंडलिनीच्या मुखांत पडून योग्याच्या शरिरांत मुरलें म्हणजे तें शरीर इतकें तेजस्वी होतें कीं, त्याच्या रूपानें साक्षात् चंद्रकलाच अवतरली आहे व तिनें त्वचेचें पांघरूण घेतलें आहे असें वाटतें. सूर्यावरील अभ्र निघून गेल्यावर त्याचें तेज जसें पुनः प्रकट होतें, त्याप्रमाणें योग्याच्या शरिरावरील त्वचेचा कोरडा पापुद्रा निघून गेल्यावर, नैसर्गिक केशरी वर्णाची, रत्नबीजाला कोंब फुटावा तशी त्याची शरीरकांति दिसते. संध्येचा लालसर रंग काढून अथवा प्रत्यक्ष आत्मज्योतीनें त्याचें अंग बनविलें असावें असें वाटतें. चैतन्यरसानें ओतलेली ती केशरी वर्णाची शरीराकृति मूर्तिमती शांतीच दिसते. सोनचांफ्याचा कळा, किंवा अमृताचा पुतळा, किंवा कोमलतेचा मळा असें तें शरीर भासतें. शारदीय चंद्रिकेच्या शीतलतेनें प्रफुल्लित झालेलें चंद्रबिंब किंवा मूर्तिमान् तेजच त्या योग्याच्या रूपानें आसनस्थ झालेलें असतें.' हें वर्णन वाचतां वाचतां योगिराज ज्ञानेश्वरांची मूर्तीच आपल्यापुढें साकार होत जाते. आपलें मस्तक आपोआप नम्र होतें व आपले हात जोडले जातात. सभ्य गृहस्थहो, ज्ञानेश्वरांचें दर्शन आपणांस घ्यावयाचें असेल तर ज्ञानेश्वरीचें आणि विशेषतः सहाव्या अध्यायाचें सूक्ष्म निरीक्षण आपण केलें तर ही गुरुमाउली आपणांस खचित दर्शन देईल, आणि आपल्या जीवनाचें सार्थक झालें असें आपणांस वाटेल. कारण गीता ही जशी प्रभची वाङ्मयी मूर्ति आहे तशी ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरांची वाङ्मयी मर्ति आहे.

भक्तियुक्त निष्काम कर्म आणि योग या चित्तशुद्धीच्या साधनांत योग हें नित्य नवा अग्निप्रवेश करण्यासारखे किंवा लोखंडाचे चणे खाण्यासारखें कष्ट-कारक साधन असल्यामुळें सामान्य साधकांनीं भक्तियुक्त निष्काम कर्मयोगाचें साधनच स्वीकारावें असें ज्ञानेश्वरांचें मत दिसतें. यापैकीं कोणत्याहि साधनानें चित्त शुद्ध झालें म्हणजे, 'प्रियाची पैली सीमा'[६२] असा माउली आत्मा भेटतो.

---

६१ तुझिये निढळीं कोटिचंद्रप्रकाशे, सकलसंतगाथा (इंदिरा प्रेस) ज्ञानेश्वरांचे अभंग ७६

६२ पैली सीमा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १६–४४३

जीव ब्रह्मस्वरूप होतो आणि त्याला अविनाशी अशा ब्रह्मानंदाचा लाभ होतो. या आनंदालाच शांतरस असें म्हणतात. आणि 'शांतरसें वर्षला। तो हा ग्रंथु'[६३] ज्ञानेश्वरींत स्थितप्रज्ञांचीं, ज्ञानी भक्तांचीं, योगी पुरुषांचीं, योगसाधनेच्या स्थलांचीं वर्णनें करून, ज्ञानेश्वरांनीं शांत रसाचा वर्षाव केला आहे. गुरुकृपेनें त्यांच्या मतीवर भावांचा असा फुलोरा आला आहे कीं, भावपूर्ण अलंकारांनीं सगळा ग्रंथ सुशोभित व रमणीय झाला आहे, आणि वसंतऋतूमधील बटमोगऱ्याचीं वाटोळीं फुलें जशीं सुंदर व सुगंधित असतात, त्याप्रमाणें ब्रह्मरसाच्या गोडीनें भरलेल्या अक्षरांनीं, ज्ञानेश्वरांचे सखोल व अर्थपूर्ण मराठी बोल गुंफलेले आहेत. अद्‌भुत आणि इतर रस या ग्रंथांत पाहुणे म्हणून आले असले तरी शांतरस हाच येथील यजमान आहे. शृंगाराच्या माथ्यावर पाय देण्यास समर्थ अशा शांत रसाचा आविष्कार करण्याकरितांच ज्ञानेश्वरी लिहिली असल्यामुळें हें एक महान आध्यात्मिक काव्य झालें आहे. आत्मा किंवा आत्मज्ञान हा शांत रसाचा स्थायी भाव आहे; निर्वेद नव्हे. 'रसो वै स.।'[६४] असा हा आत्मा मूर्तिमान् आनंद रस आहे. या रसांतून इतर काव्यरस निर्माण होतात व कांहीं काल आनंद देतात, म्हणून त्यांना, 'ब्रह्मास्वाद सहोदर' म्हटलें आहे. शृंगारादि रसांत परिणत होणाऱ्या वृत्ति शांत अशा चैतन्यसागरावरच निर्माण होतात व तेथेंच लय पावतात. या दृष्टीनें सर्व रसांची निर्मिति जेथून होते, तो शांतरस सर्वश्रेष्ठ असतांना शृंगाराला रसराजाची पदवी देण्यांत आली, याचें कारण आनंद किंवा सुख हें बाहेरून येतें, बाह्य विषयांच्या प्राप्तीनें होतें ही अज्ञानमलक समजूत आहे. वस्तुतः अंतरींचें सुख अंतःकरणांत प्रकट होतें. सर्व सुखांचा आराम असा आत्माराम आपल्या हृदयांतच आहे. वृत्ति स्थिर व शांत करीत गेलें म्हणजे या सुखाचा अनुभव येतो. पण गोचीड जवळचें दूध सोडून रक्तच पितो, किंवा बेडूक जवळचा कमलपराग सोडून चिखलच खातो, त्याप्रमाणें बहिर्मुख विषयासक्त लोक अंतरींचें सुख सोडून वैषयिक सुखांच्या मागें लागतात आणि विषयलंपट बनलेले हे लोक शेवटीं कर्तव्यच्युत होतात. या दृष्टीनें शृंगाराचें महत्त्व कमी करून शांतरसाची निर्मिति करण्यांत ज्ञानेश्वरांनीं मराठी वाङ्मयांतच नव्हे तर मराठी देशांतहि फार मोठी मानसिक क्रांति घडवून आणली. स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केलेल्या शृंगारापेक्षां सूचक शृंगाराचा आस्वाद घेण्यास मनाची जर अधिक योग्यता लागते तर शांतरसाचा आस्वाद घेण्यास लोकांचीं मनें किती शुद्ध व सुसंस्कृत झालीं पाहिजेत हें सहज लक्षांत येईल.

शांतरसाचा स्थायीभाव असणारें आत्मतत्त्व, सदैव तरुण, चैतन्यमय, आनंदमय

---

६३ शांतरसें वर्षला, तो हा ग्रंथु, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) १८–१७६१

६४ रसो वै सः, तैत्तिरीयोपनिषद् २–७

व परम सुंदर आहे. 'उन्मनींचें लावण्य। तुरीयेचें तारुण्य। अनादि जें अगण्य। परम तत्त्व॥ जें विश्वाचे येया मूळ। जें योगद्रुमाचें फळ। जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा'[६५] असें त्याचें वर्णन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे. देह म्हणजे मी ही भ्रांति ज्याची गेली त्याला अजर, अमर व सुंदर आत्मस्वरूप समजल्यानें परम आनंद होतो. सौंदर्य हा शरीरगत भाव नाहीं. तो आत्म्याचा अव्यक्त भाव आहे, म्हणूनच प्रत्येकाला आपण सुंदर असावें व दिसावें असें वाटतें. आत्मज्ञानानें प्रत्येक मनुष्याला जरा-मरणाच्या भयापासून मुक्त होऊन सुंदर होतां येतें.

दया हा शांत रसाचा अंतरंग गुण आहे. शांत, सम व सुंदर असणाऱ्या निराकार परमात्म तत्त्वाला विषमता व अन्यायामुळें आलेली जगांतील कुरूपता सहन होत नाहीं. सज्जनांचा छळ झालेला पाहून त्याला करुणा येते व छलकांना शासन करण्याकरितां या अव्यक्त तत्त्वाला शंख, चक्र, गदा व खड्ग धारण केलेले चार हात फुटून त्याची अव्यक्त शोभा व्यक्त होऊन रूपाला येते असें 'हे चतुर्भुज कोंभली। जेयाचि शोभाचि रूपा आली। देखोनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदे'[६६] या ओंवींत ज्ञानेश्वरांनीं सांगितलें आहे, 'निर्गुण व निराकार आत्मतत्त्व सगुण व साकार कसें होतें व शांतरसांतूनच करुण आणि वीररस कसे निर्माण होतात याचें सूचक व मार्मिक वर्णन या ओंवींत केलें आहे. शांतरस ही अशी चैतन्यमय अवस्था आहे. सात्त्विक लोकांनाच आत्मज्ञान होऊन शांतरसाचा आस्वाद घेतां येतो आणि सात्त्विक कर्ते नेहमीं 'धृत्युत्साहसमन्वित' असतात हें लक्षांत घेतलें म्हणजे शांतरसाचा आविष्कार करण्यांत ज्ञानेश्वरांचा हेतु तामसी, आलस्य आणि राजसी विषयासक्ति नाहींशी व्हावी, खलांची व्यंकटी मोडावी व सात्त्विक वृत्ति वाढीला लागावी हा होता हें स्पष्ट दिसतें. सर्वत्र सम व आनंदमय अशा आत्म-स्वरूपाच्या ठिकाणीं बुद्धि स्थिर झाल्यामुळें ज्यांच्या वृत्ति शांत व प्रसन्न झाल्या आहेत, सर्वांविषयीं ज्यांना सदयता व सहानुभूति वाटते, विषमता व अन्याय झालेला पाहून ज्यांचें कारुण्य जागृत होतें, धैर्यानें व उत्साहानें लोकसंग्रहाकरितां जे अविरत निष्काम कर्तव्याचरण करीत असतात, विश्वाएवढें व्यापक होऊन विश्वाशीं समरस झाल्यामुळें जे लोकांना कंटाळत नाहींत व लोक ज्यांना कंटाळत नाहींत अशा स्थितप्रज्ञ ज्ञानी भक्तांची व सात्त्विक कार्यकर्त्यांची अखंड परंपरा निर्माण व्हावी, त्यांच्या उपदेशानें व उदाहरणानें मानवजाति उद्धाराच्या मार्गाला लागावी आणि भूतां परस्परें जीवाभावाची मैत्री घडावी या उद्देशानें ज्ञानेश्वरांची ग्रंथसंपदा अवतीर्ण झाली आहे. मराठी बोलींतील ही अमर ग्रंथसंपदा ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्राच्या स्वाधीन केली व आपलें जीवितकार्य आतां संपलें असें वाटून या

---

६५ उन्मनींचें लावण्य...चैतन्य गा, ज्ञानेश्वरी (साखरेप्रत) ६–३२०, २१

६६ हे चतुर्भुज कोंभली...भक्तवृंदे, ज्ञानेश्वरी, (साखरेप्रत) ६–३२४

योगिराजानें वयाच्या २१व्या वर्षी शके १२१८ मध्यें कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदी येथें सिद्धेश्वरासमोर संजीवन समाधि घेतली.

परमात्मस्वरूप निवृत्तिनाथांचा कृपा-प्रसाद ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयांत अंतर्बाह्य भरून राहिला आहे. ज्ञानेश्वरांची अमृत – मधुर वाणी जे ऐकतील व त्यांच्या अनुभवाचें अमृत जे प्राशन करतील त्यांचे दुःखशोक नाहींसे होतील, त्यांच्या चित्ताला प्रसन्नता प्राप्त होईल, आणि ते स्वानंदसाम्राज्याचे चक्रवर्ती होतील. ज्ञानेश्वरांच्या कृपेनें आपणां सर्वांना हें भाग्य प्राप्त व्हावें अशी इच्छा व्यक्त करून, कै. लाड यांच्या स्मृतीला हें प्रवचनपुष्प अर्पण करतों.

ध्वनिक्षेपण दिनांक २४ मार्च १९५८.

• • •

पुष्प दुसरें

संत एकनाथ

अध्यक्षीय भाषण : रे. एम्. ओ. मॅस्करेन्हॅस

काल येथें ऑल इंडिया रेडिओच्या विद्यमान मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री .चव्हाण यांचे हस्तें पु. मं. लाड व्याख्यानमालेचें उद्घाटन झालें. संतवाङ्मय चर्चा ही आज जरी संकुचित स्वरूपाची असली तरी तिला अखिल भारतीय स्वरूप देण्यांत येईल अशी भारत सरकारनें घोषणा केली आहे. ज्या श्री. लाड यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला सुरू करण्यांत आली आहे, त्या दिवंगत व्यक्तीबद्दल चार शब्द बोलण्याची मला परवानगी असावी.

लहानपणापासून त्यांच्याबद्दल मला एक प्रकारचा आदर आणि आकर्षण वाटत असे. त्यांचा प्रेमळ स्वभाव अभ्यासू वृत्ति यांचा विद्यार्थी-दशेंत असतां माझ्या मनावर विशेष परिणाम झाला. कॉलेजांत शिकत असतांहि प्रत्येक विषयांत तें प्रथम श्रेणी मिळवीत असत.

अर्थशास्त्र हा आपला आवडीचा विषय म्हणून त्यांनीं निवडला होता. देशाच्या कल्याणाकरितां जरी कोणत्याहि पुरुषाला चार पुरुषार्थ साधावे लागतात तरी देशाच्या बिकट परिस्थितिमुळें अर्थशास्त्राच्या अभ्यासाशिवाय देशाला तरणोपाय नाहीं असा विचार करून अर्थशास्त्राच्या अभ्यासाला त्यांनीं विशेष महत्त्व दिलें. अर्थशास्त्राचा सांगोपांग अभ्यास करतांना त्यांना असें आढळून आलें कीं व्यक्तीच्या स्वार्थपरायणतेमुळें केवळ अर्थशास्त्र समाजाचें खरेंखुरें कल्याण साधूं शकणार नाहीं. समाजाचें खरें खरें हित साधावयाचें असेल तर निष्कामी, निःस्वार्थी कर्मयोगी संतांच्या विचारसरणीची समाजाला पूर्ण ओळख करून दिली पाहिजे. व्यक्ति ही बहुतांशीं स्वार्थी असते, तर समाज बहुतांशीं परमार्थी असतो. म्हणून समाजाचें खरें कल्याण करण्याकरितां संतमंडळींचें साहाय्य घ्यावें लागेल असें वाटून त्यांनीं अलीकडे भारतांतील प्राचीन बुद्धाचा निष्काम कर्मयोग, मध्ययुगीन तुकारामाची निःस्वार्थी समाजसेवा आणि अर्वाचीन महात्मा गांधींची सत्यनिष्ठा या त्रयीचा मार्मिक अभ्यास सुरू केला. या बाबतींत श्री. धर्मानंद

कोसंबी यांचें शिष्यत्त्व त्यांनीं पत्करलें. अशा रीतीनें या श्री. लांडानीं भारतांतील, त्याचप्रमाणें सर्व जगांतील संत-मंडळींचा अभ्यास मोठ्या आवडीनें हातीं घेतला. ज्या विषयाला (Mystical Theology) आध्यात्मिक ब्रह्मविद्या म्हणतात त्याचा श्री. लाड सखोल अभ्यास करूं लागले. या संतांची शिकवण थोड्याच कालावधींत त्यांनीं आत्मसात् केली. त्यावर चर्चात्मक ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा मनोदय होता ही गोष्ट त्यांनीं संपादित केलेली तुकाराममहाराजांची उत्कृष्ट गाथा व तीवरील मार्मिक चर्चा यांवरून स्पष्ट दिसून येते.

कालानें त्यांचा पार्थिव देह आपणांपासून हिरावून नेला असला तरी संत–शिकवणीचा अभ्यास उत्तरोत्तर वाढीस लावण्याकरितांच कीं काय, या व्याख्यान-मालेचा उदय झाला आहे. भारताचे विद्वान्, गुणी, सत्पुत्र श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड या मालेमुळें अमर होतील अशी मला पूर्ण आशा वाटते. संत–वाङ्मय–मालेचा हार त्यांच्या गळ्यांत पडला आहे. नदी ज्याप्रमाणें समुद्राला मिळते त्याप्रमाणें महाराष्ट्रीय संत–वाङ्मय भारतीय स्वरूप स्वीकारून श्री. लाडांचें नांव अमर करील अशी माझी श्रद्धा आहे.

आजचे व्याख्याते प्रा. नरहर रघुनाथ फाटक यांचा परिचय आपणांस करून देण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. त्यांच्या अत्यंत बुद्धिनिष्ठ आणि व्यासंगी लिखाणाचा आपणांस पूर्ण परिचय आहे. व्यासंगी इतिहासकार, 'न्यायमूर्ति रानडेचरित्र'कार, समर्थवाङ्मयाचे सापेक्षी टीकाकार म्हणून त्यांचा लौकिक आहेच. त्याखेरीज 'एकनाथांचें चरित्र व वाङ्मय' यावरील अत्यंत मार्मिक असा त्यांचा ग्रंथहि आपल्या अवलोकनांत आला असेल. त्यांच्या विद्वत्तेला निर्भयता व स्पष्टोक्तीची जोड आहे आणि त्याबरोबरच परिणामकारक वक्तृत्वाची देणगीही त्यांना लाभलेली आहे. त्यांचा अधिक परिचय करून देण्याची मला आवश्यकता वाटत नाहीं.

श्री. नरहरपंतांची मुंबईकर मंडळींना आणि त्यांतल्या त्यांत संत–वाङ्मयप्रेमी मंडळींना मी ओळख ती काय करून देणार? नाथांविषयीं त्यांचे विचार ऐकण्यास मी आपणांइतकाच उत्सुक आहे. आपला विशेष वेळ न घेतां आपल्या वतीनें श्री. नरहरपंतांना आपले विचार निवेदन करण्याची मी विनंति करतों.

ध्वनिक्षेपण दिनांक : २५ मार्च १९५८

• • •

एकनाथ—व्यक्ति आणि वाङ्मय

न. र. फाटक

महाराष्ट्रांतील संतांमध्यें एकनाथांची योग्यता एक प्रकारें अद्वितीय आहे, असें अतिशयोक्तीवांचून म्हणतां येतें. इ. स. तेराव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत ज्ञानेश्वर महाराजांनीं इहलोक सोडला व त्यांनीं जें ज्ञान ग्रंथरूपानें सिद्ध केलें, त्याचा प्रसार करण्याची कामगिरी नामदेवांनीं इ. स. १३५० पर्यन्त अत्यंत आस्थेनें बजावली. १३५० ते १५५० हा दोनशें वर्षांचा काळ मुसलमानांनीं येथें राज्य स्थापल्यामुळें अतिशय अस्वस्थतेचा होता. या कालावधींत नांव घेण्याजोगा एकहि थोर पुरुष उदयास आला नाहीं. १५५० मध्यें एकनाथांचा अवतार होऊन महाराष्ट्रांत त्यांनीं ज्या परमार्थविषयक लोकजागृतीला जन्म दिला, तो आपल्या प्रदेशाच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रांतल्या देवाधर्मासंबंधाच्या अभिमानाला एकनाथांच्या शिकवणीनें नवें चैतन्य पुरवून वारकरी संप्रदायाच्या रूपानें जी संघटना ज्ञानेश्वरापासून अस्तित्वांत होती, तिचें शैथिल्य व कर्त्या पुरुषाच्या अभावीं ह्या संघटनेला आलेलें दैन्य एकनाथांच्या शिकवणीनें नाहींसें केलें. लोकांमध्यें देवाधर्माच्या अभिमानाचा उल्हास संचरला आणि ह्यालाच पुढें पन्नास वर्षांनीं स्वराज्यसंस्थापनेच्या प्रयत्नाचें फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रांतील जनतेला भोगावयास मिळाला. एकनाथांच्या कर्तृत्वाचें हें स्वरूप आपल्यास कांहींसें सविस्तर पाहावयाचें आहे.

एकनाथांच्या जन्मवर्षाविषयीं संशोधकांमध्यें मतांची एकवाक्यता नसली तरी ते ज्या काळांत कर्तबगारीसाठीं सरसावले तो काळ मतभेदांचा नाहीं. तो काळ अकबर बादशहाच्या कारकीर्दीचा होता. नाथांचें घराणें पैठणचें याविषयीं वाद नाहीं. नाथ जन्मास आल्यानंतर त्यांना आईबापांच्या पुत्रवात्सल्याचें सुख लाभलें नाहीं. परंतु सुदैवानें आजोबा जिवंत होते व त्यांनींच एकनाथांचें पालनपोषण केलें. एकनाथांची मुंज होऊन त्यांचें त्या वेळच्या ब्राह्मणकुटुंबांत मिळणारें प्राथमिक शिक्षण चालू असतां त्यांची परमार्थप्राप्तीची आस्था वाढत जाऊन त्यांनीं घर सोडलें आणि देवगिरीस किल्लेदाराच्या नात्यानें राहणारे संत जनार्दनस्वामी यांचा आश्रय एकनाथांनीं घेतला. जनार्दनस्वामींच्या साहचर्यांत एकनाथांनीं उपनिषदें

व इतर वेदान्तग्रंथ यांचा अभ्यास केला, असें त्यांच्या ग्रंथांतून येणाऱ्या त्या संबंधाच्या निदर्शनावरून सहज कळणारें आहे. देवगिरीच्या आसपासच्या अरण्यांत एकान्त साधून त्यांनीं आपली तपश्चर्या पार पाडली व त्यांना जें परमार्थज्ञान हवें होतें, तें निस्संदिग्ध रीतीनें बुद्धींत मुरल्यावर त्यांना आजोबांनीं जनार्दनस्वामींची अनुज्ञा संपादून गृहस्थाश्रमांत आणलें. एकनाथांचें पुढील बहुतेक सर्व आयुष्य, काशीक्षेत्रांतील वास्तव्याचीं थोडीं वर्षें सोडल्यास, पैठणांतच गेलें. गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्यापूर्वी नाथ तीर्थयात्रेला निघाले होते, असें दिसतें. परंतु त्यांनीं कोणत्या तीर्थांना भेट दिली याची नक्की माहिती सांगणें कठिण आहे, तथापि त्यांच्या ग्रंथांत प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें ज्या तीर्थांचीं नांवें आलेलीं आहेत, तीं एकत्र केल्यास दक्षिणेंतील कांहीं तीर्थें त्यांच्या अवलोकनांत येऊन गेल्याचा तर्क करतां येतो. काशीक्षेत्रास नाथ गेल्याचा निर्देश केलेला आहेच. सुरवातीच्या तीर्थयात्राप्रसंगीं त्यांनीं ग्रंथलेखनास प्रारंभ केला. तेव्हां एका गांवांत मुक्काम असतां तेथील कोणा पंडिताचें प्रवचन ऐकून जनार्दनस्वामींनीं आपल्या या उमेदवार शिष्याला भागवत पुराणांतील एखादा विषय प्रतिपादन करण्याची आज्ञा केली व ह्या आज्ञेल प्रवचनानंतर चतुःश्लोकी भागवतावरील मराठी टीकेचें फळ आलें. एकनाथांचा यानंतर आत्मविश्वास वाढला व ते मरेपर्यन्त ग्रंथलेखन करीत राहिले.

एकनाथांनीं गुरुगृहीं जे वेदान्तविचार शिकून पचविले, त्यांत कांहीं नवा उन्मेष आहे. ज्याला परमार्थ म्हणतात तो जगाला सोडून केवळ आत्मसुखांत रमण्यासाठीं नाहीं, तो लोकोद्धारासाठीं आहे, अशी त्यांची खात्री झालेली होती. त्या खात्रीनेंच एकनाथांनीं आपल्या व्यावहारिक जीवनाला वळण देऊन लोकसेवा केली. त्यांची लोकसेवा समाजांतील जातिभेद ओळखीत नव्हती. स्त्रीपुरुष या भेदालाहि त्यांच्या विचारसरणींत थारा नव्हता. त्यांची समत्वदृष्टि केवळ मनुष्यापुरती आकुंचित नव्हती, तिच्या कृपाळू व्यापांतून पशूदेखील सुटले नव्हते. त्यांच्या वर्तनक्रमांतील हा समाजांतील जातिभेदाला झिडकारणारा व पशूंनाहि जवळ करणारा लोकोत्तर परमार्थ त्यांच्या जीवनकालांत सामान्य जनतेला जसा मार्गदर्शक ठरला तसाच तो आजदेखील मार्गदर्शक व्हावा अशी त्याची देशकालाच्या मर्यादेला ओलांडणारी थोरवी आहे. पितरांच्या श्राद्धप्रसंगीं महारांना भोजनास बोलावणें, चुकलेलें महाराचें मूल बरोबर घेऊन महारवाड्यांत जाऊन त्यास त्याच्या आईकडे पोंचविणें, तुरुंगांतून पळालेल्या गुन्हेगाराला आपल्या घरीं ठेवून घेऊन त्याच्या आयुष्याला नवी गति देणें, काशीहून रामेश्वरास चालविलेल्या गंगेच्या कावडींतलें पाणी तहानेनें तडफडत पडलेल्या गाढवास पाजून, 'हाच माझा रामेश्वर' अशा भावनेची कृतार्थता व्यक्त करणें या साऱ्या कथा-आख्यायिका एकनाथांच्या श्रेष्ठ चारित्र्याचा परिचय करून देणाऱ्या आहेत. म्हणूनच तात्पर्यार्थानें असें पटणारें आहे कीं, ज्याच्या व्यवहारांत हिंदु समाजांतील अंत्यज म्हणजे महार आणि

जनावरांतील अंत्यज म्हणजे गाढव यांच्याविषयीं समानदृष्टि आढळते, असा एकच एक सन्त आपल्या देशांत होऊन गेला; तो म्हणजे एकनाथ. रोग बरे करणें, मृताला जिवंत करणें, अचेतन पदार्थांना सचेतनासारखीं कामें करावयास लावणें, असल्या गोष्टी साऱ्या संतांच्या चरित्रांतून सामान्यपणें जोडलेल्या आढळतात. एकनाथांच्या चरित्रांतील ज्या गोष्टींचा आतां उल्लेख केला तशा गोष्टी इतर संतांच्या चरित्रांतून सांपडत नाहींत, यासाठींच एकनाथांचा अभ्यास करणारांनीं सदर गोष्टीकडे अधिक लक्ष देणें, त्यांचा विश्वास बाळगणें व त्या यथाशक्ति आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करणें, यांतच आत्मकल्याण व समाजकल्याण असल्याचें न विसरणें अत्यंत श्रेयस्कर ठरतें.

एकनाथचारित्र्याचें थोडेसें दर्शन आपण घेतलें. परंतु त्यांच्या कामगिरीचा आणखी एक पैलू दाखविल्याखेरीज गत्यंतर नाहीं. एकनाथ जगाच्या उद्धाराची धुरा अंगावर घेऊन लोकसेवेला प्रवृत्त झाले त्या वेळीं ज्ञानेश्वरांनीं ज्या भक्तिमार्गाच्या इमारतीचा पाया घातला व ज्यावर नामदेवांनीं भक्तिमार्गाच्या आस्थेवाईक यात्रेकरूंसाठीं इमारत उभारली ती मधल्या दोनशें वर्षांत मोडून कोसळली नसली तरी तिला भेगा पडल्या होत्या, त्यांतून वडपिंपळासारख्या, इमारती धुळीस मिळविणाऱ्या, झाडांनीं मुळें धरलीं होतीं, त्या मार्गाची रहदारी थंडावल्यानें त्यावर कांटेकुटे पसरून त्याची स्वच्छता व स्पष्टता मावळली होती. एकनाथांना ही सारी स्थिति बदलून टाकायची होती, म्हणून त्यांनीं भोंवतालीं रान माजून लोकांच्या दृष्टीआड झालेल्या ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार शेवटास नेला. या संबंधाची आख्यायिका अतिशय सूचक आहे व तिचा अर्थ काय हें सांगण्याचा मोह आवरण्यासारखा नाहीं. एकनाथांना असें कळलें कीं, ज्ञानदेवांचा गळा पिंपळाच्या मुळांनीं आवळला गेला आहे. येथला पिंपळ हा खराखुरा पिंपळाचा वृक्ष नसावा, हें अजानवृक्ष या शब्दांवरून समजण्याजोगें आहे. आख्यायिकेंत अजानवृक्षाच्या मुळांनीं ज्ञानेश्वरांची गळचेपी चालविली होती, असा मजकूर दृष्टीस पडतो. अजान हा अज्ञान या शब्दाचा अपभ्रंश असल्याचें समजतां येतें व त्यावरून ह्या आख्यायिकेंतील चमत्कार नाहींसा होऊन बुद्धीला पटतें कीं नामदेवानंतरच्या दोनशें वर्षांत ज्ञानेश्वरांची शिकवण अज्ञानाच्या दडपणाखालीं सांपडल्याची कल्पना प्रस्तुत आख्यायिकेंत भोळ्या भाविकांना रुचणाऱ्या चमत्काराच्या कथेंत भरलेली आहे. ज्ञानेश्वरांचें समाधिस्थान आजूबाजूचें रान तोडून एकनाथांनीं लोकांना सुगम केलें असेल, यांत संशय नाहीं, पण ज्ञानेश्वराच्या गळचाची मुळी तोडली म्हणजे त्यांची शिकवण अज्ञानाच्या दडपणांतून सोडविली, हें रहस्य जास्त उद्‌बोधक आहे व त्याला पुराव्याचाहि आधार आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रती जमवून त्याची पाठशुद्धि करणारे पहिले संशोधक एकनाथ ही गोष्ट सर्वमान्य आहे. ज्ञानेश्वरांचा ग्रंथ त्यांतील पाठ शुद्ध करून लोकांच्या अभ्यास-

क्षेत्रांत आणून सोडल्यानें चमत्काराच्या भाषेंतील ज्ञानेश्वरांच्या गळ्याला जाचणारी झाडाची मुळी तुटली. परंतु एकनाथ एवढ्यावरच थांबले नव्हते. ज्ञानेश्वरीचा त्यांच्या बुद्धीवर केवढा प्रभाव होता, याची साक्ष एकनाथांनीं भागवत पुराणाच्या अकराव्या स्कंदावर लिहिलेली मराठी टीका वाचतांना पटते. त्या टीकेंत ज्ञानेश्वरीच्या कल्पनांचाच केवळ अंतर्भाव झालेला नाहीं तर कित्येकदां ज्ञानेश्वरींतल्या ओव्यांचे चरणचे चरण एकनाथांनीं आपल्या रचनेंत गोवले आहेत असें आढळतें. ज्ञानेश्वरीच्या जीर्णोद्धाराचा हा दुसरा पुरावा आहे. ज्ञानेश्वरी हें महाराष्ट्रांतील मध्ययुगीन भक्तिमार्गाचें प्रारंभस्थान आहे. तें स्थान उजळल्यावर पुढील मार्ग आपोआप ओळखला जाऊं लागला. भक्तिबोधाचा ज्ञानेश्वरी हा बिनमोल ठेवा जनतेच्या पदरांत टाकून एकनाथांनीं जनतेच्या पारमार्थिक आस्थेला संजीवनी पुरविली. ती आस्था ताजीतवानीच नव्हे तर सकस केली. एकनाथांच्या कर्तबगारीचा जो महत्त्वाचा पैलू म्हटला तो हाच.

आतां आपण एकनाथांच्या ग्रंथरचनेचा जास्त विचार करण्याला हरकत नाहीं. एकनाथांचे सहा स्फुट ग्रंथ आहेत व ते हस्तामलक-शुकाष्टक, यांसारख्या स्तोत्रांवरील टीकांचे आहेत. चतुःश्लोकी भागवताचा निर्देश केलाच आहे. याखेरीज ज्यांना स्वतंत्र रचना म्हणतां येईल असें थोडेसें स्फुट लेखन आहे. परंतु प्रख्यात ग्रंथ प्रामुख्यानें तीनच सांगतां येतात. एक भागवताच्या एकादश स्कंधावरील विस्तीर्ण टीका, दुसरा 'रुक्मिणीस्वयंवर', आणि तिसरा 'भावार्थ रामायण.' हा तिसरा ग्रंथ फार मोठा आहे व त्याचें पारायण विशेष प्रमाणामध्यें होत नाहीं. याखेरीज त्यांचे हजारों अभंग असून 'भारुड' या नांवानें प्रसिद्ध असलेला स्फुट लेखनाचा एक संग्रह आहे व तो लोकांना आवडतो, असा अनुभव आहे. भागवताच्या अकराव्या स्कंधांतील विवेचनाचें गीतेच्या उपदेशाशीं पुष्कळ सादृश्य असल्यामुळें ज्ञानेश्वरीच्या छटा एकनाथांच्या टीकेंत कां उतरल्या हें उमजूं शकेल. गीतेंत अर्जुनाला श्रीकृष्णानें केलेला उपदेश आहे तर अकराव्या स्कंधांत श्रीकृष्णानें उद्धवाला केलेला उपदेश आहे. त्यांत गीतेंतील विचार यावे हें आश्चर्य नाहीं. गीतेचा आदर्श पुढें ठेवूनच उद्धवासाठीं असलेला उपदेश भागवतकारानें निर्माण केलेला आहे. रुक्मिणीस्वयंवरांत जीव-शिव किंवा आत्मा-परमात्मा यांचें अंतिम ऐक्य रुक्मिणी-कृष्णांच्या विवाहकथेनें दाखविलेलें आहे. त्याचें मूळ भागवतामधील कथा हेंच असलें तरी एकनाथांनीं त्याला स्वतंत्र रूप दिलेलें आहे. रुक्मिणी हा परमात्म्याच्या प्राप्तीसाठीं तळमळणारा जीव, रुक्मिणीचा भाऊ व शिशुपालादि इतर व्यक्ति ही त्या जिवाची परमात्म्याशीं गांठ पडूं न देणारीं विघ्नें, त्यांची मात्रा चालू न देतां रुक्मिणीनें अर्थात् जीवानें श्रीकृष्णाशीं म्हणजे परमात्म्याशीं आपलें ऐक्य साधलें, अशा धोरणाचें हें रूपक आहे. रुक्मिणीस्वयंवराचा विषय प्रापंचिक व्यवहारांतील विषय असल्यानें त्याच्या निवेदनांत सहजगत्या एकनाथकालीन

लोकस्थितीचें प्रतिबिंब उमटून लोकांच्या सामाजिक जीवनाची नीट ओळख व्हायला ह्या प्रतिबिंबाचा उपयोग होऊं शकतो. अशीच स्थिति नाथांच्या भावार्थरामायणाची आहे.

हा ग्रंथ एकनाथांच्या लेखणींतून उतरलेला शेवटचा ग्रंथ असून त्यांत रामाचें चरित्र पारमार्थिक शिकवणीनें सजविलेलें आहे. रामाच्या जन्मकाळीं कौसल्येस होणारे डोहाळे, सीतास्वयंवर, रामाचा वनवास, सीताहरण, रामाचा विरह, राम-हनुमानभेट, लंकेवर स्वारी वगैरे रामचरित्राचे तपशील सर्वांच्या परिचयाचे असले तरी एकनाथांनीं ह्या मूळ तपशिलामध्यें तत्कालीन देवदेवता, गांवें, खेडीं, लोकांची राहणी यांचा संबंध जोडून वेगळाच रंग भरला आहे. रामाचा बाण लागून धावणाऱ्या मारीच राक्षसाच्या संदर्भात नगर-नाशिक जिल्ह्यांतील गांव-खेड्यांचीं नांवें आलेलीं आहेत. विरहाकुल रामाला सीतेच्या रूपानें फसविण्याकरितां आलेल्या पार्वतीला ओळखून रामानें तिची फजिती उडवून तिला इहलोकीं राहावयास लाविलें व तीच तुळजा भवानी नांवानें प्रसिद्धि पावली. हें आख्यान सांगतांना एकनाथांनीं या देवतेच्या तुकाई या नांवाची जी उपपत्ति लिहिली आहे ती विशेष मनोरंजक आहे. जणूं काय रामकाळीं मराठी भाषा दंडकारण्यांत चालू होती, अशा धारणेनें एकनाथांनीं रामाच्या तोंडीं पार्वतीला अनुलक्षून 'तूं कां आई इथें' असा प्रश्न वदविला आहे. या 'तूं का आईचें तुकाई' असें संक्षिप्त रूप लोकांनीं स्वीकारलें व तेंच नांव रूढ झालें. ही एक तुळजा भवानीची जन्मकथा आणि तिच्या नांवाची व्युत्पत्ति झाली. अशा कितीतरी शब्दांच्या व्युत्पत्ती एकनाथ सांगतात. एकनाथांनीं आपल्या रामायणांत रामाविषयीं ज्या कथा पुराणांच्या द्वारें लोकप्रिय झाल्या होत्या त्यांतील पुष्कळांचा आदर केलेला आहे. पण त्यांनीं स्वतःच्या काळीं लोकांना गांजणाऱ्या इस्लामी सुलतानशाहीचें जें चित्र रेखाटलें आहे त्याकडे लक्ष दिल्यास रामचरित्रकथनाचें निमित्त घेऊन एकनाथ आपल्या काळांतील राजकीय व सामाजिक इतिहास अप्रत्यक्षपणें निवेदन करीत असल्याची खूणगांठ अभ्यासकाला आपल्या मनांत बांधतां येते. एकनाथकालीन तीर्थस्थ व इतर ठिकाणचे ब्राह्मण कसे पराकाष्ठेचे स्वार्थी आणि नास्तिक होते, याचाहि खुलासा नाथांच्या रामायणांत पाहायला सांपडतो. ब्राह्मणांचा स्वधर्माभिमान किती खालावला होता, याच्या स्पष्टीकरणांत ब्राह्मण गायत्रीसारख्या वेदांतील महामंत्राचीं अनुष्ठानें परक्यासाठीं करण्याला कचरत नाहींत याचा जो शोचनीय पाढा एकनाथांनीं ठिकठिकाणीं आपल्या ग्रंथांतून वाचलेला दृष्टीस पडतो तसाच तो रामायणांतहि पाहायला सांपडतो. ब्राह्मणांवर नाथांनीं कोरडे ओढतांना जी दृष्टि बाळगली होती, ती विशद केल्याशिवाय ह्या विषयाचें रहस्य आकलन व्हावयाचें नाहीं. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' समाज-व्यवस्थेंत ब्राह्मण याप्रमाणें अग्रेसर असतां त्यानें जर आपली समाजोद्धाराची

जबाबदारी योग्य रीतीनें पाळली नाहीं, तर समाजानें कुणाच्या तोंडाकडे पाहून आपलें जीवन सुधारायचें हा प्रश्न नाथांसमोर होता. समाजाला स्वराज्य असेल तर राज्यकर्त्यांकडून उचित नीतिमार्ग दाखविला जातो. पण एकनाथांच्या काळीं स्वराज्य नव्हतें, त्याच्या अभावीं ब्राह्मणांनीं समाजाचें नेतृत्व करायचें तर धर्माच्या संकुचित भावनेनें ते आपल्या बडेजावींत आणि ख्यालीखुशालींत मग्न झालेले, असा प्रत्यक्ष अनुभव एकनाथांच्या वांटणीस आलेला होता. सर्वांविषयीं समदृष्टि बाळगून वागतात म्हणून ब्राह्मणांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला होता, त्यांनीं भागवत मराठींत लिहायला आरंभ केला, यासाठीं त्या ग्रंथाची परीक्षा होण्याकरितां एकनाथांना काशीस जायला ब्राह्मणांनीं भाग पाडलें. काशीस त्यांचा गौरव झाला व विजय मिळवून ते पैठणास परत आले, हें तेथील ब्राह्मणांचें दुर्दैव, परंतु ब्राह्मणांनीं छळाच्या हेतूनें हा प्रकार घडवून आणला याबद्दल शंका नको. आपलें महत्त्व येनकेन प्रकारेण टिकवून धरण्याची ही ब्राह्मणांची क्षुद्र वृत्ति बाकीच्या समाजाला अधोगतीस नेणारी आहे. याची आंच एकनाथांना असल्यानें त्यांनीं आपली कर्तव्यनिष्ठा मरेपर्यन्त कायम ठेवली. ब्राह्मणांना आपली समाज-नेतृत्वाची जबाबदारी समजावी, हा नाथांचा उद्देश त्यांनीं ब्राह्मणांवर केलेली टीका मननपूर्वक पाहिल्यास ध्यानांत येऊं शकतो. ब्राह्मणांचें स्वार्थ हें दैवत कसें बनलें होतें, तें किती स्पष्ट स्वरूपाचें होतें, याची कल्पना एकदोन उदाहरणांनीं येईल.

पंचवटीस रामाचें वास्तव्य असतां त्याचा दानधर्माचा फायदा मिळण्यासाठीं ब्राह्मण त्याच्या आश्रयास आले. पुढें जेव्हां रामाचा व राक्षसांचा संग्राम उद्भवला तेव्हां रामाचा पराभव होईल व त्याच्या आश्रयास राहिल्याबद्दल राक्षस आपल्याला त्रास देतील या भीतीनें ब्राह्मणांनीं रामाचा संबंध सोडला. रामानें राक्षस मारले व त्यांच्या शिबिरांत त्यांच्या स्त्रिया निस्त्राण झालेल्या दिसतांच ब्राह्मणांनीं त्यांना लुटलें. पुनः राक्षसांचें नवें सैन्य रामावर चालून येतांना पाहिलें तेव्हां तें लुटीचें द्रव्य ब्राह्मणांनीं राक्षसस्त्रियांच्या हवालीं करून तें द्रव्य सुरक्षित ठेवण्याकरितां आपण नेलें होतें, आतां आलेलें नवें सैन्य तुमचें रक्षण करील म्हणून तें द्रव्य जसेंच्या तसें परत करीत आहों, या आमच्या निरपेक्ष कामगिरीची येणाऱ्या राक्षसांजवळ शिफारस करून आम्हांला त्यांच्या तडाक्यांतून वांचवा, अशी ब्राह्मणांनीं राक्षसस्त्रियांशीं काकळूत चालविली. एकनाथांनीं या दुटप्पी ब्राह्मणां-बद्दलचा आपला प्रतिकूल अभिप्राय राक्षसस्त्रियांच्या उद्गारांत घातलेला आहे. दुसरें उदाहरण लंकेंतल्या ब्राह्मणांचें आहे. यांना राक्षसराजाचे आश्रित म्हणून ब्रह्मराक्षस अशी एकनाथांची संज्ञा असली परी ते पिशाच्चापैकीं नव्हते. त्यांचें वर्तन राक्षसासारखें होतें, यामुळें त्यांची गणना एकनाथांनीं राक्षसांत केली. राक्षसांची सेवा करण्यांत धन्यता मानणारे हे अग्निहोत्री ब्रह्मराक्षस सज्जनांना अस्पृश्य मानीत होते. इतरांची छायादेखील आपल्यावर पडूं न देण्याची दक्षता ते दाखवीत होते, अशी

त्यांची राक्षसांना शोभणारी क्रूर वृत्ति एकनाथांनीं वर्णिलेली आहे. हे लंकेंतले ब्रह्मराक्षस म्हणजे स्वजनांना हेटाळणारे, विटाळचांडाळाच्या भ्रमानें स्वकीयांना दूर लोटणारे एकनाथकालीन ब्राह्मण होते याविषयीं एकनाथांचें चरित्र शंका राहूं देत नाहीं.

एकनाथांचे राक्षस दाढीवाले आहेत. राक्षस निरनिराळीं रूपें घेत असल्याचीं वर्णनें पुराणांतून आहेत, परंतु त्या वर्णनांत राक्षसांना दाढी असल्याची खूण सांपडत नाहीं. मुसलमान राज्यकर्त्यांची दाढी डोळचांसमोर ठेवून त्यांच्या प्रतिमा एकनाथांनीं आपल्या रामायणांत उभ्या केल्या आहेत असा बोध अभ्यासकांना ग्रहण करतां येतो. मारुति लंकेंत सीतेच्या शोधासाठीं असल्या वेळीं त्याचा धुमाकूळ थांबवितांना रावणानें आपल्या प्रजेचे निरनिराळचा रीतीनें हाल केले आहेत, त्यांची मुसलमानी कारभाराशीं सहज तुलना करतां येते. हा विषय भावार्थ रामायणामध्यें दिसणाऱ्या इतिहासकालीन लोकस्थितीचें व राज्यकारभाराचें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं व त्या ग्रंथाची महती दर्शविण्यासाठीं येथें मांडला आहे. या प्रकरणाला भारुडांतील कविता जोडल्या कीं आणखी स्पष्टपणा येतो. भारुडांतील जे महारांचे अर्ज घातले आहेत, त्यांवरून गांवचे पाटील, पाटलीण, कुलकर्णी, महाजन, शेटचे, वगैरे अधिकारी व प्रतिष्ठित व्यक्ति सामान्य प्रजेशीं किती शिरजोरीनें वागत होत्या, याची अटकळ करतां येते. ही मनुष्यदेहाच्या अंतर्बाह्य व्यवहाराचीं रूपकें आहेत. परंतु खेडचांना मुसलमानी भाषेंत 'देह' असेंच नांव असल्याचें न विसरल्यास हें केवळ मानवी देहाच्या कारभाराचें रूपक नसून खेडचांतील जीवनाचें रूपक आहे, असें मानल्यास ज्ञानाची ओढाताण होत नाहीं, उलट तत्कालीन इतिहासावर प्रकाश पडतो. महारांच्या अर्जाखेरीज वाळसंतोष, वासुदेव, सरवदा, भविष्यवादी, गांवजोशी, गांवचा जागल्या, लोकांना चोर दरवडेखोरांपासून सावध राहण्याचा रात्रीं आरोळीनें सूचना देणारा, दिवसां मशालीनें उजेड पुरविणारा, कोल्हाटी, देवीचा भुत्या, गांवगुंड, एवढेंच नव्हे तर आंधळे, पांगळे, बहिरे, मुके, कुत्रे, बैल, एडके यांचाहि एकनाथांनीं आपल्या भारुडाच्या कवित्वांत आदर केला आहे. एका स्फुटांत एकनाथांनीं आपल्या वेळच्या भोंदूंची यादी दाखल केलेली आहे. आणखी एका कवितेमध्यें एकनाथांनीं हिंदु व मुसलमान यांच्यांतील संवाद लिहिला आहे. या संवादाच्या शेवटीं आचारभेदानें ईश्वराच्या कल्पनेंत भेद उत्पन्न होत नाहीं. हिंदु-मुसलमानांचा देव एकच, याची जाणीव संवादाच्या शेवटीं दोघांमध्यें उत्पन्न करून दोघे एकवटले, आपसांतलें द्वैत विसरले, दोघांत सख्यभाव संचरला, असें तात्पर्य एकनाथांनीं या संवादांतून काढलें आहे.

भारुडाच्या स्फुटांतून 'सर्वांभूतीं परमेश्वर' या सिद्धांताचें विवेचन पाहायला सांपडतें. परंतु या विवेचनाच्या मांडणींत क्वचित् उपरोध, विनोद हे वाङ्मयगुण झळकून जातात. लोकांत परमार्थासंबंधीं जे भ्रम पसरले होते, ते उघड होतात.

त्यांचे चुटके येथें सांगितल्यास ते अप्रासंगिक ठरणार नाहींत. उदारणार्थ, ब्राह्मण व बैल यांच्यांतला एक संवाद आहे. बैलाला ओझ्याचें जनावर लेखून ब्राह्मणानें त्याला हिणवलें, तेव्हां बैल संतापून ब्राह्मणाला आपला एकेक गुण व प्रभाव सांगूं लागला. ब्राह्मणानें दिलेली शिवी ऐकून शंकराच्या देवळांतील दगडी नंदीच्या हीन अवयवाला स्पर्श करावा लागतो, याची बैलानें ब्राह्मणाला आठवण करून दिली. त्यावर, 'काय बेटा बेवकूब ढोरगा' असे शब्द उच्चारून त्याला हाकलून लावण्याचा या ब्राह्मणानें विचार केला, त्यासरशीं बैलानें म्हटलें कीं, 'आम्ही नसूं तर तुम्ही भिकारी ठराल'. 'आम्ही भाग्यवान् आहों,' असे ब्राह्मणाचे शब्द कानीं पडतांच, 'बाबारे, आमच्या साह्याखेरीज तुम्हांला यात्रा करणें शक्य नाहीं. आमच्या शेणानें तुमचीं घरें स्वच्छ केलीं जातात.' 'शेणाचा जर असा महिमा तर आम्हांला नीच लेखण्यांत स्वारस्य काय?' अशी खोंच या उत्तरांत आहे. 'आम्ही ब्राह्मण कसे थोर' तर 'नित्य गांजा सुरापानी' ही एकनाथांनीं ब्राह्मणाच्या तोंडीं घातलेली निंदाव्यंजक आत्मश्लाघा लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शेणाच्या उपयोगाचा दाखला ऐकून ब्राह्मण खूप चिडला व 'गप्प राहा, नाहींतर हाणीन रागें' असें बोलला, पण माराच्या धाकाला भीक न घालतां एकनाथांच्या कवितेमधील या बैलानें 'मी कमी नाहीं, माझीं तिखट आहेत शिंगें' असा उलट धाक दाखविला. 'थांब तुझी अशी सहज खोड मोडणार नाहीं, तुझ्या पाठीवर जड ओझें लादून तुला मट्टयास आणतों,' अशी पुनः धाकदपटशाची भाषा ब्राह्मणानें उच्चारली. तथापि तो बैल कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें झटकन् उत्तर केलें, 'माझ्यावर ओझें लादून तर पाहा, तें मी ओस रानांत नेऊन पाडीन,' येथें कविता संपली. हा एक मासला झाला. दुसरा मासला याहून जास्त बहारीचा व बोधप्रद आहे. एका ब्राह्मणानें भाकरीचा तुकडा दाखवून, 'ये रे कुत्तु ये' म्हणून कुत्र्याला बोलावलें. कुत्रें जवळ येतांच, 'विटाळ करूं नको,' असें ब्राह्मणानें त्याला बजावलें. 'तुझ्याखालीं विटाळ आहे, तो आवर' असा कुत्र्यामार्फत उत्तराचा फटका बसतांच, 'हें कुत्रें माजलें' अशा हृद्गताच्या अनुरोधानें दोघांमध्यें आक्षेपप्रत्याक्षेप सुरू झाले. 'सर्वांघटी जो ईश्वरांश नांदतो, तोच माझ्या ठिकाणीं आहे.' हा कुत्र्याचा बोल ब्राह्मणाला रुचला नाहीं, 'आम्हीं तुला कुत्रा म्हणतों,' या शब्दानें कुत्र्याचा ब्राह्मणानें उपमर्द केला. 'हा अविद्येचा प्रभाव आहे. अविद्येनें तुला धत्तुरा दिला.' असें कुत्र्याचें उत्तर सज्ज होतेंच. 'ब्राह्मणासी अविद्या म्हणसी?' हा ब्राह्मणाचा प्रश्न, तर 'देहें ब्राह्मण कैसा होशी?' हा कुत्र्याचा प्रतिप्रश्न. ब्राह्मण जन्मानें श्रेष्ठ असें वेदांत सांगितलें, त्याचा आधार ब्राह्मणानें दाखविला. पण कुत्रें वेदाच्या आधाराला दबणारें नव्हतें. 'तुम्ही जर एवढे श्रेष्ठ तर मरतां कसे? मरण जसें आम्हांला तसेंच तुम्हां वेदोक्त श्रेष्ठांनाहि टळत नाहीं, असें कां?' यावर 'मरत कोण नाहीं?' असा ब्राह्मणानें प्रश्न

केला. 'हरिभक्त अमर होती,' असें कुत्र्यानें सांगितलें. 'असें कैसें–आपण व्हावें तैसें,' ही प्रश्नोत्तरांची आणखी एक चकमक उडाल्यावर एकनाथ, 'जात, गोत, नातें, देहभेद यांकडे पाहूं नये.' अशा सिद्धान्तावर आले. 'हें तुला ज्ञान कशानें झालें, तर एका-जनार्दनगुरुकृपें आलें,' एकनाथांनीं भारूडाच्या कवितेंत पुष्कळदां गुरुकृपेचा निर्देश केला आहे. एकनाथांनीं जानार्दनस्वामींपासून आत्मोद्धाराची व स्वजनोद्धाराची कोणती गुरुकिल्ली हस्तगत केली होती याची सूचना या गुरुकृपेच्या उल्लेखांतून सापडते.

एकनाथांच्या काळापर्यंत मुसलमानांचा अंमल महाराष्ट्रांत स्थिरावला असल्यामुळें मराठी भाषेंत फारसी-अरबी शब्द शिरले याचा प्रत्यय भागवतटीका, भावार्थ-रामायण, रुक्मिणीस्वयंवर या वाङ्मयांत अगदीं थोड्या प्रमाणांत येतो. हे ग्रंथ साक्षर किंवा विद्यावंतांसाठीं असल्यानें व परमार्थाची भाषा संस्कृताची आश्रित होती म्हणून तेथें फारसी-अरबी शब्द अगदींच किरकोळ प्रमाणामध्यें दिसतात. भारुडांतील स्फुटांची रचना सामान्य बहुजनांसाठीं होती, शिवाय तिच्यांत नाट्य आहे, यामुळें तेथें फारसी-अरबी शब्दांचा भरणा जास्त दिसतो. त्यांत पुनः बारकाईनें पाहिल्यास महारांच्या अर्जांतून त्या शब्दांची रेलचेल आहे व तसें होणें स्वाभाविक आहे. या अर्जाचा दरबाराशीं संबंध होता व त्या वेळच्या दरबारांत ज्या भाषेनें दाद मागितली जात असे तीच पद्धत वास्तवतेला धरून एकनाथांनीं स्वीकारली आहे. अरबी-फारसीच्या शिरजोरीला स्वभाषेंतील ग्रंथरचनेचा बांध घालून भाषेबरोबरच महाराष्ट्रांतील हिंदु संस्कृतीचें रक्षण संतांनीं केलें हें श्रेय ज्यांना संतांविषयीं आदर नाहीं, त्यांनाहि संतांच्या पदरांत टाकणें भाग पडलें, याची येथें आठवण करून देणें बरें.

संस्कृतिरक्षणाच्या कामगिरींत भावार्थरामायणाची महती विशेष आहे. भावार्थ-रामायणाची उभारणी आपल्या पाठीस लागून प्रत्यक्ष श्रीरामच करवीत आहे, असें त्या ग्रंथांत एकनाथ वारंवार आवर्जून सांगतात, पण इतिहासांत शिरून या रचनेचे धागेदोरे उकलूं लागल्यास कांहीं तरी अधिक रहस्य दृष्टोत्पत्तीस येतें. एकनाथांच्या आधीं व नंतर जीं रामायणें चार दिशांस झालीं. त्यांविषयीं केवळ यदृच्छा किंवा योगायोग मानतां येत नाहीं. त्या काळीं इस्लामी भाषेंत रामायणाची कथा गेली. याचा विचार करतांना सामाजिक अवनति थांबविण्यासाठीं रामाचें चरित्र अधिक उपयोगी, असें सोळाव्या शतकांतील स्वजनोद्धारक विचारवंतांना पटलें होतें, याबद्दल खात्री पटते. ज्या काळांत आपल्या मुलीबहिणींना बादशाही जनानखान्यांत आपखुशीनें दाखल करण्याचें हिंदु राजेरजवाडयांना लांछन वाटण्याऐवजीं भूषण वाटूं लागलें होतें, ज्या काळांत भाऊबंदकींत सरशी होण्यासाठीं स्वजनांविरुद्ध बादशाही दरबारांत किटाळें उठविण्याचा धंदाच होऊन बसला होता, ज्या काळांत वचनें पाळण्याच्या नीतीला किंमत उरली नव्हती,

उलट या बोटावरची थुंकी त्या बोटावर दाखवून लोकांची वंचना करण्याची करामत हीच व्यावहारिक चातुर्याची पराकाष्ठा समजली जात होती, ज्या वेळीं स्वार्थापुढें धनी-नोकर, बाप-लेक, भाऊ-भाऊ, पति-पत्नी, हे सर्व संबंध ढिलावून कोणत्याहि संबंधाचें पावित्र्य किंवा मर्यादा उरली नव्हती, अशा वेळीं डोळ्यां-देखतच्या दारुण सामाजिक ऱ्हासांतून समाजापुढें रामचंद्राचा आदर्श ठेवण्याची अपरिहार्य आवश्यकता समाजोद्धाराचा विचार करणारांना प्रेरक होऊन त्यांनीं रामायणें लिहिलीं असा तर्क करायला जागा आहे. रामाचें चरित्र हा भारतीय संस्कृतीचा उच्चतम बिंदु असल्याचें मुद्दाम सांगायला नको. श्रीरामचंद्र हा पुरुष एकवचनी, एकबाणी व एकपत्नी होता. उत्तम पुत्र, उत्तम पति, उत्तम पिता, उत्तम भ्राता, उत्तम स्वामी, उत्तम नेता व उत्तम मित्र, सारांश, व्यक्ति व एक समाजघटक या भूमिकेला नीतिदृष्ट्या शोभणारीं सर्व कर्तव्यें यथासांग सिद्धीस नेणारा अशी या पुरुषाची ख्याति आहे. ऐन राज्याभिषेकाच्या वेळीं सावत्र आईच्या कारवाईनें सिंहासनाऐवजीं वनवास वांट्यास आला तर त्यानें भावांच्या द्वेषाला आपल्या हृदयांत थारा दिला नाहीं; सावत्र आईनें बापाला पूर्वीं दिलेल्या वचनांत पकडून हा वनवासाचा प्रसंग उत्पन्न केला. पण वचन बापाचें असलें तरी तें मुलानें पाळलें पाहिजे असा बाणा आदरून रामानें अत्यंत आनंदानें वनवास पत्करला. वनवासांत रावणानें बायको पळविली तर लंकेवर स्वारी करून रामानें तिला सोडविलें. सुग्रीव आंणि बिभीषण यांच्या मित्रत्वाला केव्हांहि उणेपणा येऊं दिला नाहीं, कैकयीबद्दल आई म्हणून वाटणारा पूज्य भाव शेवटपर्यंत अढळ राखला, 'मरणान्तानि वैराणि' या न्यायास अनु-सरून रामानें रावणाबद्दल गौरवबुद्धि दाखविली. रामाचे हे गुण लोकांना शिकविल्यास समाजाचा ऱ्हास थांबेल अशा विश्वासानें एकनाथांनीं रामायण लिहिलें. त्यांत भक्तिरस ओतप्रोत भरलेला आहे. पण व्यावहारिक नीतीच्या उपदेशाचा कोणताहि रामचरित्रांतला प्रसंग एकनाथांनीं वांया दवडलेला नाहीं. एका प्रसंगानें एकनाथांच्या लेखनदृष्टीची कल्पना करतां येईल. लंकेची लढाई संपली, सीतेची सुटका झाली. सीतेला रामानें भेटीस बोलावलें, वानरसेनेचा अग्रणी व बिभीषण ही मंडळी सीतेला आणण्यासाठीं पालखीचा लवाजमा घेऊन सीतेकडे गेली. त्यांनीं रामाचा निरोप सांगून तिला पालखींत बसण्याबद्दल विनविलें. एखादी सामान्य स्त्री असती तर ती कदाचित् पालखींत बसण्याची विनंति ऐकण्यापूर्वीच पालखींत विराजमान झाली असती व पालखी चालविण्याची त्वरा तिनें निदर्शनास आणली असती. रावणाच्या बंदीखान्यांत अहोरात्र रामासाठीं झुरणारी विरहिणी सीता ही रामाची पत्नी असल्यानें ती पालखीसमोर आली, तिच्यांत बसण्याचा मारुति-बिभीषणांनीं आग्रह केला तरी सीता जागची हलेना. आपल्या मुग्धतेचा अर्थ आग्रह करणारांना समजेल ही तिची अपेक्षा

फुकट गेली, इतकेंच नव्हे, तर त्यांची निकड फारच वाढली, असें पाहिल्यावर तिनें त्या सर्तांच्या डोळ्यांत अंजन घातलें. 'ज्याच्या भेटीस जायचें तो देवतुल्य पुरुष, त्यांतून पति; त्याच्याकडे जायचें तर पालखीच्या थाटामाटानें जाणें म्हणजे त्याचा अनादर करण्यासारखें आहे. अनवाणी पायांनीं चालत त्याच्याकडे जाण्याचा नियम तुम्हांला माहीत नाहींसें दिसतें,' असा सीतेनें टोमणा मारल्यावर पालखी नेण्याचा मूर्खपणा बिभीषणादिकांच्या ध्यानांत येऊन ते ओशाळले, त्यांनीं क्षमा मागितली, पालखी दूर हटविली, तेव्हां सीता रामाकडे जाण्यास निघाली. हा प्रसंग क्षुल्लक वाटण्याजोगा आहे, परंतु त्यांतून जी नीति एकनाथांनीं उघडकीस आणली आहे, ती महत्त्वाची आहे. व्यवहारांतील नीति याप्रमाणें कितीतरी ठिकाणीं एकनाथांनीं आपल्या रामायणांत आणून ठेवली आहे. तिचा संपूर्ण परिचय करून घेऊं इच्छिणारांनीं तो सगळा ग्रंथच मननपूर्वक चोखळण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

एकनाथांच्या उपदेशाचें एकंदर स्वरूप भक्तिमार्गाविषयीं जे ग्रह आजकाल प्रचलित आहेत त्यांच्याशीं मेळ बसणारें नाहीं. भक्ति म्हटली कीं कुटुंब, समाज यांच्याशीं कमालीची फारकत केली पाहिजे अशा कल्पनेचा लोकांवर पगडा बसलेला आहे. देव आणि भक्त यांखेरीज तिसऱ्या कुणाचाहि विचार भक्तीच्या तत्त्वज्ञानांत नाहीं, असा लोकांत दिसून येणारा एक ठाम समज आहे. भक्तानें आपल्या बायकापोरांना खुशाल भिकेस लावावें, घर सोडावें, सदासर्वदा टाळ कुटीत देवाचें भजन करावें, आणि लोकांनीं त्याला पोसावें, या समजुतीच्या आधारावर भक्तीचा विषय लोक उपेक्षेनें किंबहुना तुच्छतावृत्तीनें चघळतात. परंतु भक्तीमध्यें भजन, कीर्तन, स्मरण इत्यादि कर्तव्यांचा अंतर्भाव असला तरी कुटुंबाच्या व समाजाच्या जबाबदाऱ्या झुगाराव्या असा भाग इतर संतांच्या शिकवणींत ज्याप्रमाणें नाहीं, त्याप्रमाणें एकनाथांनीं पुरस्कारलेल्या शिकवणींतहि नाहीं. एकनाथ गृहस्थाश्रमी होते, त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या भिन्न जातीच्या व भिन्न व्यवसायाच्या संतांपैकीं बहुतेक गृहस्थाश्रमीच होते. त्यांनीं आपल्या बायकापोरांना सोडल्याचा उल्लेख कुठेंच सांपडत नाहीं. एकनाथांच्या गृहस्थाश्रमांत कसलेंच न्यून नव्हतें. त्यांची बायको, मुलें गांवांत भिक्षा मागून चरितार्थ चालवीत होतीं, असाहि प्रकार नव्हता. त्यांच्या उपदेशांत भक्तानें जगाशीं फटकून वागण्याचे विचार नाहींत.

संतांनीं आपपरभाव विसरायला शिकवून देशाचा घात केला असें मानणारा व म्हणणारा वर्ग हल्लींच्या साक्षर जनतेमध्यें फार मोठा आहे. जे संतांच्या कार्याची पूर्वग्रह टाळून परीक्षा करतील त्यांना संतांसंबंधांतील यांसारखे आरोप सोडून द्यावे लागतील. संत म्हणजे देवाचा भक्त हें समीकरण अर्वाचीन आहे, संत म्हणजे सत्पुरुष. लोकांना आपल्या आचरणानें शुद्ध व्यवहाराचा धडा घालून देणारे जे कोणी ते संत, साधु, अशी या शब्दाची प्राचीन व्याख्या आहे. पुढें ब्रह्मवेत्ता व

देवभक्ति या गुणांचा त्या व्याख्येंत समावेश झाला. देवांच्या भक्तांना संत शब्दानें ओळखण्याची प्रथा ज्ञानेश्वरकाळापासून उद्भवली असें स्थूलपणें म्हणतां येतें. देवाची भक्ति व स्वधर्माचें निरतिशय प्रेम याच दोन गोष्टींचें मोल ज्या काळांत संतांनीं वाढविलें, त्या काळांत देव आणि धर्म हीं संकटांत सांपडलेलीं होतीं. देवाची व धर्माची लोकांत पुरातन काळापासून रुजलेली आस्था जेव्हां परमार्थाच्या आक्रमणाखालीं नष्ट होण्याचा प्रसंग आला, तेव्हां सगळा समाज जागृत व संघटित करण्याला देवाधर्माचा साभिमान पुरस्कार हाच एक उपाय होता. महाराष्ट्रांतील संतांनीं ही स्थिति ओळखून देवाधर्माची आस्था वाढविण्याची कामगिरी अंगावर घेतली व लोक त्यांच्या फडावर जमा होऊं लागले. समाजामध्यें देवाधर्माचें प्रेम जागृत झालें. त्या जागृतीला संतांनीं संघटनेचें रूप दिलें. संघटनेला आपसांतील भेदभाव बाधतो, म्हणून संतांनीं त्या भेदभावावर हल्ला चढविला. देवाच्या भक्तीपुढें जातीचें स्तोम नको हा महाराष्ट्रीय भक्तिमार्गाचा पहिला दंडक आहे. समाजाला जी भाषा समजते त्या देशी भाषेंत आपली शिकवण उतरविणें हें साधन संतांनीं छळ सोसून उपयोगांत आणलें. देवाच्या उपासनेंतून जातिभेदाची हकालपट्टी संतांनीं केली व देशी भाषेंतून देवाधर्माचें जें शुद्ध ज्ञान तें शिकविण्याला प्रारंभ केला. एकनाथांच्या काळीं जुन्या क्षुद्र शेंदरी दैवतांमध्यें पीरांची भर पडली होती. पीरांची पूजा करणारा समाज आपलें स्वत्व गमावून उघडपणें जाणूनबुजून नव्हे, तर केवळ नेणतेपणानें परधर्माच्या कुशींत शिरत आहे, हा फार मोठा धोका होता. त्यांतून जनतेची बुद्धि सोडवितांना ज्या क्षुद्र देवतांच्या खुळचा भक्तीनें लोक पीराकडे वळले त्या क्षुद्र देवतांचा समाचार घेणें संतांना प्राप्तच होतें. एकनाथांच्या शिकवणींत गांवोगांव बकऱ्या कोंबड्यांचा बळी घेणाऱ्या देवतांची जी निंदा आहे तिचें कारण त्या देवता वाटेल त्या धार्मिक भ्रष्टाचाराला प्रवृत्त करणाऱ्या आहेत या खात्रीशिवाय दुसरें सांगतां येणार नाहीं. एरवीं आपसांत एकमेकांच्या उष्टचाची शिसारी बाळगणारीं माणसें दावलमलकाच्या उरुसांत प्रसाद म्हणून उष्टें खाण्याला कचरत नाहींत, हा निर्देश एकनाथांच्या शिकवणींत आहे. अशी हीन देवभक्तीची आणि भ्रष्ट कर्माचारांचीं उदाहरणें सांगूं लागलों तर खूपच विस्तार होईल. देव आणि धर्म यांच्या व्यवहारांत जो समाजाला अधोगतीस नेणारा भ्रष्ट रूढाचार माजला होता, त्याचें निरसन केल्याखेरीज जनतेच्या उद्धाराचा मार्ग निर्विघ्न होणार नाहीं, याबद्दल एकनाथांना शंका नव्हती. जातवारीनें आधींच समाज भंगलेला होता. पुढें देवतावारीनें समाजाच्या फळचा वाढविल्या. जो गणपतीचा भक्त तो देवीच्या भक्तांना परके मानतो, जो मारुतीचा भक्त तो गणपतीच्या भक्ताला दुरावतो, दत्ताचे भक्त शंकराच्या भक्ताविषयीं वैमनस्य बाळगतो तर शैव वैष्णवाला कमी प्रतीचे लेखतात. याप्रमाणें भक्तीच्या व्यवहारांत सामाजिक संघटनेचे धिंडवडे उडवणारे व

समाजाची शक्ति क्षीण करून सोडणारे प्रकार एकीकडे दिसतात तर दुसरीकडे संन्यासी वर्गाचीं माणसें, 'आपण श्रेष्ठ' या घातक भावनेच्या आहारीं जाऊन सामान्य जनतेचें कल्याण डोळ्यांआड करून त्या जनतेला जवळ येऊं देत नाहींत. वस्तुतः संन्यासधर्माच्या योगानें सर्वांना अभय लाभावें, दीनदुर्बलांचें संन्यासी म्हणजे एक निर्भय आश्रयस्थान व्हावें अशी धर्मशास्त्राची केवळ दृष्टि नव्हे तर आशा असतां संन्याशांनीं जनतेमध्यें आपल्या श्रेष्ठतेचा दंभ माजवावा याबद्दल एकनाथांना अतिशय चीड वाटत होती. अगोदर जातिभेदानें, देवताभेदानें, समाज पोखरलेला होताच, त्याला आश्रमभेदाचें साहच्य मिळत असल्याचें पाहून, एकनाथांच्या अंतरंगांत जो सात्त्विक संताप उद्भवलेला होता, त्याचें प्रत्यंतर त्यांच्या ग्रंथरचनेंत दोन वेळां तीव्रतेनें प्रगटलें आहे. रुक्मिणी व सीता यांचा विवाह उरकल्यावर वरातीच्या सोहळ्याचा प्रसंग घेऊन एकनाथांनीं त्या सोहळ्याच्या वर्णनांत आपल्या सात्त्विक संतापाच्या निदर्शनाला अवकाश दिलेला आहे. वरात पाहण्यासाठीं लोक जमतात हा अनुभव नेहमींचाच आहे. त्यांतून ती वरात जर थोरामोठ्यांची असेल तर लोकांच्या गर्दीला सीमा उरत नाहीं, हें मुद्दाम सांगायला नको. कृष्ण व राम यांची वरात म्हणजे प्रत्यक्ष अवतारी पुरुषांची वरात. लोकांनीं अनन्यपणें उपासना करावी अशा पुरुषांची वरात. ती पाहण्यासाठीं शहरांतील घराघरांतून वरातीच्या मार्गावर सर्व जातीचे लोक––स्त्रिया व पुरुष दोन्ही––खेंचाखेंचीनें गोळा व्हावे, यांत नवल नाहीं. एकनाथांनीं हा वरातीचा प्रसंग रंगवितांना दोन हेतु साधले आहेत. एक लोकस्वभावाचें चित्र रेखाटणें व दुसरें देवाच्या भक्तीचा परामर्श घेणें. भक्तीला जातिभेदाची अटक नाहीं असेंहि एकनाथांना दाखवावयाचें होतें. त्याप्रमाणें वरात पाहण्याच्या वेळीं लोक जातिभेद साफ विसरले. ब्राह्मणाला खेटून चांडाळ उभा राहिला. लोकांना देहभान उरलें नव्हतें, यामुळें स्त्रिया व पुरुष हा भेद त्या गर्दीनें तुडवून टाकला होता. सर्वांना एकच वेध होता. वरात पाहण्याच्या निमित्तानें देवाचें दर्शन घेऊन कृतार्थ व्हावें अशा एकाच ध्यासानें शहरभर लोक दाटी करून एकवटले होते. त्यांची दृष्टि देवावर खिळली होती. अंतःकरण देवाच्या ध्यानांत गुंतलें होतें. या वेळच्या एकतानतेनें जवळ स्त्री आहे का चांडाळ आहे, याकडे कोणाचें लक्ष नसणें हें स्वाभाविक आहे.

एकनाथांनीं या वर्णनांत एक वेश्या व एक संन्यासी अशीं दोन पात्रें आणन संन्यासी व्यक्तीची विपरीत वागणूक उघड केली आहे. लोकांच्या गर्दीनें आपलें पावित्र्य गमावेल, अशी धास्ती उत्पन्न होऊन संन्यासी आपल्याला कुणाचाहि स्पर्श होऊं नये, आपण कायमचे सोवळे अशा धोरणानें आजूबाजूला पाहात शहराबाहेर पळून चालला होता. त्याला देवाचें महत्त्व वाटत नव्हतें. आपला सोवळेपणा टिकावा एवढेंच त्याचें ध्येय होतें. कुणाचाहि आपल्याला

स्पर्श होऊं नये म्हणून सर्वांना चुकवीत तो अति सावधपणानें पळत असतां त्याचें दुर्दैव अकस्मात ओढवलें. त्याला कुणाचा तरी धक्का लागला. तो धक्का जर एखाद्या ब्राह्मणाचा असता तर तो त्याला कदाचित् सहन झाला असता, पण जिचा धक्का लागला ती व्यक्ति ब्राह्मण तर नव्हतीच, पण अतिशूद्रापलीकडची समजावी अशा वर्गांतली होती. ती म्हणजे एक वेश्या असून वरातीच्या सोहळ्यांत आपल्याला देवाचें रूप कसें दिसेल, या प्रश्नाच्या तंद्रींत शहराची वाट चालत असतां सदर संन्याशाला तिचा धक्का लागला. संन्यासी त्या वेळीं आजूबाजूला कोणी येतें कीं काय हें पाहण्याच्या धांदलीमुळें असावध झाला होता व त्यालाहि वेश्या समोरून येत असल्याचें समजलें नाहीं. धक्का लागतांच तो भानावर येऊन पाहातो तों वेश्येचा स्पर्श झाल्याचें त्याच्या लक्षांत आलें व रागानें वेश्यावाचक ग्राम्य शब्दाची शिवी उच्चारून त्यानें हातांतली काठी वेश्येला मारली, तेव्हां तिची तंद्री मोडली व तिनें संन्यासी पाहिला. संन्यासी व राग यांचें साहचर्य खरोखरी असूं नये; परंतु तसें साहचर्य प्रत्यक्ष माराच्या योगानें अनुभवल्यावर तिला त्याचा चमत्कार वाटला. ती आपलें दुःख विसरली व हंसून संन्याशाला म्हणाली, 'तुमच्या दंडाघातानें माझीं पापें गेलीं, हा माझ्यावर उपकार झाला. देवाच्या दर्शनासाठीं व्यवहारांतील सगळे भेदभाव विसरून जमणाऱ्या लोकांचे दोष कुणाच्या तरी वांट्यास इहलोकीं जायलाच हवे होते. तुम्ही लोकांतील स्पर्शास्पर्श भेदाचे गांठोडें (अर्थात् संन्याशाच्या कांखेतील भिक्षेची भरलेली झोळी) बगलेंत मारून शहराबाहेर पळ काढीत आहां हें देखील एक प्रकारें सयुक्तिकच समजायला हवें.' तिचे हे विनोदी उद्गार संन्याशाच्या हृदयास झोंबले व तो जास्तच खवळला. 'मला शहाणपण शिकविण्याइतकी स्वतःला ज्ञानी समजून असे फाजीलपणाचे बोल तोंडावाटें काढतेस काय ? मला भ्रष्टवून वर पुनः ही तोंडपाटिलकी ?' वगैरे आशय त्यानें रागारागानें वेश्येच्या कानावर घातला व तो निघून गेला. देवाच्या दर्शनानें आपण आज पावन होणार आहों, या भावनेच्या उत्साहानें जिनें काठीचा दणका सहन केला, तिला संन्याशाच्या रागाचे शब्द इजा करूं शकत नव्हते, हें कळण्याला कठिण नाहीं. संन्यास हा आश्रम असा कीं, ज्यांत कामक्रोध या दोघांचा गंधहि नसावा. विषयवासनेला थारा नसावा. भारुडांत संन्यासाबद्दल एकनाथांनीं म्हटलें आहे; 'अहो तुम्हीं संन्यासी झालां । काम क्रोध जवळीचा नाहीं गेला ।। व्यर्थ कां विनाश केला । सावध होई ।। १ ।। संसार व्यर्थ मांडिला । मुलाबाळा तुटी पाडिला । नारायण नाहीं जोडिला । सावध होई ।। २ ।। वर वर शेंडी बोडी । जानवें तोडून धोत्रें फाडी । हातीं घेउनि दंड लाकडी । सावध होई ।। ३ ।। वर वर म्हणसी नारायण । अंतरीं विषयावरी ध्यान । कासया संन्यास घेऊन । सावध होई ।। ४ ।। आतां एक विचार ।

घरीं तूं संताचा आधार । एका जनार्दनीं तत्पर । सावध होई ।। ५ ।।'

नाथांच्या भागवतामध्यें हाच विषय आणखी कांहीं तपशील देऊन स्पष्ट केलेला आहे. संन्यास म्हणून घरदार, बायका-पोरें सोडायचीं, गांवाबाहेर मठ बांधून त्यांत वस्ती करायची, फुलबाग उठवायचा, पण काम-क्रोध अंतरांत बाळगायचा, कोणी देवपूजेसाठीं फुलें-दुर्वा मागायला आल्यास त्याला शिव्या देऊन हाकलायचें, मठाच्या आवारांतील विहिरीचें पाणी तहानेल्या माणसांना पिऊं द्यावयाचें नाहीं, याचा अर्थ घरादाराचा प्रपंच सोडायचा व मठाचा प्रपंच मांडून पूर्वीच्या प्रपंचांतील व्यवहारानुसार काम-क्रोधादि दुष्ट मनोविकारांचा स्वभाव अंमलांत ठेवायचा, असा एकनाथांनीं केला आहे. वेषांतराच्या सोंगानें किंवा स्थलान्तर केल्यानें मनुष्याला आपला उद्धार साधणें शक्य नाहीं, हेंच एकनाथांनीं एका अभंगांत 'सचेतनी द्वेष अचेतनी पूजा । भक्ति गरुडध्वजा केवीं पावें ।' या वचनामध्यें अतिशय मार्मिकपणानें थोडक्यामध्यें सांगितलें आहे. दगडाची पूजा व जिवंत दुःखितांचा अनादर असा कारभार देवाला रुचत नाहीं, देवाकडे रुजू होत नाहीं.

या वचनाच्या आधारानें एकनाथांच्या एकंदर विचारांचें समालोचन करतां येईल. घरदार सोडायला, जगाशीं अर्थात् जनांशीं फटकून राहायला एकनाथ सांगत नाहींत; तसें प्रतिपादन करणें कुणाहि खऱ्या विचारवंताला शक्य नाहीं. घरादाराची आसक्ति, घरदार किंवा आपला देह अधिक मोलाचा, तेंच जणूं काय ऐहिक जीवनाचें सारसर्वस्व, या भावनेचा निषेध व त्या संबंधांतील ममत्वाची कर्तव्यापुरती किंमत मानून वागणें, यांतील भेद ज्यांना आकलन होत नाहीं किंवा आकलन करण्याची इच्छा नाहीं, त्यांनीं संतांच्या उपदेशाचा विपर्यास करावा यांत आश्चर्य नाहीं. मनुष्य प्रपंचांत जन्म घेतो, प्रपंचांत वाढतो व घरादाराचा सामान्य प्रपंच सोडला तरी निराळ्या व्यवसायाच्या प्रपंचांतच त्याचा शेवट होतो. प्रपंच सुटणें जर अशक्य तर प्रपंचांत राहून प्रपंचांतील कर्तव्यें योग्य रीतीनें शेवटास नेऊन आपला व आपल्या उदाहरणानें जनतेचा उद्धार साधण्याच्या युक्तीलाच भारतीय तत्त्वज्ञानाच्या वाङ्मयांत निर्मम, निरहंकार, निःसंग आसक्तिशून्यता 'तुल्यनिंदास्तुतिः' इत्यादि शब्दांनीं ओळखण्याचा प्रघात पडलेला आहे. निर्मम, निरहंकार यदृच्छालाभ संतोष या शब्दांचा खोलांत शिरून अर्थ पाहूं गेल्यास तो प्रपंचनिरपेक्ष किंवा समाजनिरपेक्ष आहे, असें समजतां येत नाहीं. जो प्रपंचांत—पर्यायानें समाजांत—राहील, त्यालाच या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या गुणांचें संपादन व संवर्धन करण्याची संधि मिळते. एकनाथांनीं आपल्या भागवताच्या टीकेंत एका ठिकाणीं प्रपंचाला धर्मशाळा म्हटलें आहे. धर्मशाळेंतील वस्ती जशी निर्मम असते तशी निर्ममत्वाची वृत्ति प्रपंचांत असावी. त्या वस्तीच्या आसक्तीनें गुरफटून जाऊं नये; कर्तव्यें करावीं

पण तीं अलिप्तपणानें करावीं, हा प्राचीन उपदेशच एकनाथांनीं पुनः चोखाळला आहे. या अनुरोधांत एकनाथांनीं 'समाधि' या शब्दाची केलेली व्याख्या सादर करायला हरकत नाहीं. प्रपंचांतील अलिप्त कर्तव्यनिष्ठेच्या संदर्भांत 'समाधि' ची व्याख्या विचारांत घ्यायची तेव्हां तिचें स्वरूप कसें असेल, हें अनुमानणें शक्य आहे. आपल्या व्याख्येचा एकनाथांना अभिमान वाटत असावा, असें तिच्या ठिकठिकाणच्या पुनरुक्तीवरून समजणें भाग आहे. आपल्या पारमार्थिक चिंतन-मननाचा अभिमान बाळगावा, असा ह्या व्याख्येंत नवेपणा आहे. आपलें आयुष्य लोकोद्धाराच्या कर्मयोगांत वेंचणाऱ्या संताची ती व्याख्या आहे. त्या व्याख्येचा त्यांच्यामागून होऊन गेलेल्या समर्थ रामदासांनीं आपल्या उपदेशांत आदर केला ही वस्तुस्थिति ह्या व्याख्येची महती पटवून देईल.

'समाधि' हा शब्द ऐकतां क्षणीं शरिराची निश्चेष्ट अवस्था हा अर्थ मनांत उभा राहतो. शरीराचें चलनवलन बंद करण्याच्या कसरतीसारख्या करामतीला एकनाथ समाधि मानीत नाहींत. चलनशून्य देहावस्थेला जर समाधि समजायचें असेल तर मूर्च्छेला, मरणाला किंवा खडकाला तो शब्द लावायला प्रत्यवाय कोणता ? मूर्च्छेंत किंवा मरण आल्यास देहाला जी गाढ स्थिरता प्राप्त होते, तशीच स्थिरता खडकामध्यें असते; मग त्यांनाहि समाधिस्थ म्हणावें असा युक्तिवाद लढवून समाधि म्हणजे देहाची स्थिरता नव्हे, असा सिद्धान्त एकनाथांनीं मांडला आहे. देहाचें चलनवलन कायम ठेवून त्याच्या द्वारें होणाऱ्या क्रियांच्या सुखदुःखादि किंवा हर्ष-विषादादि परिणामाच्या तावडींत जो सांपडणार नाहीं तो खरा समाधिस्थ असें त्यांच्या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण निस्संदिग्ध शब्दांमध्यें पाहायला सांपडतें. एकनाथांचें सगळें जीवन त्यांनीं केलेल्या व्याख्येप्रमाणें समाधीचें होतें. ब्राह्मणांनीं बहिष्कार घातला तरी त्यांचा परोपकार थांबला नाहीं. कालांतरानें लोकप्रियता चालून आली तरी एकनाथ आपल्या स्वीकृत ध्येयापासून ढळले नाहींत. बहिष्काराचा विषाद त्यांना जसा बाधला नाहीं तसाच लोकप्रियतेचा हर्ष त्यांच्या ठिकाणीं उद्भवला नाहीं. चित्तावें समत्व कसल्याहि बऱ्यावाईट प्रसंगानें हादरूं द्यावयाचें नाहीं यालाच ते 'समाधि' मानीत होते. समधातपणाला, वेगळ्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास मनाचा तोल सुटूं न देणें या वृत्तीच्या बळकटीला, ते समाधि समजत होते, हें तात्पर्य ध्यानांत येऊं शकतें.

समचित्तत्वाच्या समाधींत राहून साधावयाचें काय, या प्रश्नाचें उत्तर एकनाथांच्या शिकवणींत आहे. 'जनीं जनार्दन' हे शब्द एकनाथांच्या शिकवणींत आलेले दृष्टीस पडतात. 'सचेतनाचा द्वेष आणि अचेतनाची पूजा' या वचनांत दर्शविलेला भाव 'जनीं जनार्दन' या शब्दांच्या खुलाशासारखा आहे. कै. लो. टिळकांनीं आपलें 'गीतारहस्य' 'श्रोशाय जनतात्मने' या जनतात्म्या ईश्वराला अर्पण करतांना 'जनीं जनार्दन' हे शब्द त्यांच्या डोळ्यांपुढें होते याबद्दल शंका राहात नाहीं.

'जनसेवा ही ईश्वरसेवा' हा अलीकडे रूढ झालेला वाक्प्रचार 'जनीं जनार्दन' या शब्दाचा पर्याय आहे. जनसेवेकरितां संत अवतरले ही खूणगांठ मनाशीं पक्की बांधून एकनाथ आपली जीवनयात्रा क्रमीत होते. 'जनीं जनार्दन' या शब्दांत जनतेच्या भेदाला अवकाश ठेवलेला नाहीं. जन म्हणजे सर्वजन, त्यांत महार, मांग, ब्राह्मण अशी वर्गवारी नाहीं. जनार्दनाचा अर्थ जनतेविषयीं कळवळा बाळगणारा. देव जनतेच्या कल्याणासाठीं आहे. जनतेचा कल्याणकर्ता तो देव, त्या देवाचें वास्तव्य जनतेमध्यें असावें, हें सरळ आहे. देवाची भक्ति ही खऱ्या अर्थानें जनतेच्या कल्याणाची निरतिशय अढळ आस्था व याच अर्थानें भक्तीचा उपदेश संतांनीं केलेला आहे. रामकृष्णांची भक्ति करावी, असें सांगतांना जरी एखाद्या अवताराची प्रौढी ते गात असले तरी देवाचा अवतार 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्'. देवाचें अवतारकार्य संत विसरले नव्हते. देवाची भक्ति जनतेच्या प्रत्येक घटकांतील ईश्वरांशाचें, आत्मारामाचें हित करण्यानें साधतें. हा आत्माराम स्त्री-पुरुषांत भिन्न नाहीं. एकनाथांनीं पुरुषांचा तेवढा आत्मा व स्त्रीची आत्मी अशी स्थिति नसून दोन्ही देहांत आत्मा एकच असतो, असें एका ठिकाणीं ठासून बजावलें आहे. जनतेमधील वैराचीं, दुःखाचीं, दीनत्वाचीं जीं कारणें असतील तीं नष्ट करणाऱ्या श्रद्धेला संत भक्ति म्हणत होते असें तात्पर्य संतांच्या शिकवणुकींतून निघतें. देवाचें स्मरण कशासाठीं तर लोकोद्धाराच्या प्रेरणेसाठीं, स्फूर्तीसाठीं अशी संतांची धारणा त्यांच्या शिकवणुकींतून स्पष्ट निदर्शनास येते. देवापाशीं ब्राह्मण, चांडाळ हा भेद नाहीं; मग तो त्याच्या भक्तांनीं कां मानावा? देवाच्या साक्षात्काराचें उपयोगी पडणारें अद्वैत हें अंतिम तत्त्व आहे तर त्याची कांस धरून समाजांत अद्वैत बुद्धीनें कां वागूं नये? एकनाथांनीं अद्वैत भावना आपलीशी केल्याची साक्ष आपल्या स्फुट ग्रंथांकरितां निवडलेल्या लहानलहान संस्कृत स्तोत्रांच्या द्वारें पुरविली आहे. 'हस्तामलक' हें स्तोत्र शंकराचार्यांनीं एक मुक्या बालकाला विचारलेल्या, 'कस्त्वं शिशो?' या प्रश्नाच्या उत्तरावर उभारलेलें आहे. तो प्रश्न ऐकून आपण इहलोकींच्या भेदप्रचुर व्यापारापलीकडील कल्याणकारक मात्र आहों, असें बालकानें उत्तर दिलें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांचें व ब्रह्मचर्यादि आश्रमांचे भेद आपल्याजवळ नाहींत, असें त्या बालकाच्या उत्तराचें व्याख्यान आहे. एकनाथांनीं समरस होऊन त्यावर जी टीका लिहिली आहे ती यांच्या बुद्धींत मुरून आचरणांत उतरलेल्या अद्वैत भावाला दुजोरा देणारी आहे. एकनाथांनीं जातगोत, स्त्रीपुरुष हे भेद विसरून ग्रंथलेखन, कीर्तन, प्रवचन आणि परोपकार या उपायांनीं भक्तीच्या बैठकीवर लोकोद्धाराची संघटना बळकट केली, त्या संघटनेच्या ध्येयानें व शक्तीनें महाराष्ट्रीय जनतेचें थोडक्याच अवधींत स्वराज्यस्थापनेच्या रूपानें कल्याण घडवून आणलें.

ज्ञानेश्वर-नामदेव यांच्यामागून एकनाथ होऊन गेले. ते जाऊन आज साडेतीनशें वर्षांवर काळ गेला. ज्ञानेश्वरांच्या वारकरी पंथानें त्यांची स्मृति जगविली आहे. ही स्मृति सफल करायची असेल तर एकनाथांच्या चारित्र्याचा कित्ता आपण निष्ठेनें गिरविला पाहिजे. साडेतीनशेंहून अधिक वर्षें लोटलीं, एकनाथांमागून अस्तित्वांत आलेलीं मराठ्यांचीं राज्यें अस्तास जाऊन उदयास आलेली इंग्रजांची सत्ताहि दहा वर्षांपूर्वी मावळली. आपण सध्यां केवळ प्रादेशिक नव्हे तर अखिल भारतीय स्वराज्यांत नांदत आहोंत. साडेतीनशें वर्षांमध्यें वेगवेगळा राज्यकारभार अनुभवला. परंतु लोकोद्धाराला जाचणारीं समाजरचनेंतील व्यंगें अजून कायम आहेत आणि तीं घालवून लोकांमध्यें जूट, शिस्त, सहकारिता, सहानुभूति वगरे गुणांचें संपादन, संगोपन आणि संवर्धन करादयाचें असेल तर आपण एकनाथांच्या सर्व भेदातीत अद्वैत बुद्धीचें अनुशीलन स्वीकारलें पाहिजे. भारतीय तत्त्वज्ञानानें माणसासकट सर्व सृष्ट पदार्थांचें सत्त्वादि गुणानुसार त्रिविधत्व कल्पिलें असून त्यांतील राजस व तामस गुणाच्या वर्चस्वाखालीं माणसांचा फार मोठा कारभार चालतो, असा या तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आहे. राजस, तामस मनोविकारांना दडपून सात्त्विक गुणाची प्रवृत्ति लोकांत वाढावी याकरितां एकनाथांनीं आपली सगळी हयात खर्ची घातली. एकनाथांचें भागवतावर मराठी निरूपण असल्यानें तेथील सत्त्व, रज, तमाचीं लक्षणें सांगितल्यास योग्य होईल. 'सम, दम, तितिक्षा, विवेक, तप, सत्य, दया, स्मृति, सृष्टि, त्याग, निःस्पृहता, श्रद्धा, लज्जा' ही सत्त्वाचीं लक्षणें तर 'हावरेपणा, मद, ताठरपणा (स्तंभ), आशा आकांक्षांची गर्दी, भेदांत सुख मानणें, यशाची लालसा, आसक्ति, थट्टा-मस्करी, पराक्रमाची व आपल्या अंगीं असलेल्या शक्तीच्या प्रयोगाची हौस, हीं राजसाचीं लक्षणें आहेत. येथें एकनाथी टीकेला अनुसरून त्यांचा खुलासा केलेला आहे. क्रोध, लोभ, खोटेपणा, हिंसा. भीकमागेपणा, दंभ, क्लेश, दुसऱ्याशीं हेवादावा, शोक, मोह, विषाद, किरकिर करण्याची संवय, झोप, भेकडपणा व उद्योगाचा कंटाळा हे तामसाचे मनोविकार आहेत. राजसांतील भिदासुखम, आपसांतल्या भेदभावाचें सुख या लक्षणाची हल्लीं वारंवार प्रचीति येते म्हणून तिकडे जास्त लक्ष देणें चांगलें. तामसी मनोविकारांच्या समाजांतील सुळसुळाटाबद्दल मुद्दाम विवेचन करायला नको. त्यांचा हा प्रत्यय अतिशय अंगवळणीं पडला आहे. लोकांचा उत्कर्ष राजस-तामसांच्या प्राबल्यानें होऊं शकत नाहीं. त्याकरितां सत्त्व गुणाची समाजांत वाढ झाली पाहिजे. एकनाथांपुढें देवाधर्माच्या रक्षणाचें ध्येय असल्यामुळें त्यांनीं आपल्या वेळचीं उदाहरणें देऊन विषय संपविला आहे. तेव्हां देवाधर्माचे अनेक पंथ होते, तर आज राजकीय व सामाजिक मतभेदानें पुष्कळ एकमेकांशीं न पटणारे पक्ष उत्पन्न झालेले आहेत. उद्योगाचा कंटाळा, भेकडपणा, इतरांबद्दल गाऱ्हाणें गाण्याची किंवा तक्रार करण्याची संवय हिलाच मघाशीं किरकिरीची संवय

असें म्हटलें आहे. दंभ, खोटेपणा, भीकमागेपणा, क्रोध, हिंसा, दुसऱ्याच्या घात-पाताचा यत्न वगैरे राजस, तामस मनोविकारांच्या दुष्परिणामांचा ऊहापोह प्रत्येक दिवशीं ऐकूं येतो. आज देवाधर्माऐवजीं देशाच्या भक्तीचें ध्येय लोकांच्या पुढें आहे. देवाधर्मांच्या जागीं देश आला; परंतु लोकोद्धाराचें, देशाच्या अभ्युदयाचें ध्येय बदललें नाहीं. भक्ति—मग ती देवाची असो वा देशाची असो–भक्तीचे गुण बदलत नाहींत. एकनाथांनीं देवाची भक्ति सफल होण्यासाठीं जे गुण स्वकालीन जनतेला शिकविले ते आज देशाच्या भक्तीला आवश्यक आहेत. एकनाथांनीं जे गुण आचरून आपल्या उपदेशांत आणले त्या गुणांची आचरणाच्या द्वारें पूजा केल्याखेरीज आपल्या राष्ट्राचा अभ्युदय होणार नाहीं.*

ध्वनिक्षेपण दिनांक, २५ मार्च १९५८

• • •

* या व्याख्यानांतील सर्व विवेचन लेखकाच्या "श्रीएकनाथ–वाङ्मय आणि कार्य" (मौज प्रकाशन, मुंबई ४) या पुस्तकावर आधारलेलें आहे.

पुष्प तिसरें

तुकारामांचे अभंग

वि. भि. कोलते

अध्यक्षीय भाषण : **मामा वरेरकर**

प्रस्तुतच्या व्याख्यानमालेंत आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे. आजचे वक्ते संत तुकारामांच्या कृतींचें अवलोकन करणार आहेत. ज्यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला अस्तित्वांत आली आहे त्या कै. पुरुषोत्तम मंगेश लाड यांचा हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा होता. तुकारामांच्या साहित्याचा त्यांनीं अनेक वर्षे फार सखोल अभ्यास केला होता. तुकारामांची गाथा मूळ स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचें श्रेयही त्यांचेंच. आणि त्या गाथेला त्यांनीं तुकारामांच्या चरित्राचा जो प्रास्ताविक खंड जोडण्याचें काम हातीं घेतलें होतें तें मराठी भाषेच्या दुर्दैवानें अपुरें राहिलें. आज या तुकारामचरित्राचा जेवढा भाग त्यांच्या हातून लिहिला गेला आहे तेवढा भाग म्हणजे मराठी साहित्याचें एक अनमोल भूषण आहे. बऱ्याचशा प्राकृतिक अडचणींच्या पायीं तें त्यांना पुरें करतां आलें नाहीं आणि आयुष्याच्या अखेरच्या क्षणालाही त्यांनीं या कार्याचें स्मरण करूनच देह ठेवला. या दृष्टीनें पाहतांना आजच्या विषयाला एक प्रकारचें महत्त्व आलें आहे.

तुकारामांच्या साहित्याचा आढावा घेतांना तुकारामांच्या चरित्राकडेही नजर फेकणें अवश्य आहे. आधुनिक मराठी साहित्यांत कै. कृष्णराव अर्जुन केळुसकर मास्तर यांनीं सुमारें ६३ वर्षांपूर्वी जें चरित्र लिहिलें होतें तें आज उपलब्ध नाहीं. तुकारामांच्या चरित्रांतील चमत्कार प्रकरण वगळून त्यांनीं लिहिलेलें हें चरित्र आधुनिक वाचकाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. आज तें उपलब्ध नाहीं आणि तें उपलब्ध करण्याचा कुणी प्रयत्न केला असल्याचें दिसून येत नाहीं. ज्या दृष्टिकोनांतून केळुसकर मास्तर यांनीं हें चरित्र लिहिलें होतें तो दृष्टिकोन, सर्वसाधारण वाचकापुढें ह्या चरित्रलेखनाच्या काळांत पचवणें फार बिकट होतें. त्या काळांत या चरित्रावर मोठी टीका झाली होती. तुकारामाच्या चरित्रांतील चमत्कार प्रकरणाच्या आख्यायिका त्यांनीं एका वेगळ्या परिशिष्टांत ग्रथित केल्या होत्या. तरीही तत्कालीन निरीक्षकांचें समाधान झालें

नव्हतें. हें चमत्कार प्रकरण वगळलें जाणेंच मुळीं त्यांना पसंत नव्हतें. कै. लाड यांच्या हातून तुकारामचरित्र पुरें झालें असतें तर त्यांनीं देखील केळुसकर मास्तरांचेंच अनुकरण केलें असतें कीं काय हा एक प्रश्न आहे. ते मोठे भाविक होते, श्रद्धाळू होते, परंपरेच्या अंधश्रद्ध भक्तांप्रमाणें त्यांची वृत्ति नव्हती, तरीही त्यांनीं हें प्रकरण वेगळ्या दृष्टिकोनांतून हाताळलें असतें.

तुकारामांचें साहित्य महाराष्ट्रांत सर्वतोमुखी आहे, सर्वप्रिय आहे. पंढरीच्या वारकऱ्याच्या तोंडून चंद्रभागेच्या वाळवंटांत, वैष्णवांच्या मेळाव्यांत गाजणाऱ्या अभंगांच्या संख्येंत तुकारामांच्या अभंगांची संख्या फार मोठी असते. या वैष्णवांच्या मेळाव्यांत तुकारामांच्या अभंगांच्या लोकप्रियतेचा उच्चांक दिसून येत असला तरी तुकारामांच्या तत्त्वज्ञानाचा या भाविक वैष्णवांनीं अभ्यास केला आहे असें दिसून येत नाहीं. महाराष्ट्रांतील विद्वान् पंडितांनीं देखील तुकारामांच्या काळांतील विद्वान पंडितांप्रमाणेंच त्यांची उपेक्षा केली आहे. तुकारामांच्या साहित्याचें आलोडन करून त्यांचें तत्त्वज्ञान बहुजनसमाजापुढें मांडायचें कार्य ज्या प्रमाणांत झालें पाहिजे होतें, त्या प्रमाणांत झालें असल्याचें दिसून येत नाहीं. यापुढें तरी तें व्हावें असें माझ्यासारख्या तुकारामांच्या भक्ताला वाटलें तर नवल नाहीं.

आज तुकारामांच्या साहित्याकडे पाहिलें जात आहे तें बहुतांशीं त्यांच्या श्रद्धाळू अभंगांच्या दृष्टिकोनांतून. तुकाराम एक भक्त आहेत, ते श्रद्धाळू आहेत पण अंधश्रद्ध नाहींत. किंबहुना अंधश्रद्धेवर कुणीही त्यांच्याइतके आघात केलेले नाहींत. ज्या काळांत ब्राह्मणी संस्कृतीचें प्राबल्य होतें, रूढ झालेल्या धार्मिक संस्कारांवर, त्या काळांत त्यांनीं निर्दयपणें जबरदस्त कुठाराघात केले आहेत. ही वृत्ति पूर्वकालीन संतांच्या ठायीं क्वचितच असल्याचें दिसून येतें.

तुकाराम अशिक्षित होते असा एक सर्वसाधारण समज आहे. त्यांच्या साहित्याचें अवलोकन केलें तर त्यांचा संस्कृत साहित्याचा व्यासंग गाढा असल्याचें दिसून येतें. त्यांनीं गीतेचें अभंगबद्ध रूपांतर केलेलें आहे. त्यांच्या साहित्यांतून उपनिषदांतलीं तत्त्वें ठिकठिकाणीं विखुरलीं असल्याचें दिसून येतें. हा प्रत्यक्ष पुरावा समोर असतांनाही त्यांना अशिक्षित कां म्हटलें जातें हेंच कळत नाहीं. 'बरा कुणबी केलों। नाहीं तरी दंभें असतों मेलों ॥' असा त्यांनीं काढलेला उद्गार हाच त्यांच्या गाढ्या विद्वत्तेचा सबळ पुरावा आहे. त्या काळांत कुणब्याला संस्कृताचा अभ्यास वर्ज्य होता, 'ॐ तत्सत् इति सूत्राचें तें सार। कृपेचा सागर पांडुरंग।' असा उदगार काढल्यापायींच त्यांचा छळ झाला. नुसते अभंग लिहायला देखील जेथें तीव्र विरोध झाला होता – तेथें उच्च वर्णीयांच्या प्रतिष्ठेवर आघात केलेला सहन कसा व्हावा? किंबहुना या आघाताच्या पायींच त्यांचा छळ झाला होता. इतक्या निधड्या, निर्भय वृत्तीनें तत्कालीन रूढाचारांवर तुकारामांनीं जसे आघात केले तसे कुठल्याही संतानें क्वचितच

केले असतील. त्या काळांतले ते एक जबरदस्त सुधारक होते. भक्तिमार्गाचा प्रसार करतांना त्या मार्गाच्या आड येणारे आणि बहुजनसमाजाला पायांखालीं तुडवणारे जे जे कुणी होते, त्यांचा त्यांचा त्यांनीं यथास्थित समाचार घेतला आहे. स्वाभाविक भूमिकेंतून तत्त्वज्ञानाकडे पाहायची एक नवी दृष्टि त्यांनीं त्या काळच्या महाराष्ट्राला दिली आहे. याच त्यांच्या वृत्तीमुळें त्यांच्या काळाप्रमाणें आजच्या काळांत देखील त्यांच्या साहित्याचें यथायोग्य मूल्यमापन होत नसावें.

भारताची व्याप्ति फार मोठी आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या भारतांत अनेक प्रान्त आहेत, अनेक भाषा आहेत, अनेक रूढी आहेत, आचार आहेत आणि विचार आहेत; या सर्वांचें एकसूत्रीकरण झालें पाहिजे. या भारतीय भाषाभगिनींचा संसार एका घरांत झाला पाहिजे. तसा तो झाला म्हणजेच तुकारामांसारख्या अत्यंत प्रभावी तत्त्वज्ञान्याच्या चढावाच्या धोरणाचें मार्गदर्शन अखिल भारतालाही कार्यान्वित करील.

कांहीं वर्षांपूर्वी कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं तुकारामांच्या निवडक अभंगांचें इंग्रजींत भाषांतर केलें होतें. आज तें उपलब्ध नाहीं. भारताच्या राष्ट्र-भाषेंत तुकारामांच्या साहित्याचा अनुवाद आज होणें अवश्य आहे. त्या दृष्टीनें आज प्रयत्न झाले पाहिजेत.

आजचे वक्ते डॉ. विष्णु भिकाजी कोलते हे एक गाढे संशोधक आहेत. मराठी भाषेचे पहिले प्रवर्तक जे महानुभाव त्यांच्या साहित्याचा त्यांनीं केलेला अभ्यास आणि त्या अभ्यासांतून त्यांनीं काढलेले निष्कर्ष म्हणजे मराठी साहित्याचें एक मोठें मोलाचें लेणें आहे. महानुभावांच्या साहित्याच्या अनुषंगानें मराठी संतांच्या साहित्याचा त्यांनीं तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास केला आहे. त्या संशोधनांतून निघालेले निष्कर्ष आज जे वादविषय झाले आहेत, ते केवळ आम्हां महाराष्ट्रीयांच्या वादप्रियतेमुळेंच होते. कुणींही नवी दृष्टि दाखवली कीं ती पटवून घ्यायची नाहीं, या आम्हां महाराष्ट्रीयांच्या वृत्तीच्या पायीं महाराष्ट्राचें मोठें नुकसान झालें आहे. आजच्या व्याख्यानांतून मराठी साहित्याला भूषणभूत होणारीं कांहीं लेणीं आपल्याला सांपडतील अशी माझी अपेक्षा आहे. या अपेक्षेला अनुलक्षून डॉ. कोलते यांना आपणां सर्वांच्या तर्फे व्याख्यानाची सुरवात करायची मी विनंति करतों.

— ध्वनिक्षेपण दिनांक २६ मार्च, १९५८

• • •

तुकारामांचे अभंग*

वि. भि. कोलते

सुप्रसिद्ध** मराठी साहित्यिक कै. लाड यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ होणाऱ्या या व्याख्यानमालेतील आजचा माझा विषय एका दृष्टीने अधिक जवळचा आहे. कारण तुकाराम हा लाडांचा विशेष लाडका कवि होता. सातआठ वर्षापूर्वी तुकारामांच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगी तुकारामबोवांच्या अभंगांची सरकारी गाथा पुन्हा छापून प्रसिद्ध करण्यात आली ती, परवां माननीय मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे, लाडांच्या स्फूर्तीने, प्रेरणेने व त्यांच्याच संपादकत्वाखाली. या पुनर्मुद्रित संहितेला 'तुकारामांचे चरित्र, काव्य, शिकवणूक व अभ्यास यांची सांगोपांग चर्चा करणारा एक प्रबंध' जोडला जायचा होता. पण विस्तार व विलंब फार होऊ नये म्हणून त्या वेळी जोडावयाचा राहिलेला तो प्रबंध गेल्याच वर्षी स्वतंत्र पुस्तकाच्या स्वरूपात प्रसिद्ध झाला. दुर्दैवाने या प्रबंधाचा केवळ पूर्वार्ध प्रसिद्ध होऊ शकला आणि तोही श्री. लाडांच्या आकस्मिक मृत्यूनंतर! श्री. लाड यांनी लिहिलेला तुकारामचरित्राचा हा पूर्वार्ध पाहिला म्हणजे उत्तरार्ध त्यांच्या लेखणीतून लिहावयाचा राहून गेल्याबद्दल राहून राहून हळहळ वाटते. तुकारामांच्या अभंगात लाड किती रंगून गेले होते याची साक्ष या चरित्राच्या ओळीओळीतून मिळते. त्यांची चिकित्सक बुद्धि, त्यांची रसिकता, चरित्रनायकाशी झालेली त्यांची समरसता, तुकारामांच्या बोलामागील अबोलण्या खुणा हुडकून काढण्याचे त्यांचे सामर्थ्य यांची ओळख जसजशी अधिक होत जाते तसतशी त्यांच्या अकाल निधनाने झालेल्या मराठी साहित्याच्या हानीबद्दलची हळहळ अधिक वाढत जाते.

पुनर्मुद्रित सरकारी गाथेच्या प्रस्तावनेत लाडांनी लिहिले आहे की, 'सर्व खाजगी व सार्वजनिक संग्रहात असलेली हस्तलिखिते तपासून, संख्या, क्रम व पाठ निश्चित करून पांगारकरांनी अपेक्षा केल्याप्रमाणे सर्वजनमान्य होईल असा एक

---

* या व्याख्यानांतील अभंगांचे संदर्भ कै. पु. मं. लाड यांनीं संपादिलेल्या व मुंबई सरकारानें प्रकाशिलेल्या "श्रीतुकारामांचे अभंग" (दुसरी आवृति, १९५०) या पुस्तकांतून घेतले आहेत.

** या भाषणांतील शुद्धलेखन लेखकाच्या इच्छेनुसार अनुच्चारित अनुस्वार वगळून ठेवलें आहे.

नवीन गाथा परंपरेच्या व संशोधनाच्या अशा दुहेरी दृष्टीने तयार झाला पाहिजे.' त्यांचे हे म्हणणे अगदी यथार्थ आहे. कारण असे की, तुकारामांच्या समग्र साहित्याचा विचार करीत असताना त्यांचे स्फुट अभंग तेवढेच आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. याशिवाय त्यांची काही इतर रचना असेल ही कल्पनाहि मनात येत नाही. पण गाथ्यातील अभंगाव्यतिरिक्त तुकारामांची इतरहि रचना आहे. तीत त्यांनी केलेला भगवद्गीतेचा अभंगात्मक अनुवाद अथवा मंत्रगीता महत्त्वाची होय. या गीतानुवादाकडे अभ्यासकांचे पुन्हा लक्ष वेधण्याचे महत्त्वाचे कार्य श्री. वा. सी. बेंद्रे यांनी केलेले आहे. इ. स. १९५० मध्ये त्यांनी या ग्रंथाची एक अधिकृत संहिता छापून प्रसिद्ध केली. प्रस्तुत गीतानुवाद दुसऱ्या कोणा तुकारामाचा नसून तो देहूकर तुकारामांचाच आहे हे त्यांनी सप्रमाण मांडलेले आहे. कै. लाड यांना हे मत मान्य असल्याचे त्यांच्या तुकारामचरित्रावरून दिसून येते. (पृ. १५, ५६, १०३). या गीतानुवादाव्यतिरिक्त श्री. रा. म. आठवले यांना उपलब्ध झालेले 'भानुदासचरित्र' आणि कै. दा. के. ओक यांनी उजेडात आणलेले 'सुदामचरित्र' (भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष २३, २४) यांचाहि अंतर्भाव तुकारामांच्या गाथ्यात व्हावयास पाहिजे. याशिवाय तुकारामांची आणखीहि रचना निरनिराळ्या बाडातून विखुरलेली असण्याचा संभव आहे. ती एकत्रित करून गाथ्याची अधिकृत संहिता तयार व्हावी व तिच्या आधाराने तुकारामांच्या व्यक्तित्वाचे व कवित्वाचे अध्ययन आणि विवेचन व्हावे हे कुणालाहि मान्य होईल.

कदाचित्, आपण यावर मला प्रश्न विचाराल की, तुकारामांच्या व्यक्तित्वाच्या विवेचनात या अध्ययनाने काही विशेष फरक पडणार आहे काय? कारण, आज उपलब्ध असलेल्या सुमारे साडेचार, पांच हजार अभंगातूनच तुकारामांचे व्यक्तित्व इतके उठावदार व सुस्पष्ट रीतीने आविष्कृत झालेले आहे की या नवीन साहित्याच्या साह्याने त्यात फरक पडण्याचा संभव नाही. तुकारामांचा हा गीतानुवाद बहिर्मुख दृष्टीने केलेला असल्यामुळे तुकारामांच्या व्यक्तित्वावर त्यामुळे प्रकाश तो काय पडणार? आपली धारणा खरोखरच अशी असेल तर ती बरोबर नाही. गीतानुवाद तुकोबांनी बहिर्मुख दृष्टीने केलेला आहे हे खरे, पण त्यामुळे त्यांच्या ग्रंथाध्ययनावर व ग्रंथाध्ययनपद्धतीवर प्रकाश पडत नाही काय? भावार्थ समजावून घेण्यापुरते तरी संस्कृतचे त्यांना ज्ञान होते हे यावरून प्रत्ययास येत नाही काय? मूळ ग्रंथ आत्मसात् करून घेण्याच्या दृष्टीने त्याचा भावानुवाद करण्याचा प्रयत्न करणे ही अध्ययनाची पद्धति हा गीतानुवाद लक्षात घेतला म्हणजे स्पष्टपणे दिसून येते. तुकाराम म्हटला म्हणजे एक अशिक्षित खेडवळ माणूस, त्याच्या काव्यात जर काही संस्कृत सुभाषितादिकांचे प्रतिबिंब पडलेले असेल तर तो केवळ त्याच्या कानावरून गेलेल्या अशा सुभाषितांचा परिणाम होय, त्याचा त्याच्या संस्कृताध्ययनाशी काही संबंध पोचत नाही असा जो एक समज रूढ आहे तो, मला

वाटते, हा गीतानुवाद लक्षात घेतला म्हणजे नाहीसा होऊ शकेल. इतर पंडिताप्रमाणे तुकोबांनी संस्कृतचे 'पद्धतशीर' अध्ययन केले होते असे मला म्हणायचे नाही. तथापि, काही मूळ संस्कृत ग्रंथाशी त्यांनी परिचय करून घेतला होता असे मात्र निश्चितपणे म्हणता येईल. कदाचित् गीताभागवतावरील ज्ञानदेव-एकनाथांच्या टीकांच्या साह्याने त्यांनी हा परिचय करून घेतला असेल. हा गीतानुवाद म्हणजे तुकारामांचा अभंगरचनेतील आरंभीचा ओनामा होय, असेहि मला वाटते. कारण ही रचना अभंगचरणातील यमकसाधनेसाठी काही ठिकाणी अवघडल्यासारखी भासते. तथापि तुकोबांच्या मुखातून पुढे स्रवणाऱ्या प्रासादिक वाणीचा प्रत्यय मात्र यात अनेक ठिकाणी येतो.

वस्तुतः तुकाराम आणि तुकारामांचे अभंग यात मुळीच भेद नाही. हे सर्व अभंग आत्मपर आहेत. मराठी साहित्यातील ती उत्कृष्ट भावगीते आहेत. कवि आणि त्याची कविता ही किती एकरूप असू शकतात याची ही बोलकी उदाहरणे आहेत. तुकारामांचे लौकिक व अलौकिक भावजीवन त्यात उत्कृष्टपणे प्रतिबिंबित झालेले आहे. नामदेवाशिवाय मराठीतील दुसऱ्या कोणत्याहि कवीच्या काव्यात कवीची आणि त्याच्या काव्याची इतकी एकरूपता आढळत नाही. आणि म्हणून खऱ्या तुकारामाशी आपणाला ओळख करून घ्यावयाची असेल तर त्यांच्या अभंगाकडेच वळले पाहिजे. तुकारामांनी आत्मचरित्रपर असे काही अभंग लिहिलेले असले तरी तेवढ्यातच त्यांचे चरित्र सामावले आहे असे नाही. आपल्या प्रत्येक अभंगातून ते जणू आपले चरित्रच सांगत आहेत असा प्रत्यय येतो. त्यांच्या मनःसागरावर वेळोवेळी उठलेले विचारांचे आणि विकारांचे तरंग म्हणजे हे अभंग होत. त्यातून त्यांच्या जीवनाचे व व्यक्तित्वाचे उत्कृष्ट दर्शन घडते. विठ्ठलभक्त विश्वंभराच्या शुद्ध बीजातून निर्माण झालेल्या वंशवृक्षाला लागलेले रसाळ व गोमटे फळ म्हणजे तुकाराम होय. तुकारामांच्या वर्णाविषयी व जातीविषयी विद्वानात वाद आहे. शास्त्रात वैश्यांना जलदिव्य सांगितले आहे त्यामुळे तुकारामाला आपले अभंग नदीत बुडवावे लागले, या विचारसरणीला पोषक म्हणून श्री. बेंद्रे तुकोबांना वैश्य वाणी ठरवितात. पण तुकोबा वर्णाने वैश्य अर्थात् द्विज असते तर शास्त्रनियमाप्रमाणे संस्कृत ग्रंथावर टीका लिहिण्याबद्दल त्यांना कोणतेहि दिव्य करण्याची आवश्यकताच नव्हती. तुकोबांनी 'यातीशूद्र वंश' (१३३३) 'शूद्रवंशी जन्मलों । ह्मणोनि दंभें मोकलिलों' (२७६६) असे स्वतः स्वच्छ म्हटले आहे. आपण जातीने कुणबी आहोत याचाहि त्यांनी स्पष्ट निर्देश केला आहे. 'बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों' (३२०), 'तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत' (४३९२) इत्यादि चरणावरून हे दिसून येईल. वैश्य म्हणजे वाण्याचा व्यवसाय ते करीत होते, एवढेच ! त्यांच्या घरात शेतीभाती होती, पूर्वीपासून चालत आलेली महाजनकीची वृत्ति

होती, आणि सावकारीहि होती. अर्थात् तुकोबांचे घराणे चांगले सुखसमृद्धीने संपन्न होते. बोल्होबा आणि कनकाई या प्रेमळ मातापित्यांच्या छत्रछायेखाली तुकारामांचे बालपण अत्यंत आनंदात गेले असले पाहिजे. पितापुत्र, मायलेक यांच्या वात्सल्याचे अनेक उद्‌गार त्यांच्या अभंगात सापडतात याचे कारण हेच होय. तुकोबांची पहिली पत्नी रखमेकरी असल्यामुळे बोल्होबांनी अवलाई ऊर्फ जिजाई नावाच्या एका श्रीमंताच्या मुलीबरोबर तुकोबांचे दुसरे लग्न लावून दिले होते. अशा सुखासमाधानाच्या संसारातहि परंपराप्राप्त संस्कारामुळे तुकोबा विठ्ठलाची भक्ति करीत. त्यांचे वडील बंधु सावजी यांनी वडिलांच्या संसाराचा भार उचलण्याचे साफ नाकारल्यामुळे तो बोजा तुकोबावर अकाली येऊन पडला. ते शेती, दुकानदारी व सावकारी करू लागले. त्यांची मानमान्यता वाढू लागली. पण लौकरच त्यांच्या संसाराची चक्रे उलटी फिरू लागली. सुखासमाधानाचा संसार त्यांच्याकडून सुरळीतपणे सावरला जात असताना त्यांचे वडील एका-एकी वारले. या दुःखातून ते बाहेर पडतात न पडतात तोच त्यांना आपल्या आईचे मरण पाहावे लागले. संकटे यायला लागली म्हणजे ती कधी एकेकटी येत नाहीत; आपल्याबरोबर दुःखांची परवड घेऊन येतात. तुकोबांना याचा चांगलाच अनुभव आला. आईवडिलांच्या मृत्यूनंतर वडील बंधु सावजी यांची पत्नी मृत्यु-मुखी पडली आणि त्यामुळे हातात आधीच तुळशीपत्र घेऊन बसलेला सावजी घर सोडून तीर्थाटनाला निघून गेला. एकामागून एक आलेल्या या संकटपरंपरेने तुकोबांना केवढे दुःख झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी! अशाहि स्थितीत त्यांनी संसाराचे गाडे सुरळीतपणे हाकण्याचा प्रयत्न केला. पण आता काळच फिरला होता, त्याला तुकोबा तरी काय करणार! देशात सर्वत्र दुष्काळ पडला. त्यामुळे दुकानावरील देणेघेणे थांबले. जवळचे 'सहज सरलें, होतें कांहीं। द्रव्य थोडें बहु तेंही' (१३३४). कुळांनीहि पैसे बुडविले पण सावकार मात्र दारी धरणे धरून बसले. दिवाळे निघालेल्या तुकोबांना मानाचे जिणे जगणे अशक्य झाले. दुष्काळ इतका भीषण होता की, तुकोबासारख्या वतनदार महाजन सावकाराच्या घरातील माणसांनाहि अन्न खायला मिळेना. त्यांची पहिली पत्नी रखमाई या दुष्काळात 'अन्न अन्न करितां मेली' (१३३३) व तिच्या पोटी आलेल्या एकुलत्या एका कोवळ्या मुलानेहि तोच मार्ग स्वीकारला. या वज्राघाताने तुकोबांचें जीवन हादरून गेले. 'होतें गांठीं सरलें येतां। आणीक माथां ऋण जालें' (१२०७) तेव्हा 'वेवसाय' करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण प्रामाणिक व्यापार करणाऱ्या तुकोबांना त्यात तूट आली. त्यामुळे गावकऱ्यांनी त्यांची निर्भर्त्सना चालविली. कर्कशा जिजाईनेहि त्यांना घालून पाडून बोलायला कमी केले नाही. या विटंबनेमुळे पाषाणालाहि पाझर फुटतील असे तीव्र दुःख होऊन लाजेने 'तोंड न दाखवे जना' (१३३४) असे तुकोबांना झाले. संसारातील सर्व सुखें

रसिकतेने उपभोगलेल्या तुकोबांना या चारपाच वर्षात दारिद्र्याच्या दुःखाचा, संसाराच्या असारतेचा, सुखाच्या सोबत्यांच्या स्वार्थाचा व उदासीनतेचा मोठा विलक्षण अनुभव आला. त्यामुळे त्यांचे आंतर जीवन ढवळून निघाले. संसार-दुःखाच्या तीव्र तापाने त्यांच्या अंतःकरणाची भूमि भाजून निघाली. ती शांत करण्याकरिता ते आपल्या कुलदैवताकडे--विठ्ठलाकडे वळले. भाजलेल्या अंतःकरणाच्या भूमीवर श्रद्धेचे पाणी शिंपडले जाताच आत कुठेतरी खोल भागात पडून असलेल्या भक्तीच्या व कवित्वाच्या बीजांना अंकुर फुटू लागले. ईश्वराजवळ आळवणी, आत्मनिवेदन, आत्मपरीक्षण इत्यादि स्वरूपात त्यांची अभंगवाणी प्रगट होऊ लागली. 'तोंड न दाखवे जना।' म्हणून आरंभी 'शिरें सांदी भरें राणां' (१३३४) रानावनात जाऊन वृक्षवल्लरीच्या सहवासात ते विठ्ठलचिंतन करीत. पुढे आपल्या घराजवळील देवाचे देऊळ दुरुस्त करून तेथे ते भजन करू लागले. पूर्वी ते एकादशी करीत, कीर्तनेहि ऐकत; पण 'नव्हतें अभ्यासीं चित आधीं' (१३३३); आता ते इतरांच्या कीर्तनात 'गाती पुढें त्यांचें' (१३३३) ध्रुपद धरू लागले. भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, नामदेवांचे अभंग, नाथभागवत, कबिराचे दोहे यांचे त्यांनी अध्ययन चालविले. त्यातील काही रचना मुखोद्गत केली, आणि मग ते स्वतःच कीर्तनाला उभे राहू लागले. कीर्तनानंदात ते स्वतःचे देहभान विसरत. आनंदाच्या त्या सविकल्प समाधीत त्यांच्या भावोत्कट हृदयातून उसळून बाहेर पडलेल्या अभंगांच्या गंगाप्रवाहात श्रोते रंगून जात. कीर्तनभक्ती-बरोबरच तुकोबांनी 'संतांचें सेविलें तीर्थ पायवणी' (१३३३); शरीर कष्टवून यथाशक्ति परोपकार केला. एके दिवशी स्वप्नात सद्गुरु बाबाजी चैतन्याचा त्यांना साक्षात्कार झाला. त्यांनी तुकारामांना स्मरणार्थ तुळशीमाळा जपण्याचे सांगून 'रामकृष्ण हरि' हा आवडीचा सोपा मंत्र दिला. गुरूपदेशाप्रमाणे नामचिंतन व नामस्मरण चालू असतानाच एके दिवशी 'नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें। सवें पांडुरंगें येऊनियां। सांगितलें काम करावें कवित्व' (१३२०). अशा रीतीने पांडुरंगाने प्रेरणा केल्यामुळे तुकोबांच्या काव्यरचनेला बहर विशेष येऊ लागला. त्यांची साधना चालूच होती. विठ्ठलाची प्राप्ती करून घेण्यासाठी नाना रीतींनी ते त्याची करुणा भाकू लागले. 'संवसारतापें तापलों मी देवा। करितां या सेवा कुटुंबाची॥ ह्मणऊनी तुझे आठविले पाय। ये वो माझे माय पांडुरंगे' (९१) अशा आर्त वाणीने ते पांडुरंगाचा धावा फोकरू लागले. ''कन्या सासुऱ्यासि जाये। मागें परतोनी पाहे' (२६६) तशी त्यांची अवस्था होऊन विठ्ठलदर्शनासाठी 'जीवनावेगळ्या मासोळी'प्रमाणे ते तळमळू लागले. कधी 'पांडुरंगे पांडुरंगे। माझे गंगे माउलिये॥ पान्हां घालीं प्रेमधारा। पूर क्षीरा लोटों दे' (२४५४) म्हणून पांडुरंगाला मातृभावाने आळवू लागले; तर कधी 'कृपाळू सज्जन तुह्मी संतजन। हेंचि कृपादान तुमचें मज॥ आठवण तुह्मी द्यावी पांडुरंगा। कीव

माझी सांगा काकुलती' (२२५६) म्हणून भीड घालण्यासाठी संतांना सांगू लागले. कधी 'काय देह घालूं करवती कर्मरी । टाकूं या भितरी अग्नीमाजी' (८५८) अशी जीव देण्याची भीति ते घालू लागले; तरीहि परमेश्वर दर्शन देत नाहीसे पाहून 'करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥ जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस' (१९२९) या शब्दात ईश्वराच्या निष्ठुरतेचा डांगोरा पिटण्याचा धाक घालून ते त्याच्याशी भांडू लागले. पोटातील आर्ततेमुळे तर कधी कधी 'निलाजिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा जना ॥ खासी धोंडे माती जीव जंत झाडें । एकलें उघडें परदेसी ॥ लटिका तूं मागें बहुतांसी ठावा । आलें अनुभवा माझ्या तें ही ॥ तुका ह्मणे मज खवळिलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे' (२२४८) अशा शिव्या देण्यापर्यंत त्यांची मजल जाई. आपल्या पोटतिडकेचाहि उपयोग होत नाही हे पाहून 'माझे लेखीं देव मेला'। असो त्याला असेल' (२३४९) असा उपहास करण्यालाहि त्यांनी कमी केले नाही.

अशा या साधनावस्थेत कठोर आत्मपरीक्षणाने चित्त शुद्ध करून आपली योग्यता तुकोबा वाढवीत होते. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी इतरावर हत्यार धरले; पण ती पात्रता प्राप्त करून घेण्यासाठी साधकावस्थेत त्यांनी स्वतःवर हत्यार उपसले होते. तुकोबासारखा कठोर आत्मपरीक्षक दुसरा क्वचितच आढळेल. 'मी तों सर्वभावें अनधिकारी। होइल कैसी परी नेणों देवा' (७०३); 'माझे मज कळों येती अवगुण' (२८६१) अशी जाणीव त्यांना सदैव होती व 'लक्ष्मीमदें मातें घडले महा दोष'– ते कोणते? तर 'निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार' (२८३५) अशा रीतीने आपल्या पूर्वायुष्यातील अवगुणांचा व पातकांचा कबुलीजबाब देऊन ते प्रायश्चित्त करीत. कारण 'अनुतापें दोष। जाय न लागतां निमिष' (७३०). या अवगुणांचे मूळ कारण कोणते? तुकोबाच सांगतात, 'मन माझें चपळ न राहे निश्चळ। घडी एकी पळ स्थिर नाहीं' (१७३७) या अनावर मनामुळे 'इंद्रियांचीं दिनें। आह्मी केलों नारायणें' (२४९५) 'काय करूं आतां या मना। न संडी विषयांची वासना ॥ प्रार्थितां ही राहेना। आदरें पतना नेऊं पाहे' (४०५३) यातून सुटण्यासाठी मनाला ते वारंवार उपदेश करीत. 'नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया' (२८०८); 'फजितखोरा मना किती तुज सांगों। नको कोणा लागों मागें मागें ॥ स्नेहवादें दुःख जडलेंसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥ निंदास्तुति कोणी करो दयामाया। न धरीं चाड या सुखदुःखें' (९९६). अशा स्थितीत विठ्ठलाच्या ठिकाणी आपल्या मनाचा लय करून त्यांनी त्याला व इंद्रियांना जिंकण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात 'लोकलाज' आडवी येत असे. लाजेला त्यांनी वारंवार विनंती करावी की, 'नको येऊं लाजे होय तूं परती ।

दा. क. ८७५९

भजों दे श्रीपती सखा माझा ।। तुझे संगतीनें मोठा जाला घात । जाली मी अंकित दुर्जनाचा' (४३१९). कधी देहाचा व मीपणाचा अहंकार बळावत असे. 'माझिया मीपणावर पडो पाषाण। जळो हें भूषण नाम माझें' (२८३५) हे साधावे म्हणून 'हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कळिवरा पाठी' (१४०३). आपला अहंकार नष्ट करण्याचाहि ते प्रयत्न करीत. त्यांनी 'प्रिया-पुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु' (१३३४) आणि एकांत सेवन करून विठ्ठल-चिंतनाने मन व इंद्रिये ताब्यात आणली. पूर्वीची संसारदुःखे आपल्या पारमार्थिक कल्याणासाठी होती असा त्यांना अनुभव आला. 'बाईल मेली मुक्त जाली। देवें माया सोडविली ।। पोर मेलें बरें जालें । देवें मायाविरहित केलें ।। माता मेली मज देखतां । तुका ह्मणे हरली चिंता' (७७८) असे तुकोबांनी म्हटले ते याचमुळे. त्यांच्या 'शरीराचा भाव प्रेतरूप' होऊन त्याने 'लक्षियेला ठाव श्मशानींचा' त्यामुळे 'रडती रात्रंदिवस कामक्रोधमाया। ह्मणती हायहाया यमधर्म' (२६६८).

ईश्वरप्राप्तीसाठी ही साधना चालू असतानाच तुकोबांच्या स्वयंस्फूर्त कवित्वाची वेल बहरत होती. भगवद्गीतेच्या अनुवादाचे काम ते याच काळात करीत असावे असे दिसते. त्यांच्या या काव्यांची त्यांच्याच कीर्तनादिकातून प्रसिद्धि होताच पढिक पंडित तुकारामाविरुद्ध खवळले. शूद्रवंशातील या कुणब्याने कवित्व करावे, गीते-सारख्या संस्कृत ग्रंथावर भाष्य लिहावे, आणि 'वेदाचा तो अर्थ आह्मांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां' (२२६६) अशा आत्मविश्वासाने वेदांचे रहस्य चार-चौघात सांगत सुटावे म्हणजे केवढा अधर्म ! त्यांनी याविरुद्ध एकच काहूर माजवले. त्या अभंगांचा त्यांनी निषेध केला. धर्मपंडितांनी या अपराधाचा न्यायनिवाडा करण्याचे सोंग करून तुकोबांना आपले कवित्व पाण्यात बुडविण्याचा आदेश दिला. ब्रह्मवृंदाच्या निवाड्यामुळे गावातील लोकहि तुकोबावर रागावले. तेव्हा तुकोबांना असे झाले की, 'आतां काय खावें कोणीकडे जावें । गावांत रहावें कोण्या बळें ।। कोपला पाटील ये गावींच्या लोका । आतां मज भिका कोण घाली ?'(३८८१) तुकोबांनी अभंगांच्या वह्या इंद्रायणीच्या डोहात बुडवल्या त्या वेळेला झालेली त्यांच्या मनाची तगमग कोण वर्णन करू शकेल ? पांडुरंगाच्या आज्ञेने आणि अनुज्ञेने केलेले कवित्व बुडविण्याची पाळी यावी यासारखा अन्याय तो कोणता ? आणि पांडुरंग हा अन्याय सहन कसा करीत आहे ? तुकोबांनी इंद्रायणीच्या काठावरच बसून 'सत्याग्रह' सुरू केला, भूकतहान विसरून परमेश्वराची अखंड आळवणी चालविली. तेरा दिवस उलटले तरी काही नाही ! तेव्हा त्यांनी विठोबाला निर्वाणीने बजावले की,

'तेरा दिवस जाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥
पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी जालें तुज ॥
तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥
फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ॥

तुका ह्मणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन चंद्रभागे ॥' (२४९३) तेरा दिवसांच्या या निश्चक्रानंतर मात्र पांडुरंगाचे दर्शन होऊन इंद्रायणीमध्ये बुडविलेल्या अभंगांच्या वह्या अगदी कोरड्या वर आल्या. 'चुकी जाली एकवेळा मज पासूनि चांडाळा । उभें करोनियां जळा माजी वह्या राखिल्या' (२२४३) असे प्रत्यक्ष त्यांनीच सांगितले आहे. परमेश्वराच्या दर्शनाचा हा आनंद

'सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥
मनें धरिला अभिळास । मिठी घातली पायांस ॥
होतां दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी ॥
तुका ह्मणे जाला । लाभें लाभ दुणावला ॥' (२०१९)

या शब्दात तुकोबांनी वर्णन केला आहे. पांडुरंगाच्या सगुण दर्शनानंतर तर त्यांचा भक्तीचा उमाळा अधिकच वाढला. 'होतें बहुत हें दिवस मानसीं । आजि नवस हे फळले नवसीं ॥ व्हावी भेटी ते जाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेंसी वो' (३७६) असे पांडुरंगाच्या अखंड भक्तीचे त्यांनी व्रतच स्वीकारले त्यांचे जीवन पांडुरंगमय झाले. त्यांचा देहभाव आणि मीपणाचा अहंकार पूर्णपणे गळाला. 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य' (२६६९). सर्व जग त्यांना पांडुरंगमय दिसू लागले. 'देह नव्हे मी हें सरे । उरला उरे विठ्ठल' (१२९५). साधनावस्थेतील 'नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ॥' ही इच्छा पूर्ण होऊन 'देव जाले अवघे जन । माझे गुण दोष हारपले ॥ बरवें जालें बरवें जालें । चित्त धालें महालाभें' (३१३२). 'भूतांचें पाळन' हीच खरी 'देवाची पूजा' (३८५४) या भावनेने ते जनताजनार्दनाची अधिकाधिक सेवा करू लागले. पांडुरंगाच्या साक्षात्काराने 'अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥' होऊन त्याने 'गिळुनि सांडिलें कळिवर । भव भ्रमाचा आकार ॥ सांडिली त्रिपुटी । दीप उजळिला घटीं' त्यामुळे 'तुका ह्मणे आतां । उरलों उपकारापुरता' (९९३).

तुकोबांच्या या आयुष्याचे सिंहावलोकन केले म्हणजे त्यात होणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्वाच्या दर्शनाने मन मुग्ध होऊन जाते. त्यांना शेताची राखण करायला ठेवल्यानंतर पाखरांनी दाणे खाऊन शेत उजाड केले तरी धान्य मात्र भरपूर पिकले, कीर्तनप्रसंगी त्यांनी मेलेले मूल जिवंत केले, परचक्राचा वेढा पडून शिवराय संकटात सापडले असताना परमेश्वराचा धावा करून त्यांनी परचक्राचे निवारण केले – हे किंवा अशा प्रकारचे चमत्कार त्यांच्याकडून झाले असोत किंवा नसोत, पण आपल्या आर्त भक्तीने अवघ्या पंधरावीस वर्षात ते नराचे नारायण झाले, सामान्यत्वातून असामान्यत्वात पोचले हा फार मोठा चमत्कार आहे. होय, तुकोबांचे व्यक्तित्व म्हणजे मनुष्याला सामान्यत्वातून असामान्यत्वापर्यंत पोचविणाऱ्या गुणांचा आदर्श होय. पण आरंभीच्या तुकोबांना नुसते 'सामान्य' विशेषण लावून

चालणार नाही. शूद्रवंशात जन्मलेल्या या कुणब्याच्या मुलाने आपल्या यातिहीनत्वाबद्दल, पढिक पंडितांकडून निंदा, द्वेष, अपमान वगैरे होत असतानाहि 'घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं। मुक्तां आत्मस्थिती सांडवीन' (१५८९) अशी उच्चतम अवस्था प्राप्त कशी करून घेतली याचा उत्कृष्ट आदर्श म्हणजे तुकाराम होय. आणि याच दृष्टीने त्यांच्या चरित्राचे आणि चारित्र्याचे बहुजनसमाजाच्या आजच्या युगात विशेष महत्त्व आहे. आईवडिलांचा व बायकोपोरांचा मृत्यु, दुष्काळाने आणलेले दारिद्र्य आणि त्यामुळे ओढवलेल्या आपत्ति यातून तुकोबांचे भावी व्यक्तित्व आकाराला आले हे तर खरेच; पण याचबरोबर त्यांच्या आत्मोद्धाराच्या मार्गात त्यांचे वंशहीनत्व व जातिहीनत्व वारंवार आडवे पडत असे हेहि तितकेच खरे. म्हणूनच 'याती मतिहीन रूपें लीन दीन। आणीक अवगुण जाणोनियां ॥ केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार' (१२१९) याबद्दल त्यांना विशेष कृतज्ञता वाटत होती. पांडुरंगाने कवित्वरचनेचा आदेश दिला असताही 'निषेधाचा कांहीं पडिला आघात। तेणें मध्यें चित्त दुखविलें। बुडविल्या वह्या –' (१३३३) याला कारण रामेश्वरादि पंडितांकडून तुकोबांच्या जातिहीनत्वामुळे घेतले गेलेले आक्षेप होते. संभाजीसारख्या महंताने तुकोबांचा जो छळ केला त्यालाही कारण तेच होते. आणि हे शल्य आपली आध्यात्मिक साधना करीत असतानाहि विसरता न येण्याइतपत तीव्र होते, असे त्यांच्या अभंगावरून दिसून येते. 'याती हीन मति हीन कर्म हीन माझें। सांडोनियां सर्व लज्जा शरण आलों तुज' (२७५३); 'तूं श्रीयेचा पति। माझी बहु हीन याती' (२०५५); 'भागविलासी केला सीण। अधम मी यातीहीन' (२२४१) हे उद्गार याची साक्ष देतील. ईश्वरसाक्षात्कार झाल्यानंतर 'यातिहीन नये ऐकों जयां वेद। तयां दिलें पद वैकुंठीचें'; 'आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ। यातिहीनकुळ दैन्यवाणा' (१६९२) असे उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले याचे कारण आणखी दुसरे कोणते असू शकेल? तेव्हा यातिवर्णहीन असल्यामुळे, जन्मजात वर्णधर्माच्या ठेकेदाराकडून होणाऱ्या निंदा, द्वेष, निषेध, हाणमार यासारख्या आपत्तींना तोंड देऊन ब्रह्मज्ञान्यांनाहि लाळ घोटावयास लावणारे श्रेष्ठत्व त्यांनी केवळ आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी प्राप्त करून घेतले आणि तो आदर्श अशा स्थितीत खितपत पडलेल्या बहुजनसमाजासमोर ठेवला हे तुकोबांचे सामाजिक कार्य महत्त्वाचे आहे. सामान्य जनतेतील वर्णजातिहीनत्वाचा न्यूनगंड आपल्या या आदर्शाने त्यांनी नाहीसा केला. 'साहोनियां टांकीघाये। पाषाण देवचि जाला पाहें' (२०३९) हे त्यांनी आपल्या उदाहरणाने सिद्ध केले. मुखात विठ्ठलाचे नाव असले म्हणजे सर्व जाती समान योग्यतेच्या आहेत. 'जिहीं म्हणविलें हरिचे अंकित। जातीचे ते होत कोणी तरी'; 'राम ह्मणतां तरे जाणतां नेणतां। हो कां यातिभलता कुळहीन' (११००); 'वैष्णव तो जया। अवघी देवावरी

माया ॥ तुका ह्मणे याती । हो का तयाची भलती' (३६६) अशा अनेक रीतींनी त्यांनी हे सांगितले आहे. संतांना भक्तीच्या क्षेत्रात जातपात मान्य नव्हती पण व्यवहारात मात्र ती मान्य होती असे सांगण्यात येते; आणि कदाचित हे खरे असेलहि. पण केवळ जन्मावर अवलंबून असलेली जातिव्यवस्था व तिच्यातील श्रेष्ठकनिष्ठता तुकोबांना मान्य असेल असे वाटत नाही. 'देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती' (३४३१) हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीचे निवेदन होय; मान्यतेचे शिक्कामोर्तब नव्हे. 'कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा' (१२३), 'आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं' (३३७) असे वारंवार झडझडून सांगणाऱ्या तुकारामांनी कोणत्याहि 'कर्मभ्रष्टांना' 'सर्वश्रेष्ठत्वा' चे प्रमाणपत्र दिले असेल असे ज्यांना वाटेल त्यांना वाटो. हा अभंग निश्चित क्षेपक असला पाहिजे. एरव्ही, केवळ आध्यात्मिक क्षेत्रात नव्हे तर नित्याच्या व्यवहारात

'महारासि सिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥
तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥' (५५)

हे उद्‌गार काय सुचवितात ? 'उत्तम कुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कुळ उभयतां' (३९२२); 'जातीचा ब्राह्मण । न करितां संध्यास्नान ॥ तो एक नांवाचा ब्राह्मण । होय हीनाहूनी हीन' (३९६५) ही वचने काय सांगतात ? याच्या उलट 'वैष्णव चांडाळ । धन्य त्याची माता ॥ शुद्ध उभयता । कुळ याती' 'ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वता निश्चयेसीं' (१२३५) याहि उद्‌गारांवरून हीच गोष्ट स्पष्ट होईल. तेव्हा जातिव्यवस्था मान्य करूनहि—कारण ती व्यावहारिक वस्तुस्थिति होती—गुणकर्माचे श्रेष्ठत्व खणखणीतपणे सांगून रूढिजन्य जातिव्यवस्थेमुळे बहुजनसमाजाच्या अंतःकरणात घर करून बसलेला न्यूनगंड घालविण्याचे कार्य तुकारामांनी फार मोठ्या प्रमाणात केले यात शंका नाही. अर्थात् खालच्या जातींनी काय, किंवा वरच्या जातींनी काय श्रेष्ठत्व प्राप्त करून घेण्यासाठी अथवा सांभाळून ठेवण्यासाठी सदाचार-संपन्न झाले पाहिजे, यावर तुकोबांचा फार मोठा कटाक्ष होता. या धर्माचे किंवा नीतिमार्गाचे धडे समाजाला देणे हे ते आपले कर्तव्यकर्म समजतात. 'धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आह्मांसि' (२६०), 'उजळावया आलों वाटा । खरा खोटा निवाड' (३१८), 'आह्मां हें कौतुक जगा द्यावी नीत । करावी फजित चुकती ते' (८३४) असे त्यांनीच म्हटले आहे. या धर्मरक्षणाच्या कार्याची त्यांच्या दृष्टीने दोन अंगे होती. एक निषेधस्वरूपाचे व दुसरे विधिस्वरूपाचे. पाखंडाचे खंडण करणे, धर्ममार्गाने जाण्याला जे चुकतील त्यांना फजीत करणे हे निषेधात्मक अंग

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

होय; तर नीतीचा उपदेश देऊन त्यांना सन्मार्गाला लावणे हे विधिस्वरूपाचे अंग होय. त्यांचा पहिला कटाक्ष पाखंड्यावर होता. 'ह्मणे विठ्ठल पाषाण। त्याच्या तोंडावरि वाहाण ॥ नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे ॥ शाळिग्रामासि ह्मणे धोंडा । किडे पडोत त्याच्या तोंडा ' (४३६६) अशा कडक शब्दात त्यांनी त्यांचा समाचार घेतला आहे. आचारभ्रष्टतेवर व दांभिकपणावर तुकोबांचा दुसरा कटाक्ष होता. आचारभ्रष्टतेविरुद्ध तर त्यांनी हत्यार उपसले आहे. 'वैश्य-शूद्राद्रिक। हे तरी सहज नीच लोक' पण सर्वांना मार्गदर्शन करणारे ब्राह्मण ? त्यांनी 'सांडिले आचार। द्विज चाहाड जाले थोर '—टिळे लपवून, विजारा नेसून 'बैसोनियां तक्तां । अन्नेंविण पिडिती लोकां ' इतकेच नाही तर हे 'नीचाचे चाकर। चुकलिया खाती मार ' (२६७). रामराम म्हणणे सोडून दोमदोम करणारे हे उच्चवर्णीय, खिस्तीचा हीन उदीम करताना विटाळ न मानता खुशाल महारमांगवाड्यात जाऊन 'मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा' (३९२१). वस्तुतः यांचे अनुकरण करून इतरांनी तरून जावे; पण येथे तर 'तरता नाहीं ठाव । बुडवी तारूं तरतीया ' (३८०६) – तरणाऱ्यांना नावच बुडवू लागली होती. 'वंदाया पुरते' बाह्य वेश धारण करणाऱ्या दांभिक संतांचाहि तुकोबांना कटु अनुभव आला होता. 'होऊनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ' (३९३४); 'लांबवूनि जटा नेसोनि कासोटा। अभिमान मोटा करिताती ' (३९३५); 'कान फाडूनियां मुद्रा ते घालिती । नाथ ह्मणविती जगामाजी ' (३९३६); 'कौडीकौडीसाटीं फोडिताती शिर । काढूनि रुधिर मलंग ते ' (३९३७); 'होउनी जंगम विभूती लाविती। शंख वाजविती घरोघरीं ' (३९३९); इत्यादि शब्दात संन्यासी, बैरागी, नाथ, मलंग, जंगम या पंथातील दांभिकांची त्यांनी खरपूस हजेरी घेतली आहे. 'तुका ह्मणे ऐसे दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ' (३९३४). मद्यमांसाशन करून व्यभिचार करणाऱ्या शाक्तांना तर त्यांनी नुसते धारेवर धरले आहे. हा रंडीदास 'शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ' (७९१). भिन्नपंथीय दांभिकाप्रमाणे खळ-दुर्जनावरहि त्यांचा कटाक्ष होता. त्यांची मानखंडना करण्यास कोणतीहि हरकत नाही असे तुकोबांचे स्पष्ट मत होते. 'दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥ लात हाणोनियां वारी । गुंड वाट शुद्ध करी ॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ तुका म्हणे नखें। काढुनि टाकिजेती सुखें ' (२१३८). 'विश्वीं विश्वंभर' (३७४७) असल्यामुळे परपीडक हा तुकोबांना आपला दावेदार वाटत असे. त्यांना 'दडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळा । राखूं तो चांडाळा ऐसा दूरी;' कारण 'अनाचार कांहीं न साहे अवगुणें । बहु होय मन कासावीस ' (२७९२). अशा आचारभ्रष्टांचा, दांभिकांचा व दुर्जनांचा तुकोबांना चांगला अनुभव आला होता म्हणून या सर्वांचा अत्यंत कठोर शब्दांनी निषेध करून त्यांचे

तुकोबांनी तीव्र ताडन केले आहे. ते करण्यासाठी 'तीक्ष्ण उत्तराचे बाण' हाती घेऊन ते सदैव फिरत आणि भीडभाड न धरता किंवा सानथोर न पाहता शरसंधान करीत (२१३६). निषेधाच्या या वचनात तुकारामांनी शिवराळ व बीभत्स शिव्याशापांची भाषा वापरल्याबद्दल अनेक नागरशिष्टांनी नाके मुरडली आहेत. पण स्वभावदुर्जनावर नाजुकसाजुक शब्दांच्या उपदेशाचा उपयोग होत नाही; तेथे अपशब्दांच्या चाबकाचे फटकारेच पाहिजेत. 'तेज्या इशारती। तट्टा फोक वरी घेती' (९०३) हे आपण अनुभवतोच की नाही? तुकोबा सांगतात की, हे दांभिक दुर्जन परपीडक आहेत म्हणून 'माझें संतापलें मन। परपीडा ऐकोन' (१२३१). दुर्जनांच्या दुष्कृत्यामुळे 'बुडतां हे जन न देखवे डोळां। येतो कळवळा म्हणउनि' (९४८). तथापि, आपल्या बोलांनी यांनी रागावूं नये. कारण, 'बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता। वचन नेणतां क्षमा कीजे॥ वाट दावी तया न लगे रुसावें। अतित्याई जीवें नाश पावे' (१३१) अशा शब्दात त्यांची ते क्षमाहि मागतात. यात तुकारामांचा कटु अनुभव जसा व्यक्त झाला आहे तशीच समाजोद्धाराची त्यांची तीव्र तळमळहि उत्कटतेने शब्दरूप झालेली आहे.

धर्मरक्षणाचा हा निषेधात्मक भाग जितका कठोर आहे तितकाच त्याचा उपदेशात्मक भाग कोवळा आहे. ईश्वर, ईश्वराची भक्ति, भक्तीचे मार्ग -- नामस्मरण व नामसंकीर्तन -- या अध्यात्मविषयाप्रमाणेच संसार, परस्त्री, परधन, सत्य, दया, क्षमा, शांति, परोपकार, परपीडा इत्यादि लौकिक विषयासंबंधी तुकोबांनी जनतेला अत्यंत समर्पक शब्दात नीत्युपदेश केला आहे तोहि त्यांच्या अनुभवातूनच स्फुरलेला आहे. या संबंधीच्या तुकोबांच्या उद्गारात क्वचित् विरोध असल्याचे भासते. पण याचे कारण निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने ते उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर निघाले, हे लक्षात घेतले पाहिजे. आपल्या साधनावस्थेत 'याजसाठीं वनांतरा। जातों सांडुनियां घरा॥ माझें दिठावेल प्रेम। बुद्धि होईल निष्काम' (७३७) असे त्यांनी म्हटले असले तरी सिद्धावस्थेत 'न लगे सायास जावें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण' (२४५८) स्वानुभव निर्णय त्यांनीसां सारिकांना सांगितला आहे. 'नव्हे आराणूक संवसारा हाती'(७३); 'ठाउकाचि आहे संसार दुःखाचा' (२८७८) हे खरे असले तरी 'सुखें करावा संसार। परि न संडावे दोन्ही वार' दया क्षमा घर। चोजवीत येतील'; (३४६) 'सुखें असों संसारीं। मग जवळीच हरी' (४१६१) हाच उपदेश त्यांनी अनुभवान्ती केला आहे. शरीर हे नाशिवंत आहे, त्यावर काळाची उडी केव्हा पडेल हे सांगता येत नाही, मृत्युपासून दारा, पुत्र, बंधु कोणीहि आपणाला वाचवू शकत नाही म्हणून, ईश्वराची कास धरणे उत्तम, हे अनुभवाने त्यांना पटले होते. 'फुटती तरुवर उष्णकाळमासीं। जीवन तयांसी कोण घाली?' 'पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर। तया मुखीं चार कोण घाली?' असे प्रश्न विचारून 'तुका ह्मणे ज्याचें नांव विश्वंभर। त्याचें निरंतर

ध्यान करीं' (२३१०) असे समर्पकपणे सांगून त्यांनी ईश्वरावर आस्तिक्य-बुद्धि निर्माण केली. ईश्वर किंवा देव म्हणून अनेक दैवतांचा बुजबुजाट झाला आहे. पण त्यात श्रीकृष्णाचा अवतार विठ्ठल हाच सर्वश्रेष्ठ होय. 'सेंदरीं हें देवी दैवतें । कोण तीं पुजी भुतेंकेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान' (६२१); 'नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।। रंडी चंडी शक्ती । मद्यमांसातें भक्षिती ।। बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाटीं देव ।। गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ।। मुंज्या म्हैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ।। वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें' अशा शब्दात क्षुद्र दैवतांचा धिक्कार करून 'या देवांचाहि देव' (२३८४) किंवा 'सकळ देवाचें दैवत' (२८६७) असलेल्या त्या बळिया पंढरीरायाकडे जनतेला वेधले आहे (२३८४). विठ्ठल म्हणजे 'अति सुखाहुनी सोलीव सुख' (६८४) होय. कलियुगात ईश्वर-प्राप्तीच्या 'अवघ्या वाटा क्षीण' झाल्यामुळे केवळ भक्तिपंथ तेवढा सोपा आहे (२२९९). या भक्तिपंथावरील वाटसरांचे मुख्य तीर्थक्षेत्र पंढरपूर होय. 'वाराणसी ते पंढरी' (४२०५); इतकेच नव्हे तर पंढरीला 'देव उभाउभी भेटे' म्हणून 'तुका ह्मणे पेठ । भूमिवरि हें वैकुंठ' (११३). तेथे कटीवर कर ठेवून विटेवर युगानुयुगे उभा असलेला 'उभारोनि बाहे विठो पालवीत आहे' (२२९९) तो बाहू उभारून बोलावतो आहे. कुणाकुणाला ? सगळ्यांना. त्या विठ्ठलाचे बोलावणे, तुकोबा सांगतात 'यारे यारे लाहान थोर । याति भलतें नारीनर' (५१९). कारण, या सुलभ भक्तिपंथात 'ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळां आहे अधिकार । बाळें नारीनर । आदि करोनि वेश्या ही' (११४२). ज्ञानेश्वर-नामदेवादि पूर्वसंतांनी प्रतिपादिलेल्या या भक्तिपंथाच्या श्रेष्ठत्वाचा अनुभव तुकोबांना स्वतःला आलेला होता. या पंथाची कास धरून त्यांची सर्व दुःखे निवारण झाली होती आणि ते स्वतः साक्षात्कारी संत बनले होते. म्हणून त्याचाच पुरस्कार व प्रचार तुकोबांनी अधिक तळमळीने केला आहे. हा भक्तिपंथ सगळ्यांना मोकळा आहे तसाच तो सोपाहि आहे. त्यासाठी साधकाची विठ्ठलाच्या ठिकाणी आत्यंतिक भक्ति व निर्मळ भोळा भाव पाहिजे, पांडित्याची गरज नाही. 'ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण' (१४५८). भक्तिभाव असून पांडित्य असले, साधक 'ब्रह्मज्ञानी निपुण' असून 'भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा' (८११) असला तर गोष्ट निराळी. पण सामान्यतः 'ज्ञानाचे आंधळे' हे केवळ 'भारवाही' (५५०) असतात. त्यांच्या ठिकाणी अहंकार येतो. 'ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे' (१५३६). हे अहंमन्य पंडित 'काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय' म्हणून 'भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें' (२८२७). भक्तिभावपूर्वक नामसंकीर्तन केले म्हणजे झाले, मग संसार सोडण्याची, रानावनात जाण्याची, इतर तीर्थक्षेत्रे

धुंडाळण्याची गरज नाही. 'नामसंकीर्तन साधन पैं सोपें। जळतील पापें जन्मांतरें॥ न लगे सायास जावें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण' (२४५८) असे तुकोबांनी वारंवार सांगितले आहे. 'नाम घेतां उठाउठी। होय संसारासी तुटी' (२७८०). किंबहुना 'मुखीं नाम हातीं मोक्ष' (२२९५) पडत असल्यामुळे 'नामापरतें साधन नाहीं। जें तूं करिशी आणिक कांहीं' म्हणून 'हाकारोनि सांगे तुंका। नाम घेतां राहों नका' (२७८०). नामाप्रमाणेच कथाकीर्तनांचेहि महत्त्व भक्तिपंथात फार आहे. किंबहुना 'कथा त्रिवेणीसंगम। देव भक्त आणि नाम' (२३५७) असल्यामुळे 'जप तप ध्यान न लगे धारणा। विठ्ठलकीर्त्तनामाजी सर्व' (२९२९). अशा रीतीने प्रापंचिकांनी विठोबाचे नामस्मरण व कथाकीर्तन करीत संसार सुखाने करावा. पण 'सुखाने' म्हणजे आसक्तीने नव्हे तर अनासक्तीने. स्त्रिया आणि धन ही सर्व दुःखाला कारण होतात, म्हणून स्त्रीलंपट नसावे. 'रांडापोरा' विषयी तुकोबा ज्या ज्या वेळी सांगतात त्या त्या वेळी त्यांच्या ठिकाणी आसक्ति नको, लंपटता नको, एवढाच त्याचा अर्थ असतो. एरवी आईची थोरवी गौरवाने सांगणारे तुकोबा स्त्रीची स्त्री म्हणून निंदा करतील हे कसे संभवनीय आहे? धनदेखील जोडावे, पण ते 'उत्तम व्यवहारा'ने; आणि त्याचा वेच करावा तो 'उदास विचारा'ने (२८६४). ही पथ्ये पाळली म्हणजे संसारात स्त्री आणि धन दोन्ही उपकारकच होतात व संसार सुखाचा होतो. तुकोबांनी काढलेले 'मानवी संसाराचे चित्र येथून तेथून नैराश्याने व उद्वेगाने भरून गेले आहे' हे म्हणणे बरोबर नाही. संसार नाशिवंत आहे, मिथ्या आहे हे खरेच आहे. म्हणून तो सत्य लेखून त्यात गुंतू नये. 'ठाउकाचि आहे संसार दुःखाचा' परंतु 'चित्तीं सीण याचा वाहों नये' (२८७८) हे त्यावर अनुपान आहे. 'संसारा आलिया एक सुख आहे। आठवावे पाये विठोबाचे॥ येणें होय सर्व संसार सुखाचा। न लगे दुःखाचा लेश कांहीं' (३९२८) हे लक्षात ठेवूनच तुकोबा 'सुखें करावा संसार' असे सांगतात. संसारातील इतर पथ्येहि सदाचारसंपन्न होऊन पाळलीच पाहिजेत. त्यात परद्रव्य आणि परनारी ही दोन मुख्य आहेत. 'साधनें तरी हींच दोन्ही। जरी कोणी साधील। परद्रव्य परनारी। याचा धरी विटाळ' (५७५); 'परावियां नारी माउलीसमान। परधनीं बाटों नेदीं मन। जीवित्व तें तृणासमान। स्वामिकाजीं जाण शूर म्हणों तया' (४५०). दंभ, अहंकार, मानापमान यांना दूर सारले पाहिजे. कारण 'मानदंभांसाटीं। पडे देवासवें तुटी' (२३९९); म्हणून 'मान अपमान गोवे। अवघे गुंडूनी ठेवावे॥ हेंचि देवाचें दर्शन। सदा राहे समाधान' (१०९). दया, क्षमा, शांति हे सद्गुण अंगी बाणवावे. 'दया, क्षमा, शांति। तेथें देवाची वसति' (१४३२) हे तुकोबांचे वचन सुप्रसिद्ध आहे. तुकोबा दया, क्षमा, शांतीचा उपदेश करतात याचा अर्थ ते नेभळटपणा शिकवितात असा बिलकुल नाही. तुकोबा

अत्यंत व्यवहारी व क्रियाशील संत होते. प्रत्येकाने आपला मान नेहमी जतन करून ठेवला पाहिजे असे ते सांगतात. 'तुका म्हणे यश कीर्ति आणि मान। करितां जतन देव जोडे' (३१८१); 'तुका ह्मणे जीणें। देवा काय हीनपणें' (३१८४); 'ज्यावें हीनपणें। कासयाच्या प्रयोजनें' (३२६५); 'जळो जळो तैसें जिणें। फटमरे लाजिरवाणें' (३१७९) इत्यादि उद्‌गार याची साक्ष देतील. 'दया तिचें नांव भूतांचें पालन। अणीक निर्दळन कंटकांचें' (२६४) ही तर त्यांची दयेची व्याख्या आहे. त्यांचा आदर्श संत नुसता टाळकुट्या नाही. तो नाठाळांच्या माथी काठी हाणणारा आहे, मेणाहून मऊ असला तरी प्रसंगी कठीण वज्राला भेदणारा आहे, अमृताहून गोड असला तरी योग्य वेळी विषाहून कडू होणारा आहे, रंजल्यागांजल्यांना आपले म्हणणारा पण परपीडक दावेदारांना दंडणारा आहे, भिक्षापात्र हातात घेऊन जगाला साकडे घालणाऱ्याच्या लाजिरवाण्या जिण्याला धिक्कारणारा आहे, नम्रतेने मुंगी होऊन साखर खाणारा पण जगाचे आघात सोसण्याचे सामर्थ्य बाळगणारा आहे, भूतमात्रांसमोर नम्र होणारा पण हे 'शूरत्वाचे अंग' जाणणारा आहे, सर्वभूती अन्न देणारा असला तरी तो दूध पाजून साप पोसणारा नाही. उलट 'देव्हाऱ्यावरि विंचू आला। देवपूजा नावडे त्याला। तेथे पैजारेचें काम। अधमासि तों अधम' (४३७८) व्हायला सांगणारा आहे. प्रारब्धावर तो विश्वास ठेवायला सांगतो पण म्हणून तो प्रयत्नाच्या विरुद्ध आहे असे नाही. असाध्य गोष्टीदेखील अभ्यासाने साध्य होतात. 'असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका ह्मणे' (२९८); 'ओलें मूळ भेदी खडकाचें अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धि' (१४००) असे हडसून खडसून सांगणारा आहे. या व्यवहारचतुर व क्रियाशील संताने आपल्या आचरणाने हा आदर्श बहुजनसमाजासमोर ठेवला व त्याला व्यवहारचतुर व क्रियाशील बनविले.

तुकोबांनी लिहिलेले 'पाईक – अभंग' (१०६२ – १०७२) पाहिले म्हणजे हा नेभळटपणाचा आरोप किती चुकीचा आहे याचे चांगले प्रत्यंतर येते. भोवतालच्या जीवनातील 'न देखवे डोळां' (५५७) ऐशा आकांताने, परपीडेने आणि परचक्राने दुःखी होऊन तळमळणाऱ्या, 'पीडतां राष्ट्र देखोनि जग' (१६०४) कळवळणाऱ्या तुकोबांनी हातात वाग्बाण घेऊन दुर्जनावर शरसंधान केले; इतकेच नाही तर आपल्या ओजस्वी वाणीने जनतेला, शौर्याचा संदेश कसा दिला हे त्यावरून चांगले लक्षात येईल. तुकोबांना केवळ विठ्ठलभक्त पाइक अभिप्रेत नव्हता, तर प्रजेचे दुःख निवारणारा पाइकहि अभिप्रेत होता. 'पाइकावांचून नव्हे कधीं सुख। प्रजामध्यें दुःख न सरे पीडा' (१०६२); 'पाईक तो प्रजा राखोनियां कुळ। पारखिया मूळ छेदी दुष्टा' (१०६६) असे 'व्हावें पाइक जिवाचे उदार' (१०६२) हीच त्यांची इच्छा होती. 'येतां गोळचा बाण साहिले भडमार।

वर्षतां अपार वृष्टि वरी ॥ स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडन शोभा दावी' (१०६३) असा उपदेश करून आपल्या कीर्तनाला येणाऱ्या मावळ्यांना त्यांनी शूर शिपाई बनविले. शिवाजीमहाराजांची आणि तुकारामांची भेट झालेली असो किंवा नसो, पण त्या वेळच्या वातावरणाला उपयुक्त असे शूरवीर निर्माण करण्याचे कार्य मात्र तुकोबांच्या अभंगांनी केले यात शंका नाही. त्यांचे हे राष्ट्रीय कार्य अत्यंत महत्त्वाचे होय.

तुकोबांचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान भक्तिपंथातील देवभक्तांच्या भूमिकेला साजेसेच आहे. द्वैत-अद्वैत, भेद-अभेद ह्या शुष्क पांडित्याच्या चर्चा म्हणजे त्यांच्या दृष्टीने अमंगल आहेत. ते 'भ्रमाचे संवाद' (३७) आहेत. यासंबंधीचे त्यांचे उद्‌गार साक्षात्कारानंतरचे दिसतात. 'दुजें खंडे तरी। उरला तो अवघा हरि' (४५); 'तुज मज ऐसी परी। जैसे तरंग सागरीं ॥ दोहींमाजी एक जाणा । विठ्ठल पंढरीचा राणा' (३९९९); 'लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥ तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ॥ अग्निकर्पुराच्या मेळीं। काय उरली काजळी ॥ तुका ह्मणे होती । तुझी माझी एक ज्योती' (२४८४) इत्यादि अनेक अभंगावरून तुकोबांना झालेला अद्वैताचा साक्षात्कार स्पष्ट दिसतो. तथापि अद्वैतात 'देव सबाह्य अंतरीं' असल्यामुळे 'आतां भजों कवणे परी' (५८१) अशी त्यांना जणु चिंता पडलेली भासते. कारण तुकोबा 'भक्त' होते; आणि भक्ताला द्वैतातील स्वामी-सेवकभावच अधिक प्रिय असतो. म्हणूनच की काय 'अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान। गोड हे चरण-सेवा तुझी' (३७५४); 'अद्वैताची वाणी। नाहीं ऐकत मी कानीं' (७३७) असे ते म्हणतात. परमेश्वराची म्हणजे 'निजवस्तूची भेटी घ्यावी.' पण ती कशी ? तर 'मुंगी होउनि साकर खावी' (२८९२). मुंगी स्वतःच साखर झाली तर तिने गोडी घ्यावी कशी आणि कुणाची ? तेव्हा 'देवभक्तपण । तुका ह्मणे नाहीं भिन्न' (२९४); 'भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज' (६९८) असे असले तरी हा अभेद 'तूं धनी मी सेवक। आइक्य तें एका एक' (३४३६) अशा स्वरूपाचा आहे. अद्वैताच्या भूमिकेवर उभे राहून तुकोबा द्वैताचे सोहळे भोगत होते असेच म्हटले पाहिजे.

द्वैताद्वैताप्रमाणेच सगुण-निर्गुणाच्याहि चर्चेत तुकोबा पडले नाहीत. परमेश्वर निराकार निर्गुण आहे पण भक्तासाठी तो सगुण-साकार झालेला आहे. 'दोन्ही टिपरीं एकचि नाद। सगुण निर्गुण नाहीं भेद रे' (१९२) अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. तथापि भक्ताला सगुणाचीच उपासना अधिक प्रिय असते. म्हणूनच 'इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप' ज्यांची इच्छा असेल त्यांच्यासाठी, हे ईश्वरा, तू निर्गुण निराकार राहा, पण 'आह्मांसी स्वरूपस्थिती चाड' (३२६३). निर्गुण परमेश्वराचे 'गुणासी' म्हणजे सगुण स्वरूपातच दर्शन घ्यावे. 'अवघ्या दशा

येणें साधती। मुख्य उपासना सगुणभक्ति' (६४५); कारण 'नामपाठ मुक्ता-फळांच्या ओवणी। हें सुख सगुणीं अभिनव' (७१५) असे तुकोबा सांगतात. किंबहुना, सगुण भक्तिसुखासमोर 'भक्तांचिया मना मोक्ष न ये' (७१५) त्यांना मोक्षहि तुच्छ वाटतो. 'भक्तीच्या उत्कर्षे। नाहीं मुक्तीचें तें पिसें' (२३४५).

तुकोबांची ही सगळी अभंगवाणी प्रतीतीची – अनुभवाची होती––'अनुभवें वदे वाणी। अंतर ध्यानीं आपुलें' (२७९१) 'अनुभवें आलें अंगा। तें या जगा देतसे। नव्हती हाततुके बोल। मूळ ओल अंतरिची' (२८४५). अंतःकरणातील ही ओल, हा जिव्हाळा, ही पोटतिडिक तुकारामांच्या अभंगवाणीत आहे, म्हणूनच ती श्रोत्यांच्या हृदयाला जाऊन भिडते. त्यांचा एकेक अभंग म्हणजे त्यांच्या अंतः-करणाचा तुकडा आहे, भावनांचा आणि विचारांचा आरसा आहे, व तो इतका स्वच्छ आहे की त्यात तुकारामाला कोणीहि पाहून घ्यावे; इतकेच नाही तर त्यांच्या उपदेशात्मक व टीकात्मक अभंगात स्वतःला पाहून घ्यावे. तुकारामांचे बोलणे सरळ, स्वाभाविक, कळकळीचे पण निर्भीड, त्यामुळे सर्वांना ते पटते, दुर्जनांना मात्र बोचते. त्यांच्या टीका व्यक्तीला उद्देशून नव्हत्या, सामान्य स्वरूपाच्या होत्या. दुर्जनांच्या त्या टाळक्यात बसतात त्याला तुकाराम काय करणार? ते स्वतः सांगतात–

आमुचें तें आहे सहज बोलणें। नाहीं विचारून केलें कोणीं॥
अंगें उणें त्याच्या बसे टाळक्यांत। तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे॥
तुका ह्मणे आम्ही काय करणें त्यासी। ढका खवंदासी लागतसे॥ (४२२५)

या काव्यरचनेच्या मुळाशी तुकारामांचे उत्कट भावजीवन होते, व्यापक अनुभूति होती. त्यांचे हृदय खऱ्या कवीचे होते. ते अत्यंत बुद्धिमान पण कमालीचे सहृदय होते. त्यामुळे स्वतःच्या आणि समाजाच्या जीवनातील लहानमोठ्या प्रसंगांचा टचका त्याच्या अंतःकरणाला तेव्हाच जाऊन पोचे, आणि तो काव्यरूपाने बाहेर पडे. अनुभूति आपली पण ती परमेश्वराच्या प्रेरणेने शब्दरूप होऊन बाहेर पडते अशी त्यांची श्रद्धा होती. 'तुका ह्मणे झरा। आहे मुळींचा चि खरा' (३५००); 'वचनाचा अनुभव हातीं। बोलविती देव मज' (३२०४); 'नव्हती माझे बोल। अवघें करितो विठ्ठल' (९५२) अशी अनेक अभंगात त्यांनी ग्वाही दिलेली आहे. स्वतःच्या आणि बहुजनसमाजाच्या उद्धाराची तीव्र तळमळ त्यांच्या व्यापक अनुभूतीच्या रसात भिजून अभंगांच्या रूपाने बाहेर पडलेली आहे. हे खरे 'कवित्व' आहे आणि म्हणून ते यथार्थपणे 'अभंग' आहे. त्यामुळे तुकारामांच्या जिवंत-पणीच त्यांची अभंगवाणी सर्वत्र पसरली आणि जनतेच्या जिभेवर सुभाषिता-सारखी जाऊन बसली. 'कोण सांगायास। गेलें होतें देशोंदेश॥ नेलें वाऱ्याहातीं माप। समर्थ तो माझा बाप' (६९५) हे खरे आहे. त्यांचे बोल जनरंजनासाठी नाहीत, कळवळ्याचे आहेत. 'न ये नेत्रां जळ। नाहीं अंतरीं कळवळ॥ तों हे चावटीचे

बोल । जन रंजवणें फोल '(८२). ते 'यशसे आणि अर्थकृते' हि नाहीत. तुकोबांनी 'मानदंभासाठी अक्षरांची आटाआटी' केली नाही. 'तुका ह्मणे कवित्व करी। मानवस्तु हे आदरी ।। थू थू त्याच्या तोंडावरी। व्यर्थ सिणवी वैखरी (३५६७). त्यांचे कवित्व 'व्यवहारविदे' आणि 'शिवेतरक्षतये' मात्र निश्चित आहे. 'भवतापश्रमी दुःखें पीडिलीं निववूं त्यां' (२३०२) हे तर त्यांचे जीवितकार्य होते. त्यासाठी 'सावध करी तुका। ह्मणे निजले हो आइका' (३९७९). 'उजळावया आलों वाटा। खरा खोटा निवाड' आणि यासाठीच 'बोलविले बोल बोलें। धनी विठ्ठला सन्निध' (३१८). 'सादावीत गेला तुका। येथें एकाएकीं तो' (१३०९). भवतापश्रमीच्या दुःखनिवारणासाठी निघालेल्या तुकारामांच्या अभंगवाणीतील अर्धाअधिक भाग त्यांच्या साधकावस्थेतील असून तो सर्वांशी आत्मपर आहे. हे आत्मपर अभंग आर्ततेने आणि कारुण्याने ओथंबलेले आहेत. तुकारामांचे, आत्मोद्धारासाठी तळमळणारे अंतःकरण त्यातून ओसंडून वाहते आहे. देवभक्तांचा सुखसंवाद, प्रेमकलह, साधकावस्थेतील निरनिराळे अभंग इत्यादींनी भरलेली ही भावगीते मनाला चटका लावणारी आहेत. स्वतःला विरहिणी कल्पून त्यांनी लिहिलेल्या विराण्या नाट्यगीतात्मक आहेत. तुकोबांनी पंढरपूरच्या पत्त्यावर पांडुरंगाला पाठविलेले पत्र अतीव कारुण्याने थबथबलेले आहे. कवीच्या कवित्वाचा त्यात परमोत्कर्ष झालेला आहे असे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. त्यांच्या काव्याच्या दुसऱ्या विभागात हमामा, हुतूतू, फुगडी इत्यादि खेळांच्या रूपकांनी केलेले परमेश्वरवर्णन, उपदेशपर आणि प्रासंगिक अभंग यांचा समावेश होतो. या सर्व अभंगात त्यांच्या अनुभवाच्या उत्कटतेबरोबर व व्यापकतेबरोबरच निरीक्षणाची सूक्ष्मताहि दृष्टोत्पत्तीस येते. उपमानांच्या रूपाने त्यांनी योजलेल्या प्रतिमांचा सविस्तर पण सूक्ष्म अभ्यास अद्याप कुणी केलेला नाही. तो केला तर माझ्या विधानाची सत्यता सहज दिसून येईल. चंद्र, चकोर, कुमुदिनी, भ्रमर, इत्यादि ठराविक उपमाने तर त्यात आहेतच; पण याशिवाय लौकिक व्यवहारातील व कौटुंबिक जीवनातील उपमाने त्यांनी विपुल प्रमाणात योजलेली आढळतील. शेती, सावकारी, दुकानदारी, लढाई, मायलेक, पितापुत्र, भाऊबहीण यांच्या संबंधाच्या प्रतिमांनी त्यांच्या काव्याला शोभा आलेली आहे. 'शुद्ध बीजापोटीं।' फळें रसाळ गोमटीं' (६२); 'मिरासीचें ह्मूण सेत। नाहीं देत पीक उगें। (८१); 'मढें झांकुनियां करिती पेरणी। कुणबियाचे वाणी लवलाहें' (८२३); ही शेतीतील उपमाने; 'मुलाम्याचें नाणें। तुका ह्मणे नव्हे सोनें' (१५६६); 'चुकलिया ताळा। वाती घालुनि बैसे डोळां' (२७५७); 'सत्य तराजू पैं धरा ॥ नका कृत्रिम विकरा '(४०५२); 'भक्तिऋण घेतलें माझें। चरण गाहाण आहेत तुझे। प्रेमव्याज देई हरी। माझा हिशेब लवकरी करीं' (४३२०) ही सावकारी-व्यापारातील उपमाने; 'धाकुटयाचे मुखीं घांस घाली माता। वरी करी

सत्ता शाहाणियां '(२४२); ' कन्या सासुऱ्यासि जाये। मागें परतोनि पाहे ' ' चुकलिया माये । बाळ हुरुहुरु पाहे ' (२६६) ही कौटुंबिक जीवनातील उपमाने; ' ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ' (२४५२); ' मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली·'(२३८०) ' काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे न लगे वाती ' (२४९७) इत्यादि सूक्ष्म जीवजंतूंच्या जीवनाची उपमाने केवळ आपणासमोर ठेवतो. ही सर्व उदाहरणे पाहिली म्हणजे तुकारामांच्या काव्यातील वेगळेपण लक्षात येईलच व त्यातच त्यांच्या काव्याच्या लोकप्रियतेचे व परिणामकारकतेचे रहस्य सापडेल. सर्वसामान्यांच्या, अठरापगड जातींच्या जीवनातील ही उपमाने बहुजनसमाजाला विशेष पटली व म्हणून ती त्यांच्या तोंडी सुभाषिताप्रमाणे सहज रुळली तर आश्चर्य नाही. तुकारामांच्याच काळात नव्हे तर आजहि सामान्यांच्या तोंडून ' तुका म्हणे ' हा अभंग सहजगत्या बाहेर पडतो. कारण तुकाराम महाराष्ट्राचे म्हणजे महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचे खरेखुरे प्रतिनिधि होते. त्यामुळे त्यांचे जीवन तुकारामांच्या काव्यात प्रतिबिंबित झालेले आहे. म्हणून तुकारामांच्या वचनांचा प्रत्यय व पडसाद त्यांच्या अंतःकरणात ताबडतोब उठतो आणि ती वचने त्यांच्या अंतःकरणात ठसून जातात. म्हणूनच इतर कोणत्याहि संतकवीपेक्षा तुकाराम आणि तुकारामांची अभंगवाणी अधिक लोकप्रिय आहे; आणि मराठी भाषा व मराठी मन कायम आहे तोंपर्यंत ती अशीच अभंग राहील यात शंका नाही.

—ध्वनिक्षेपण दिनांक २६ मार्च, १९५८

• • •

पुष्प चौथें

रामदासांचें जीवनकार्य

तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्षीय भाषण : **कृ. पां. कुलकर्णी**

कै. पुरुषोत्तम मंगेश लाड यांच्या स्मरणार्थ आकाशवाणी मुंबई केंद्रानें सुरू केलेल्या व्याख्यानमालेंतील आज चौथें व्याख्यान आहे. व्याख्यानाचा विषय आहे ' रामदासांचें जीवनकार्य ' आणि व्याख्याते आहेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. विषय व वक्ता या दोहोंचा इतका योग्य व सुंदर मेळ दुसरा क्वचितच आढळेल. रामदास व त्यांचें वाङ्मय हा एक महाराष्ट्रांतील विद्वानांच्या मोठ्या आवडीचा विषय आहे. आजवर कित्येक विद्वानांनीं त्याचें संशोधन केलें आहे.

धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभा, राजवाडे संशोधन–मंदिर व समर्थवाग्देवता-मंदिर वगैरे संस्था त्या दृष्टीनें उल्लेखनीय आहेत. तेथील समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव ह्यांनीं तर आपली उभी हयात रामदासी संशोधनांत खर्च केली आहे व अद्याप करीत आहेत. कै. लाड ह्यांनींहि धुळें येथें असतांना आपल्या इतर व्यासंगाबरोबर समर्थ-वाङ्मयाचेंहि परिशीलन केलें. कै. लाड हे चिकित्सक संशोधक होते. त्यांनीं वाङ्मयासंबंधीं पुष्कळ संशोधन केलें. त्यांनीं जसें सर्जनपर वाङ्मय लिहिलें तसें संशोधनपर वाङ्मयहि लिहिलें. त्यांच्या मतें प्रयत्न, प्रचीति, प्रक्षोभ, प्रसाद व प्रतिभा हे वाङ्मयाचे पंचप्राण आहेत. रामदासांसंबंधीं ज्याप्रमाणें संशोधन पुष्कळ झालें आहे त्याचप्रमाणें त्यांच्यासंबंधीं विद्वानांमध्यें मतभेदहि पुष्कळ निर्माण झाले आहेत. ह्या मतभेदांतून योग्य मार्गदर्शनाचा लाभ आज आपणांस तर्कतीर्थांच्याकडून होणार आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं भक्तिमंदिराचा पाया महाराष्ट्रांत कसा घातला हें आपण पहिल्या व्याख्यानांत ऐकलें. त्या मंदिराच्या गाभाऱ्याची सजावट एकनाथमहाराजांनीं कशी केली हें आपण दुसऱ्या व्याख्यानांत पाहिलें. त्याच्या कळसाचें दर्शनहि आपण तिसऱ्या व्याख्यानांत तुकोबाच्या अभंगवाणीनें घेतलें. मोक्षाचीं द्वारें ह्या महात्म्यांनीं सर्वांना खुलीं केलीं. ब्राह्मण-अंत्यज, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष इत्यादि सर्व भेद त्यांनीं नाहींसे केले

मोक्षाची प्राप्ति त्यांनीं सर्वांच्या आटोक्यांत आणली. त्यांनीं धार्मिक लोकशाही प्रस्थापित केली किंवा लोकशाहीचा धर्म निर्माण केला. त्यांपैकीं प्रत्येक महात्म्यानें आपली वैयक्तिक मुक्ति तर साधलीच, पण त्याबरोबर इतरांनाहि आपली मुक्ति साधून घेण्याचें सामर्थ्य प्राप्त करून दिलें. त्यांच्या आध्यात्मिक मुक्तीच्या पुढें आधिभौतिक मुक्तीचा तो पाड काय ? शिवाय ज्ञानेश्वरांच्या काळांत तेराव्या शतकांत

इंदुवंशविलासु । जो सकलकलानिवासु । न्यायातें पोखीत क्षितीशु ।

अशा यादवांचें राज्य होतें. यादवांची राजवट म्हणजे स्वराज्याचीच राजवट असल्यामुळें आधिभौतिक मुक्तीचा तेव्हां प्रश्नच नव्हता. परंतु पुढच्या काळांत देशावर सावट आलें. त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न एकनाथ व इतर दत्तात्रेय पंथांतील महंतांनीं केला. त्यांनीं भूमि तयार केली. दोन्ही प्रकारच्या मुक्तींच्या रोपड्यांची चांगली मशागत केली. परंतु पुढील काळांतील अज्ञानाच्या व अवनतीच्या अंधकारांत सांपडलेल्या लोकांना खडबडून जागें करण्याचें कार्य रामदासांनीं केलें. आध्यात्मिक व आधिभौतिक मुक्तीचा मार्ग दाखविण्याचें कार्य रामदासांनीं केलें. तेराव्या शतकांत ज्याप्रमाणें विद्येचें पुनरुज्जीवन झालें तसेंच सतराव्या शतकांतहि झालें व हें करण्याचें बरेचसें श्रेय रामदासांचें आहे.

ज्ञानेश्वरांनीं सुरू केलेली शांतरसाची परंपरा इतर तत्कालीन व उत्तरकालीन साधुसंतांनीं पुढें चालविली. नामदेवाचे व जनाबाईचे अभंग, नाथांचे भागवत व भावार्थरामायण, तुकोबांचे अभंग हीं त्या शांतरसाच्या परंपरेंतील दालनें होत. ही एक बाजू झाली; ही एक परंपरा झाली. हिच्या बरोबरीनेंच महाराष्ट्रांत दुसरी एक परंपरा त्या काळीं किंवा त्या काळाच्याहि पूर्वीपासून प्रचलित होती. ती परंपरा म्हणजे ब्रह्मरसाची. ह्या दोन्ही परंपरांचें उद्दिष्ट एकच आणि तें म्हणजे आध्यात्मिक आणि आधिभौतिक मुक्ति.

ब्रह्मरसाची ही परंपरा महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांच्याहि पूर्वी सुमारें शंभर वर्षें तरी चालू होती. ती मुकुंदराजांनीं सुरू केली. ते म्हणतात,

" शृंगारादिक नवरस । तेहि जेथ अतिविरस ।
ते परब्रह्म येक रस । जाणावें योगिराजे ॥ " १८-१२७ वि. सिं.

आणखीहि ते म्हणतात–

" तूं ब्रह्मरसाचा पूतळा । परमपुरुषः " १-३ वि. सिं.

हीच परंपरा ' परमामृत ', ज्ञानेश्वरांचा ' अमृतानुभव ', सरस्वतीगंगाधरांचें ' गुरुचरित्र ', दासोपंतांचा ' गीतार्णव ', व मुख्यतः समर्थांचा ' दासबोध ' ह्या ग्रंथांत प्रतिबिंबित झाली. हें जें आम्ही म्हणतों त्याला एक प्रमाण आहे. रामदासी पंथांतील आत्मारामबुवा ह्यांनीं आपल्या ' दासविश्रामधाम ' ग्रंथांत तसा उल्लेख केला आहे. समर्थांचें वास्तव्य बुटेटेकडीवर असतांना त्यांना मुकुंदराजांचे कांहीं

शिष्य आढळले. त्यांच्या जवळील त्यांनीं मुकुंदराजांचा "विवेकसिंधु" वाचला. समर्थांना तेथें स्वप्नांत दृष्टान्त झाला. मुकुंदराज त्यांच्या भेटीस आले व त्यांनीं समर्थांना सांगितलें कीं–

"आखुड ग्रंथ हा सिंधु सहसा। विस्तार सर्वत्रा कळेल तैसा।
ग्रंथ स्वमतीनें रचावा।"

ह्यावर समर्थांनीं 'तथास्तु' असें म्हटलें आणि 'दासबोध' हा ग्रंथ रचिला. मुकुंदराजांनीं स्थापिलेल्या, दत्तात्रेयपंथीयांनीं पुढें चालविलेल्या व रामदासी पंथीयांनीं परिणत केलेल्या ह्या ब्रह्मरसपरंपरेंतहि आध्यात्मिक व, आधिभौतिक मुक्तीचें मार्गदर्शन होतें.

सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत ह्या दोन्हीहि परंपरा चालू होत्या. शांतरसाचे पुरस्कारक तुकोबा व ब्रह्मरसाचे पुरस्कारक रामदास हे दोघे एकाच काळीं व एकाच क्षेत्रांत आपापलें कार्य करीत होते. कार्य जरी भिन्न तरी पण परिणाम एकच. दोघांची वाङ्मय निर्मिति जरी भिन्न स्वरूपाची असली तरी परिणाम इष्टच झाला. त्यांची भिन्नता ही त्यांच्या वैयक्तिक स्वभावामुळें आहे, सामाजिक प्रेरणेमुळें नव्हे. वाङ्मयनिर्मिति हा जसा वैयक्तिक प्रयत्न आहे तसाच तो सामाजिक प्रयत्नहि आहे.व्यक्तितत्त्वाच्या दृष्टीनें त्यांत भिन्नता जरी दिसली तरी कालतत्त्वाच्या दृष्टीनें त्यांत एकताच असते व चिरंतन तत्त्वाच्या दृष्टीनें तर घनिष्ठ एकताच असते. ह्या दुसऱ्या परंपरेंतील श्रेष्ठ महंत म्हणजे रामदास.

समर्थांचा अवतार एखाद्या प्रेरक विभूतीचा किंवा एखाद्या प्रेषित विभूतीचा आहे असें वाटतें. रामदास्य ही त्यांची सेवा आहे, रामराज्य हा त्यांचा संदेश आहे. त्यांच्या वाङ्मयांत राकटपणा आहे, थोडा ओबडधोबडपणा आहे; पण त्याबरोबर जोरदार प्रामाणिकपणा आहे. त्यांचें सांगणें धबाबा लोटणाऱ्या धारेसारखें किंवा धबधबा आदळणाऱ्या तोयासारखें आहे. मेघांच्या गर्जनांत उसळणाऱ्या सागराच्या कल्लोळासारखा त्यांचा उपदेश आहे. अशा ह्या महान द्रष्टचा रामदासांच्या व्यक्तिमत्त्वाचें व जीवनाचें दर्शन आज पंडित लक्ष्मणशास्त्री हे करून देणार आहेत.

लक्ष्मणशास्त्री हे महाराष्ट्रांतील एक अत्यंत बुद्धिमान व विचारवंत असे विद्वान आहेत. वाङ्मयाच्या जाणकारांत ते अग्रेसर आहेत. वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत त्यांच्या प्रज्ञेला कुशाग्रता व विशालता प्राप्त झाली आहे. ब्रह्मीभूत केवलानंदसरस्वतींच्या सान्निध्यांत त्यांनीं शास्त्राचें व सारस्वताचें अध्ययन केलें आहे. पौर्वात्य ग्रंथांच्या बरोबरीनें त्यांनीं पाश्चात्य विचारवंतांच्या ग्रंथांचेंहि परिशीलन चांगल्या डोळसपणानें केलें आहे. दोन्ही विद्यांतील चांगलें जें तें त्यांनीं उचलल्यामुळें त्यांच्या विचारांत गाढत्व आलेंच पण त्याबरोबर प्रगतिशीलत्वहि आलें आहे. लक्ष्मणरेषा आहे, पण ती प्रतिपक्षाच्या विरोधाला आहे. त्यांच्या

स्वतःच्या विद्येला नाहीं. अशा एका व्यासंगी व प्रगतिप्रिय पंडिताकडून आज आपणांस समर्थांच्या जीवनकार्याचें विवेचन ऐकावयास मिळणार आहे. तेव्हां आपणां सर्वांच्या व आकाशवाणी मुंबई केन्द्र यांच्या वतीनें मी त्यांना आपलें व्याख्यान सुरू करण्यास विनंती करतों.

—ध्वनिक्षेपण दिनांक २७ मार्च, १९५८

• • •

रामदासांचें जीवनकार्य

तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

श्रीचक्रधरस्वामी, ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत, वामन व रामदास यांनींच विशेषतः आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची रचना मराठींत मध्ययुगांत केली आहे. त्या मध्ययुगीन मराठी तत्त्वज्ञान्यांच्या परंपरेंतील अखेरचे श्रेष्ठ संत रामदास होत. श्रीचक्रधरस्वामींचें द्वैती तत्त्वज्ञान मराठी समाजांत प्रसृत होण्यांत यशस्वी झालें नाहीं. बाकीच्या संतांचें भागवतधर्मीय अद्वैत तत्त्वज्ञान सर्वत्र फैलावलें. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व दासबोध ही जुन्या मराठी साहित्यांतील प्रस्थानत्रयी होय. प्रपंचांत राहूनच परमार्थाची सिद्धि करतां येते, हा पुराणप्रसिद्ध भागवतधर्मीय सिद्धान्त या प्रस्थानत्रयीनें मराठी भाषेच्या द्वारें समाजांत प्रस्थापित केला. या विचारानेंच महाराष्ट्रांतील सामाजिक जीवनाची शुद्धि केली व त्याच्यांत जोम राखण्याचें कार्य केलें; तें आतांपर्यंत अप्रतिहत सुरू आहे.

ज्ञानेश्वरांपासून चालत आलेलें भागवतधर्मीय तत्त्वज्ञान रामदासांनीं स्वतःच्या चिंतनानें, प्रतीतिबलानें व प्रतिभेनें अधिक समृद्ध केलें. भगवद्गीता, भागवत व योगवासिष्ठ यांतील अनेक कल्पनांमध्यें नवीन गंभीर अर्थ रामदासांना दिसला. प्रपंच व परमार्थ यांच्यांतील विसंगति पूर्ण दूर करून त्यांच्यांत पूर्ण सुसंगति तात्त्विक दृष्टीनें दाखविण्यांत अपूर्व यश रामदासांनीं मिळविलें आहे. शंकराचार्यांच्या मायावादी अद्वैतदर्शनाला एक निराळा संस्कार प्रथम ज्ञानदेवांनीं दिला आणि नंतर रामदासांनीं त्याला आणखी दुसरा संस्कार दिला. रामदासांनीं अद्वैतदर्शनाला प्रवृत्ति-निवृत्तीच्या द्वंद्वांतून सोडवून घेतलें, प्रपंच व परमार्थ यांच्यांतील विरोध मोडून काढला आणि परमार्थाच्या सिंहासनावर उत्तम पुरुषाच्या प्रपंचाला मूर्धाभिषेक केला. हें अस्सल वैचारिक कार्य इतर कोणालाहि मध्ययुगांत इतक्या यशस्वी रीतीनें करतां आलें नाहीं. या कार्याचें विहंगावलोकन या भाषणाच्या उत्तर भागांत करूं.

रामदासांच्या आत्मचरित्राचें व कार्याचें उत्कट, भव्य व संदर चित्र त्यांच्या साहित्यांत जागोजागीं प्रतिबिंबित झालें आहे. त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत त्याचें सार 'संकेतें' म्हणजे सूचित रूपानें असें आहे —

बहुजनांस चालवी। नाना मंडळें हालवी। ऐसी समर्थपदवी। विवेकें होते॥ विवेक एकांतीं करावा। जगदीश धारणेनें धरावा। लोक आपुला आणि परावा। म्हणोचि नये॥ (दासबोध १८–१०) हे प्रचीतीचे बोलिले। आधीं केलें मग सांगितलें।

मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी एकें ॥ महंतें महंत करावें । युक्तिबुद्धीनें मरावे । जाणते करुनि विखरावे । नाना देशीं ॥ (दासबोध ११–१०). शहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ॥ (१४–६). आत्मोन्नति ज्यांनीं केली आहे आणि सर्वत्र समभावनेनें सर्वांची उन्नति सतत करण्यास जे उद्युक्त झाले आहेत अशा महंतांची, परमार्थी लोकशिक्षकांची संस्था उत्पन्न करणें व ती चालविणें हें रामदासाचें मुख्य जीवितकार्य होतें. समाजधारणेचें राजकारण हें त्यांचें प्रधान साधन होतें. तत्त्वज्ञानी व परमार्थी पुरुषांच्या शिकवणीनें चालणारा, विवेक, विचार व सावधपणा यांच्या योगानें महाकाळासहि धाक वाटेल अशा प्रयत्नांत रत असलेला मानवी समाज उत्पन्न करणें हें रामदासांचें उद्दिष्ट होतें. त्याप्रमाणें त्यांनीं स्वतः आचरलें व नंतर लोकांस बोधिलें, 'आधीं केलें मग सांगितलें'. सर्व जनांना सुखी करण्याकरितां प्रबोध शक्तीचीं द्वारें उघडणारे महंत मिळावे म्हणून रामदासांनीं जन्मभर खटपट केली.

स्वतःचें दिव्य जीवन निर्मिण्याकरितां रामदासांनीं अचाट साहसांत आयुष्य व्यतीत केलें. माणसांना युगानुयुगें गाढ निराशेंतून ओढून व विवेकी बनवून अदम्य उत्साह देत राहील असेंच त्यांच्या भव्य जीवनाचें चित्र आहे.

संतचरित्र म्हणून इतकें मोठें चरित्रवाङ्मय मराठींत प्रथम रामदासांचें उपलब्ध होतें. इंग्रजी राज्य होण्यापूर्वीच्या मराठी साहित्यांत रामदासांचीं चरित्रें जितकीं सांपडतात तितकीं कोणाहि संताचीं सांपडत नाहींत. समर्थशिष्य तंजावर मठाधिपति भीमस्वामी, तिसगांवमठपति दिनकरस्वामी, मेरुस्वामी, हरिहरस्वामी, उद्धवसुत, राजाराम प्रसादी व चरेगांवकर आत्मारामबुवा यांनीं लिहिलेलीं छोटीं चरित्रें समग्र किंवा त्रुटित अशीं उपलब्ध होतात. समर्थशिष्य गिरिधरस्वामी, हनुमंतस्वामी व महिपतिबुवा यांनीं लिहिलेलीं विस्तृत चरित्रें मिळतात. आत्माराम-महाराज यांनीं लिहिलेलें '**दासविश्रामधाम**' हा तर चरित्रसागरच आहे. हीं मध्ययुगीन वातावरणांत लिहिलेलीं चरित्रें पौराणिक पद्धतीचीं आहेत. त्यांत अद्भुत चमत्कारपूर्ण कथांचा फार सुकाळ झाला आहे. त्यांतून वास्तविक चरित्राची कथा ऐतिहासिक पुराव्यांच्या व देशकालपरिस्थितीच्या अनुसंधानानें हुडकून काढावी लागते. त्यामुळें अर्वाचीन काळांत रामदासचरित्र हा आधुनिक इतिहासज्ञ पंडितांच्या वादाचा सततचा विषय बनला आहे; किंबहुना त्यांनीं खूप वादग्रस्त करून सोडला आहे. त्यांतील अत्यंत वादग्रस्त मुद्दा म्हणजे रामदास व शिवाजी यांची भेट केव्हां झाली व शिवाजीच्या राजकारणाशीं रामदासांचा काय संबंध होता हाच होय. हा अत्यंत वादग्रस्त मुद्दा बाजूला काढला तरी रामदासांचा धर्मसंस्थापनेचा उद्योग अनन्यसामान्य होता हें मान्य होण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें अध्यात्मज्ञान आणि प्रासादिक व ओजस्वी शैली यांनीं संपन्न असलेलें सारस्वत रामदासांनीं निर्मिलें यावद्लहि वाद होण्यासारखा नाहीं.

श्रीरामदासांच्या ७३ वर्षांच्या कारकीर्दीचे एकंदर ४ भाग पडतात. त्यांतील पहिले नेमके बारा बारा वर्षांचे आहेत. १२ वर्षे शैशवावस्था, १२ वर्षे गोदाकांठीं तपश्चर्या व १२ वर्षे तीर्थाटन; चौथ्या उरलेल्या भागांत कृष्णेच्या परिसरांत राजकारण व धर्मसंस्थापनेचें कार्य अवतारसमाप्तीपर्यंत त्यांनीं केलें.

ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम यांच्याप्रमाणेंच शुचिष्मंत भगवद्भक्तांच्या कुळांत, 'जे समजले व वर्तले।' (दासबोध २–६) अशा भाग्यपुरुषांच्या घराण्यांत रामदासांचा जन्म झाला. अशा जन्मास भगवद्गीतेंत 'दुर्लभतरम्' म्हटलें आहे. बेदर प्रांतांतून इसवी सनाच्या दहाव्या शतकांत रामदासांचे मूळपुरुष कृष्णाजीपंत ठोसर औरंगाबाद प्रदेशांत आले. कृष्णाजीपंतांपासून रामदासांचे वडील सूर्याजीपंत बावीसावे पुरुष. जांब गांवचें कुलकर्णपण वंशपरंपरागत या घराण्याकडे होतें. रामदासांची माता राणूबाई. सूर्याजीपंतांची सूर्य व श्रीराम यांची उपासना नित्य चाले. त्यांत राणूबाईचें साहाय्य असें.

गृहस्थाश्रमी असोनि जाण। परमार्थ साधनीं त्याचें मन।
वाचेसी नेम केला त्यानं। असत्य वचन न बोले॥

असें महिपतीनें त्यांचें 'वर्णन केलें आहे. सूर्याजीपंतांचें शरीर नित्य सहस्र सूर्यनमस्कारांनीं तेजःपुंज झालें होतें. सूर्यनारायणाच्या वरदानानें त्यांना दोन तेजस्वी पुत्र झाले. पहिला गंगाधर व दुसरा नारायण, म्हणजेच रामदास. रामदासांच्या ज्येष्ठ बंधूस श्रेष्ठ म्हणून संबोधीत असत. जांब या गांवीं शके १५३० (इ. स. १६०८) चैत्र शुद्ध नवमीस म्हणजे रामनवमीस मध्यान्हीं रामजन्माच्या वेळीं रामदासांचा जन्म झाला. नारायण हें जन्मनाम. नारायणाच्या प्रत्येक वाढदिवशीं प्रतिवर्षी रामनवमीचा उत्सव भजन-कीर्तनाच्या गजरांत साजरा होई. त्याचा नारायणाच्या बालमनावर खोल भावनामय ठसा उमटला. राणूबाईंच्या माहेरीं एकनाथांचा भक्तिसंप्रदाय होता. त्याचाहि प्रभाव नारायणावर पडून, घरीं पडलेला ठसा अधिकच दृढ बनला. एकनाथी रामायणाचें सतत श्रवण घडून रामभक्तीचें बीज पेरलें गेलें. पिता, माता व ज्येष्ठ बंधु या तिघांच्या वात्सल्याच्या ओलाव्यानें रामभक्तीच्या बीजाला बाळपणींच अंकुर आला. एकनाथाच्या परंपरेशीं असें नातें जुळलें; त्यामुळें पुढें रामदास हे एकनाथांचे अवतार होत, असेंहि संप्रदायांत म्हणूं लागले.

नारायणाचें शरीर मुळांतच चपळ, सोशीक व आरोग्याचें निधान होतें. ही निसर्गाची विलक्षण देणगीच होती. स्वभाव अवखळ व साहसी, बुद्धि ग्रहणपटु, स्मृति दृढ व कल्पना विस्तारशील होती. चरित्रकारांनीं रामदासांच्या अनेक अद्भुत बाललीला वर्णिल्या आहेत. त्यांतील वास्तविक सार असें निघतें. बाळपणीं रामदासांना क्रीडेची अपरंपार हौस होती. अचूक नेमबाजी असल्यामुळें गोट्या व विटी-दांडू यांत हार होत नसे. सुरपारंब्याचा खेळ खेळतांना झाडांच्या फांद्यां-

वरून वानरासारख्या अचूक झेंपा टाकतां येत होत्या. पोहणें, घोड्यावर बसणें, तिरंदाजी इत्यादि गोष्टींत ते लवकर पटाईत झाले. घोड्यावर बसण्याची संवय म्हातारपणापर्यंत टिकली. समर्थ वयाच्या ६६ व्या वर्षीं हेळवाकच्या घळींतून घोड्यावर बसून चाफळास डोंगरकपारी ओलांडून आले, असा तत्कालीन पत्रांत उल्लेख आहे. रामदासांच्या बाललीलेंत अपार शरीरसामर्थ्याच्या खुणा उमटूं लागल्या होत्या.

रामदासांचें प्राथमिक शिक्षण फार जलद पूर्ण झालें. बालबोध व मोडी अक्षरांचें लेखन, वाचन, अंकगणित, या गोष्टी झपाट्यानें ते शिकले, त्यामुळें; उपनयनहि लवकर--पांचव्या वर्षीं--झालें. व्युत्पन्न व ज्ञानी वडील व ज्येष्ठ बंधु यांची शिकवण मिळाल्यामुळें ब्रह्मकर्म व पुराणेतिहास अधिगत केले. रामदासांचें शिक्षण कशा पद्धतीनें झालें असेल याची कल्पना त्यांच्या साहित्यांतील शैक्षणिक उपदेशावरून चांगली येते. " सुंदर अक्षर ल्याहावें। स्पष्ट नेमस्त वाचावें। विवरविवरो जाणावें। अर्थान्तर ॥ मागील उजळणी पुढें पाठ। नेम धरावा निकट। बाष्कळपणाची वटवट। करूं नये ॥ प्रातःकाळीं उठावें। कांहीं पाठांतर करावें। यथानुशक्ति आठवावें। सर्वोत्तमासी ॥

धार्मिक शिक्षणाचा प्रभाव रामदासांवर फारच खोल झाला. वडील मुमुक्षूंवर अनुग्रह करून मंत्रोपदेश देत असत. रामदासांनीं आपला तसा मनोदय वडिलांस कळविला. बालवय म्हणून त्यांनीं उपेक्षा केली. ८ व्या वर्षीं वडील निवर्तल्यावर श्रेष्ठांनीं वडिलांची तीच पद्धति चालविली. ज्येष्ठ बंधूंपाशीं रामदासांनीं अनुग्रहाची याचना केली. परंतु त्यांनीं धीर धर, योग्य वेळीं सर्व कांहीं होईल, असें सांगून मुद्दा टाळला. रामदासांना परमार्थाचा अनिवार ध्यास लहानपणींच लागला. चित्त परमार्थाच्या तृष्णेनें तळमळत होतें. मार्ग कसा सापडेल ? कोणाकडे जावें ? हा विचार घोळूं लागला. आठवलें. मोक्षाच्या मार्गांतील वाटाड्या हनुमंत. मारुतीच्या देवळांत जाऊन करुणा भाकली. उदासपणें पडून राहिले. खेदानें थकून झोप लागली. प्रत्यक्ष रामचंद्रांनीं स्वप्नांत भेट देऊन, श्रीराम जयराम जयजयराम हा त्रयोदशाक्षरी मंत्र उपदेशिला. पातंजल योगसूत्रांत म्हटलें आहे कीं,' स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ' सर्वांत प्राचीन जे त्यांचाहि गुरु तो आहे. ईश्वरानें स्वतःच मार्ग दाखविला. नारायणानें या क्षणापासून रामाचें दास्य पत्करून ' रामदास ' ही पदवी धारण केली. शके १५३८, श्रावण शुद्ध अष्टमीस मध्यरात्रीं हा अनुग्रह झाला. ध्रुव व प्रल्हाद यांनाहि याच कौमार्यावस्थेंत ईश्वरानुग्रह स्वतः श्रींनीं प्रकट होऊन दिला, तसें झालें. रामदासांनीं आपली गुरुपरंपरा एका अभंगांत सांगितली आहे. त्यांत हा मुद्दा आला आहे.

'आदि नारायण सद्गुरु आमुचा। शिष्य जाला त्याचा महा विष्णु। तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस। तेणें ब्रह्मयास उपदेशिलें ।। उपदेश केला त्यावरीं

वसिष्ठा। तेथें धरा निष्ठा शुद्ध भावीं। वसिष्ठें उपदेशिलें रामरायाशीं। रामें रामदासीं उपदेशिलें।' केव्हां व कोठें याचा येथें निर्देश नसला तरी दुसऱ्या अभंगावरून बालपणीं घरींच उपदेश घडला असें अनुमान करणें अधिक उचित वाटतें. 'आमचें वंशीं आत्माराम। एक पिंडीचे निष्काम। रामदास्य जालें आतां। अवघा वंश धन्य आतां।'. 'बापें केली उपासना। आम्ही लाधलों त्या धना। बंधु आभिलाषा टकला। (त्या धनाचा वांटा घेऊन) धन्य झाला। पोर सकळां संकोचलें। एक सुखा उधळलें। रामीं रामदासी स्थिति। पाहिली वडिलांची रीति॥'

बालपणींच स्वतःच्या जनक परिवारांत ईश्वरानेंच स्वतःचें दर्शन देऊन मार्गहि दाखविला. तो राघवाचा मार्ग अनन्त आहे ही खूणगांठ बांधून पुढें सतत न थांबतां, अखेरपर्यंत चालतच राहिलें पाहिजे, क्षणभरहि थांबतां कामा नये, वा क्षणभरहि विस्मृति अयोग्य होय; म्हणून तो प्राप्त प्रत्यय अंगीं बाणावा, स्वरूपी राहण्याचा स्वधर्म हा टिकावा, मोक्षदशेची पहाट फुटली, तरी तिचा शाश्वत मध्यान्ह व्हावा, म्हणून घरांतून निसटले. राघवाच्या अनन्त मार्गाला लागले. गोदेंत उडी टाकून पैलतीर गांठलें. वस्तुतः अगोदर उद्धृत केलेल्या अभंगांत वर्णिल्याप्रमाणें घरच तपोभूमि होती. श्रेष्ठ बंधूंप्रमाणेंच माताहि ईश्वरनिष्ठ होती. मातेबद्दलचा अभिप्राय असा होता. 'विवेकाची दृढ बुद्धि। तुझेनि गुणें। श्रेष्ठतर संतच.' 'विमल ब्रह्मपरायण। सकलभक्ति संरक्षण। विशेष वैराग्यलक्षण। तुमचे ठायीं॥ दक्षता आणि चातुर्यता। व्युत्पन्नता आणि लीनता। उत्तम गुण सर्वज्ञता। तुमचे ठायीं॥' असा समर्थांनीं श्रेष्ठांना लिहिलेल्या एका पत्रांत त्यांचा महिमा वर्णिला आहे. तपोभूमीच ती होती. ती सोडून नाशिकच्या जवळील टाकळीस विजन-वास कां पत्करला ? त्या मधुर वात्सल्याच्या शीतल छायेंत ममतेचा मृदु बंध होता, तो न कळत संपूर्ण विळखा घालून टाकतो. योगसूत्राच्या व्यासभाष्यांत म्हटलें आहे तद्वत् योग्याचें मन '**अक्षिपात्रकल्प**' डोळ्याला मृदु रेशमाचा धागाहि खुपतो असें विषयस्पर्शा सहिष्णु व संवेदनशील असतें. मातेनें लग्नाचा आग्रह करून नाखुषी असतांच लग्नमंडपांत उभें केलें. '**सावधान**' म्हणून इशाऱ्याचे शब्द ऐकतांच वेदीवरून उडी ठोकून पलायन केलें. मनाला मागें पाहूं नकोस असें बजावलें.—

सदा सेवि आरण्य तारुण्य काळीं। मिळेना कदा कल्पनेचे नि मेळीं।
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

अनेक गडी धावले. कसें सांपडणें शक्य ? ब्रह्मपिशाच्च तें. समर्थांना नाशिकचे लोक 'ब्रह्मपिसा' म्हणत. तें महाभूत कोणालाच हातीं लागत नाहीं. ईशोपनिषदांत म्हटलें आहे कीं, 'तद् धावतोऽन्यानत्येति' धावणाऱ्या इतर सर्वांच्या पुढें जातें तें.

नाशिक हें रामोपासनेस अत्यंत अनुकूल स्थान. रामायणानें नाशिक हें रामकर्थेत राक्षससंहाररूप अवतारकार्याचें प्रारंभस्थान म्हणून दर्शित केलें आहे. दुसरें, नाशिक हें वैदिक, शास्त्री, पंडित, पुराणिक, कीर्तनकार, कलावंत यांचें महाराष्ट्रांतील विद्येचें माहेरघर, दक्षिणकाशी म्हणून अनेक शतकें प्रसिद्ध. विद्यारूप तपाला तर जांबचा उपयोगच नव्हता. रामदासांच्या मतें स्वतःच्या गांवीं राहून माणसें संकुचित बसून घरकोंडे बनतात. पराक्रम, विद्या व भाग्योदय यांकरितां आपलें गांव सोडणें उत्तम. ' गांवींच वाढती । ते तो करंटे होती । कोणी विद्या सीकताती । तरी विदेशा जाती । आपुल्या लोकांमध्यें । भाग्य वैभव आले । परंतु ऐसा थोडा । प्रचीतीनें निवडा । ' याप्रमाणें किती सांगावें ? सांगतां सांगतां दमलों. लोकांच्या पाठीस लागून सांगावें लोक तर आणखी रागावतात, असा या पदाचा शेवट आहे. सलगीच्या माणसांत सारखें राहून वाढ खुंटते. मेंचटपणा अंगीं येतो. झाडाखालीं झाड वाढत नसतें, ' झाडाखालीं झाड नव्हे । सलगीमध्यें कांहीं नव्हे ', असें दुसऱ्या पदांत रामदासांनीं बजावलें आहे. दासबोधांतहि हा विचार पुनः आला आहे.

नाशिकजवळ टाकळी गांव आहे तेथें गोदावरी व नंदिनी या नद्यांचा संगम झाला आहे. रामदास टाकळीस एका गुहेंत राहात, तेथें त्यांनीं १२ वर्षें तपश्चर्या केली. तेथें नित्यक्रम कसा होता याची कल्पना त्यांच्या कांहीं उपदेशपर कविता व दासबोधांतील शिक्षणाचें वर्णन यावरून येते. चरित्रकारांनींहि त्यांचा नित्यक्रम सांगितला आहे. त्रयोदशाक्षरी राममंत्राचा तेरा कोटि जप करण्याचा संकल्प शके १५४२ माघ शुद्ध सप्तमीस गोदासंगमावर केला व तो पुढील बारा वर्षांत पुरा केला. अनेक गायत्री पुरश्चरणेंहि त्याबरोबर केलीं. स्नानसंध्या आटोपल्यावर कमरेभर पाण्यांत दुपारीं १२ वाजेपर्यन्त उभें राहून जप व पुरश्चरण ते करीत. नंतर ब्रह्मयज्ञ आटोपून पंचवटींत मधुकरी मागून व भोजन करून गुहेंत विश्रांति घेत. एका कवितेंत त्यांनीं असा उपदेश केला आहे ' करावे आलोडचे वेद आणि शास्त्रें । मंत्र, स्तुतिस्तोत्रें, नानापरी । तपें पुरश्चरणें ध्यानस्थ बैसावें । सांग संपादाव देवार्चन । धरणींपारणीं । नित्य उपोषणें । तेणे होती क्षीण । महादोष ।। काव्यें अभ्यासावीं । पुराणें सांगावीं । कवित्वें करावीं । सावकाश ।। ' दासबोधांतील समर्थांच्या लक्षणांत म्हटलें आहे कीं, ' अक्षर सुंदर लिहो जाणें । चपल शुद्ध वाचू जाणें । अर्थान्तर सांगो जाणें । सकळ कांहीं ।। राखे सकाळांचे अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ।। (दासबोध १९–४) यावरून रामदासांच्या अध्ययनाचे जे विषय सूचित होतात त्यांत त्यांच्या फार आवडीची गायन-वादन-कलाहि अंतर्भूत होते. श्रवणभक्तीच्या उपदेशांत दासबोधांत (४–१) वेदांत पुराणेंच नव्हे, तर अनेक भौतिक विद्या आणि भौतिक कला यांचाहि अंतर्भाव केला आहे. रोज सहा तास

सकाळीं कंबरभर किंवा गळाभर पाण्यांत उभे राहून रामदासांनीं १२ वर्षे पुरश्चरण केलें या त्यांच्या भोळ्या चरित्रकारांनीं वर्णिलेल्या गोष्टीवर, रामदासांचा नेमस्तपणावर जो सर्वत्र कटाक्ष दिसतो त्यावरून, विश्वास ठेवण्यास पंचाईत होते. त्यांच्याच भाषेंत हेकाड वैराग्याच्या कोटींत हा तपश्चर्येचा प्रकार पडतो. भगवद्गीतेंत शरीरशक्तिघातक अशी तामसी तपश्चर्या निंदिली आहे, हें रामदासांना माहीत होतें. रामदासांनीं संस्कृतमधील उपनिषदें, महाभारत, रामायण, योगवासिष्ठ, भागवत, योगसांख्यादि दर्शनें मार्मिकपणें अभ्यसिलीं होतीं व त्याबरोबर ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत, इत्यादिकांच्या प्रासादिक मराठी ग्रंथांचाहि उत्कृष्ट व्यासंग केला होता हें दासबोध व स्फुट कविता यांवरून पदोंपदीं ध्यानांत येतें. तीक्ष्ण तर्कशक्ति, समतोल विचार व व्यवहारचातुर्य या गुणांची मूर्ति असलेल्या रामदासांनीं आयुष्याचा अमोल सर्वोत्तम भाग पाण्यांत राहून शरीरमनांच्या शक्तीची उधळपट्टी करीत घालविला हे पटूंच शकत नाहीं. परंतु लहान वयांत टाकळीस एकांतवासांत मुनिवृत्तीनें भजनांत दंग होऊन राहूं लागलेले पाहून भोंवतालच्या लोकांच्या तो चर्चेचा विषय झाला. रामदासांनींच आपल्यासंबंधीं या वेळीं लोक काय चर्चा करीत याचा नमुना सांगितला आहे. 'विषयांची सोयरी प्रपंचाची सखी। मिळोनी एकमेकीं करिती मात। यासी काय झालें। धडचि काय बिघडले। वयेवीण लागलें देवपिसें। यासी कोणी मोहाचे, वडिलधारें नाहीं म्हणऊनी पाही छंद करी।' यावर रामदासांनीं आपणांस खरोखर पिसें लागलें आहे असा कबुलीजबाब दिला आहे. रामदासांना उपजत सर्व विषयीं सावधपण असल्यामुळें त्यांनीं या १२ वर्षांच्या काळांत नाशिक क्षेत्रांत बहुश्रुतपणा मिळविला व अध्ययनाच्या आणि श्रवणाच्या प्रसंगानें अनेक प्रकारच्या लहानमोठ्या सज्जनांच्या संगतीचा लाभ घतला. त्यांत गाढ निराशेचेहि क्षण अनेक वेळां आले. प्रबल मोहादि विकार, ध्येयाची विशालता व त्याच्या प्राप्तीबद्दल संशय, विद्यांचा प्रचंड व्याप, स्वतःचें एकाकी निराश्रित जीवन, आयुष्याची अल्पता आणि मानवी शक्तीचा अपुरेपणा यांच्या विचारानें अपार धीर असलेलेंहि तें मन भांबावून मधूनमधून सचिंत होत असे. त्यांच्या करुणाष्टकांमध्यें अशा प्रासंगिक निराशेचें व उद्वेगाचें अत्यंत प्रामाणिक चित्र प्रतिबिंबित झालेलें दिसतें.

'युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता।
नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका॥
मन आवरेना कीं वासना वावडे सदा।
कल्पना धांवते सैरा बुद्धि दे रघुनायका॥
अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, सौख्य नाहीं जनामधे।
आश्रयो पाहता नाहीं, बुद्धि दे रघुनायका॥

संसार नेटका नाहीं, उद्वेगू वाटतो जिवीं ।
परमार्थ कळेना कीं बुद्धि दे रघुनायका ।
उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे ।
तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका ॥
उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पूसतें ।
ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका ॥
रामदास म्हणे माझा संसार तुज लागला ।
संशयो वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥'

अगाध श्रद्धेच्या जोरावर उपासना व व्यासंग केला, प्रगति होत गेली, प्रगतीचीं अन्तर्बाह्य लक्षणें प्रकट झालीं, विश्वास वाढला. 'कोसळोन पडो हें आकाश' तरी राघवाची कास धरली ती सोडणार नाहीं, अशा प्रकारें प्रतिज्ञा दृढ होत गेली. 'दाता येक रघुनंदन,' असा प्रत्यय आला. 'पावनभिक्षा, अभेद भक्ति, सज्जनसंगति, कोमळ वाचा, प्रसंग वोळखी, विमळ करणी, संगीत गाणें, आलाप गोडी, बहु पाठांतर, मनोहर शब्द, विद्यावैभव, अर्थारोहण, अलिप्तपण, जन-सुखकारक गुण, सावधपण, धूर्तकळा, आत्मनिवेदन, तद्रूपता व ब्रह्मानुभव,' असें जें जें मागितलें तें तें प्राप्त होत आहे असा अनुभव येत गेला. वादविवाद सोडून सुखाचा संवाद करण्याची हातोटी साधली. भक्तिरंगांत सर्वकाळ अन्तःकरण रंगूं लागलें, विरक्ति बाणली. जेणें सद्बुद्धि उपजेल, पाखंड भंगेल, विवेक जागेल, देहबुद्धि तुटेल, भवसिंधु आटेल, ज्ञान उजळेल, सद्वस्तु भासेल, भास निरसेल, व भगवंत प्रकटेल असें निर्मळ, सरळ, कोमळ, रसाळ व विशाळ कवित्व स्फुरूं लागलें.

हा प्रसाद कोणाचा? शब्दसृष्टीचे ईश्वर, विवेक निधीचे मनुष्याकार झालेले भांडार व अमृताचे मेघ जे वाल्मीकव्यासादिक कवीश्वर त्यांचा. त्यांत रामदासांनीं संस्कृत कवि व प्राकृत कवी असा भेदभाव केला नाहीं. '...भाषा प्राकृत। अर्थ वेदान्त आणि सिद्धान्त। नेणोनि त्यागी भ्रांत। मंदबुद्धीस्तव ॥ भाषा पालटे कांहीं। अर्थ वाया जात नाहीं। कार्यसिद्धी सर्वही। अर्थाचपासी ॥ (दासबोध ७–१). भाषेचा पक्षपात नको, भाषा कोणतीहि असो. अर्थाशीं गांठ पडली कीं संपलें. प्राकृतांतहि संस्कृतासारखे खोल बोल व अनुभवाची ओल असल्यामुळें त्याचा त्याग करणारे मूर्खच होत, अशी मराठींतील ग्रंथांची तरफदारी रामदासांनीं केली. यावरून त्यांनीं प्राचीन मराठी साहित्याचा चांगला व्यासंग केला होता हें आपोआप निर्णित होतें.

गोदातटीं आरंभलेलें विद्यामय तप तेथेंच सफल झाल्याची पावती कालां-तरानें रामदासांनीं पंचवटीच्या एका रामभक्तातर्फे पाठविलेल्या ओंवीबद्ध पत्रांत दिली आहे ती अशी : 'जनस्थान गोदातटीं। परमपावन पंचवटी। जेथें पडली कृपादृष्टी। रघूत्तमरायाची ॥'

गोदातटीं १२ वर्षें तप सफल झाल्यावर रामदासांना एका स्थळीं घट्ट आसन मांडलेलें सोडण्याची इच्छा झाली. 'जें वडिलीं निर्माण केलें। तें पाहिजे पाहिलें' (दासबोध–१५–९) असें मनांत आलें. वडील म्हणजे सर्व विश्वाचे वडील, चिन्मय जगदात्मा. त्याची ही सृष्टि हिंडून पाहावी हें भक्तीचेंच एक अंग. जनस्थान पाहिलें. परंतु त्यांत पुनः वाल्मीकिरामायणांत वर्णिलेलें स्वतःच्या उपास्य देवाचें जन्मस्थान चर्मचक्षूंनीं पाहून सर्वेन्द्रियांचें समाधान होईल, असें वाटलें. अयोध्येस केव्हां जाईन असें झालें. 'पांगुळ' या कवितेंत रामदास म्हणतात – 'भरत गा। खंडामाजी। शरयूतीरचा गांव। धर्माचें नगर तेथें। राज्य करी रामराव। पांगुळा पाय देतो। देव जानकीचा नाथ। जाईन मी तया ठाया। देवा उत्तम तो ठाव॥ राघवाचा धर्म जागो। सर्व अधर्म भागो। अज्ञान निरोनियां। विज्ञानीं लक्ष लागो॥' रामदासांनीं यात्रेचें प्रस्थान ठेवलें. उद्धवनामक आठदहा वर्षें वयाचा शिष्य बरोबर घेतला असें म्हणतात. आणखी इतर कोण कोण बरोबर गेले याचा पत्ता लागत नाहीं. शके १५५४(इ. स. १६३२) फाल्गुनामध्यें अखिल भारताच्या यात्रेस प्रारंभ झाला. काशीच्या रोखानें निघाले. काशी, प्रयाग, गया करून अयोध्येकडे गेले. काशींत हनुमान घाटावर मुक्काम केला, तेथें मारुतीची स्थापना केली. अयोध्येस सर्वांत जास्त वेळ म्हणजे ११ महिने राहिले. 'रामदासीं तीर्थविधि केला। रामीं पिंड समर्पिला।' हा तीर्थविधि द्वारकेस राममंदिर बांधून केला असेंहि म्हणतात. हें पिंडसमर्पण वस्तुतः बालपणींच झालें होतें. काश्मीरांत श्रीनगरलाहि रामदासांनीं भेट दिली, असेंहि लिहिलें आहे. पंजाबांतहि गेले तेथें शीख धर्मगुरूची भेट झाली. हिमालयांतहि बद्रीनारायण व केदारेश्वर येथपर्यंत मजल मारली. तेथें श्वेत मारुतीचें ध्यानस्थ स्थितींत दर्शन घडलें. हिमालयाच्या या उंच ठिकाणीं शैत्यबाधा झाली. श्वेत मारुतीनें ती बाधा निवारण्याकरितां टोप, वल्कलें, हुरमुजी रंगाचीं वस्त्रें, मेखला, जपमाळ, खडावा व कुबडी असा वेष देऊन सजवून पाठविलें. हा रामदासी वेष नंतर कायम राहिला. नंतर पुढें हिमालयांत मानससरोवरास प्रदक्षिणा करून स्वामी परतले. जगन्नाथपुरीचीहि यात्रा पुरी केली. नंतर दक्षिणेस गेले. सेतुबंध रामेश्वरापर्यन्त मजल मारली. किष्किधा, श्रीशैलमल्लिकार्जुन, शेषाचल, गोकर्णमहाबळेश्वर, इत्यादि तीर्थें संपवून करवीर क्षेत्रीं पोचले. तेथून कोंकणांत परशुरामक्षेत्राचें दर्शन घेऊन कृष्णेच्या उगमस्थानीं क्षेत्र महाबळेश्वरास आले. तेथून सर्व महाराष्ट्रांत पर्यटन केलें. पैठण येथें कांहीं दिवस राहिले. अखेर मातेचें स्मरण होऊन त्या मुख्य तीर्थाचें दर्शन घेतलें व तीर्थयात्रेची समाप्ति केली.

वृद्ध मातेस (दंडवत्) प्रणाम केला. तिची दृष्टि अधू होऊन दिसेनासें झालें होतें. ह्या पतितपावन बनलेल्या पुत्राची, सिद्ध पुरुषाची, भेट झाल्यानें दिव्य वात्सल्यानें ऊर भरून आलें. सर्व शरीर व सर्व इंद्रियें यांत प्रकाश भरला. डोळ्यांना पुनः

अनुक्रम २८३८८ विः तिलय
क्रमांक ११८६ नोंः दिः २५/७/८८

दृष्टि आली. असा चमत्कार असंभवनीय नाहीं. सध्या गंगातीरावर वास करीत असलेले संन्यासी पूर्वाश्रमींचे महामहोपाध्याय श्रीवरशास्त्री पाठक यांना एकदां दृष्टि गेली असतां ते नर्मदातीरावर असतांना एकदम पुनः दृष्टि आली ! रामदासांच्या मातेनें दृष्टि आल्याबरोबर त्या पुण्यपुरुषाला विचारलें कीं, " भूतचेष्टा शिकलास काय ? पिशाचवत् लहानपणापासून हिंडत आहेस, मध्येंच कित्येक वर्षें गुप्त होतोस व पुनः प्रकट होतोस ! " रामदासांनीं उत्तर दिलें, " होय आई, मला एक भूत कायम लागलें आहे. तें कधींच सोडणार नाहीं. तें अद्‌भुत आहे. ' होतें वैकुंठिचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं । लागे कौसल्येच्या स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥ ' असा प्रारंभ करून भरतभेटीपर्यंतची सगळी रामायणकथा मातेला थोडक्यांत ऐकविली व शेवटीं म्हटलें कीं, ' सर्वांभूतांचें हृदय । नाम त्याचें रामराम । रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय ॥ ' असें म्हणून मातेच्या चरणांना पुनः मस्तकानें स्पर्श केला व वडील बंधूंना दंडवत घातलें आणि संमति घेऊन सप्त गोदावरीपर्यंत गेले. गोदेस प्रदक्षिणा घालून पुनः नाशिक-त्र्यंबकेश्वरास परतले. कांहीं दिवस तेथेंच विश्रांति घेतली.

या १२ वर्षांच्या तीर्थयात्रेंत उत्तरेंत व दक्षिणेंत ठिकठिकाणीं साधु-संतांच्या, महंतांच्या गांठीभेटी घेतल्या, मैत्री केली, शिष्यशाखा वाढविल्या व मठांची स्थापना केली. ' फिरणें व विवरणें ' हें समर्थांचें जीवनसूत्र होतें. विवरणें म्हणजे विचार, विश्वाचें अवलोकन व विश्वाचा विचार. दासबोधांत म्हटलें आहे कीं, 'कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें । भिक्षामिसें लहान थोरें । परीक्षूनि सोडावीं ॥ बहुती कांहीं तरी सांपडे । विचक्षण लोकीं मैत्री घडे । उगेच बसतां कांहींच न घडे । फिरणें विवरणें ॥ "(१५–६) " एखादा आढळे गाजी । सकळ लोक अखंड राजी । सदासर्वदा आवडी तांजी । प्राणिमात्रांची ॥ चुकोन उदंड आढळतें । मनुष्य दृष्टिस पडतें । महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात् ॥ ऐसा आढळतां लोक । चमत्कारे गुणग्राहिक । क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचे ॥ " सकळ लोकांस राजी राखणारा गाजी कोण त्यांना भेटला असेल ? शिवाजी काय ? होय, अखेर शिवाजीच. तो अर्थात् नंतर भेटला. कृष्णातीरीं फिरस्ती सुरू केल्यावर.

रामदास तटस्थपणें जग पाहात फिरले, ' फिरे दास ऊदास लोकांस पाहे । मनामार्जि थक्कीत होऊनि राहे ॥ ' रामदासांना भारताच्या या दीर्घकालीन तीर्थ-यात्रेंत भारताच्या लोकस्थितीचें विराट दर्शन घडलें. उध्वस्त सामाजिक जीवन किंवा सामाजिक बेबंदशाही असें ह्या लोकस्थितीचें दारुण लक्षण होतें. दुःख, दारिद्र्य व उद्वेग यांनीं लोकांची दैना उडाली होती. रामदासांचें ' अस्मानी सुलतानी, ' हें प्रकरण देशस्थितीचें हृदयविदारक चित्र दाखवतें. निसर्गाचा कोप, व मुसलमान अमदानींतील जुलमी सुलतानी या दोन्ही गोष्टींचा तो परिपाक होता. अनेक राजवटींचा आपसांत झगडा चालू असल्यामुळें अराजक वाढीस लागून,

'बळी तो कानपिळी' या न्यायानें राजसत्तेचा धाक न राहिल्यामुळें जबरदस्त गांवगुंडांनीं धुमाकूळ माजविला. कौटुंबिक जीवनाची घडीच बिघडली. गरीब प्रजा लुटली जात होती. पिकें कणसाला आल्याबरोबर कोणीहि कापून नेई. व्यापाऱ्यांचा धीर सुटला. उद्योगधंद्याच्या वाटाच बंद होऊं लागल्या. शेती, विणकाम, सुतारकाम, गवंडीकाम, इतर कोणताहि जो जो धनोत्पादनाचा धंदा करावा त्याचें फळ हातीं पडतां पडतां कोणीहि ज्याच्या हातीं सापडेल तो तें लुबाडून न्यावयाचा. त्यामुळें अस्मानी संकटानें उग्र रूप धारण केलें. महर्घता खायला उठली. कुटुंबें देशोधडीला लागलीं. ग्रामत्याग, देशत्याग, निराधार स्थितींत मृत्यु, गावेंचीं गावें ओस पडणें, परसैन्याच्या धाडी येणें, लढणाऱ्या उभयपक्षीय सैन्याकडून लूटमार होणें, अशी अरिष्टपरंपरा प्रजेवर सारखी कोसळूं लागली. मुसलमान, मराठे सरदार व पोर्तुगीज या सर्वांचा असह्य जाच होत होता. मुसलमान व पोर्तुगीज हे तर लोकांच्या देवाधर्मावर हल्ला करून मानवी अन्तःकरणाचे लांडग्याप्रमाणें तुकडे तोडीत. घरांत नांदणाऱ्या साजऱ्या गोजिऱ्या पोरींचे हात धरून बाहेर काढीत व धर्मभ्रष्ट करून पळवीत. अन्नाची वाण पडल्यामुळेंहि परधर्मांत लोक प्रविष्ट होत. कुलवंतांनीं व धर्मनिष्ठांनीं आत्महत्या केल्या. भकास दारिद्र्य व कुटुंबाची प्राणांतिक दैना पाहून कंटाळून भरल्या नदींत लोक उडया टाकून प्राण देत, अग्नींत जाळून घेत किंवा विषभक्षणहि करीत. सर्वत्र चौर्य माजलें. कोठेंहि उपाय दिसेना. 'मोठी फजीती फजीती। सांगावें तें किती॥' असें रामदास म्हणतात. जगण्यांत अर्थ राहिला नाहीं. जीव परत घे देवा। दास म्हणे रे भगवंता। किती पहासी सत्त्व। काय वांचोनी वांचोनी? ने परतें जीवित्व॥' **परचक्रविरुपणांत॥**' स्वामी म्हणतात, 'कांहींच पाहतां धड नाहीं। विचार सुचेना कांहीं। अखंड चिंतेच्या प्रवाहीं। पडले लोक॥'

हें सर्व सामाजिक घडी विस्कटल्याचे परिणाम म्हणून रामदासांनीं वर्णिले. मूळ कारण नीतिमर्यादा उडाली हें होय. सामाजिक आचार किंवा कर्तव्यें यांपासून लोक च्युत झाले, आपसांत कलह माजला, ईश्वरभक्तीचें रूप विकृत झालें, अज्ञान माजलें, अशीं मुख्य कारणें रामदासांनीं सांगितलीं. 'विप्रीं सांडिला आचार। क्षेत्रीं (म्हणजे क्षत्रियांनीं) सांडिला विचार। नीतिमर्यादा उडाली। भक्ति देवाची बुडाली॥ नाहीं ज्ञानाचा विचार। केला अज्ञानें संचार।' ऐहिक व पारलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनाची अवनति ज्या गोष्टींत दिसते तें सर्व करंटपण होय. रामदासांनीं तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत–अविद्येचीं हीं लक्षणें असें म्हटलें आहे. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा इतका जीवनव्यापी तपशीलवार अभिप्राय इतर कोणाहि भारतीय अध्यात्मवाद्यानें समर्थांपूर्वी काढला नव्हता. 'प्रपंच अथवा परमार्थ। प्रचीतीवीण अवघे व्यर्थ। प्रत्ययज्ञानीं तो समर्थ। सकळांमध्यें॥' (दासबोध २०-३)

अशी जीवनव्यापी प्रत्ययाची राखण करण्याची जबाबदारी वर्णाश्रमधर्मी

समाजव्यवस्थेंत मुख्यतः ब्राह्मणांची. परंतु तो ब्राह्मणवर्णच भ्रष्ट झाला. त्यामुळें सर्वत्र अनास्था माजली. अनास्थेस रामदासांच्या मतें मुख्य जबाबदार ब्राह्मण व क्षत्रिय. त्यांतल्या त्यांत ब्राह्मण. 'ब्राह्मण बुद्धीपासूनि चेवले। आचारापासूनी भ्रष्टले। गुरुत्व सांडुनि झाले। शिष्य शिष्यांचे ॥ हें ब्राह्मणांस कळेना। त्याची वृत्तीच वळेना। मिथ्या अभिमान गळेना। मूर्खपणाचा ॥ आतांचे ब्राह्मणीं काय केलें। अन्न मिळेना ऐसे जालें। तुम्हां बहुतांचे प्रचीतीस आलें। किंवा नाहीं ?' असा रामदास जाब विचारतात.

रामदासांचे टीकाकार रामदासांस ब्राह्मणांचा बडेजाव वाढविणारे संत म्हणून इतर संतांपासून वेगळे काढून दोष देतात. वस्तुतः वर्णाश्रमव्यवस्थेचीच तरफदारी रामदासांनीं केली असें म्हणतां येईल. इतर सर्व संतांना—ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यन्तच्या सर्व संतांना—चातुर्वर्ण्य व्यवस्थेशिवाय दुसऱ्या प्रकारची अधिक चांगली समाजरचना होऊं शकते हें माहीत नव्हतें किंवा मान्यहि नव्हतें. म्हणून रामदासांवर या बाबतींत वेगळी टीका करणेंहि वैचारिक दृष्ट्या चूक होय. अध्यात्माचा व मोक्षाचा अधिकार मनुष्यमात्रास समानच आहे, व शुद्ध नीतीचा आचार करणारा कोणत्याहि जातीचा असो, तो श्रेष्ठच होय, हा संतसिद्धांत रामदासांनींहि अत्यंत मनापासून मांडला आहे. इतर कोणत्याहि संतापेक्षां रामदासांचा विशेष हा होता कीं, ते सामुदायिक जीवन, ऐहिक व्यवहार व ऐहिक कल्याण यांचे एका निराळ्या दृष्टीनें परमार्थाइतकेंच महत्त्व मानीत; म्हणून ते वर्णव्यवस्थेच्या पालनासंबंधीं अधिक कसोशीनें विचार करीत होते.

मानवी समता पाळणें हाच सज्जनपणा व संतपणा, असें रामदास इतर संतांप्रमाणें समजत. मानवी समता व वर्णसंस्था यांतला विरोध इतर संतांप्रमाणें रामदासांनाहि जाणवत होता. म्हणूनच भेद मानूं नये, परंतु वर्णसंकर करूं नये असें रामदासांनीं म्हटलें आहे. सर्व मानवांचें अंतःकरण समाधानी राखणें, विशेषतः हीन व दीन यांना सर्वांचा अंतरात्मा एकच समजून दुःखांतून सोडविणें, हेंच खरें भजन, असें रामदास मानीत. ' 'भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार। त्याचें राखावें अंतर। याचें नांव भजन ॥ दुःख नेदावें कोणाला। उंच नीच जरी झाला। अंतरात्मा ओळखिला। तोचि जाणावा सज्जन ॥ मिळाला तो भक्त झाला। दोष मिळेना तयाला। देव प्रत्यक्ष कोपला। अहंभाव दुर्जन ॥ राजी राखावे सकळ। बरेंपण सर्वकाळ। नित्य आनंदाची वेळ। काळ करी वंदन ॥ (करुणाष्टकें पृ. १६६). उच्चतम मानवी नीति व भगवदभक्ति यांचें असें अद्वैत समजणें हेंच संतजीवनाचें परमवैशिष्ट्य होय. रामदासांनीं भजन, भक्ति वा पूजा यांचा व्यापक मानवी प्रेम व भूतदया हा अर्थ अनेक ठिकाणीं सांगितला आहे. कर्मकांड, मूर्तिपूजा, टाळमृदंगांनिशीं भजन हे बाह्य आचार दुय्यम साधन होय, मुख्य साधन नव्हे; असा रामदासांचा अभिप्राय अनेक ठिकाणीं व्यक्त झाला आहे.

भटक्या गोसाव्या-बैराग्याप्रमाणें तीर्थयात्रा करण्याची रामदासांना हौस नव्हती. त्यांस ते अविवेकी समजत. हेतु निराळा होता. तीर्थयात्रा रामदासांनीं केली ती केवळ तेथील देवळांचें, मूर्तीचें व पाणवठ्याचें दर्शन घेऊन पावन होण्याकरितां नव्हे. सज्जन पहावे, त्यांची मैत्री करावी, धर्मप्रसार करावा, हाच तीर्थयात्रेचा मुख्य हेतु होता. 'आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर । जाणीव रूपें कळिवर । विवेकी वर्तवी ।। तो अन्तर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती । प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ।। मग विचारिती अंतःकरणीं । जेथें जेथें धोंडा पाणी । उगेच वणवण हिंडोनि । काय होतें ।। ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला । सत्संगें देव सांपडला । बहुत जनांसी ।। ऐसीं हे विवेकाचीं कामें । विवेकीं जाणतो नेमें। अविवेकीं भुलले भ्रमें । त्यांस हें न कळेना ।। (दासबोध १८–८). ही तीर्थयात्रेची फलश्रुति होय.

तीर्थयात्रेनें समाजस्थिति रामदासांच्या अवलोकनांत आली, सामाजिक दुरवस्था जाणवली, ऐहिक जीवनाच्या यशावरच पारमार्थिक कल्याण अवलंबून आहे याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. सामाजिक जीवनाची घडी बसविणारे धर्मनिष्ठ सज्जन हुडकले व त्यांना शिक्षण देऊन, शिष्य बनवून व मठस्थापनेच्या द्वारें जगदुद्धारास लागले. दीर्घ तपश्चर्या, भजन, अवलोकन, पर्यटन व परमार्थचिंतन यांच्या योगानें मन पावन झाल्याची, विश्व पावन करण्याचा अधिकार मिळाल्याची प्रचीति आली. अगाध आत्मश्रद्धा उत्पन्न झाली. रामदास म्हणतात, 'राघवाचा दास । मी झालों पावन । पतित तो कोण । उरो शके ।। उरो शके ऐसें कल्पांती घडेना । जो कोणी पुसेना । त्यासी उगें ।। किती एक जन । ज्ञानें उद्धारिले । कृतकृत्य जाले ।। तत्काळचि ।। येणें काळें मोक्ष । मी जरी देईना । दास म्हणवीना राघवाचा ।। राघवाचा वर । पावलों सत्वर । जनाचा उद्धार । करावया ।। " दुसरें असें कीं 'सेवकु मानवीयांचे । कष्टती बहुतापरी । सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहलों ।।'

तत्कालीन भारतांतील सामाजिक बेबंदशाही नष्ट करून न्यायनीतीची स्थापना करण्याचा म्हणजे रामराज्याचा उपाय रामोपासनाच होय, अशी खूणगांठ रामदासांनीं बांधली होती. राम व हनुमान यांच्या उपासनेंत ऐहिक वैभवी जीवन व परमार्थप्राप्ति असे दोन्ही पुरुषार्थ दिसत होते.

रामराज्य म्हणजे आत्मारामाचें राज्य. 'रामराज्य' या संज्ञेंत हे दोन्ही अर्थ समर्थांनीं दाखवून दिले आहेत. ब्रह्मांडांची व्यवस्था म्हणजे रामराज्य असा एक अर्थ आहे व उत्कर्षशाली सर्वांगीण प्रगति करणारे सामाजिक जीवन म्हणजे रामराज्य असा दुसरा अर्थ आहे. समर्थांना अद्वैत तत्त्वज्ञानाच्या पारमार्थिक अधिष्ठानावर रामोपासनेचा प्रसार करून तत्कालीन देवाधर्माचें अराजक मोडावयाचें होतें व ऐहिक पुरुषार्थ साधणारी समाजव्यवस्था निर्माण करावयाची होती. हें

दुहेरी साध्य सिद्ध करण्याकरितां तीर्थयात्रा संपवून ते कृष्णातीरावर आले. कृष्णातीराच्या परिसरांत राहून आणखी एक महत्त्वाची गोष्ट रामदासांना साधतां आली, ती म्हणजे शिवाजीच्या राज्यसंस्थापनेच्या प्रयत्नांस अनुकूल अशी लोकमनोवृत्ति निर्माण करणें. मुसलमानी राजवटींत हिंदूंना व हिंदुधर्मव्यवस्थेला नमून राहाणें भाग पडत होतें. मुसलमानी सत्तेपुढें पडतें घेऊन निमूटपणें तग धरणें एवढें कार्य हिंदू व हिंदुधर्म यांस शक्य झालें. प्रसंगीं मुसलमान राज्यसत्ता हिंदुधर्मावर जबरदस्त टोलेहि लगावत होती. हिंदुसमाजसंस्थाहि तिच्या तारक राज्यसंस्थेच्या अभावीं विस्कळीत होऊन डबघाईस आली होती. याची प्रखर जाणीव श्रीसमर्थ रामदासांना झाली होती. 'म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें बंड ।' या निर्देशांत हा सर्वत्र समदृष्टीचा संत सात्त्विक संतापानें कसा जळत होता याची कल्पना सहज करतां येते. संताचें चित्त स्वजन परजन ह्या भेदानें विटाळत नसतें. परंतु सज्जन व दुर्जन हा फरक दृष्टोत्पत्तीस येऊन मन तळमळतें. म्लेंच्छ या शब्दाला अधिक महत्त्व आहे. देवाधिदेव अन्तरात्मा हा मनुष्यांत जाणीवेच्या रूपानें प्रकट झाला आहे व तोच शुद्ध जाणीवेच्या स्वरूपांत उपास्य व प्राप्तव्य आहे. असा समर्थांचा जागोजागीं उपदेश आढळतो. 'सकळां धर्मांमध्ये धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ॥' कोणताहि विशिष्ट संस्थारूप धर्म नव्हे; हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि भेद स्वरूपीं राहण्याच्या स्वधर्मांत येत नाहीं. मानवी देहांत ज्ञानशक्ति हें अस्सल वस्तु-स्वरूप प्रकट झालें आहे, त्यांत म्हणजे विवेकसंपन्न जीवनांत माणसाची स्थापना हें सर्व जागतिक धर्माचें कार्य आहे. तेंच स्वामींच्या शिकवणीचें मर्म आहे. म्हणून म्लेंच्छांच्याहि थोर मानव्याचें अधःपतन दुर्जन शब्दानें सूचित केलें आहे असें म्हणावें लागतें. मुसलमानी अधिकारी व मुसलमानी बादशाहीचा दरबार यांच्यावर समर्थांचें वजन होतें, व ते अनेक महत्त्वाचीं कामें त्यांच्याकडून करवून घेत, एवढेंच नव्हे, तर त्यांच्याकडून देवस्थानी इनामेंही स्वीकारीत, असें इतिहास सांगतो. म्हणून जातिद्वेषापेक्षां त्या मुसलमानी राज्यसत्तेच्या दुष्परिणामांचीच चिंता समर्थांना होती असें सिद्ध होतें. म्हणून न्यायनीतीचें रामराज्य समर्थांना स्थापावयाचें होतें व त्याचेंच राजकारण त्यांनीं चालविलें होतें.

परमार्थाचा संस्थापक, उद्धारक व पक्षपाती राजा समर्थांना पाहिजे होता. 'परमार्थ' मनुष्यमात्राच्या अंतिम ध्येयाचा वाचक शब्द आहे. 'रामराज्य' म्हणजे केवळ परमार्थ वा मोक्ष नव्हे. किंवा या शब्दानें केवळ देवाधर्माची उपासना व सनातनी आचारधर्म एवढाच अर्थ अभिप्रेत नाहीं, तर ऐहिक, आर्थिक व सामाजिक ध्येयें सिद्ध करणारी राजसंस्थाहि त्यांत अभिप्रेत आहे. 'उद्वेग पाहतां नाहीं । चिंता मात्र नसे जनीं । व्याधि नाहीं रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥ युद्ध नाहींच अवोध्या । राग ना मत्सर नसे । बंदनिबंदहि

नाहीं । दंड दोष कदा नसे ॥ बोलणें सत्यन्यायाचें ॥ अन्याय सहसा नसे । अनेक वर्तती काय । एक जीव परस्परे ॥ दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हो तो असेचिना । परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें । तीर्थक्षेत्रें नानास्थानें । शिवालयें गोपुरें बरें । मठ, मठचा, धर्मशाळा । ऋषिआश्रम साजिरे ॥ वेदशास्त्र, धर्मचर्चा । स्थानसंध्या तपोनिधी । चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे । संतोष समस्त लोकां । रामराज्य भूमंडळीं ॥ (मानपंचक–१)

अशा रामराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमि निर्माण करणें म्हणजे धर्मसंस्थापना करणें हें समर्थ रामदासांचें अंगीकृत मुख्य कार्य होतें. त्याकरितां व दुर्जनसंहार व भक्तजनांसी आधार व्हावा म्हणून 'रामकथा ब्रह्मांड भेदूनि । पैलाड न्यावी ॥" असा आदेश त्यांनीं आपल्या शिष्यमहंतांना दिला व महाराष्ट्रांतील क्षत्रियांना सांगितलें कीं, रामवरदायिनी तुळजाभवानी पारघाटीं येऊन प्रतापगडावर विराजमान झालेली आहे. तिच्या वरानें रामानें रावण मारला; तिचें स्मरण करून तुम्हींहि धर्मसंस्थापनेसाठीं संघटित होऊन । 'मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।' अशा वीरधर्माचा आदेश दासबोधांत दिला. त्या तुळजाभवानीला रामदासांनीं स्फुट कवितेंत अनन्यभावें प्रार्थना केली कीं, 'एकचि मागणें आतां । द्यावें तूं मजकारणें । तुझाच वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥ दुष्ट संहारिले मागें । ऐसे उदंड ऐकतों । परंतु रोकडे कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें । क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥ '

प्रतापगडाच्या तुळजाभवानीचा हा राजा शिवाजीच हें सांगण्याची गरज नाहीं. शिवाजीच्या राज्यस्थापनेच्या प्रत्यक्ष उद्योगांत म्हणजे युद्ध, कारस्थानें, हल्ले, इत्यादि हालचालींत व तत्संबंधीं मसलतींत रामदासस्वामींचा हात होता कीं नाहीं याबद्दल अजून वाद आहे. स्पष्ट प्रमाण मिळत नाहीं. एवढेंच नव्हे तर शिवाजी व रामदास यांची प्रथम भेटच मुळीं शके १५९४ (इ. स. १६७२) मध्यें झाली, असेंच ऐतिहासिक प्रमाणांची छाननी करून निघते, असें म्हणणाऱ्यांविरुद्ध निश्चित कागदोपत्रीं पुरावा सांपडत नाहीं. 'लोक संकल्पविकल्प करिती । ते अवघेंच निर्फळ होती । जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ परंतु तो आपुली स्थिति । अनुमाना येवोच नेदी । तेथें कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना । उदंडकरी गुप्तरूपें ॥ गुप्तरूपें राजकारण करावें म्हणजे त्याचा कसलाहि पुरावा ठेवूं नये, असा जर संकेत रामदासांचा होता तर इतिहाससंशोधकांस पुरावा कसा सांपडणार ?

शिवाजीच्या राज्यविषयक उलाढालींत रामदासांचा प्रत्यक्ष हात नव्हता हें जरी खरें मानलें तरी रामदास राजकारणी संत नव्हते, ते इतर संतांसारखे केवळ परमार्थी व केवळ भगवद्भजनांत दंग होते, हें मुळींच मान्य होण्या

सारखें नाहीं. सर्व परंपरागत भक्तियोग व त्याचें अद्वैत तत्त्वज्ञान यांच्यांत रामदासांनीं ऐहिक, सामाजिक जीवन भाग्यशाली व्हावें या ध्येयास अनुसरून तात्त्विक अर्थ व्युत्पादून दाखविला आहे, तसा इतर कोणत्याहि--ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतच्या--संतांनीं दाखविला नाहीं. ज्ञान, नित्यानित्यविवेक, बुद्धियोग, अहंता, निरास, सत्त्वगुण, सद्विद्या, योग, विरक्त, इत्यादि पारमार्थिक पदार्थांचा अर्थ सांगतांना त्यांची प्रपंचांत परमार्थाइतकीच उपयुक्तता, आवश्यकता रामदासांनीं प्रतिपादिली आहे; असें प्रतिपादन अन्यत्र आढळत नाहीं. ऐहिक समाजजीवन म्हणजे ईश्वरी राज्य, असा अर्थ दाखविणाऱ्या जर्मन तत्त्वज्ञ हेगेलशीं रामदासांचें वैचारिक साम्य इतिहाससंशोधक राजवाडे यांना दिसून आलें तें महत्त्वपूर्ण मानावें लागतें. हेगेल व रामदास यांच्यांत महत्त्वाचे अनेक फरक आहेत. त्यांच्याकडे मात्र राजवाडे यांचें लक्ष गेलें नाहीं. हिंदूंचीं देवळें व धर्म यांस ज्यांत धोका होता अशा मुसलमानी राजवटीच्या सरहद्दींत धर्मप्रचारकांचे मठ व देवळें बांधून त्यांचे सार्वजनिक उत्सव रामदासांनीं सुरू केले. हें त्या काळचें महत्त्वाचेंच राजकारण होय, असेंहि म्हणतां येतें. मुसलमान राज्यकर्त्यांच्या व अधिकाऱ्यांच्या भीतीनें लोकांनीं डोहांत बुडविलेलीं दैवतें बाहेर काढून डौलानें स्थापणें हें केवढें राजकारण आहे ! परंतु ह्या राजकारणाचें अंतरंग म्हणजे सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धि हेंच होतें, असें रामदासांच्या अनेक स्फुट कवितांवरून व दास-बोधांतील राजकारण, शिकवण, येत्नसिकवण, निर्मळ लक्षण, जाणपण निरूपण, निस्पृह शिकवण, निस्पृह लक्षण, चातुर्यलक्षण, महंतलक्षण, निस्पृहव्यापलक्षण इत्यादि समास प्रकरणांवरून सिद्ध होतें.

कृष्णेच्या परिसरांत आल्यावर समर्थ रामदासांनीं जे उघड उद्योग केले त्यांत मारुतीचीं मंदिरें, महंतांचे मठ, चाफळ येथील राममंदिराची प्रतिष्ठा व देवोत्सव यांची विशेष महती होती. शिष्य, मठ व मंदिरें यांच्याद्वारें परमार्थविवरण व हरिकथानिरुपण करीत देवधर्माचें अराजक नष्ट करणें, शुद्ध आध्यात्मिक जाणीव निर्माण करून नैतिक जीवनाची शिकवण देऊन सर्व मानवांची उन्नति करणें हा त्यांचा उद्देश होता.

शके १५६६ (इ. स. १६४४) च्या वैशाखांत कृष्णातीरीं रामदास आले; प्रथम महाबळेश्वर येथें चार महिने राहून नंतर वाई व माहुली करून कराडजवळील शहापूरच्या पर्वतावर राहावयास गेले. दोन प्रहरीं शहापूर किंवा मसूर येथें कोरडी भिक्षा मागून स्वयंपाक करून भोजन करीत. नाना अडचणींत व संकटांत सांपडलेल्या माणसांना त्यांतून सोडविण्याचें काम स्वामी करीत. शहापूरचे बाजीपंत कुलकर्णी हिशेबाच्या भानगडींत सांपडले व त्यांना सरकारनें अटक करून नेलें. रामदासांनीं त्यांना निरपराधी ठरवून सोडवून घेतलें. त्यांनीं व त्यांच्या पत्नी

सईबाई यांनीं रामदासांचा अनुग्रह घेतला. समर्थांनीं स्थापिलेल्या अकरा मारुती-पैकीं पहिला मारूती शहापूरला स्थापिला. कांहीं काल शहापूरला घालविल्यावर स्वामींना चाफळखोरें अधिक पसंत पडलें. तेथें ते कायम वस्तीस गेले. स्वामी कीर्तनद्वारां लोकांस प्रपंचपरमार्थांचा बोध करीत. त्यामुळें ज्यांच्या हृदयांत पश्चात्ताप होऊन पालट होई ते स्वामींचे शिष्य बनत. मठ चालविण्यास योग्य शिष्यांकरितां मठाची योजना करून देत. शिष्यवर्गांत पुरुषांबरोबर स्त्रियांचाहि समावेश करीत. गृहस्थाश्रम उत्तमोत्तम असें उपदेशून तो आदर्शरूप व्हावा म्हणून अनेक पतिपत्नी जोडपीं स्वामींनीं परमार्थाच्या मार्गाला लावलीं. परमार्थाच्या मार्गास स्त्रिया व पुरुष सारखेच अधिकारी, मानवी देह दोघांचाहि सारखाच श्रेष्ठ असें स्वामी मानीत. अनेक बालविधवा अनुग्रह करून परमार्थाच्या मार्गावर आणल्या. त्यांत अक्काबाई व वेणूबाई यांचीं नांवें सुप्रसिद्ध आहेत.

परस्त्रियांचा बालब्रह्मचाऱ्यानें सहवास करूं नये खरें, परंतु जितेंद्रिय महापुरुषाला तो अधिकार प्राप्त होतो. 'श्रीरामभजनें तरल्या गतभर्तृका,' हें स्वामींनी जाणून विधवांना परमार्थाची दीक्षा दिली. या संबंधांत स्वतःबद्दल स्वामींनीं अशी ग्वाही दिली आहे. 'कदामी विधवा अनाथा न्यस्तकामा । सुशीला भजविल्या श्रीरामा । विजितेंद्रियें यथान्यायें तरी क्षमा । करील जानकीनाथ ॥ माझ्यासारख्या जितेंद्रियानें सुशील विधवांना यथान्याय दीक्षा दिली तर श्रीराम क्षमा जरूर करील. समर्थशिष्यांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे स्त्रीपुरुष होते. मुसलमान फकीरहि होते. कारण समर्थ ग्रंथप्रामाण्यवादी नव्हते, प्रतीतीचेंच मुख्य प्रामाण्य ते मानीत असत. अंतिम तत्त्व नामरूपातीत असल्यामुळें तेथें भाषेच्या व संज्ञेच्या मर्यादा व हिंदु मुसलमान इत्यादि भेद निरस्त होत. अशा 'अजब महजब' विलक्षण धर्मात हिंदू व मुसलमान असा भेद खोटा ठरतो. म्हणून स्वामी एका उर्दू पद्यांत सांगतात – 'भाओ काहेकु लढते । लढते सो पडते भाई' 'बंधूनो, कशाला भांडतां ? भांडतात ते पडतात.'

अनेक विद्वान् व कर्तृत्ववान् मंडळी स्वामी समर्थांच्या शिष्यगणांत समाविष्ट झाली होती. त्यांत खास स्वामींच्या तैनातीस प्रत्यक्ष मदतनीस म्हणून काम करणारेहि अनेक होते. परंतु स्वामींचा पट्टशिष्य कल्याण. तो स्वामींची कोणतीहि आज्ञा पडूं देत नसे. त्याचें मूळचें नांव अंबाजी. त्याचें अक्षर उत्तम, स्मरण बळकट व शरीर दणकट होतें. दमाचा व धीराचा गडी होता. सावध व दक्ष, जीव धोक्यांत घालून काम करी. स्वामींनीं मोठा रामजन्मोत्सव मसूर गांवीं सुरू केला. तेथें रामाच्या मिरवणुकीला अडथळा आणणारी विशाळवृक्षाची भली मोठी आडवी फांदी तोडण्यास अंबाजी पुढें सरसावला. खालीं विहीर अशा जागीं फांदी होती. तोडतां तोडतां फांदी तुटली व कोसळली. खूप दमल्यामुळें तोल जाऊन अंबाजीहि नेमका विहिरींत पडला. ही गोष्ट स्वामींच्या त्वरित ध्यानांत

येऊन विहिरींत डोकावून पृच्छा केली कीं, "कल्याण आहे ना?" खालून आवाज आला "महाराज, कल्याण आहे." तेव्हांपासून अंबाजीचें नांव कल्याण पडलें. 'मुख्य सच्छिष्याचें लक्षण। सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण। अनन्यभावें शरण। त्या नांव सच्छिष्य॥' असें धर्मसंस्थापनेस सहकारी झालेले अगणित शिष्य भारतांत स्वामींना मिळाले. भरतखंडांत ते विखरून राहिले होते. महाराष्ट्र व विशेषतः वाईपासून कोल्हापूरपर्यन्तचा प्रांत हयांत त्यांचा भरणा विशेष होता. चाफळचा मठ हें त्यांचें आदिपीठ होतें.

स्वामी समर्थांचीं निवडलेलीं उपास्य दैवतें मुख्यतः तीन—श्रीराम, हनुमान् व तुळजाभवानी. तात्त्विक अशा खोल भावार्थांचीं सूचक अशीं हीं प्रतीकें होत. हे खोल भावार्थ स्वामींनीं संक्षेपानें वा विस्तारानें त्या त्या प्रसंगीं निरूपिले आहेत. त्याकरितां स्वामींनीं पौराणिक कथांचा आधार घेतला. पौराणिक कथांचा स्थूल अर्थ हा प्रथम मनांत येतो, तो त्यांनीं सांगितला. त्याच्याच जोडीला ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा अव्यक्त व सूक्ष्म अर्थ प्रतिपादिला. वाल्मीकीरामायण व व योगवासिष्ठ यांवरून दुर्जननाशक, सज्जनरक्षक, आदर्शभूत उत्तमपुरुष धर्मस्थापकनर ईश्वरावतार असा रामाचा अर्थ घेतला. दुष्टसंहारक राम, हें एवढेंच दाखवण्याकरितां युद्धांतला राम मराठी रामायणांत रामदासांनीं वर्णिला, व त्याचें जागृत सद्गुणी, विवेकी व प्रयत्नशील माणसाचें, न्यायनीतीचें राज्य म्हणजे रामराज्य, असा भावार्थ आपल्या तत्संबंधीं साहित्यांत सूचित केला. सूक्ष्मार्थ असा; अध्यात्मरामायणांत राम हा आत्माराम व निर्गुण परब्रह्म म्हणून निरूपिला आहे. त्यामुळें राम म्हणजे परमार्थ असें सूक्ष्म समीकरण स्वामींनीं गृहीत धरलें व विश्व म्हणजे रामाची पदार्थमात्रांत व प्राणिमात्रांत विभागलेली '**राजसत्ता**', असा दासबोधांत अर्थ विवरिला आहे. विश्वाचें प्राणतत्त्व म्हणजे वायु. त्याचा अत्यंत प्रिय सुत हनुमान ही पौराणिक कथा मुळांत धरून व रामाणांतील हनुमानाचें कार्य 'रामायण ज्याचेंनियोगें' हें लक्षांत ठेवून अचूक कार्यसिद्धि साधणारा महावीर, बुद्धिशाली अशी चपल शरीरबलाची देवता, असा अर्थ उघडा करून दाखविला आणि परमार्थांत साक्षात्कार घडवून आणणारा भक्ताचा मध्यस्थ असा सूक्ष्म अर्थहि स्पष्ट केला. तुळजाभवानी ही रामवरदायिनी म्हणून पुराणकथा प्रमाण मानून रामराज्याची अधिष्ठात्री विश्वशक्ति असा अर्थ केला. मानवी प्रपंचांतील हिचें रूप शक्ति व युक्ति होय. ही या लक्षणांनीं मानवांना राज्याच्या उभारणीस व वैभवी जीवनास साहाय्यभूत होते.

रामदासांनीं कोणते व कोठें ११ मारुती स्थापिले याबद्दल मतभेद नाहीं. परंतु अन्यत्रहि असंख्य स्थापिले असें मानण्यासहि पुरावे मिळूं शकतात. स्वामींनीं श्रीरामाची चाफळ येथें स्थापना केली व त्यामुळें त्यांना फार धन्यता वाटली. मनांत फार दिवस घोळत असलेला तो कार्यक्रम होता. 'अंतरीं कल्पना केली।

एकांतीं बोलिलों बहु । रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव इच्छिला ।।, असें स्वामींनीं एका स्फुट कवितेंत नोंदून ठेविलें आहे. चाफळच्या देवस्थानास हिंदूंप्रमाणें विजापूरच्या मुसलमानी राज्याचींहि इनामें मिळालीं. शिवाजीमहाराजांकडून प्रथमपासून दोनशें होन वार्षिक इनाम मिळूं लागलें. नंतर शिवाजीमहाराजांनींहि अनेक गांवें इनामी दिलीं व आदिलशाही इनाम कायम राहीलच असेंहि आश्वासन दिलें.

शिवाजीचें चरित्र लिहिणारा मार्मागोव्याचा शिवकालीन पोर्तुगीज लेखक कास्मडगार्डा, रामदास व त्यांचा मठ याबद्दल लिहितो – "या प्रांतांत एक ब्राह्मण असून त्याचें नांव रामजी (रामदास या शब्दांचा संक्षिप्त किंवा चुकीचा उच्चार). त्याला जमीनजुमला फार आहे. त्याजविषयीं मुसलमान व सर्व जातीचे हिंदू यांना फार आदर आहे. या प्रांतांत नेहमीं युद्धें चालतात. परंतु कोणत्याहि धर्माचा वा जातीचा सैनिक असो, तो त्याच्या जहागिरीस धक्का लावीत नाहीं. या आश्रमांत (settlement) हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा परामर्श घेतला जातो. कारण तो म्हणतो कीं, मला देवानें दिलेलें द्रव्य सर्वांकरितां दिलेलें आहे. याला पूज्य मानीत नाहीं असा एकहि मानव हिंदुस्थानांत नाहीं. त्यास जगांतील अद्वितीय पुरुष समजलें जातें. त्याच्या मठांतील अन्नग्रहण कोणासहि नाकारणें शक्य नाहीं. कोणी एखादा त्याचें आदरातिथ्य चुकवून जाऊं म्हणेल तर त्याचे हेर त्याला अगत्यपूर्वक ठेवून घेतात. पहिल्या खेपेस शिवाजी ह्याच्या मठावरून जात असतां त्यास मठांत पाहुणचार घेण्यास बोलाविलें. पण त्यानें तें नाकारलें. तेव्हां रामजीनें आपल्या मनुष्याबरोबर त्याजकडे शिधा पाठवून निरोप दिला कीं, 'सर्वच लोक गरीब आहेत; तूं आपणांस श्रीमंत न समजतां पाठविलेल्या शिध्याचा स्वीकार कर. हें धन माझें नसून सर्वांचें' आहे." गार्डाचें हें वर्णन फार सूचक अर्थानें भरलें आहे.

शिवाजीनें स्वामी रामदासांचा उपदेश घेतला व स्वामींचा तो शिष्य बनला. शिवाजीनें अनेक साधुसंत महंताचे धार्मिक उपदेश घेतले त्यांतीलच हा एक होय, असें म्हणतां येत नाहीं. चिंचवडचे मोरयागोसावी, केंजळचे केवलभारती, जांलन्याचे तानपाठक, मुदलगांवचे देवभारती, स्वानंदस्वामी, बाबा याकूत, मौनीबुवा, महाबळेश्वरचे गोपाळभट, चाकणचे सिद्धेश्वर ब्रह्मे इत्यादि बहुत गुरु शिवाजीनें केले. परंतु रामदासस्वामींचा अधिकार न्यारा होता. दासबोधकारांचा महिमा शिवाजीसच काय परंतु बहुश्रुत शिक्षितांसहि दासबोधावरून अलौकिक म्हणून सहज प्रत्ययास यावा असा आहे. परमार्थनिष्ठा राखा व राज्यसाधना करून धर्मसंस्थापना करा, असा आदेश स्वामींनीं शिवाजीस दिला, हें शिवाजीनें स्वामींना स्वतः लिहिलेल्या पत्रांत स्पष्ट निर्दिष्ट केलें आहे. स्वामी रामदासांना स्वतःच्या रामराज्यविषयक आदर्शाची पूर्ति करणारा शिष्य मिळाला तो शिवाजी.

शिवाजीनें राज्यस्थापनेच्या उलाढाली केल्या त्यांत रामदासांचा हात किती होता, हा प्रश्न दुर्ज्ञेय महत्त्वाचा आहे. त्या राज्यस्थापनेचें विशाल वैचारिक अधिष्ठान केवळ स्वामी समर्थांनींच दिलें. मानवी आदर्शाचें, समाजरचनेचें व राज्याचें इतकें गंभीर अध्यात्मवादी तत्त्वज्ञान महाभारतानंतर दासबोधांतच मिळतें, दुसरीकडे कोठेंहि मध्ययुगीन भारतीय साहित्यांत मिळत नाहीं. शिवाजीनें त्याची थोडक्यांत दखल त्या पत्रांत दिली आहे. एवढेंच नव्हे तर 'मीं संपादिलेलें राज्य चरणीं समर्पण करून आपलीच चरणसेवा घडावी' अशी मनीषा व्यक्त केल्याचेंहि तो निर्दिष्ट करतो. राज्यधारी तत्त्ववेत्ता म्हणजे परमार्थी असावा, तरच माणसाचे सर्व पुरुषार्थ साधणारे न्यायनीतीनें राज्य निर्माण होऊन चालूं शकतें. राज्यसंस्थेचा अंतिम उद्देश त्यामुळें पूर्ण होतो, हा फार प्राचीन असा पौर्वात्य व पाश्चात्य राज्यतत्त्वचिंतकांचा सिद्धांत आहे. मनु, भरत, जनक, रामचंद्र, अशोक, यांची ही परंपरा आहे. स्वतः रामदासांनीं, 'मनु चक्रवर्ती जाले येणेंचि न्यायें' (दासबोध १५–३) असा जाणिवेच्या अधिष्ठानासंबंधीं दृष्टांत सांगितला आहे. स्वामी रामदास हे अशा जाणिवेचें अधिष्ठान होतें. त्यांनीं तें अधिष्ठान राज्यकर्ता शिवाजी याच्यांत जागृत केलें. म्हणूनच समर्थांना राजगुरु, शिवाजीचे राजकारणाचे गुरु असें म्हणणें सार्थ ठरतें.

स्वामी रामदासांना आपल्या तात्त्विक आदर्शाचें प्रात्यक्षिक उदाहरण म्हणजे रामराज्याचा स्थापक कर्मयोगी शिवाजीच वाटला, हें त्यांनीं शिवाजीस लिहिलेल्या ओवीबद्ध संदेशांतहि स्वच्छ जाहीर केलें. त्यांतील कांहीं उदाहरणादाखल पहाः–

'निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।। यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।। धीर उदार गंभीर । शूर क्रियेसि तत्पर । सावधपणें नृपवर । तुच्छ केले ।। तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।। या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्र-धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ।। कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सूटले । कित्येकांस आश्रय जाले । शिवकल्याणराजा ।। सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हां प्रती । धर्मस्थापनेची कीर्ती । संभाळिली पाहिजे ।।"

भारतीय संस्कृतींतील उच्च राजकारणाचें स्वरूप शिवाजीच्या कृतींत व व्यक्तित्वांत प्रकट झालें तें यांत रामदासांनीं वृत्तकथनानें चित्रित केलें. स्वामींना कसें राजकारण व कसा राजा पाहिजे होता, हें त्यांच्या पुढील ६ ओव्यांत साररूपानें समजून येतें.

'गनिमाच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा । ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षीं परमार्थी ।। तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे । बंडपाखंडाचे वाखे । सहजचि होती ।। हें धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें

नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ कोठेंच पडेना दृष्टी । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी । वाग्विलासें सकळ सृष्टी । वेधिलीं तेणें ॥ जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटें । इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस नच पडे ॥ '

हें समर्थांचें राजकारण महाराष्ट्रांत शिवाजीच्या प्रतापानें सफळ झाल्याचा आनंद, ' **आनंदवनभुवन** ' प्रकरणांत त्यांनीं स्वतः फार उल्हासांत येऊन व्यक्त केला आहे—' स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तेतें तैसेचि होतसे । हिंडतां हिंडतां गेलों । आनंदवनभूवना ॥ स्वर्गीची लोटली गंगा । रामगंगा महानदी । तीर्थासी तुळणा नाहीं । आनंदवनभूवनीं ॥ कल्पान्त मांडला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभूवनीं ॥ बुडाले सर्वही पापी । हिंदुस्तान बळावलें । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनीं ॥ बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला । मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभूवनीं ॥ आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सीमा । सारसर्वस्व देवाचें । आनंदवनभूवनीं ॥ सामर्थ्य यशकीर्तीची । प्रतापें सांडिली सीमा । रामकर्ता रामभोक्ता । रामराज्य भूमंडळीं ॥ सर्व सद्या सर्व विद्या । न भूतो न भविष्यति । वैराग्य जाहलें मोठें । आनंदवनभूवनीं ॥ '

शिवाजीराजे निवर्तल्यावर संभाजीराजे यांस जें उपदेशपर पत्र स्वामींनीं लिहिलें त्यांत शिवाजीबद्दल स्वामींनीं जो निर्देश केला आहे त्यांतहि शिवाजीच्या कर्तृत्वांत स्वामींना ध्येयसिद्धीचा अनुभव आला, असें दिसतें. जणूं ईश्वर समजून त्याचा आदर्श मनांत वागव, असा सल्ला स्वामींनीं दिला आहे :— ' बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे । कष्ट करुनि घसरावे । म्लेंच्छांवरी ॥ लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी । चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ शिवराजास आठवावें । जीवित तृणवत् मानावें । इहपरलोकीं रहावें । कीर्तिरूपें ॥ शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाचें कसें चालणें । शिवराजाची सलगी देणें । कैसी असे ॥ सकळ सुखांचा त्याग । करुनि साधिजे तो योग । राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥ त्याहून करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष । या ऊपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ "

स्वामी समर्थांचें सर्वांत श्रेष्ठ कार्य म्हणजे दासबोध इत्यादि ग्रंथसंपत्ति होय. थोर साहित्य हें माणसांत संपूर्ण पालट घडवून आणतें, असा स्वामी समर्थांचा साहित्याच्या सामर्थ्यावर विश्वास होता. खल, लंपट, पाखंडी, अशा लोकांचीं मनें बदलून त्यांना पुण्यशील, नीतिमान्, सज्जन बनविण्याचें कार्य अस्सल गुणांचें साहित्य करूं शकतें, असें स्वामींनीं अनेक प्रसंगीं श्रवणाचा प्रभाव सांगतांना म्हटलें आहे. हा केवळ श्रवणाचा अत्युक्तिपूर्ण गौरव नाहीं. त्याची उपपत्तिहि त्यांनीं तेथेंच सांगितली आहे. मुळांत सर्व मानवांत भेद न करतां जाणीव म्हणजे विवेक-

शक्ति प्रकट झाली आहे. तिला चेतविण्याचें काम साहित्य करतें. ठिणगी असली तरी तिचा प्रळयाग्नि बनेपर्यंत तिची वाढ होऊं शकते तसें आळशी, करंटे, महापातकी व दुराचारी यांच्यांतली जाणिवेची ठिणगी चेतली म्हणजे सर्व जीवन घेरते, ब्रह्मांड गिळते व मायानिरास करून शुद्ध चैतन्यरूपानें स्थिरावते.

समर्थानें समर्थ करावे। तरीच समर्थ म्हणवावें। त्रैलोक्यास पडिलें ठावें। सामर्थ्य जयाचें ।। हें सामर्थ्य समर्थांच्या ग्रंथांत असतें असें स्वामी रामदासांचें सांगणें आहे. स्वामी रामदासांचें साहित्य बहुविध व विशाल आहे. ज्ञान, भक्ति व वैराग्य यांचा त्रिवेणीसंगम होऊन समर्थवाङ्मय हें प्रयाग बनलें आहे. भारतीयांच्या धार्मिक व आध्यात्मिक विद्यांच्या संस्कृत व प्राकृत ग्रंथांचें आलोडन करून काढलेले विचार प्रत्यक्ष प्रत्ययाची कसोटी लावून तपासले आणि नंतर ते मांडले असें स्वामी उच्च रवानें अनेक ठिकाणीं सांगतात.

आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या उपपत्तीनें प्रपंच व परमार्थ यांच्यांत सुसंगति स्थापन करणें हें समर्थ वाङ्मयाचें मुख्य वैशिष्ट्य होय. प्रपंच हा असारच आहे परंतु तो सारवान् ज्याच्या योगानें बनतो, प्रपंचच परमार्थ ज्याच्या योगानें होतो असा असाधारण विचार स्वामींनीं आपल्या उपदेशग्रंथांत मांडला आहे. प्रपंच व परमार्थ यांच्यांत विरोध नाहीं, दोन्हीकडे यत्न, विवेक, विचार, सद्गुण, व प्रतीति यांची समान आवश्यकता आहे, असा अभिप्राय रामदासांनीं वेदान्ताची गंभीर मीमांसा करून प्रतिपादिला आहे. सृष्टीची उभारणी व व्यवस्था ज्या मूळ अन्तरात्म्यामुळें जाणिवेच्या अधिष्ठानामुळें होते, तीच जाणीव फळांत म्हणजे मानवांत सर्वांत अधिक उमळली आहे. सृष्टीची धारणा करणारा अंतरात्मा होय. तोच मानवांत उत्कट रूपानें भासमान झाला आहे. ती जाणीव शुद्ध होऊं लागली कीं, सद्गुणांचा विकास होतो, कर्तृत्व वाढतें, दारिद्र्य नष्ट होतें, वैभव येतें. ती जाणीवच सारासार विवेक होय. त्यामुळें अखेर परमार्थ प्राप्त होतो व तो सारासार विवेक प्रपंचासहि शुभ व सुंदर बनवितो. सृष्टीची उत्पत्ति होण्यास मूळ कारण यत्न. म्हणून यत्न हा प्रपंच यशस्वी करावयास लावणारा देव होय. यत्नदेवाची तात्त्विक उपपत्ति समर्थांनीं योगवासिष्ठांतील दैवपौरुषविषयक विवेचनावरून घेतली असें दिसतें. विवेकाला यत्नाची किंवा यत्नाची विवेकाला जोड दिली कीं, यत्न अचूक होतो. जाणीव, विवेक, विचार, यत्न, ही मूलभूत ईश्वरी तत्त्वाचीं मानवांतलीं लक्षणेंच होत. म्हणून तीं ज्या मानवांत दिसतात तो सदैव मानव होय. नारायणाची प्राप्ति प्रथम पाहिजे. त्यामुळें प्रपंचाचा उत्कर्ष होऊन मोक्षहि याच देहीं अनुभवावयास मिळतो. 'अंतरीं असतां नारायणें। लक्ष्मीस काय उणे। ज्याची लक्ष्मी तो आपणें। बळकट करावा ।।' (दासबोध १७–५) नारायण बळकट करणें म्हणजे विचार, यत्न व सद्गुण हे ईश्वरी गुण बळकट करणें होय. 'संसारा आलियाचें सार्थक। जेथें नित्यानित्यविवेक। येहलोक परलोक। दोन्हीं साधिले।' (दासबोध

१७–१) समर्थांच्या सर्व तत्त्वज्ञानाचें, सर्व भावार्थाचें हें सूचक सूत्र आहे.

विश्वाचा अनंत पसारा आहे. त्यांत गोंधळ नाहीं, अव्यवस्था नाहीं. उत्पत्ति व लय यांचा क्रम अगदीं व्यवस्थित रीतीनें बांधला गेला आहे. अनंत प्राणी व अनंत मनोवृत्ति आहेत. परंतु त्यांतहि न्यायी, दक्ष व पराक्रमी राजाच्या राज्यापेक्षां अधिक नियमबद्धता आहे. कारण या विश्वव्यवस्थेचें सूत्रसंचालन गुप्तपणें करणारी एक राजसत्ता आहे, हें सूत्रचालन म्हणजे ईश्वराचें गुप्तपणें चालणारें राजकारण होय. वस्तुमात्रांत व प्राणिमात्रांत ही ईश्वरी सत्ता विभागून जाते व राजकारण गुप्तपणें करते, असें स्वामी म्हणतात. 'अनंत राजकारणें धरणें। कुबुद्धी सुबुद्धी विवरणें। कळो न देणें चुकावणें। प्राणिमात्रासी ॥' (दासबोध १६–८) अशा त्या परमेश्वरी सत्तेचें अनुकरण करून मनुष्यमात्राशीं निष्काम मैत्री ठेवून मानवी समुदाय न्यायनीतीनें वर्तविण्याचा, सामुदायिक जीवन पवित्र ठेवण्याचा, सामाजिक अनवस्था व बेबंदशाही नष्ट करण्याचा विवेकविचारसावधपणें दीर्घ प्रयत्न करणें म्हणजेच राजकारण होय, असें समर्थांचें राजकीय तत्त्वज्ञान आहे. महंतांचें राजकारण व शस्त्रधारी व राज्यधारी क्षत्रियांचें राजकारण यांच्यांतला समान अर्थ हाच होय. महंताला दुर्जनसंहाराचा मात्र प्रत्यक्ष अधिकार नाहीं. त्याचे राजकारण मानव्याच्या श्रेष्ठतेवरील श्रद्धेचें आहे, क्षमेचें, स्वतः सर्व आघात सोसून दुर्जनाच्या हृदयांत परिवर्तन घडवून आणण्याचें आहे. महंतानें समाजधारणेचें राजकारणे हें निस्पृह वृत्तीनें अलिप्तपणें सर्वत्र समभाव, अद्रोह व अहिंसा यांवर अवलंबून करावयाचें. परंतु तें फार गुप्त रीतीनेंच करावें, तरच त्याला साफल्य व यश येतें, असा स्वामींचा अभिप्राय आहे. तात्पर्य, स्वामींचे दासबोध व इतर अनेक प्रकरण ग्रंथ हे वेदान्तावर आधारलेलें राजनीतीचें नीतिशास्त्र आहे याबद्दल वादच संभवूं शकत नाहीं.

स्वामी समर्थांचें व त्यांच्या दासबोध या ग्रंथाचें मराठी भाषेवरील ऋण कधीं न फिटणारें आहे. मराठी भाषेच्या दृष्टीनें शब्दसृष्टीचे ईश्वर कवीश्वर स्वतः स्वामी होत. मराठीचें अपार शब्दवैभव व विविध अर्थांचीं बोधक शब्दसामर्थ्यें समर्थांच्या ग्रंथांइतकीं प्राचीन वा अर्वाचीन अशा कोणत्याहि मराठी साहित्यांत आढळत नाहींत. प्रत्येक शब्द खणखण वाजवून घ्यावा, बद्द आवाज निघावयाचाच नाहीं, अशी शब्दांची टाकसाळ समर्थ साहित्यांत उघडली आहे. त्या साहित्यानें रोकडी ब्रह्मप्रचीति येते, केवळ शाब्दिक ज्ञान होत नाहीं. श्रुतिवाक्याचें, महावाक्याचें हेंच महत्त्व आद्य शंकराचार्यांनीं सांगितलें आहे, त्याचेंच प्रत्यंतर दासबोधांत मिळतें. परंतु दासबोधानें अधिक एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे ती ही कीं, ब्रह्म साक्षात्कार घेऊन स्वस्थ बसूं नका, सिद्धानें साधकाचीं कर्तव्यें कडक रीतीनें पाळलीं पाहिजेत. दास-

बोधांत व तसेंच इतर रामदासवाङ्मयांत तर्कशुद्ध विचारसरणी व साहित्यसौंदर्य यांचें हृद्य मीलन झालें आहे; सृष्टीचें व मानवी व्यवहाराचें सूक्ष्म निरीक्षण त्यांत प्रतिबिंबित झालें आहे; मानवी मनाचें व जीवनाचें सूक्ष्म पदर त्यांत उकलून दाखविले आहेत. त्रिगुणात्मक मायेनें चालणाऱ्या सृष्टीच्या उभारणीचें व संहाराचें चित्र मांडत असतां रूक्षता व नीरसपणा येऊं दिला नाहीं. परमार्थी लोकसंग्रही महंताला मार्गदर्शक असा हा ग्रंथ आहे. त्याची मांडणी सुबोध व प्रसन्न झाली आहे. मानवी सद्गुणांची जोपासना करणारा ईश्वरोपासक लोकशिक्षक म्हणजेच महंत. हाच मानवी समाजधारणेचा आधार होय, असा दृष्टिकोण गृहीत धरून दासबोधाची रचना स्वामींनीं केली आहे. स्वामींचें सूर्यासारखें दैदीप्यमान पुण्यमय व्यक्तिमत्त्व या ग्रंथांत ठायीं ठायीं बिलोरी आरशांतल्याप्रमाणें प्रतिबिंबित झालें आहे.

दासबोध व दोन कांडांचें रामायण हे स्वामींचे मोठे प्रबंध होत. याशिवाय स्वामींची मोठीच ग्रंथसंपत्ति आहे. वयांत आल्यापासून म्हणजे नाशिक येथें तपश्चर्येस बसल्यापासून सतत विद्याव्यासंग व लेखन शेवटपर्यन्त करीत राहिले म्हणून हें दिव्य भांडार ते निर्माण करूं शकले. स्फुट कविता, अभंग, प्रासंगिक कविता, श्लोक, स्तोत्रें, करुणाष्टकें, आरत्या, भूपाळ्या, वेदान्त-प्रकरणें, यांचा त्यांनीं केलेला मोठाच विस्तार सहस्रावधि पृष्ठांचा मिळतो. त्यांतील 'मनोबोध' हें श्लोकात्मक प्रकरण लोकप्रसिद्ध आहे. आद्य शंकराचार्यांच्या उपदेशसाहस्त्रींत शेवटचें प्रकरण मनोबोधाचें आहे, परंतु तें छोटेंसें आहे. 'मनोबोध' या नांवावरून मनुष्यानें स्वतःच स्वतःला शिकवावें, असा अर्थ सूचित होतो.

समर्थांची अध्यात्मसंबंधीं स्फुट प्रकरणें पाहून शंकराचार्यांच्या पंचीकरण, शतश्लोकी, यासारख्या प्रकरणांचीं व स्तोत्रें, आरत्या व भूपाळ्या वाचून शंकराचार्यांच्या स्तोत्रांची आठवण होते. कफदोष व खोकला यांनीं समर्थ फार बेजार झाले होते. तेव्हां त्यांतून बरें होण्याकरितां हनुमानावर त्यांनीं कविता लिहिली. ती वाचतांना शंकराचार्यांची आनंदलहरी मनासमोर येते. त्यांत शेवटीं आनंदलहरीच्या पठनानें 'ज्वरजनितपीडा न भवति' असें म्हटलें आहे. समर्थकालीन समाजांतील सर्व थरांतील व्रतें, कुळाचार, विविध देवतांच्या उपासनांचे प्रकार, भिन्न जातींचे उद्योगधंदे, व्यापार, बाजारपेठांतील माल, यांची चपखल वर्णनें समर्थांच्या कवितेंतच सांपडतात. समर्थांचे अभंग व करुणाष्टकें हें भक्तिवाङ्मय ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, व तुकाराम यांच्या वाङ्मय-पंक्तींत शोभणारें आहे. एवढेंच नव्हे तर, कांहीं ठिकाणीं स्वतःच्या विशिष्ट ओजानें अधिक चमकणारें आहे.

समर्थसाहित्य व समर्थचरित्र यांचा सांधा अनुस्यूत ठेवून हें विवेचन केलें आहे. समर्थांच्या जीवनाचा व वाङ्मयाचा अविभाज्य संबंध कसा आहे, हें या भाषणा-

वरून कळून येईल. स्वामी रामदासांच्या ग्रंथवाचनाची फलश्रुति त्यांच्या शब्दांतच सांगावयाची तर– ' उमजणें समजणें आधीं । प्रवृत्ति-निवृत्तींकडे । भाग्यश्री मोक्षश्री होते । विवरतां विवरतां पुढें ॥'–(मान तृतीय३३२). मानवी समाज हा सज्जनांचा अभेद्य दुर्ग, सज्जनगड, बनवा; त्यांत निरंतर भाग्यश्री व मोक्षश्री नांदावी; हाच समर्थांचा जीवनोद्देश होता.

ध्वनिक्षेपण दिनांक : २७ मार्च १९५८

• • •

पुष्प पांचवें

मराठी संत कवियित्री

डॉ. कमलाबाई देशपांडे

अध्यक्षीय भाषण : **प्रा० वा. ल. कुलकर्णी**

'पुरुषोत्तम मंगेश लाड व्याख्यानमालें' तील आजचें हें पांचवें व्याख्यान आहे. आजच्या व्याख्यानाचा विषय 'मराठी संत कवयित्री' हा असून व्याख्यात्या डॉ. कमलाबाई देशपांडे ह्या आहेत. महर्षि डॉ. अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या महिला विद्यापीठाच्या एक प्राचार्य, एक कुशल प्राध्यापिका व Child in Ancient India ह्या ग्रंथाच्या लेखिका म्हणून विद्यापीठाच्या जगांत त्यांचें नांव विश्रुतच आहे. परंतु त्यांनीं मराठीमध्यें केलेलें लेखनहि विशेष लक्षांत घण्याजोगें आहे. त्यांची कविता त्यांचे बंधु श्री. यशवंत नरसिंह केळकर ह्यांच्या कांहीं कवितांबरोबर 'गीतद्विदल' ह्या नांवानें प्रसिद्ध झाली असून तिजमधी 'जीवनकोडें' ह्या कवितेनें एके काळीं रसिकांचीं मनें आकर्षून घेतलीं होतीं. "हंसरा निर्माल्य" व "चिमण्या" ह्या त्यांच्या पुस्तकांतील छोटीं छोटीं, घरगुती परंतु सूचक भाषेंत रेखाटलेलीं स्वभावचित्रें अत्यंत बोलकीं उतरलीं आहेत. श्रीमती कमलाबाईंचें बालपण त्यांचे वडील श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या घरांत गेलें. तात्यासाहेबांचें निवासस्थान म्हणजे साहित्य, राजकारण व समाजकारण ह्यांच्याशीं संलग्न असणाऱ्या अनेक प्रश्नांच्या चर्चांचा आखाडाच. डॉ. कमलाबाई देशपांडे ह्यांच्या 'स्मरणसांखळी' ह्या आत्मवृत्तवजा ग्रंथाच्या पूर्वार्धांत बालपणच्या ह्या सुखद स्मृति चित्रित झाल्या आहेत. पहिल्या महायुद्धाच्या अगोदरच्या व नंतरच्या पुण्यांतील सांस्कृतिक जीवनाची त्यांत उमटलेलीं क्षणचित्रें अत्यंत हृद्य आहेत. ह्या ग्रंथाच्या उत्तरार्धांत महिला विद्यापीठांत काम करीत असतांना आलेल्या स्त्री-शिक्षणाच्या संदर्भांतील अनुभवाचें सिंहावलोकन व चिंतन आहे. मराठी आत्मचरित्रात्मक लेखनांत "स्मरणसांखळी" ह्या ग्रंथाला ह्यामुळेंच आगळें महत्त्व आलें आहे.

परंतु आजच्या व्याख्यानाच्या संदर्भांत डॉ. कमलाबाई देशपांडे ह्यांच्या ज्या लेखनाची विशेषकरून आठवण होते तें लेखन म्हणजे त्यांचा "अपौरुषेय वाङ्मय"

हा प्रबंध होय. हा प्रबंध २३ जुलै १९४५ रोजीं मुंबई मराठी साहित्य संघासमोर त्यांनीं दिलेल्या एका व्याख्यानांतून जन्मास आला. स्त्रियांच्या ओंव्या, कहाण्या, उखाणे, फेराचीं गाणीं, म्हणी ह्या सर्वच प्रकारच्या, स्त्रियांनीं स्त्रियांसाठीं निर्माण केलेल्या वाङ्मयाला उद्देशून कमलाबाईंनीं "अपौरुषेय वाङ्मय" हा बव्हर्थी शब्दप्रयोग केला आहे; परंतु प्रबंधांत त्यांनीं परामर्श घेतला आहे तो मुख्यतः स्त्री-गीतांचा. आज लोककथा व लोकगीतें ह्यासंबंधींच्या संशोधनाबाबत आणि विवेचनाबाबत महाराष्ट्रांत बराच उत्साह दिसून येत आहे, व त्यांत अलीकडील काळांत तर कांहीं अत्यंत नांवाजण्याजोगे ग्रंथहि निर्माण झाले आहेत. परंतु ह्या अपौरुषेय वाङ्मयाचें स्वरूप व त्यांत काव्यदृष्टचा सामावलेलें सौंदर्य स्पष्ट करून रसिकांचें, अभ्यासकांचें व सर्वसामान्य वाचकांचें लक्ष ह्या वाङ्मयाकडे वेधण्याचें श्रेय कांहीं इतर मराठी ग्रंथकारांबरोबर कमलाबाईंकडेहि प्रामुख्यानें जातें. डॉ. कमलाबाई देशपांडे यांचा प्रबंध ह्या वाङ्मयाच्या अभ्यासकांना नेहमींच अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.

आज एका अर्थानें डॉ. कमलाबाई देशपांडे मराठींतील "अपौरुषेय वाङ्मया" वरच बोलणार आहेत. "मराठी संत कवयित्री" हा त्यांच्या आजच्या व्याख्यानाचा विषय आहे. ज्या अपौरुषेय वाङमयाचा कमलाबाईंनीं अत्यंत सहृदयतेनें आणि चिकित्सक बुद्धीनें जवळ जवळ १०–१२ वर्षांपूर्वी परामर्श घेतला, त्या अपौरुषेय वाङ्मयाप्रमाणेंच मराठी संत कवयित्रींचें हें वाङ्मय ओंवी आणि ओंवीला जवळ असणाऱ्या अभंग ह्या छंदांमध्येंच आहे. स्त्री-गीतांचें हृदगत जाणणाऱ्या कमलाबाईना ह्या वाङमयाच्या अंतरंगाचाहि शोध घ्यावासा वाटला असल्यास त्यांत नवल नाहीं. हें वाङ्मयच तसें आहे. पाहतांच मोह पडावा असें त्याचें रूप आहे. कमलाबाईंनीं ज्या अपौरुषेय वाङ्मयाचें रसग्रहण केलें आहे तें वाङ्मय ज्यांनीं निर्माण केलें त्या सर्वच स्त्रिया अनामिक आहेत. मराठी संत कवयित्रींच्या वाङ्मयाबाबत आपण तसें म्हणूं शकणार नाहीं. ह्या वाङ्मयाच्या निर्मात्यांचीं नांवें आपणांस ठाऊक आहेत. परंतु कमलाबाईंना प्रिय असणाऱ्या अपौरुषेय वाङ्मयाप्रमाणें त्यांचें स्वरूपहि एखाद्या जिवंत झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणें सहजस्फूर्त आहे. त्या वाङ्मयाप्रमाणेंच ह्या वाङ्मयालाहि ग्रंथकर्तृत्वाचा कोठें वासहि येत नाहीं. मनाच्या भावोत्कट अवस्थेंत स्फुरलेले ते बोल आहेत. कवित्व म्हणजे काय ह्याची यत्किंचितही जाणीव नसलेल्या मनाचे ते छंदोरूपानें व्यक्त झालेले सहजोद्गार आहेत. जीं मनें ह्या उद्गारांतून सहजपणें व्यक्त होतात तीं सरल, निष्कपट, विठ्ठलाच्या भक्तिभावानें तुडुंब भरलेलीं, निरागस अशीं मनें आहेत. जन्मोजन्मींची आपली दुबळीक हीं मनें विसरलीं आहेत, विसरूं पाहत आहेत. आत्मोद्धाराबाबत पूर्वी कधींहि न वाटलेला आत्मविश्वास आतां ह्या मनांना वाटतो आहे. हा आत्मविश्वास, हें नवचैतन्य ह्या स्त्री-मनामध्यें निर्माण केलें

श्री. ज्ञानेश्वरांनीं तेरावें शतक हा मराठी कवितेचा खरोखरच प्रातःकाल आहे. ज्ञानेश्वरांचा उदय होतांच आणि ज्ञानेश्वरीची अमृतवाणी कानीं पडतांच महाराष्ट्र समाजांतल्या सर्वच थरांवरील स्त्री-पुरुषांना एकाएकीं कंठ फुटला. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रांत नव्हे तर अतिशूद्रांतहि स्वत्वाची जाणीव निर्माण झाली. आत्मोद्धाराची आंच लागली. त्याचा मार्ग दिसूं लागला व आत्मसामर्थ्यप्रतीति झाली. ही किमया पुरुषांप्रमाणें स्त्रियांमध्येंहि घडून आली. व म्हणूनच आपणांस मराठी संत वाङमयाच्या निर्मल काव्यसागराला येऊन मिळणारी संत कवयित्रीच्या विशुद्ध भावकवितेची एक स्वतंत्र सरिता दिसते. मराठीची आद्य कवयित्री महदंबा ही महानुभाव खरी. परंतु तिच्या " धवळ्यांमध्यें " प्रकट झालेली वृत्ति संत कवयित्रींच्या वृत्तीसारखीच भक्तीनें ओथंबलेली आहे. परंतु महदंबा ही महानुभाव म्हणून तिचा स्वतंत्र उल्लेख केला तरी मुक्ताबाईपासून तुकोबांना गुरु मानणाऱ्या बहिणाबाईपर्यंत आणि रामदासांना गुरुस्थानीं लेखणाऱ्या वेणाबाई, बयाबाई, अंबाबाईंपर्यंत संत कवयित्रीची एक अखंड परंपरा आपणांस मराठी वाङ्मयाच्या प्रारंभकालापासून तो थेट १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत दिसून येते. नामदेवांचें सर्व कुटुंबच काव्यरचना करीत होतें. त्याची दासी जनी, त्याची आई गोणाई, त्याची बायको राजाई, त्याची बहिण आऊबाई, त्याची लेक लिंबाई व त्याच्या कुटुंबांतील इतर कितीतरी स्त्रिया ह्या काव्यसरितेंत भर घालीत होत्या. आपणांस चोखामेळ्याचें नांव विदितच आहे, पण चोख्याबरोबर " चोखयाची नारी " सोयराबाई हिनेंहि अभंगरचना केलेली आहे. येथेंच पंधराव्या शतकांत होऊन गेलेल्या सुप्रसिद्ध संत कवयित्री कान्होपात्रेचें नांव आपल्या डोळ्यांपुढें येतें. ह्या सर्व संत कवयित्रींच्या मधुर भावकवितेचा परिचय आज आपणांस व्हावयाचा आहे. ह्या खऱ्याखुऱ्या अपौरुषेय वाङमयाचें स्वरूप त्याचें निरागस भावसौंदर्य आज कमलाबाई देशपांडे यांच्यासारख्या रसिक समीक्षिका उकलून दाखविणार आहेत, हा मणिकांचन योग आहे. तेव्हां कै. पु. मं. लाड यांच्या पवित्र स्मृतीस वंदन करून मी आपल्या वतीनें डॉ. कमलाबाई देशपांडे यांना आपल्या व्याख्यानास प्रारंभ करण्याची विनंती करितों.

—ध्वनिक्षेपण, दिनांक : २८ मार्च, १९५८

• • •

मराठी संत कवयित्री

डॉ. कमलाबाई देशपांडे

कै. लाड यांचे स्मारकानिमित्त चालू असलेल्या व्याख्यानमालेंतील आजचें पांचवें व्याख्यान. गेले चार दिवस प्रस्तुत विषयांत ज्यांनीं तर्पेच्या तर्पे खर्च केलीं अशा तज्ज्ञांचीं व्याख्यानें आपण ऐकलीं. उद्यां पुन्हा त्या सर्वांचा निष्कर्ष आपणांस ऐकावयास मिळणार आहेच. त्या दृष्टीनें आजचें माझें व्याख्यान हा विश्रांतिखंड मानण्यास हरकत नाहीं. कारण ऐतिहासिक संशोधनपर चर्चेंत शिरण्याचा माझा विचार नाहीं आणि तत्त्वज्ञानाच्या चर्चेबद्दल म्हणावयाचें तर आज चार दिवस चाललेल्या चर्चेपेक्षां वेगळें मी काय सांगणार ? एक प्रकारें आजचें व्याख्यान हा भातुकलीचा खेळच आहे. घरांत दिवाळीचा सण झाला म्हणजे झालेलें फराळाचें तयार असतेंच, त्यांतून थोडें काढून मुलींना देतात. त्याच्याच आधारावर मुली स्वतःच खेळ मांडतात व आपला वेगळेपणा दाखवितात. पण वस्तुतः घरांत घडलेल्या पहिल्या कार्याची ती नक्कल असते. माझ्या व्याख्यानाची स्थिति तीच व्हावयाची आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदासांसारखे पंथसंस्थापक व संवर्धक आणि त्यांच्या वाङ्मयाचा व तत्त्वज्ञानाचा वर्षानुवर्षें अभ्यास व चिंतन करणारे अधिकारी असे वक्ते आपणांस लाभले होते. या विषयाच्या व्यासंगाबद्दल माझ्याइतक्या तपश्चर्येची ग्वाही मी देऊं शकत नाहीं. शिवाय परंपरा निर्माण करणाऱ्या उपरिनिर्दिष्ट संतांपासूनच ज्यांनीं स्फूर्ति घेतली, त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं ज्यांचा विकास झाला अशा या संतकवयित्री. तेव्हां आज चार दिवस ज्या तत्त्वांची चर्चा आपण ऐकलीत त्याहून वगळें त्या तरी काय सांगणार ? त्यांच्या वडिलधाऱ्या संतांच्या घरीं शिजलेल्या पक्वान्नांतूनच ही त्यांची भातुकुली साजरी होणार आणि म्हणूनच या व्याख्यानास मी भातुकली म्हणतें. एक गोष्ट मात्र त्यांची स्वतःची म्हणून दाखवितां येईल. ती म्हणजे त्यांनीं स्वीकारलेलें काम कसें पार पाडलें. मुलींनीं भातुकें घेतलें तें आईनेंच तयार करून दिलेलें असतें. पण डाव मांडल्यावर त्यांत ती सासूचा अगर सुनेचा जो अभिनय वठवते, तो मात्र तिचा स्वतःचा असतो. त्यानेंच तिच्या व्यक्तिमत्त्वाची घडण होते व खेळ खेळण्याचा आनंद तिचा स्वतःला असतो. व्यक्तीचा जीवनविकास त्यामुळें होतो. तेव्हां वेगळें व नवें तत्त्वज्ञान त्यांचे जीवनग्रंथांतून सांपडलें नाहीं, तरी आपलेभोंवतीं पसरलेलें तत्त्वज्ञान त्यांनीं कसें

आत्मसात् केलें, तें वठवून दाखविलें. व 'स्वांतस्सुखाय व बहुजनहिताय' कसें केलें तें मात्र त्यांच्या जीवनावरून पूर्णपणें कळतें.

एकप्रकारें संतचरित्रांच्या सिद्धांतावरील संतस्त्रियांचीं चरित्रें हे उपसिद्धांत आहेत. पुनरुक्तीचा दोष स्वीकारूनहि मी वेणाबाईचे भाषेंतच म्हणतें,

असें बोलिलें वाल्मिकें मूळ ग्रंथीं[१]।
तसें काय साधेल आम्हांसि अर्थीं।
समर्थीं करावी यथासांग पूजा।
दिना दूबळा वेल भावार्थ माझा॥

संतकवयित्रींची प्रथम नुसती तोंडओळख घ्यावयाची म्हटलें तर अनेक तारकांचा समूह दिसूं लागतो. सर्वांचा मिळून प्रकाश एकत्र होऊन पसरलेली ती एक आकाश-गंगा भासते. महदाईसेपासून सुरवात करून मुक्ताबाई, जनाबाई, आउबाई, लिंबाई लाडाई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मला, प्रेमाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, बया-बाई इत्यादि अनेक स्त्रिया डोळ्यांसमोर येतात :

(१) स्त्रिष्टीचा राजा करितो वेव्हार ... चंद्रसूर्ये मुशाफर चुकेना येंरझर[२]॥
(२) स्त्रिष्टीचा राजा जातीचा कुंभार-मनुष्य देहाची यानें केली घडामोड॥
(३) आत्मा म्हनीतो कुडीला चाल कुडी लवकरी।
तुला राहन गांवसरी। मला जानं देवाघरीं॥
(४) कोनाचें घरदार, कोनाचें लेकर।
देवाजीच्या घरीं, जनि निदाळी सकळ॥
(५) कोनाचं घरदार, कोनाच्या गाई म्हशी।
देवाजीच्या दारीं, आत्मा चालला उपाशी॥
(६) संकटाच्या वेळीं, कामा येईना पोटींचा।
धर्म कामा येतो बाई। पांचा या बोटींचा॥
(७) आत्मा या कुडींचं, दोहीचं भांडन।
आत्मा मोठा बयमान, गेला कुडीळा टाकून॥

असें म्हणून ओंव्या गाऊन जगासंबंधीं तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कांहीं अनामिक संसारी संत स्त्रियाहि सुचतात. पण सर्वांनीं समुच्चयानें आकाशगंगेला तेज दिलें असलें तरी त्यांतून खड्याप्रमाणें वेगळ्या उचलून घेऊन ज्यांच्या तेजाचा कस सांगतां येईल अशा कांहीं थोड्याच प्रमुख संतकवयित्रींचा प्रस्तुत व्याख्यानांत विचार मी करीत आहें.

मराठी भाषेंतील पहिली संतकवयित्री म्हणून प्रसिद्धीस येण्याचा मान तसें पाहिलें तर महानुभाव वाङ्मयांतील 'धवळे' या गीतांची कर्त्री महदंबा किंवा

---

१. असें बोलिलें— वेणाबाई रामायण, सुंदरकांड, ५, ४, ९८
२. स्त्रिष्टीचा राजा— अपौरुषेय 'माहेरचं मराठी,' आत्माकुडींचें भांडण

महदाईसा हिला द्यावा लागतो. तिची व चक्रधराची भेट झाली व ती त्याला गुरु म्हणून त्याची सेवा करून राहिली. गुरु देशपर्यटणास गेल्यानंतर गोविंदप्रभुजवळ तिनें वास केला. त्यांचे लग्नाचे निमित्तानें व त्यांचे कृपाप्रसादानेंच तिला कविता स्फुरली व 'चक्रधराचे शिरीं धरुनियां चरण'[३] अशी सुरवात करून तिनें 'धवळे' रचले. परंतु महानुभावपंथाच्या ग्रंथ गुप्त राखण्याच्या सवयीनें व सर्व समांजांतून फुटून राहण्याच्या रीतीमुळें त्यांचे पंथाखेरीज सर्व समाजास तिच्या काव्याचा लाभ त्या वेळीं झाला नाहीं. परंतु संतत्त्व प्राप्त होण्यास आवश्यक गोष्टी तिच्या ठायीं होत्या. कृष्णाची भक्ति, गुरूनें केलेल्या आज्ञेप्रमाणें वागण्यांत दिसून येणारी निष्ठा यावरून इतर संतस्त्रियांप्रमाणेंच देवभक्ति, गुरुभक्ति व काव्यगुण तिजठायीं होते. शेवटीं ती आजारी पडली व तिचे पायास व्रण झाला त्यावर उपाय करावा म्हणून भटोबानें वैद्य बोलाविला व त्यांनीं रक्त काढण्याचा उपाय सांगितला तेव्हां महदाईसा म्हणाली, 'गोसावी यांनीं रक्त काढण्यास व डाग देण्यास परवानगी दिलेली नाहीं. मी आतां म्हातारी. फार दिवस जगत नाहीं. तेव्हां आज्ञाभंग कशास करूं?' व या तन्हेनें शेवटच्या दुखण्यांतहि गुरूच्या आज्ञा तिनें कसोशीनें पाळल्या. तिच्या मृत्यूनंतर नागदेवाचार्यांनीं उद्गार काढले, 'म्हातारी धर्मरक्षक, यावरून तिची गुरूवरील निष्ठा कळते. परंतु तिच्या काव्याचा व विचारसरणीचा महाराष्ट्राच्या मनावर त्यावेळीं कोणताच परिणाम होऊं शकला नाहीं. महदंबा आद्यकवयित्री हें मान्य करूनहि एकंदर आजच्या विषयाच्या अनुरोधानें मुक्ताबाईपासून सुरवात करावी लागते. कारण आजच्या व्याख्यानमालेची मर्यादा वारकरी पंथाचे आद्य संत ज्ञानेश्वर यांचेपासून रामदासांपर्यंत आहे. तेव्हां या कालखंडांतील व त्यांचे परंपरेंतील संत मुक्ताबाईपासून वेणाबाई, बहिणाबाई या कवयित्रींच्या काव्याचा जास्त विचार करणें प्रस्तुत प्रसंगीं योग्य होईल.

त्या दृष्टीनें पाहूं लागलें, तर या संतकाळाचे तीन खंड पडतात. (१) ज्ञानेश्वर, नामदेव यांचा एक कालखंड, (२) दुसरा एकनाथांचा कालखंड, व (३) तुकाराम, रामदासांचा तिसरा कालखंड. आणि या तिसऱ्या कालखंडांत पुन्हां वारकरी संप्रदाय व रामदासी संप्रदाय असे दोन प्रकार येतात.

पहिल्या खंडांत संतकवयित्रींची संख्या विपुल दिसते. त्या वेळीं सर्व संतांच्या काव्यशक्तीस जणुं बहर आला होता. वसंतांत सर्व पक्ष्यांस गावेसें वाटावें, त्याप्रमाणें त्या वेळीं पुरुषसंत व स्त्रीसंतांसहि कविता स्फुरत होती.

यानंतर मध्यंतरींचा काळ एकनाथांचा. यांत नांव घण्याजोगी कवयित्री आढळत नाहीं. तिसरा कालखंड तुकाराम-रामदास यांचा. यांतील कवयित्री संख्येनें थोड्या

---

३. सर्वेश्वराचे सीरीं— महदंबा–धवळे पूर्वार्ध ओंवी १

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ११८६ नोः दिः २५/८/९९

असल्या तरी त्यांचे व्यक्तिमत्त्वाबद्दल व काव्याबद्दल माहिती जास्त निश्चितपणें मिळते.

सुरवात सहजच पहिल्या कालखंडापासून करावयास हवी व या पहिल्या कालखंडांत पहिली कवयित्री म्हणून मान कोणाचा, हा प्रश्न पडण्याचें कारण नाहीं. कारण आज अनेक शतकें वारकरी मंडळीच्या भजनांत त्या नांवाचा गजर होतो आहे.

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम ।
आवडीनें हीं नामें गाती ते नर पावति मंगलधाम ॥

निवृत्ती–ज्ञानदेवांच्या जोडीनें मुक्ताबाईचे दररोजच्या भजनांत घरोघरीं स्मरण होत आहे. तेव्हां जो मान संतकवींत ज्ञानदेवांचा तोच मान संतकवयित्रींत मुक्ताबाईचा. 'ज्ञानदेवें रचिला पाया'[४] असें वारकरी सांप्रदयाचें वर्णन संतकवयित्री बहिणाबाई पुढें तीनशें वर्षांनीं करतात. तेव्हां ही जी पायाभरणी झाली तींत संतकवयित्री मुक्ताई यांचा मान आहेच.

मुक्ताबाईच्या पूर्वजांबद्दल बोलावयाचें म्हणजे ते ज्ञानेश्वरांबद्दल पूर्वीच्या व्याख्यानांत सांगितलें आहे तेंच येणार. अर्थात् पुन्हां आठवणीस उजळा देण्यापुरतें पुन्हां सांगणें आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांचें घराणें माध्यंदिनशाखीय यजुर्वेदी, पंचप्रवरात्मक वत्सगोत्री देशस्थ ब्राह्मणांचें. आडनांव कुलकर्णी. आपेगांवीं पिढ्यान्पिढ्या कुळकर्णीपणाची वृत्ति चालविणारे. यांपैकीं ज्ञानदेवांचे पणजे त्र्यंबकपंत. यांचा वडील पुत्र गोविंदपंत व त्यांची पत्नी निराबाई यांचे पोटीं पुढें विठ्ठलपंताचा जन्म झाला. त्र्यंबकपंताचे दुसरे पुत्र हरिहरपंत. हे एका बंडखोर देशमुखाबरोबर लढाई चालू असतां कामास आले. त्यामुळें त्र्यंबकपंतास विरक्ति उत्पन्न झाली. या सुमारास महासाधु गोरक्षनाथ हे आपेगांवीं आले व त्र्यंबकपंतांनीं त्यांचा गुरूपदेश घेतला. तेव्हांपासून आपेगांवचे कुळकर्णी यांचें वळण गुरुसंबंधानें नाथपंथाकडे लागलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मुक्ताबाईचे वडील विठ्ठलपंत यांची प्रथमपासूनच परमार्थाकडे ओढ दिसून येत होती. उपनयनानंतर वेदाध्ययन संपवून ते तीर्थाटनास निघाले व फिरतां फिरतां आळंदी क्षेत्रीं आले. आळंदी येथील कुळकर्णी त्रिप्रवरी वासिष्ठ गोत्री सिधोपंत यांनीं आपली मुलगी हा अनुरूप वर म्हणून विठ्ठलपंतास दिली. पुढें विठ्ठलपंत आपली पत्नी रुक्मिणीबाई व सासूसासरा यांसह आपेगांवीं आईबापांचे भेटीस आले. आईबापांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षें गृहप्रपंच चालविला; पण पुनरपि उदासीनता उत्पन्न होऊन बायकोची संमति घेतल्यासारखें करून काशीस निघून गेले व तेथें त्यांनीं संन्यास घेतला. रुक्मिणीबाई ही माहेरीं येऊन व्रतवैकल्यें करून दिवस कंठूं लागली. विठ्ठलपंतांस संन्यासदीक्षा देणारे रामानंद-

---

४. ज्ञानदेवें रचिला पाया— बहिणाबाई, संत बहिणाबाईचा गाथा

स्वामी यात्रा करीत आळंदीस आले. रुक्मिणीबाई पिंपळाचे पारावर प्रदक्षिणा घालीत होत्या. संन्यासी समोरून आलेले पाहून त्यांनीं नमस्कार केला व रामानंदांनीं 'अष्टपुत्रा सौभाग्यवती पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला. त्यामुळें रुक्मिणीबाईस हंसूं आलें. त्यांनीं आपला पूर्ववृत्तांत रामानंदांस सांगितला. आपण ज्याला संन्यास दिला त्याचीच ही स्त्री व स्त्रीची अनुज्ञाहि त्यांनीं फसवून घेतलेली आहे हें ध्यानीं येतांच त्यांनीं विठ्ठलपंतास पुन्हां गृहस्थाश्रम स्वीकारण्यास सांगितलें. विठ्ठलपंत गुर्वाज्ञा प्रमाण म्हणून पुनरपि गृहस्थाश्रम स्वीकारते झाले. याप्रमाणें आपल्या हातून नकळत व शिष्याच्या हातून जाणूनबुजून झालेल्या चुकीचें त्यांनीं परिमार्जन केलें. रुक्मिणीबाईस न्याय केला. पण तोच न्याय संततीस पुढें जन्मभर भोवला.

विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई या दांपत्यास या गृहस्थाश्रमांत चार अपत्यें झालीं. एकाद्या नाटकांत वा कादंबरींत पूर्वी पात्रांच्या स्वभावावरून नांवाची योजना करीत. उदा. नायकाचें नांव सुमति, खलपुरुषाचें नांव कुमति इ. त्याप्रमाणें यांचे मुलांचीं नांवें, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई अशीं वैराग्यदर्शक व पुन्हां त्यांच्या पुढच्या आयुष्यक्रमास अनुरूप अशीं कशीं ठेवलीं गेलीं कीं कोणी मागून काल्पनिक ठेविलीं असा प्रश्न मनांत उद्भवणें सहज आहे. पण विठ्ठलपंत-रुक्मिणी दांपत्याचा पूर्ववृत्तांत पाहिला तर त्यांना मुलांसाठीं हीं नांवें सुचणें सहज वाटतें. परंतु तीं नांवें सार्थ म्हणण्यास 'लावणारीं मुलें गुणांनीं निघावीं ही मात्र त्यांची पूर्वपुण्याईच. पण अपत्यप्राप्ति व त्यांच्या बाळलीला पाहण्याचें सुख जें काय थोडें मिळालें, तेवढेंच या जोडप्याचें संसारसुख. संन्याशानें पुन्हां संसार मांडला हें त्या वेळच्या लोकांना पटेना. हें कुटुंब वाळींत पडलें. पुढें मुलांच्या मुंजीच्या निमित्तानें हें प्रकरण पुन्हां एकदा धसास लागलें. आळंदीस ब्रह्मवृंदांच्या सभा झाल्या. चर्चा झाल्या व ब्रह्मवृंदानें एकमतानें निर्णय दिला कीं, आश्रम बदलणारास देहान्त प्रायश्चित्ताखेरीज दुसरें प्रायश्चित्त नाहीं. विठ्ठलपंतांनीं तेव्हां रामानंदांची आज्ञा मानली. आतां ब्रह्मवृंदांची मानली व सरळ काशीस जाऊन देह गंगार्पण केला. रुक्मिणीबाईनेंहि तोच मार्ग अनुसरला. लहान वयांत संकटें आलीं म्हणजे मुलांना लहानपणींच जास्त समजून येतें म्हणतात. आईबाप नाहींसे झालेले, गांव विचारीना. भाऊ त्यांतल्या त्यांत मोठे. चार वर्षांची ही मुक्ताई. हीं भावंडें तेथून आपेगांवास आलीं. भाऊबंद घरांत वांटा देईनात. थोरल्या दोघांनीं कोरान्न मागावें व चारपांच वर्षाचे मुक्ताईस तिच्याहून दोन वर्षांनीं वडील अशा सोपानदेवानें संभाळावे. मुक्ताईच्या जन्माच्या प्राथमिक आठवणी असणार, त्या हच्या अशा कीं, भाऊ आज भिक्षा मागून काय आणतील. आईबापांच्या आठवणी तर तिच्या जास्तच पुसटलेल्या असणार. जुन्या गोष्टींशीं नव्या गोष्टींचा दृष्टांत पाहूं जातां पंडिता रमाबाईंच्या लहान-

दि. क. ८७९ १०१

पणींची आठवण होते. तेंहि कुटुंब दोन वर्षांच्या रमाबाईस कावडीच्या एका पारड्यांत ठेवून असेंच देशाटन करीत होतें व पुढें सर्व दुष्काळांत मरून दोन बहिण-भाऊच एकटीं हिंडावयास उरलीं व कलकत्त्यास प्रकट झालीं.

निवृत्तिनाथांचा जन्म शके ११९५ म्हणजे १२७३ इ. सन
ज्ञानदेवांचा जन्म शके ११९७ म्हणजे १२७५ इ. सन
सोपानदेवांचा जन्म शके ११९९ म्हणजे १२७७ इ. सन
मुक्ताबाईंचा जन्म शके १२०१ म्हणजे १२७९ इ. सन सालीं झाला असें मानलें गेलेलें आहे.

आईपाबांची बुद्धिमत्ता, करारीपणा, वैराग्य सर्व गुण मुलांत आले व परिस्थितीनें उजळले गेले. निवृत्तिनाथांनीं वडील हयात असतां आधींच गुरूपदेश घेतला पण उपनयन वगैरे बाबतींत ते उदासीन होते. पण इतरांच्या समजुतीसाठीं सर्वजण पैठणला गेले व तेथील ब्रह्मवृंदास आपणांस शुद्ध करून घेणेंची त्यांनीं विनंति केली. प्रथम ब्राह्मणांनीं 'तुम्हांस शुद्ध करून घेणें शक्य नाहीं' असेंच सांगितलें. 'आम्हीं कसें वागावें' विचारतां 'निवृत्तिमार्गानें वागावें. संसार वाढवूं नये' असेंहि सांगितलें. पण पुढें ज्ञानेश्वरांनीं कांहीं अलौकिक गोष्टी केल्यामुळें पुन्हां शुद्धिपत्र दिलें किंवा तुम्ही अलौकिक आहांत, तुम्हांस शुद्धीची जरुरीच नाहीं असें सांगितलें. सर्व गोष्टींचा परिणाम संसाराविषयीं उदासीनता व ज्ञानमार्गाकडे वळून आयुष्य घालविण्याचा निश्चय यांत झाला. लोकांची कांहीं सहानुभूति असती तर त्या कालाप्रमाणें मुक्ताबाईचें लग्न करून हे तिन्ही भाऊ एका जबाबदारींतून मोकळे झाले असते. पण तशी शक्यता दिसत नव्हती. लोकांचे मतें हें कुटुंब जें बहिष्कृत ठरलें तें ठरलें. तेव्हां मुक्ताबाईचे बाबतींत भावांचाच आयुष्यक्रम ठरला. भावाप्रमाणेंच ती वाढली. त्यांचेचबरोबर अध्ययन, चर्चा, चिंतन तिचेंहि झालें. निवृत्तिनाथांनीं, ज्ञानेश्वर-सोपानाप्रमाणेंच तिलाहि गुरूपदेश दिला. कांहीं ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं दिला असें आहे. आणि भावंडांबरोबर तिचीहि आध्यात्मिक प्रगति होत गेली. ज्ञानेश्वरांनीं पैठणास चमत्कार केला व पुढें नेवाशास ज्ञानेश्वरी लिहिली त्या योगानें या सर्वच भावंडांबद्दल आदर व कौतुक लोकांत निर्माण झालें. या वेळीं तिचें वय सरासरी बारा तेरा वर्षांचें. वडील बंधूंमध्यें एक प्रकारचा संथपणा आला होता, पण हिची उमेद नवी. पोरपणा गेला नव्हता. त्यामुळें नामदेवास वाटलेला गर्व ओळखून त्यास स्पष्टपणें बोलल्यावांचून तिच्यानें राहवेना हें तिचें बोलणें.

'अखंड जयाला देवाचा शेजार । का रे अहंकार गेला नाहीं ?। ५

या श्लोकांत कळून येतें. प्रसिद्ध हठयोगी चांगदेव वटेश्वर यांनाहि गर्व वाटला व ज्ञानेश्वराला आशीर्वाद लिहावा का नमस्कार लिहावा असा विचार पडला. त्यांनीं

---

५. अखंड जयाला देवाचा— मुक्ताबाई-महाराष्ट्र संतकवयित्री, पृष्ठ ३२

कोरा कागदच पत्र म्हणून ज्ञानेश्वरांकडे पाठविला. हा तर अगदींच 'कोरा' दिसतो, म्हणून मुक्ताबाईला बोलल्यावांचून राहवेना. पण निवृत्तिनाथांनीं तो 'कोरा' म्हणजे निर्मळ आहे असें म्हणूनच बाजू सावरिली. पुढें चांगदेवांना मुक्ताबाई-कडून निवृत्तिदेवांनीं उपदेश देवविला. ज्ञानेश्वर-निवृत्तिनाथांसारख्या भावांच्या बरोबर सर्व आयुष्य गेल्यानें त्यांच्या मोठेपणाचा वांटा तिजकडे आला. तिच्या-बद्दल तिनें अनेक चमत्कार केल्याच्या कथा प्रसिद्ध आहेत. भिंत चालविली, पाठीवर मांडे भाजले, इ. पण यांत भाऊहि बरोबर आहेतच. ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतल्यानंतर सरासरी वर्षांतच तिचाहि शेवट झाला. ज्ञानेश्वरांचे समाधीनंतरे तिन्ही भांवंडें आपेगांवीं गेलीं. आपल्या मूळ गांवचें दर्शन घेऊन पुन्हां परत येत असतां आधीं सासवडजवळ सोपानदेवांनीं समाधि घेतली व पुढें एदलाबादेजवळ कीर्तन करीत असतां वीज पडून मुक्ताई नाहींशी झाली. या वेळीं तिचें वय सारें अठरा वर्षांचें असणार. जन्मापासून पहिलीं १२ वर्षें हाल-अपेष्टांतच गेलीं. ज्ञानदेवानीं 'ज्ञानेश्वरी' लिहिली तेव्हांपासून म्हणजे इ. स. १२९० पासून पुढें या भावंडांना समाजांत एक प्रकारचें मानाचें स्थान मिळालें. तेव्हां बारा ते अठरा वर्षांचा म्हणजे सहा वर्षांचा तिच्या कर्तृत्वाचा काळ. पण त्यांतहि तिचें भावांपेक्षां स्वतंत्र असें चरित्र नाहीं. भावांच्या कार्यांत ती समरस झाली होती. त्यांच्याप्रमाणें तिचीहि काव्यशक्ति उसळून येऊन ती अभंग व पद्यरचना करीत होती. अभंग थोडे असले तरी त्यांत आत्मानुभवाचा जोर तिच्या वाणींत भासतो. अर्थात् त्यांत किती मिसळ झाली असेल हें निश्चितपणें सांगतां येणें कठीण. पण परंपरेनें तिचे म्हणून जे अभंग व पदें प्रसिद्ध आहेत तीं तिचीं म्हणून त्यांचे रसग्रहण करण्यास हरकत नाहीं. एखाद्या कवितेबद्दल मतभेद झाला तरी तिची विचारसरणी कळावयास हरकत नाहीं. तिच्या नांवावर मोडणारें सुप्रसिद्ध पद हें आहे —

उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खासी ।[६]
भरला पूर मायेचा लोंढा वाहुनिया जासी ॥

यांतील तत्त्वज्ञान इतर संतांप्रमाणेंच, संसाराचा निष्फळपणा व मायावाद सांगणारें आहे. 'क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाहीं,' हें सांगून शेवटीं ती सांगते—

म्हणजे मुक्ताबाई चांग्या अंतरिंची खूण ।
धरि सद्गुरुचे पाय तुजला नेतिल उद्धरुन ॥

सद्गुरुची कृपा ही या संसारांतून सुटण्यास अवश्य आहे. तोच तुला उद्धारील. यांतील 'मुक्ताबाई' या शब्दावरून कांहींना हें पद 'मुक्ताई'चें वाटत नाहीं. पण वरील सद्गुरूच्या प्रसादाची आवश्यकता ती दुसऱ्याहि श्लोकांत सांगते व

---

६. उलट उलट माघारा— मुक्ताबाई—संतवचनामृत पृष्ठ ६३

आपण सद्गुरुकृपेनें कसे तरलों, आपले डोळे कसे उघडले हेंहि सांगते —

ऐसी मी हो अंध जात होतें वाया । प्रकृति सावया पावळीं तेथें ।[७]
मुक्ताई सावध करी निवृत्तिराजा । हरिप्रेमें उमज एकतत्त्वें ।।

याप्रमाणें गुरूनें आपणांस ईश्वरप्राप्ति करविली ही गोष्ट ती अनेक अंभगांत सांगत असते.

एकूण मुक्ताबाईचें जीवन व वाङ्मय हें विद्युल्लतेप्रमाणें क्षणभर चमकून जाणारें, पण मनाला चटका लावणारें आहे.

मुक्ताबाईचे पाठोपाठ डोळ्यांत भरणारी संत कवयित्री म्हणजे जनाबाई. ज्ञानदेवांच्या परिसरांत ज्याप्रमाणें मुक्ताबाई चमकली त्याप्रमाणें पंढरपुरांतील नामदेव संताच्या कक्षेंत जनाई तेज पावली. मुक्ताबाईस जर मागील कुलपरंपरेचा व कर्तबगार भावांचा आधार तर जनाबाई कुठली कोण कांहींच कळत नाही. महिपति संतकवि चरित्रकार काय सांगतात तेवढी माहिती कळते. संत नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी हे पंढरीस आले असतां दमा व कुरुंद या शूद्र जोडप्यानें आपली लहान मुलगी त्यांचे स्वाधीन केली. इतरांचे मतें देवाचें देवळांत आईबापांपासून यात्रेंत चुकलेली मुलगी दामाशेटना सांपडली व तिला त्यांनीं घरीं आणून वाढविली. घरीं नामदेव विठ्ठलभक्तींत रंगलेले होते. तीच भक्ति तिजकडे आली व आपला जन्म दामाशेटच्या घरीं दासीपणानें वागून पण भगवच्चिंतनांत रंगून तिनें काढला. यापलिकडे तिजबद्दल जास्त माहिती नसली तरी तिच्या अभंगांनीं व गुणवर्णनपर गाण्यांनीं महाराष्ट्र झुलतो आहे हें कांहीं खोटें नव्हे.

जनी दळण दळी – पांडुरंग जातं झाडी ।[८]
एकापायी झाली आढी – जनी दळण ।।

अशा तऱ्हेच्या ओव्यांनीं ती स्त्रियांना माहित आहे. 'उनउन पाणी घालुनि ।[९] बाळा सोन्याच्या घंगाळा । चंदनाची उटी देवा । कस्तुरी वेल्हाळा । तें तुला आवडेना रे देवा । जनीच्या घरीं जासी ।।

जनीची वाकळ पांघरीसी । जनीच्या घरीं राहसी ।
राधा म्हणे रे श्रीहरी । कसा तूं भुललासी ।
भक्तासाठीं होऊनि कष्टी । रानोमाळ फिरसी.।

अशा गाण्यांनीं जनीचा व देवाचा मित्रपणा बायकांच्या गाण्यांत वर्णिला जात आहे. इतकेंच नव्हे तर या वर्णनाची वाढ होतां होतां रुक्मिणीला जनीचा मत्सर वाटूं लागतो, अशीहि वर्णनें बायकांच्या ओव्यांत येतात.

---

७. ऐसी मी हो अंध— मुक्ताबाई संतवाचनामृत–पृष्ठ ६१
८. जनी दळग दळी— ,, स्त्रीगीतरत्नाकर, भा. ३ पृष्ठ ३९
९. उन उन पाणी— अपौरुषेय वऱ्हाडी लोकगीतें, पृष्ठ ६

बोले रुक्मिणी रागांत । विठ्ठला कां नाहीं लाज ।[१०]
सांगा जनीच्या वाड्याला । कशाला हो जाता रोज ? ।।
देव विठोबा बोलला ।[११] नको गडे असें बोलूं ।
जनी अपंग बिचारी । होय आपलें लेकरूं ।। "

कथा, पुराणें, भजनें, यांत तर जनाबाईचे अभंग सर्वत्र वावरत आहेत.

येग येग विठाबाई, माझे पंढरीचे आई ।[१२]
भिमा आणि चंद्रभागा, तुझ्या चरणींच्या गंगा ।
इतुक्यासहित त्वां बा यावें, माझे रंगणीं नाचावें ।
माझा रंग तुझे गुणी, म्हणे नामयाची जनी ॥

हा अभंग सर्वांचे परिचयाचा आहे. तसेंच

गंगा गेली सिंधुपाशीं, त्यानें अव्हेरिलें तिसी ।[१३]

हा उत्कृष्ट दृष्टांत सांगणारा अभंग कोणास माहित नाहीं ? हें जग कसें निर्माण झालें, 'तत्वमसि' इत्यादि तत्त्वशोधनांत गुंतण्यांपेक्षां ती देवाच्या सगुण रूपांत गुंगली आहे. देव तिचा साहाय्यकर्ता आहे. खेळगडी आहे. इतका कीं वेळप्रसंगीं रागावून त्याला चार शिव्या देण्यासहि तिला हरकत वाटत नाहीं.

धरिला पंढरीचा चोर, प्रेमें बांधूनिया दोर ।[१४]

तसेंच 'अरे विठ्या विठ्या, मळ मायेच्या पोरट्या ।'[१५]

हे अभंग हेच सांगतात.

नामदेवांच्या घरीं लाभलेल्या सत्संगानें आपणांस हा लाभ झाला हे ती मोठ्या सुंदर व व्यवहारांतील दृष्टांतानें सांगते.

नोवरियासंगें वऱ्हाडियां सोहळा ।[१६]
मांडे पुरणपोळ्या मिळे अन्न ।
जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनियां ।।

देव तिच्या भक्तीला भुलून तिचे घरीं तिला दळणकांडणांत मदत करी. देवाचा

---

१०. बोले रुक्मिणी रागांत— अपौरुषेय वऱ्हाडी लोकगीतें पृष्ठ ७
११. देव विठोबा बोलला— अपौरुषेय वऱ्हाडी लोकगीतें पृष्ठ ७
१२. येग येग विठाबाई— जनाबाई महाराष्ट्र संतकवयित्री, पृष्ठ ५५ अभंग १–१
१३. गंगा गेली सिंधुपाशीं— जनाबाई ,, पृष्ठ ५६, अभंग ५–१
१४. धरिला पंढरीचा चोर— जनाबाई ,, पृष्ठ ५८, अभंग १७–१
१५. अरे विठ्या विठ्या— जनाबाई ,, पृष्ठ ५९, अभंग २१–१
१६. नोवरिया संगें वऱ्हाडिया—जनाबाई ,, पृष्ठ ५५, अभंग २–१

हार तिचे घरीं विसरला व त्यामुळें तो चोरल्याचा आळ तिजवर आला. अशा प्रसंगीं तिनें रचलेले अभंग म्हणून जे दिसतात ते तिचेच की कोणीं मागून केले अशी शंका येते. पण त्या वेळची तिची देवावरची श्रद्धा, आर्तता, इतर अभंगांतहि कळते.

आंधळचाची काठी अडकली कवणे बेटी ।[१७]
माझीये हरिणी कोठें गुंतलीस राणी ।
तुजविण काय करूं प्राण तिची कंठी धरूं ।[१८]
आतां जीव जाऊ पाहे धांव घाली माझे आये ।
माझी भेटवा जननी संता विनवी दासी जनी ॥

याप्रमाणेंच इतरहि तिच्या सर्व अभंगांत देवाबद्दल भक्ति व विश्वास भरलेला आहे. तिच्या अभंगांत कांहीं तत्त्वज्ञानविषयक अभंग आहेत, सद्गुरूच्या स्तुतिपर आहेत. पण तीं स्वतः याच्यापुढें जाऊन पोंचली आहे. देव तिला भेटतो. तिचे कामांत मदत करतो या आनंदांत बाकीच्या गोष्टी तिच्या हिशेबीं मागें पडतात.

नामदेवाचा जो देवभक्ताचा जिव्हाळा तोच त्याच्या घरांतील दासी जनीचा; त्यामुळें तिचें कुलगोत, अध्ययन, पात्रता इत्यादींबद्दल विचार मागें पडतात व तिच्या भक्तिप्रेमांत श्रोता समरस होतो. मुक्ताबाई, ज्ञानेश्वर यांची विद्वता गुरुपरंपरा, योगसाधन इत्यादि गोष्टींनीं श्रोता त्यांचे अभंगांत तल्लीन झाला तरी त्यांचे श्रेष्ठत्वाचा मनांतील दुरावा कायम राहातो. पण नामदेव-जनीच्या अभंगांत श्रोता तद्रूप होतो. आज ६०० वर्षें होत आलीं, अज्ञानकुलशील, अशिक्षित, अडाणी अशा एका दासीच्या अभंगांची पकड संतांचे व श्रोत्यांचे मनावर कायम आहे. याहून तिची जास्त स्तुति काय करावी ?

नामदेवांच्या प्रेरणेनें विस्तारलेल्या या संतकवींत आणखीहि कांही संत कवयित्री येतात. कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मला, तसेंच खुद्द नामदेवांच्या कुटुंबांतील बायको, बहीण, सून आदि स्त्रियाहि येतात. पण त्यांचें वर्णन मोजक्या वेळांत देणें कठीण. शिवाय त्यांची कविता थोडीच आहे. नामदेवांमुळें 'पुष्पसंगें मातीस वास लागे' असें होऊन त्यांचे घरदारच संत बनून अभंगरचना करीत होतें. पण त्यांतील जनाबाईचें स्थान स्वतंत्रपणें गणना करण्यासारखें आहे व म्हणून तिचें वर्णन वेगळें केलेंच आहे.

जनाबाईचे खालोखाल वारकरी संप्रदायांत प्रसिद्ध असलेली कवयित्री कान्होपात्रा होय. तिच्या अभंगांतील प्रेमळपणा तिचे कवित्वाची ग्वाही देतोच..पण त्याखेरीज तिला संतमंडळांत वैशिष्ट्य मिळण्याचें कारण तिचें लोकअसाधारण चारित्र्य

---

१७. आंधळ्याची काठी— जनाबाई महाराष्ट्रांत संत कवयित्री, पृष्ठ ५६, अभंग ३–१
१८. तुजविण काय करू— जनाबाई ,, पृष्ठ ५६, अभंग ३–४

इतर संतांप्रमाणें तिच्याबद्दल निश्चित माहिती थोडी. तज्ज्ञांचे मतें ती नामदेवांच्या नंतरच्या शतकांत म्हणजे चौदाव्या शतकांत होऊन गेली. मंगळवेढ्याच्या शामा नायकिणीचे घरीं तिचा जन्म. असामान्य स्वरूप व त्याचे जोडीला कुळांतच चालत आलेली गायन व नर्तनाची कला; सहजच तिला कोणीहि आनंदाने मागणी घालता. पण तिच्या धंद्यांत दिसून न येणारी गोष्ट घडली व या अनुरूप यजमान मिळविण्याच्या वयांतच तिला वैराग्य उत्पन्न झालें.. तिनें यजमान मिळविण्याचा विचार सोडला व त्या गायनकलेचा उपयोग ती विठ्ठलाचे गुण गाण्यांत करूं लागली. दारावरून पंढरपुराकडे वारकऱ्यांच्या दिंड्या भजन करीत जात. त्यांचेमागें जाऊन तिला पांडुरंगास भेटावेसें वाटे व शेवटीं ती पंढरपुरास जाऊन देवासमोर गायन-नर्तन करीत काळ घालवूं लागली. तरीपण बेदरच्या बादशहापर्यंत तिचे रूपाची कीर्ति गेलीच. बादशहाची इच्छा म्हणजे आज्ञाच. तिला पकडून घेऊन जाण्यास राजदूत आले. त्यावेळीं देवाचा निरोप घेण्यासाठीं म्हणून ती गाभाऱ्यांत गेली व देवाचे पायावर डोकें टेकून तेथेंच परमेश्वरस्वरूपीं लीन झाली ! मुक्ताबाई-प्रमाणें लोकविलक्षण चरित्र तिचें झालें आणि त्या योगानें तिचे अभंगास संत-वाङ्मयांत कायम स्थान प्राप्त झालें. तिचें मनोगत पुढील अभंगांत फार चांगलें व्यक्त झालें आहे.

दीन पतित अन्यायी–शरण आलें विठाबाई। [१९]
मी तो आहें यातिहीन–न कळे कांहीं आचरण।
मज अधिकार नाहीं–भेटी देई विठाबाई।
ठाव देई चरणापाशीं–तुझी कान्होपात्रा दासी ॥

राजदूत न्यावयास आले असतां विठ्ठलाचे चरणावर डोकें टेकतांना देवावर ती सांकडे घालते.

पतितपावने म्हणविसी आधीं–तरी कां उपाधि भक्तामागें। [२०]
तुझें म्हणवितां दुजे अंगसंग–उणेपणा सांग कोणाकडे।
सिंहाचें भातुकें जंबुक पै नेतां–थोराचियां माथा लाज वाटे। [२१]
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें–करावा जतन ब्रीदासाठीं ॥

हा अभंग वाचतांना नामदेवांच्या

---

१९. दीन पतित अन्यायी— कान्होपात्रा — सकलसंतगाथा, पृष्ठ ६०अभंग १०
२०. पतित पावन म्हणविसी— कान्होपात्रा — ,, पृष्ठ ६१ अभंग २२
२१. सिंहाचें भातुकें जंबुक— कान्होपात्रा — महाराष्ट्र संतकवयित्री, पृष्ठ ८५ अभंग ९–३

पतित पावन नाम ऐकूनी आलों मी दारा। २२
पतित पावन नव्हेस म्हणून जातों माघारा ।।

या अभंगाची आठवण होते. संकट आलें असतां देवावर सर्व भार टाकून वाट पहावयाची अशी भक्तांची अनादिकालापासून रीत आहे. नामदेव तर उलट देवाला बजावतात, 'हातीं झेंगट घेऊनि दवंडी पिटितो तिही लोकीं। पतितपावन नाम परि हा मोठा घातकी ।।' पण देवाविरुद्ध दवंडी पिटवयासाठीं कां होईना, पुढच्या जीविताची खात्री त्यांना होती. पण कान्होपात्रेचें संकट त्याचेहून मोठें. देवानें ब्रीद राखलें नाहीं तर 'या प्रसंगीं देव मला पावला नाहीं, माझें ब्रीद राखलें नाहीं.' हें तरी कोणत्या तोंडानें ती जगाला सांगणार? यासाठीं देवाशीं रोखठोक भांडण करावयास उभी न राहतां ती देवाच्या स्वाभिमानालाच थोडें डिवचूं पाहते.

'सिंहाचे भातुके जंबूक पै नेता—थोरांचिया माथा लाज वाटे।'

'देवा, माझी विटंबना झाली तर त्याची लाज तुलाच.' आणि या नवलघटनेनें व तिच्या अनन्य विश्वासानें कान्होपात्रेचें नांव चिरंतन झालें आहे.

कान्होपात्रेच्या खालोखाल प्रसिद्धि मिळालेल्या पण कालदृष्ट्या कान्होपात्रेच्या मागचे शतकांत, म्हणजे नामदेव आदि संतमंडळीचे समकालीन होऊन गेलेल्या दोन नणंदा-भावजया कवयित्री सोयराबाई व निर्मला. सुप्रसिद्ध संत चोखामेळा याची सोयराबाई ही बायको व निर्मला ही बहीण. तो काळच असा दिसतो कीं ज्ञानदेव-नामदेवांच्या प्रेरणेनें आधींच चालू असलेल्या विठ्ठलभक्तीला बहर यावा. जेथें जेथें सहृदयता असे तेथें तेथें ही प्रेरणा पोचे व त्या व्यक्तींतील भक्तिभाव जागृत होऊन काव्याचें स्वरूप घेई. ज्ञानदेव व नामदेव हे स्वतंत्र स्फुरण होऊन कवि झाले. पण ज्ञानेश्वरकुटुंबीय सोपान-मुक्ताई आदि मंडळी, नामदेवकुटुंबीय बायको, बहीण, मुलगे, सुना, इत्यादि सर्व, तशीच दासी जनी, यांना त्यांच्या स्फुरणाचें वारें लागलें. तसेंच वारे जातिनिरपेक्षपणें इतर सर्वांपर्यंत पोचले. तसेंच चोख्या महारा-पर्यंतहि गेले. त्याच्या भगवद्भक्तीचा परिणाम पुन्हां त्याची बायको, मुलगा व बहीण यांवर झाला. नीच जातींत जन्म असून सदाचरणी व वृत्तीनें भक्तिमार्गी; विठ्ठलाचे चिंतनांत, भजनांत गुंगून सर्व संतांचे पद्धतीप्रमाणें तो संसार विसरे. त्यास मूलबाळ नव्हतें त्यामुळें त्याची बायको सोयराबाई दुःखी असे. पांडुरंगानें ब्राह्मणाचे स्वरूपानें येऊन अन्न मागितलें. आपण हीनजाति; ब्राह्मणास अन्न कसें द्यावें हा सोयराबाईस प्रश्न पडला. पण त्या ब्राह्मणानें आग्रहानें मागितल्यामुळें तिनें दहीभात दिला. ब्राह्मणानें दहीभात खाऊन 'तुला पुत्र होईल' असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद फलद्रूप झाला. बाळंतपणासाठीं मदत करण्यासाठीं चोखा बहिणीस

---

२२. पतित पावन नाम ऐकूनी—
हातीं झेंगट घेऊनी नामदेव संत सकल गाथा पृष्ठ १७८, अभंग १७३१

बोलावणें गेला, पण तेथेंच राहिला. इकडे देवानें बहिणीचें रूप घेऊन सोयराबाईची अडचण वारली अशी ही भक्तकथा आहे.

सोयराबाई देवाचें रूप आठवते व त्याचे ध्यानांत तल्लीन होते. ती म्हणते,

अवघा रंग एक झाला–रंगीं रंगला श्रीरंग । २३
मी-तूंपण गेलें वाया–पहातां पंढरीच्या राया ॥
नाहीं भेदाचें तें काम–पळोनि गेले क्रोध-काम ।
देहीं असूनी तूं विदेही–सदा समाधिस्थ पाही ॥
पाहते पाहणें गेले दुरी–म्हणे चोख्याची महारी ॥

या अभंगावरून अद्वैत तत्त्वज्ञानाची तिला चांगलीच समज झालेली दिसते. एरवीं

देही असूनी तूं विदेही–सदा समाधिस्थ पाहीं ।
पाहते पाहणें गेले दुरी–म्हणे चोख्याची महारी ॥

अशीं स्पष्टीकरणें इतक्या सुलभपणें येंणें कठीण. जातीची महार, त्यामुळें लोकांना आपला विटाळ होतो, हें तर तिला माहीत होतेंच. पण हा सोवळे-ओवळेपणा देव व भक्त यांच्या मीलनांत आड येणार नाहीं, हीही भागवतधर्माची शिकवण तिला कळली होती. या जगांत भेद आहे, पण या जगापलीकडे जीव व शिव यांत हा स्पर्शास्पर्श नाहीं ही तिची श्रद्धा व म्हणून ती म्हणते,

देहासी विटाळ म्हणती सकल–आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध । २४
देहींचा विटाळ देहींच जन्मला–सोवळा तो झाला कवण धर्म ? ।
विटाळावांचोनि उत्पत्तिचें स्थान–कोणी देह निर्माण नाहीं जगीं !
म्हणूनि पांडुरंगा–वानितसे थोरी–विटाळ देहांतरीं वसतसे ।
देहींचा विटाळ देहींच निर्धारी–म्हणत महारी चोखीयाची ॥

निर्मला ही चोख्याची बहीण. तीहि याच भक्तिभावानें भारावलेली आहे. नामाचा जप हा तारक होतो हें ती सांगते,—

मज नामाची आवडी, संसार केला देशधडी ॥ १ ॥२५
सांपडले वर्म सोपें । विठ्ठलनाम मंत्र जपे ॥ २ ॥
नाहीं आणीक साधन । सदा गाई नारायण ॥ ३ ॥
निर्मला म्हणे देवा । छंद एवढा पुरवावा ॥ ४ ॥

ज्ञानदेव-नामदेवांचे कालानंतर आपण आतां तुकाराम-रामदासांचे तिसऱ्या कालखंडांत येतो. या कालांतील सुप्रसिद्ध संत कवयित्री दोन. एक बहिणाबाई व दुसरी वेणाबाई.

---

२३. अवघा रंग एक झाला—सोयराबाई, पृष्ठ ६९, अभंग ३ (१ ते ५ ओळी)
२४. देहासी विटाळ— सोयराबाई पृष्ठ ६९, अभंग ४ (१ ते ५ ओळी)
२५. मज नामाची आवडी— निर्मळा पृष्ठ ७८, अभंग ४–२ (१ ते ४ ओळी)

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।[२६]
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिले देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणें रचिले तें आवार ।
जनार्दन-एकनाथ । खांब दिला भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपणा केले बोजा ॥

हा अभंग सुप्रसिद्ध असला तरी या अभंगाची रचना करणारी कवयित्री बहिणाबाई हिची हकिगत बरेच दिवस अज्ञात होती. इतर कवयित्रीचे मानानें तिचें अभंगांचें बाड बरेंच उशिरा प्रसिद्ध झालें व मग त्यांत तिचे आत्मचरित्रपर अभंगहि मिळाले. स्वत:बद्दल व्यवस्थित माहिती ग्रथित करणारे संतांत पहिले नामदेव व स्त्रियांत पहिली बहिणाबाई. हिचें चरित्र अनन्यसामान्य आहे. इ. स. १६२८ मध्यें हिचा जन्म. वेरूळजवळील देवगांवीचे वासुदेव कुलकर्णी यांची ही कन्या. ही सुमारे चारपांच वर्षांची असतांच हिचें लग्न आईबापांनीं रत्नाकर पाठक नांवाच्या आपल्याच एका दूरच्या नातेवाईकाशीं लावून दिलें. हे रत्नाकर पाठक बिजवर असून लग्नसमयीं त्यांचें वय तीस एक वर्षांचे होते. प्रथम सर्व चांगलें होतें. पण लवकरच दैवाची गति फिरली व गांवांतील शेत-जमीन सर्व भाऊबंदांस देऊन टाकून बहिणाबाईचे आईबाप आपल्या मुलीसह व जांवयासह देशत्याग करिते झाले. पायीं प्रवास करीत ही मंडळी प्रथम पंढरपुरास गेली. तिथें पांच दिवस मुक्काम केला होता. त्यावेळीं बहिणाबाईस प्रथम विठोबाचें दर्शन झालें व तुकारामाचे अभंग तिचे कानीं पडले. तेथून तें कुटुम्ब पुढें कोल्हापुरास गेलें. तेथें एका ब्राह्मणाचें घरीं वसति करून राहात असतां त्या ब्राह्मणानें आपणांस दान मिळालेलें वासरूं व गाय यांना देऊन टाकलीं. बहिणाबाई त्या गाय-वासराची सेवा प्रेमानें करी. तें वासरूंहि तिजवर विशेष माया करी. त्याच वेळीं कोल्हापुरास जयरामबुवा वडगांवकर–रामदासांचे शिष्य–यांचीं कीर्तनें होत होतीं व घरची सर्व मंडळी कीर्तन-श्रवणास जात. त्यावेळीं बहिणाबाईबरोबर तें वासरूं जाई आणि कीर्तनांतील सर्व प्रसंग त्याला कळत आहेत असें त्याच्या हुंकारावरून व डोळ्यांतील अश्रूंवरून वाटे. एके दिवशीं सभामंडपांत गर्दी झाली. माणसास जागा पुरेना म्हणून लोकांनीं तें वासरूं सभामंडपाचे बाहेर काढून लावलें. त्यावेळीं बहिणाबाई शोक करूं लागली व वासरूंहि ओरडं लागलें. ही गडबड ध्यानांत येऊन कथेकरीबुवांनीं वासरास परत मंडपांत आणविलें. वासरूं त्याबरोबर आंत झालें. बुवांनीं वासरास व

---

२६. संतकृपा झाली— बहिणाबाई, बहिणाबाईचा गाथा, पृष्ठ २६६ अभंग २२९, (१ ते ६ ओळी)

बहिणीस आपले पुढें आणवून, त्यांचे डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला व कौतुक केलें.

पण हीच बातमी विकृत स्वरूपांत मिराबाई नामक कोणा स्त्रीनें रत्नाकर पाठकास सांगितली. त्याबरोबर संतापून जाऊन बायकोस त्यानें बेदम मारलें व कोंडून बांधून घातलें. त्यामुळें त्या वासरानेंहि अन्नपाणी वर्ज्य लेलें. ही बातमी चोहींकडे पसरली. तेव्हां खुद्द जयरामस्वामी घरीं आले व त्यांनीं रत्नाकर पाठकास बोध केला. ते म्हणाले,

'म्हणती ब्राह्मणा, तूं इचा भ्रतार–सांगतो निर्धार ऐक आतां ।
योगभ्रष्ट इचीं साधनें बळकट – तूं इसी कष्ट करूं नको ।।
गायी आणि वत्स हे इचे सांगाती–अनुष्ठानें होती ऐक्यभाव ।
आयकासी तरी बरें होय तुझे – येथें काय माझें बळ आहे ।।
बहिणी म्हणजें ऐसे बोलोनी जयराम – पाहे मनोरथ सर्व चिन्ह ।

याप्रमाणें जयरामस्वामी सांगून परत गेले.

पण पुढें एक दोन दिवसांतच त्या वासराचा अंत जवळ आला. घराचे मालक बहिरंभट सायंकाळीं ओसरीवर गीतेचें पठण करीत होते. करतां करतां 'मूकं करोति वाचालं, पंगुं लंघयते गिरिम् ।' हा श्लोकार्ध त्यांनीं म्हटला, त्याबरोबर त्या वासराला वाचा फुटून त्यानें 'यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम्' हा पुढचा श्लोकार्ध म्हटला व प्राण सोडला ! ही बातमी गांवांत पसरताच जयरामस्वामी आदि सर्व मंडळी जमली व त्यांनीं मोठ्या समारंभानें भजन करीत त्या वासरास नेऊन पुरलें. बहिणाबाई दुःखभरानें बेशुद्धावस्थेंत चार दिवस होती. चार दिवसांनंतर त्यांना कोणा ब्राह्मणानें येऊन 'सावध हो' असें म्हटल्याचें ऐकूं आलें. डोळे उघडतांच आई, बाप व नवरा समोर असल्याचे दिसलें. पुन्हा बाई गुंगल्या. त्यावेळीं त्यांना पंढरी दिसली व तुकारामांनी येऊन उपदेश दिला.

'ठेवोनया कर मस्तकीं बोलिला – मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ।[२८]
म्यांहि पायावरीं ठेविलें मस्तक – दिधलें पुस्तक मंत्रगीता ।।
कार्तिकांत वद्य पंचमी रविवार – स्वप्नींचा विचार गुरुकृपा ।
आनंदलें मन चिद्रूपीं कोंदलें – उठोनी बैसले चमत्कारें ।।
मंत्र आठवती तुकोबा स्वरूपें – स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली ।।
बहिणी म्हणे ऐसी कृपा सद्गुरूची – तुकारामें साची पूर्ण केली ।।

---

२७. म्हणती ब्राह्मणा–– बहिणाबाईचा गाथा पृष्ठ १९६, अभंग १७ (७, ८, ११, १४, १५ ओळी) पृष्ठ २००, अभंग २५ (७, ८, ९, १०, ११, १३ ओळी)

२८. ठेवोनिया कर––

याप्रमाणें स्वप्नांत तुकारामाचा उपदेश होऊन बहिणी सावध होऊन पूर्ववत् बरी झाली जयरामस्वामींनीहि भेटून सांगितलें कीं, 'तुम्हीं आळंदीस जावें.'

तुम्ही आतां येथें राहूं नका कदा – आत्मज्ञान बोधा न संडावें । [२९]
बहिणी म्हणे दिलें दर्शन दुसरें – मनाच्या व्यापारें तुकोबाच्या ।।

या सर्व हकीकतीमुळें बहिणाबाईची कीर्ति गांवांत पसरून लोक तिच्या दर्शनास येऊं लागले. यामुळें नवऱ्यास जास्तच राग येऊन त्यानें वनांत निघून जाण्याचा बेत केला. त्यानें मनांत विचार केला कीं —

इसी नमस्कार करितील जना – आम्ही इसी तृण वाटो परी । [३०]
पुसतची येती इसी पहा जन – आम्ही की ब्राह्मण मूर्ख जालों ।
इचें नांव घेती गोसाविण ऐसे – आम्हां कोण पुसे इजपुढें ? ।।

तेव्हां आपण येथून जावें हेंच बरें, बहिणाबाईनेंहि मनाशीं विचार केला कीं पति निघून गेल्यास जीव कशाला ठेवावा ? ती म्हणते,

भ्रतारें वैराग्य घेतलियावरी – जीव हा निर्धारी देईन मी । [३१]
वत्सासाठीं देह पडे अचेतन – हें तव रोकडें परब्रह्म ।।
पाषाण विठ्ठल, स्वप्नांतील तुका – प्रत्यक्ष का सुखा अंतरावें । [३२]
भ्रताराची सेवा पतिव्रता करी – तरी ती उद्धरी उभय कुलें ।
बहीण म्हणे माझ्या जिवाची विश्रांती – भ्रतारें समाप्ती जन्ममृत्यू ।।

परंतु प्रवासास निघण्याचे दिवशींच रत्नाकर पाठकाचे अंगाचा दाह होण्यास सुरवात झाली व तो अत्यंत आजारी झाला. यावेळीं बहिणाबाईनें त्याची अत्यंत निष्ठेनें सेवा केली. आपण बायकोचा छळ केला यामुळें तर हा दाह होत नसेल ना, असें मनांत आलें व योगायोग असा कीं लागलीच अंगदाह थांबला. यामुळें उपरति होऊन त्यानेंहि बायकोबरोबर देहूस जाऊन तुकारामाचे सेवेंत काल घालविण्याचे ठरविलें.

देहूसहि प्रथम तेथील लोकांनीं 'यांनीं शूद्रास गुरू केलें' म्हणून बराच छळ केला. येथेंहि कांहीं चमत्कार घडले. मंबाजीनें यांच्या गाईस कोंडून मारलें व त्याचे वळ तुकोबाचे पाठीवर उठले. यामुळें लोकांची यांचे भक्तीबद्दल व तुकारामाचे दैवी गुणाबद्दल खात्री पटली व छळ कमी झाला. देहूस असतां बहिणाबाईचे मनांत आपण विठ्ठलाचे देवळांत ध्यानस्थ बसावें असें आलें. नवरा

---

२९. तुम्ही आतां येथें— बहिणाबाई अभंग पृष्ठ २०२, अभंग ३० (८, ९ ओळी)
३०. इसी नमस्कार— बहिणाबाई बहिणाबाईचा गाथा पृष्ठ २०३, अभंग ३३ (२, ४, ५ ओळी)
३१. भ्रतारे वैराग्य— बहिणाबाई पृष्ठ २०४, अभंग ३७ (१, २ ओळी)
३२. पाषाण विठ्ठल— बहिणाबाई पृष्ठ २०४, ५ अभंग ३८ (१, ३, ४ ओळी)

पुण्यास कांहीं कामास गेला असतां आईची आज्ञा घेऊन त्या एका देवळांतील आनंद ओवरी नामक ओवरींत तीन दिवस ध्यानस्थ बसल्या. त्या ध्यानामध्यें तुकाराम प्रगट होऊन त्यांनीं अनुग्रह करून कवन करावयास सांगितलें. मूळ स्थितीवर येऊन बहिणाबाई इंद्रायणीचें स्नान करून आल्या आणि एकदम अभंगाच्या ओळीच्या ओळी त्यांना सुचूं लागल्या. या स्थितीचें त्या वर्णन करतात —

वाटे उठों नये जीव जाय तरी – सुख तें अंतरीं हेलावलें ।[३३]
आनंद निर्भर होऊनियां मनें – करूं आलें स्नान इंद्रायणी ।
घेतलें दर्शन पांडुरंगमूर्ती – तंव झाली स्फूर्ति वदावया ।।

याप्रमाणें बहिणाबाईच्या गुरुप्रसादाची व काव्यस्फूर्तीची हकीकत आहे.

यावेळीं त्यांना काशीनामक एक मुलगी होती व ती म्हणजे पूर्वजन्मीचें वासरूंच आहे असा त्यांचा विश्वास होता. पुढें हें कुटुंब आपल्या मूळ गांवीं गेलें. तुकाराममहाराजांच्या निर्याणाचे वेळीं त्या देहूस नव्हत्या. पुढें कांहीं वर्षें सज्जनगडीं रहात होत्या असेंहि दिसतें. ७२ वर्षांचें दीर्घायुष्य भोगून त्यांनीं देह ठेवला. त्यापूर्वी आपल्या मुलास आपल्या पूर्वीच्या बारा जन्मांची हकीगत त्यांनीं सांगितली. तसेंच आपला निर्याणकालहि त्यांनीं सांगून ठेवला होता.

बहिणाबाईच्या आयुष्यांत कांहीं विशेष विचार करावयास लावण्याजोग्या गोष्टी आहेत. 'वासराची कथा', तसेंच पूर्वजन्माची हकीगत यांचा उलगडा आज प्रचलित व सिद्ध अशा भौतिक शास्त्राचे मदतीनें होणें कठीण आहे. परंतु स्वतः बाई मात्र संसारांत अलौकिक गोष्टीचें मागें न लागतां आपल्या प्राप्त कर्तव्यांत स्थिर दिसतात व कर्तव्यदक्ष राहून पुन्हां मनांत उत्पन्न झालेल्या भक्तिमार्गाची जोपासना निष्ठेनें करतात. वस्तुतः जातीनें ब्राह्मण असतां शूद्र गुरु कसा करावा असा प्रश्न मनांत यावा. पण असें दिसतें कीं देवगांव सोडून येतांना प्रथम क्षेत्राचें दर्शन झाले तें पंढरपुराचें व तेथील तुकारामांच्या अभंगांचा त्यांचे मनावर जो परिणाम झाला तोच पहिला पण पक्का. बाईंची वृत्ति जन्मतःच संसाराविषयीं विरक्त व त्यांतून लहान वयांत देशोधडीस लागण्याचा प्रसंग. त्यावेळीं तुकोबांचे अभंगांनीं मनावर ठसा उमटला व तोच त्यांनीं शेवटपर्यंत मानला.

याच वेळीं आपणांस या काळच्या दुसऱ्या एका संतकवयित्रीची भेट घ्यावयाची आहे. बहिणाबाई वारकरीपंथाच्या तुकाराममहाराजांच्या शिष्या, तर वेणाबाई रामदासांच्या शिष्या. यांचेंहि चरित्र बहिणाबाईप्रमाणेंच उद्बोधक आहे. शिवाय दोघींच्या चरित्रांत कांहीं बाबतींत साम्य पुष्कळ आहे; तें लक्षांत घेणें मनोरंजक आहे.

कोल्हापूर येथील देशपांडे घराण्यांत बाईंचा जन्म. आजोळीं व माहेरीं रामसंप्रदाय,

---

३३. वाटे उठो नये जीव—बहिणाबाईचा गाथा पृष्ठ २१७, अभंग ७८ (१,२, ३ ओळी)

यामुळें लहानपणापासून रामभक्तीकडे कल. त्यावेळीं क्वचित् मिळणारें असें लेखन-वाचनाचें शिक्षण लहानपणीं मिळालेलें. सासर मिरजेस. बालपणींच वैधव्य आलेलें. मिरजेस सासरीं तुळशीजवळ 'भागवत' वाचीत बसल्या असतां रामदास भिक्षेस आले व मुलीला विचारलें कीं, 'मुली, वाचतेस, पण समजतें काय?' 'प्रयत्न करतें आहे' असें मुलीनें उत्तर दिलें. पण या वेळेपासून रामदासांच्या व्यक्तित्वाचा तिचेवर परिणाम झाला. यावेळीं जीव म्हणजे काय? शिव म्हणजे काय? इत्यादि प्रश्न तिनें त्यांस विचारले व रामदासांनीं त्यांचीं कवितांबद्ध उत्तरें दिलीं असें मानतात. या प्रश्नोत्तरांस 'वेणाबाईचे पंचवीस प्रश्न' म्हणतात,

जिज्ञासू विचारतो : नमूं वागेश्वरी शारदा सुंदरी।[३४]
श्रोता प्रश्न करी वक्तयासी।
वक्तयासी पुसे जीव हा कवण।
शिवाचें लक्षण सांगा स्वामी॥

वक्ता सांगतो : नमूं वेदमाता नमूं त्या अनंता।[३५]
प्रश्न सांगो जातां श्रोतियाचे।
श्रोतयाचे प्रश्न जीव हा अज्ञान।
जया सर्व ज्ञान तोचि शिव॥

पुढें वेणाबाई माहेरास कोल्हापुरीं गेली. त्यावेळीं रामदासांचीं कीर्तनें तेथें चालू होतीं. इतरांप्रमाणें वेणाबाईहि रोज कीर्तनास जाई व त्यांत तल्लीन होई. आधींपासून रामाची भक्ति करणारें तिचें मन बालवैधव्यामुळें विरक्त होऊं लागलें होतें. आणि या कीर्तनांनीं त्यांत भरच पडली व एके दिवशीं कीर्तनानंतर समर्थांचे चरणांवर मस्तक ठेवून अनुग्रह करण्याची त्यांनीं विनंति केली. भोंवतालच्या लोकांना हें आवडलें नाहीं व त्याची चर्चा सुरू झाली. आईबाप व सासु-सासऱ्यास लोक दोष देऊं लागले. तेव्हां आईबापांनीं ही गुरुभक्ति सोडण्याबद्दल मुलीस सांगून पाहिलें. पण वेणाबाईंचा निश्चय बदलेना. तेव्हां त्रासून लोकापवादास कंटाळून आईबापांनीं त्यांस विष दिलें. दासविश्रामधामांत त्या विषाचें पुढील वर्णन आहे.

कराडे प्रांतीचे विषदारुण।[३६]
पोटीं प्रवेशतां मोहरीप्रमाण।
पाणी न मागतां जाय प्राण।
ठाऊक असे बहुतां॥

---

३४. नमूं वागेश्वरी सुंदरी— वेणाबाई 'श्रीरामदासांची कविता,' रामदासीप्रश्न, पृष्ठ २४२, प्रश्न १ ला, अभंग ६४

३५. नमूं वेदमाता— वेणाबाई ,, रामदासी उत्तरें

३६. कऱ्हाड प्रांतीचे— आत्मारामबुवा, 'दासविश्रामधाम'

कोंडून घातलेल्या खोलींत विषबाधेनें तळमळत असतां, रामदास तेथें प्रगट झाले. आपल्या हातांतील काठी त्यांचे अंगावरून फिरविली व त्यायोगें विष उतरलें अशी आख्यायिका आहे.

यानंतर मात्र वेणाबाईंनीं आपले आप्तेष्टांचा पूर्ण संबंध सोडला व रामदासांच्या शिष्यशाखेंत त्या दाखल झाल्या. तेथें स्वयंपाक, कोठी इत्यादि कामें पहात त्यांनीं काळ कंठिला. इ. स. १६५० ते ५६ पर्यंत त्या समर्थांच्या परिवारांत शिक्षण घेत होत्या. दासांच्या मठांत कीर्तनें, प्रवचनें, पुराणें सारखीं चालत. तीं त्या ऐकत व स्वतःचें वाचन वाढवीत. याप्रमाणें त्यांचा सहा वर्षें गुरुगृहीं अभ्यास झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें १६५६ मध्यें मिरजेस मठाची स्थापना करून रामदासांनीं त्यांस तेथील महंत नेमलें व तें काम करीत पुढें बावीस वर्षांनीं त्यांनी देह ठेविला. मिरजेस बाईंचें सासर, लोकापवाद स्वीकारून बाईंनीं सासरमाहेर सद्गुरूसाठीं सोडलें. तेव्हां मिरजेस मठ स्थापन करतांना तेथें वेणाबाईची महंत म्हणून योजना करावयाची व त्यांचेकडून तेथेंच कार्य चालवावयाचें यांत रामदासांचें व्यवहारचातुर्य दिसतें. लोकांच्या अपवादास वेणाबाईचें काम हें परस्पर उत्तर झालें.

बाईंना लहानपणापासून रामभक्ति व धार्मिक वाङ्मयाची आवड. अध्यात्मरामायणहि त्या लहानपणीं वाचीत. सज्जनगडीं सहा वर्षें रामदासांच्या मठांत त्यांचे मार्गदर्शनाखालीं त्यांचा व्यवस्थितपणें धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास झालेला. बाईंच्यांत कवित्व व वक्तृत्वहि होतें. त्यामुळें त्या पुराण सांगत; कीर्तनहि करीत.

वेणाबाईवांचूनि कांहीं–इतरां कन्येसी सभेसी कीर्तनाज्ञा नाहीं।[३७]
येकासनीं बैसोनि कीर्तन करणें पाही–प्रसंगानुसारें मर्यादें।

––समर्थप्रताप, अ. २०, ओवी ३१

यावरून असें दिसतें कीं पात्रता पाहून समर्थ कांहीं थोड्या जणांना कीर्तन करण्यास परवानगी देत व त्या थोड्यांपैकीं वेणाबाई एक होती. इ. स. १६७८ सालीं सज्जनगडावर एक कीर्तनसंमेलन झालें. सर्व संतांना आमंत्रणें दिलीं होतीं. त्यावेळीं श्रीशिवाजीमहाराजहि आले होते. सर्वांचीं कीर्तनें झालीं. एक दिवस शिवाजीमहाराजांनीं कीर्तन केलें. त्याचप्रमाणें एक दिवस वेणाबाईचेंहि कीर्तन झाल्याची नोंद आहे. त्यांनों लिहिलेल्या सीतास्वयंवर, रामायण, रामगुहक-संवाद इ. ग्रंथांवरूनहि बाईंना त्या बाबतींत चांगलाच परिपाठ होतासें दिसतें. श्रोत्यानें शंका विचारली असें सांगून मग वक्त्यानें उत्तर द्यावयाचें. ही पद्धति नुसती माहिती देत जाण्यापेक्षां जास्त आकर्षक होते हें त्या जाणत. त्यांच्या लेखनांत वारंवार ही पद्धत दिसते. सीतास्वयंवरांत राम लग्नासाठीं निघाला आहे. स्वर्गांतील सर्व देव त्या मिरवणुकींत आहेतच. शिवाय धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ मनुष्य-

---

३७. वेणाबाई वांचूनि–– गिरीधरस्वामी, समर्थप्रताप, अ. २० ओवी ३१

रूप घेऊन मिरवणुकींत मिसळले असें प्रथम बाई सांगतात व मग त्यांचे श्रोते शंका विचारताहेत असें वर्णन करतात. त्या म्हणतात,

धर्म-अर्थ-मोक्ष-काम । निघाले वऱ्हाडी परम ।[३८]
तव श्रोती अनुक्रम । आशंका घेतली ॥ ६.४८ ॥
धर्म-अर्थ-काम-वाणी । अगत्य वदे पाणिग्रहणी ।
मोक्ष नसे उच्चारणी । तरी कां कवी बोलिला ॥ ६.४९ ॥

लग्नामध्यें, 'धर्मेच अर्थेच कामेच नाति चरामि' इ. शपथ घेतात तेव्हां धर्म, अर्थ, काम हे वऱ्हाडी आले हें ठीक. पण लग्न म्हणजे संसाराचा आरंभ; मोक्ष म्हणजे शेवट, तेव्हां तेथें मोक्ष, हा वऱ्हाडी कशाला ? अशी शंका निर्माण करून पुढें त्याच उत्तर सांगतात. पण या लग्नांत प्रत्यक्ष, 'परब्रह्म राम' हाच वर आहे. परब्रह्माशीं गांठ पडतांच धर्म, अर्थ, काम संपतात व मोक्षच उरतो म्हणून या वर्णनांत मोक्ष हा वऱ्हाडी घातला आहे.

रामा जानकी समर्पण । धर्म-अर्थ-काम-निवारण ।[३९]
मोक्ष पाहिजे या कारण । मुगुटमणी वऱ्हाडी ॥ ६.५० ॥

यावरून कीर्तनकार होण्यास त्यांची कशी तयारी होती याची कल्पना येते.

पंढरपुरास एकदां श्रीसमर्थ गेले असतां त्यांना भेटण्यास काशीचे पंडित आले. त्यांची इच्छा समर्थांबरोबर वेदान्त विषयावर वाद करण्याची होती. त्यावेळीं समर्थांनीं वेणाबाईस बोलावून, 'बाई, ज्यांत चौदा ब्रह्मांचा समन्वय झाला आहे तो समास वाच' असें सांगितलें.

बाई दरवर्षींप्रमाणें सज्जनगडास श्रीसमर्थांचे भेटीस गेल्या होत्या. त्यावेळीं समर्थांनीं त्यांस कीर्तन करण्यास सांगितले, कीर्तन संपलें. आरती झाली व शेवटीं गुरुचरणांस नमस्कार करण्यासाठीं म्हणून त्यांनीं खालीं वांकून मस्तक टेकलें आणि त्याच क्षणीं त्या समर्थचरणीं लीन झाल्या.

वोणुनी वीणा तो सद्गुरुकरीं । वाहुनि मस्तक पदाब्जावरी ।[४०]
प्राणज्योति काढूनि झडकरी । सद्गुरुहृदयीं मिळविली ॥

चैत्र व. १४ चा दिवस होता. याप्रमाणें इ. स. १६२७ ते १६७८ पर्यन्तचा त्यांचा एकावन्न वर्षांचा आयुष्यक्रम स्वीकृत कर्तव्य करीत व रामभक्तींत त्यांनीं संपविला.

बाईयाबाई नांवाच्या आणखी एक संत कवयित्री होत्या. त्या वेणाबाईच्या शिष्या व या बाईचे शिष्य गिरिधरस्वामी यांनीं समर्थप्रताप ग्रंथ लिहिला. बाईया-बाईची कांहीं कविता उपलब्ध आहे. तसेंच प्रेमाबाई नामक एका कृष्णभक्त

---

३८. धर्म अर्थ मोक्ष— वेणाबाई सीतास्वयंवर, ६–४८
३९. रामा जानकी— ,, सीतास्वयंवर, ६–५०
४०. वोपुनी वींणा— आत्मारामबुवा, दासविश्रामधाम १११–९८

अशा संत स्त्रीचा महिपति 'भक्तिलीलामृतां'त उल्लेख करतात. त्यांचीं कांहीं पदें प्रसिद्ध आहेत.

पण तुकाराम व रामदास यांचे कालखंडांतील दोन सुप्रसिद्ध संत कवयित्री बहिणाबाई व वेणाबाईच होत हें निःसंशय. वेणाबाई व बहिणाबाई दोघींचीं चरित्रें लक्षांत घेण्याजोगीं आहेत. दोघींचा जन्म अगदीं एक काळचा. १६२७ सालीं वेणाबाई व १६२८ सालीं बहिणाबाई जन्मल्या. म्हणजे वयानें दोघी बरोबरच्या. एक देशपांड्यांची मुलगी तर एक कुलकर्ण्यांची मुलगी. लक्षांत ठेवण्यासाठीं सुलभ करून सांगावयाचें तर शिवाजीपेक्षां वेणाबाई तीन वर्षांनीं मोठ्या व बहिणाबाई दोन वर्षांनीं मोठ्या. रामदासांमुळें शिवाजीच्या राजकीय उलाढाली वेणाबाईस जास्त माहित झालेल्या. दोघांनीं एका कीर्तनसंमेलनांत सज्जनगडीं कथा केलेल्या. शिवाजीचे मृत्यूपूर्वी दोन वर्षें म्हणजे १६७८ सालीं त्या रामरूप झाल्या. बहिणाबाई वयानें शिवाजीपेक्षां दोन वर्षांनीं मोठ्या. आपल्या संसारांत नवरा व मुलें यांचेसंबंधीं प्राप्त कर्तव्य करीत व विठ्ठल-संकीर्तन करीत त्यांनीं आयुष्य काढलें. त्यांचे वांट्यास दीर्घायुष्य आलें होतें. बहात्तर वर्षांच्या होऊन इ. स. १७०० सालीं म्हणजे शिवाजी, संभाजी यांच्या कारकीर्दी होऊन गेल्यावर त्या मृत्यु पावल्या. पण येवढचा उलाढालीच्या काळांत त्यांची दृष्टि वेणाबाईप्रमाणें भोंवतालच्या गोष्टीकडे वळलेली दिसत नाहीं. संसारांतील आपत्तींनीं दोघींच्या मनांत एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होऊन शाश्वत सुखाकडे दृष्टी वळली होतीच. परिस्थितीचे विरुद्ध पण मनाला पटणाऱ्या मार्गाप्रमाणें जाण्याचें धैर्य आहे अगर नाहीं याची परीक्षा होण्याचा प्रसंग दोघींवर कोल्हापुरांतच आठ दहा वर्षांचें अंतरानें आला. प्रथम बहिणाबाईंना नवऱ्याचे हातून वासराच्या प्रेमाबद्दल मारहाण करून घ्यावी लागली व वेणाबाईस आईबापांकडून विषप्रयोग झाला. दोघींना सद्गुरुदर्शन व प्रसाद कोल्हापुरांतच मिळाला. पण यापुढील दोघींचे आयुष्यक्रम अगदीं वेगळे झाले. वेणाबाईचे पुढील कार्यावर व लेखनावर रामदासी पंथाची व वाङ्मयाची छाप आहे तर बहिणाबाईचे कवितेवर तुकाराममहाराजांच्या वाङ्मयाची छाप आहे.

पान ११७ वरील तक्त्याकडे दृष्टि टाकतां असें दिसतें कीं प्रत्येक प्रभावी परंपरा निर्माण करणारा संत निर्माण झाला कीं त्याच्यापासून स्फूर्ति घेणारी एक संतांची प्रभावळ निर्माण होत असते व योग असा, कीं नामनिर्देश करण्याजोग्या अशा संतांच्या प्रभावळींत नामनिर्देश करण्याजोगी प्रत्येकी एक तरी स्त्री संत-कवि निर्माण झालेली आहे. (१) ज्ञानदेव (२) नामदेव (३) तुकाराम (४) रामदास. या चार संतांच्या मार्गास सामान्यपणें पहिल्यास ज्ञानभक्तियुक्त, दुसऱ्यास व तिसऱ्यास भक्तिप्रधान व चवथ्यास भक्तिकर्मप्रधान असें म्हणता येईल.

प्रमुख संतकवयित्रींची कांहीं माहिती

संप्रदाय	विठ्ठलसंप्रदाय				रामसंप्रदाय
गुरुदेव	ज्ञानदेव	नामदेव	तुकाराम		रामदास
कवयित्री	मुक्ताबाई	जनाबाई	कान्होपात्रा	बहिणाबाई	वेणाबाई
शतक	१३ वें	१३ वें	१४ वें	१७ वें	१७ वें
(आयुष्याचा	इ. स.	इ. स.	इ. स.	इ. स.	इ. स.
निश्चित काल)	१२७९–९७	मा हि त	ना हीं	१६२८–१७००	१६२७ – १६७८
आयुष्य वर्षे	१८ वर्षे सुमारें	—	—	७२ वर्षे	५१ वर्षे
जात	ब्राह्मण	शूद्र	कलावंतीण	ब्राह्मण	ब्राह्मण
विरक्तीचें कारण	(भोंवतालचें अनुकूल वातावरण)	भोवतालचे प्रतिकूल वातावरण		सं सा रां ती ल	दुः खां ची झ ळ
गुरूपदेश	निवृत्तिनाथांचा	नामदेवांचा	ज्ञानदेवांचा मनानें घेतलेला	तुकारामांचा स्वप्नांत उपदेश	रामदासांचा
साधनमार्ग	योग व भक्ति	भक्ति, प्राप्त कर्तव्य	भक्ति	भक्ति व प्राप्त कर्तव्य	भक्ति व स्वीकृत कर्तव्य
(नामजप–संतसंग साक्षात्कार)	हें स र्व त्यां नीं	आ च र णां त	आ ण लें व	अ नु भ व लें.	
मृत्यु	वीज पडून	—	देवाच्या पायांवर डोकें टेकून	वृद्धपणानें	देवाच्या पायांवर डोकें टेकून

पहिला मार्ग मुक्ताबाईचा, दुसरा जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांचा आणि तिसरा वेणाबाईचा.

यांना या मार्गाकडे कां वळावेसें वाढलें ? सामान्यपणें मनुष्यास वैराग्य केव्हां उत्पन्न होतें, तर संसारांतील नेहमींच्या मार्गानें जातांना उलट गोष्टी घडूं लागून मनाला निराशा वाटू लागतें, तेव्हां संसारांत सुख नाहीं असें माणूस म्हणूं लागतो. पण सुख म्हणजे काय ? " अनुकूलवेदनीयं सुखम् " " प्रतिकूलवेदनीयं दुःखम् " अशी व्याख्या होते किंवा सुखाशा भागिलें सुखप्राप्ती बरोबर सुख असेंहि म्हणतां येतें. या दृष्टीनें पाहतां बहिणाबाई व वेणाबाई यांना आयुष्याचे सुरवातीस ह्या जगांतील प्रतिकूल वेदना देणाऱ्या गोष्टी जाणवल्या. वयाच्या पांचसात वर्षांच्या सुमारास घरदार, जमीन सर्व जाऊन सहकुटुंब कोरान्न मागत पायांनीं देशोदेशीं हिंडण्याचा प्रसंग बहिणाबाईवर आला. वेणाबाईस बालवैधव्य प्राप्त होऊन सर्व जगांतील सुखें आपल्या हिशेबीं नाहीशीं झालीसें वाटलें. दैवाच्या आघातानें या दोघींत वैराग्य उत्पन्न झालें. कान्होपात्रेच्या बाबतींत तिच्या परंपरागत आयुष्यांत विपरीतपणा नव्हता. उलट म्हणूं तेवढी संपत्ति व विषयोपभोग पुढें उभे राहिले होते. पण त्याचाच तिला उबग आला. मुक्ताबाई व जनाबाई यांच्या ठिकाणची विरक्ति दैवी पण थोडी वेगळी. मुक्ताबाईच्या भोंवतालचें वातावरणच विरक्तीचें, तसेंच जनाबाईच्या भोंवतालचें वातावरण भक्तिप्रेमानें भरलेलें, त्यामुळें आपण घरांतील दासी आहोंत, इतर आपल्यापेक्षां जन्मानें श्रेष्ठ ठरतात इ. विषमता तिला बोंचलेली दिसत नाहीं. उलट प्राप्त कर्तव्य म्हणजे नामदेवाच्या घरीं सेवाचाकरी करीत त्यांच्या घरांत पिकत असलेल्या भक्तिसुखाचे भरांत ती दंग झाली. मुक्ताबाई, जनाबाई यांचे वैराग्यास दैवी वैराग्य म्हणावें लागेल. कान्होपात्रेचेंहि तसेंच. बहिणाबाई, व वेणाबाई यांचें ठिकाणीं मात्र परिस्थिति विरुद्ध जाऊन हा संसार दुःखमय आहे हें कळून मग याहून चिरकाल टिकणारें सुख कोणतें, या सुखदुःखाचा कर्ता कोण इ. जिज्ञासा त्यांस जाणवली.

मुक्ताबाई व जनाबाई यांना मार्गदर्शक सद्गुरु घरांतच भेटले. कान्होपात्रेनें ज्ञानेश्वरांच्या समाधीस दर्शन करून त्यांना गुरु मानलें. बहिणाबाईस व वेणाबाईस मात्र त्यासाठीं झगडा करावा लागला. त्यांची सत्त्वपरीक्षा तेथेंच झाली. यापुढें त्यांनीं सद्गुरूचे साहाय्यानें आपापली उन्नति केली व साक्षात्कार मिळविलासें दिसतें. मुक्ताबाई व कान्होपात्रा दोघीजणी फार तरुणपणीं—नव्हे तारुण्याच्या सुरवातीसच—देवचरणीं लीन झाल्या. एक वीज पडून तर दुसरी पांडुरंगास नमस्कार करतां करतां; त्यामुळें त्याची अभंगरचना थोडी. मुक्ताबाईंच्या अभंगांत देवप्राप्ति-अनुभव वर्णन केलेला सांपडतो. तिचे अभंग साधकावस्था संपल्यानंतरचे वाटतात व तिची इतरांना उपदेश करण्याइतकी प्रगति झालेली दिसते.

कान्होपात्रा स्वतः ईशचिंतनांत व भक्तींत निमग्न झाली होती. तिनें

कोणाचा गुरूपदेश घेतलेला दिसत नाहीं. आळंदीस ज्ञानेश्वरांच्या समाधीचें दर्शन घेऊन ती स्वतःला कृतार्थ मानते व संतांचीं चरित्रें वर्णन करण्यांत व नाम-स्मरणांत वेळ घालविते. देवावरील तिची निष्ठा अनन्यसामान्य दिसते. तिला स्वतःचे चरणीं नेऊन तो तिची लाज राखतो. पण तिचें आयुष्य मुक्ताबाई-प्रमाणेंच थोडें; त्यामुळें अभंगहि थोडे पण वेंचक.

तिसरी भक्त कवयित्री जनाबाई. हिचे अभंग विपुल व सर्वदूर प्रसिद्ध. ही नामदेवाचे घरांत विठ्ठलप्रेमाचे वातावरणांत वाढली. हिचें वय सांगतां आलें नाहीं तरी तिच्या अभंगांची विपुलता व तिजबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या गोष्टी पाहतां ही पुष्कळ वर्षें जगली असावी. नामदेवामुळें तिला विठोबाची जोड होते, त्यामुळें तोच तिचा मार्गदर्शक गुरु म्हणावयाचा. गुरुकृपेमुळें तिला भजनाचा नाद लागतो. त्यामुळें भक्तिपर, संतवर्णनपर अभंग रचण्यांत ती गुंतते व देव तिजबरोबर सर्व कामें करतो या आनंदांत तिला कसलेंच दुःख, जास्त महत्त्वाकांक्षा उरत नाहीं. आपल्याला आलेल्या आनंदानुभवाचें वर्णन ती करते,

देहभाव सर्व जाय–तेव्हां विदेही सुख होय। [४१]
तयानिद्रेजे पहुडले–भवजागृती नाहीं आले।
ऐसी विश्रांति लाभली–आनंदकला संचरली।
त्या ऐक्यीं एक होता-दासी जनी कैची आतां॥

यापुढच्या दोन कवयित्री सतराव्या शतकांतील विठ्ठलसंप्रदायांतील व बहिणा-बाई व रामदाससांप्रदायी वेणाबाई.

बहिणाबाईचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांनीं स्वतःची हकिगत स्वतःच सर्व अभंगांत सांगितली आहे. नवऱ्यानें खोलींत कोंडून घातलें असतां तुकारामम्हाराजांनीं दर्शन दिल्याचा अनुभव ती सांगते व नामस्मरण व संतकथा श्रवण करीत काळ काढते. संसारांतील प्राप्तकर्तव्य ती केव्हांहि टाळीत नाहीं. नवऱ्यानें कितीहि छळलें तरी आपले पतिव्रताधर्माप्रमाणें नवऱ्याची सेवाचाकरी करावयास चुकत नाहीं. शेवटपर्यंत ती भक्तिमार्गाबरोबर स्वतःचा संसार करीत असतेच. शूद्र गुरु करूं नका असा लोकांनीं उपदेश केला तरी एकदा गुरु म्हटलेल्या तुकारामावरील तिची श्रद्धा ढळत नाहीं. देहू गांवीं विठोबाचे देवळांत आनंदओवरींत तीन दिवस आपण ध्यानस्थ कशा बसलों, त्यावेळीं तुकाराममहाराज आपणांपुढें प्रकट झाले व त्यांनीं काव्यरचना करण्यास आज्ञा कशी केली तें त्या मोठ्या भक्तीनें सांगतात. 'दृष्टान्त होतांच मी उठलें.' त्या म्हणतात, 'गंगेवर स्नान करून आलें व मला एकापुढें एक अभंग सुचूं लागले. कसे सुचले तें सांगतां येत नाहीं. मला झालेला आनंद पोटांत मावेना.' इ.

---

४१. देहभाव सर्वजाय— जनाबाई, सकलसंतगाथा, पृ.२७५ अ.१४६

तें सुख सांगता वाचे पडे मौन–जाणतां ते धन्य गुरुभक्त । ४२
झालासे आनंद इंद्रियाचे द्वारीं–बैसलें शेजारीं चैतन्याचे ।
घेतलें दर्शन पांडुरंगमूर्ती–तंव झाली स्फूर्ति वदावया । ४३
तुकोबासी तेथें करूनि नमस्कार–आलें मी सत्वर बिऱ्हाडासी ।
बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र–हृदयाकाशीं इंद्र बोले वाचा ॥

याप्रमाणें बहिणाबाई स्वतःच्या आयुष्याची त्याचप्रमाणें साक्षात्काराची माहिती देतात. येवढेंच नव्हे तर मरणापूर्वी आपल्या मुलाला आपल्या पूर्वीच्या बारा जन्मांचीहि हकिगत सांगतात.

या उलट वेणाबाई आपल्या ग्रंथांत स्वतःसंबंधीं एक अक्षरहि बोलत नाहींत. त्यांची जी माहिती मिळते ती इतरांनीं त्यांचेबद्दल जें लिहिलें आहे त्यावरूनच. परंपरेनें समजलें जातें त्याप्रमाणें वेणाबाईचे पंचवीस प्रश्न ज्यांस म्हटलें जातें तीं प्रश्नोत्तरें खरोखरीच झालीं असल्यास तीं त्यांच्या साधकावस्थेची सुरवात म्हणतां येईल. यापुढें रूढ लोककथा म्हणजे रामदासांनीं दर्शन देऊन विषप्रयोगांतून त्यांना जीवदान देणें. ही त्यांची सद्गुरुभेट मानावी लागेल. यापुढें त्यांचा काळ नामस्मरण, संतसमागम अशा तऱ्हेनें व्यासंगांत जाऊन पुढें रामदासांनीं त्यांस महंतीहि दिली. या मधल्या काळांत साक्षात्कार झाला किंवा काय वगैरे त्या स्वतःबद्दल कांहींच बोलत नाहींत. सीतास्वयंवरांतील तिसऱ्या अध्यायांतील अहिल्योद्धाराच्या वर्णनानें त्यांचा स्वतःचा रामदासांनीं केलेला उद्धार सूचित आहे असें आपण हवें तर म्हणावें. तेथें त्या म्हणतात, म्हणजे पापांपासून मुक्त झालेली अहिल्या म्हणते आहे :

स्त्रीदेहाचा समंधु–भोगीत होते अपराधु । ४४
मजकारणें दीनबंधू–कोणेकडून आलासी ॥ ३–३८ ॥
चौखणी वेगळा–देह धरिला होता सीळा ।
मजकारणें दीनदयाळा–अरण्य शोधित आलासी ॥ ३–३९ ॥
मज पाषाणाचें अंतर–जाणोनि केला उद्धार ।
सर्वज्ञ नामाचा बडिवार–प्रचीतीसी मज आला ॥ ३–४१ ॥
रविवंशजा रघुनंदना–जन्मोजन्मीं उपासना ।
तुझेंचि ध्यान भजना–पात्र करीं मज स्वामी ॥ ३–४२ ॥

हें वर्णन जसें अहिल्योद्धारास लागू पडतें तितकेंच श्रीसमर्थांनीं केलेल्या वेणाबाईच्या उद्धारास लागू पडतें.

---

४२. तें सुख सांगतां—बहिणाबाई, बहिणाबाईचा गाथा, पृष्ठ २१७, अभंग ७७ (१, २ ओळी)
४३. घेतलें दर्शन—बहिणाबाई ,, पृष्ठ २१७,अभंग ७८ (३,४,५ ओळी)
४४. स्त्री देहाचा—वेणाबाई, सीतास्वयंवर ३.३८

आणखी एक वेणाबाईंचा विशेष आहे. किंवा तो विशेष म्हणजे ज्या समर्थ-संप्रदायांत त्या समाविष्ट झाल्या होत्या त्याचाच विशेष आहे. तो म्हणजे स्वतःची उन्नति करीत असतां भोंवतालच्या परिस्थितीकडे लक्ष ठेवून देशाच्या व धर्माच्या कार्याला योजनापूर्वक मदत करणें. वेणाबाईच्या काव्यांत परिस्थितीबद्दल अनेक सूचक विचार सांपडतात. नुसत्या भक्तिसुखांत त्या न थांबतां भोंवतालच्या लोकांच्याहि आकांक्षा सांगतात. उदाहरणार्थ 'कौल' या त्यांच्या उत्कृष्ट अशा छोटयाशा कवितेंत त्या अयोध्येंत रामराजा झाला असतां लोकांनीं काय मागण्या केल्या त्या सांगतात. पण त्या वाचून वाचकास डोळ्यांपुढें चित्र येतें तें शिवाजी-महाराजांचा राज्याभिषेक व या राज्यस्थापनेमुळें प्रजेंत निर्माण झालेल्या आकांक्षा. त्यावेळीं निवडणुका असत्या तर त्याला शिवकालीन मतदारांच्या मागण्याच म्हटलें असतें. या आकांक्षा इतक्या मर्यादित आहेत कीं, इंद्रानें रामाकडे पाठविलेल्या प्रजेच्या मागण्या नसून गरीब दरिद्री महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्याच मागण्या असणार हें कळतें.

बहू कष्टाने पातलों जी स्वदेशा–प्रजा बोलती कौल हे राघवेशा । [४५]
भुमीने कदा पीक सोडूं नये रे–वदे राम लक्षूमणा हें लिही रे ।
मनासारिखे मेघवृष्टीनें व्हावें–जया पाहिजे ते प्रसंगीं पडावे ।
समर्था कदा रोग वारे नको रे–वदे राम लक्षूमणा हें लिही रे ।
मनाची अपेक्षा पुरे बैल गाडे–घरीं दूभती कामधेनूच पाडे ।
रधूनाथजी भाग्य येथेष्ट दे रे–वदे राम लक्षूमणा हे लिही रे ।।

आत्मचिंतन व भक्तिमार्गाच्या मदतीनें स्वतःचा उद्धार, तसाच योजनापूर्वक लोक-शिक्षणानें लोकांचा उद्धार हें ध्येयहि वेणाबाईच्या ग्रंथावरून कळून येतें. विशेषतः सीतास्वयंवरासारख्या विवाहविषयक ग्रंथांत जो भक्तिरस व ब्रह्मवर्णन भरलें आहे त्यावरून ही गोष्ट मनांत भरते.

याप्रमाणें या महाराष्ट्राच्या पंचकन्या किंवा पांच प्रमुख संत कवयित्री आहेत. महाराष्ट्रांतील चार प्रमुख संतांच्या परिसरांत त्या वाढल्या. त्यांचेपासूनच त्यांनीं स्फूर्ति घेतली. त्यांची शिकवण त्यांचे मार्गदर्शक, सद्गुरुची जी तीच. त्याहून त्या वेगळें काय सांगणार ? पण जें कांहीं त्यांनीं सांगितलें आहे, तें त्यांत पूर्णपणें रंगून समरस होऊन सांगितलें आहे.

—ध्वनिक्षेपण, दिनांक : २९ मार्च, ११५८

• • •

४५. बहू कष्टानें पातलों— वेणाबाई, स्फुट प्रकरण, कौल श्लोक, १५ वा

पुष्प सहावें

मराठी संतांचें सांस्कृतिक कार्य

अध्यक्षीय भाषण : **अनंत काणेकर**

महाराष्ट्राच्या महान् संतांच्या जीवनकार्याचें विवेचन थोर थोर विद्वानांच्या मुखांतून गेले पांच दिवस आपण ऐकतां आहां. या 'पुरुषोत्तम मंगेश लाड' व्याख्यानमालेंतलें शेवटलें व्याख्यान 'मराठी संतांचें सांस्कृतिक कार्य' आज प्राध्यापक गंगाधर बाळकृष्ण सरदार हे देणार आहेत. प्रा. सरदार यांचा या विषयाचा व्यासंग फारा वर्षांचा आणि अत्यन्त गाढ असा आहे. 'मराठी संतांच्या कार्याची सामाजिक फलश्रुति' हा त्यांचा ग्रंथ विद्वन्मान्य झाला आहे. भाऊ महाजन, लोकहितवादी, विष्णुबावा ब्रह्मचारी, ज्योतिराव फुले आणि विष्णुशास्त्री पंडित या रानडे-आगरकरांच्याहि आधीं होऊन गेलेल्या महाराष्ट्राच्या थोर समाजसुधारकांसंबंधीं 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या नांवानें लिहिलेला प्रा. सरदार यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या कालखंडाचा त्यांचा अभ्यास किती सखोल आहे, याची साक्ष त्यांचा 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' हा ग्रंथ देतो. अशा या चिकित्सक दृष्टीच्या विद्वानाचें आजचें हें व्याख्यान तुम्हांला आणि मलाहि उद्‌बोधक झाल्याशिवाय राहणार नाहीं हें निश्चित. ज्यांचें स्मारक म्हणून ही व्याख्यानमाला सुरू करण्यांत आली आहे ते माझे शाळासोबती आणि मित्र श्री. लाड यांचा विशेष आवडीचा विषय म्हणजे भक्तिवाङ्मय आणि संतांचें कार्य. या विषयानें या स्मारकाचा प्रारंभ झाला यासारखी दुसरी उचित गोष्ट नाहीं. संतांचे उल्लेख लाडांच्या बोलण्यांत नेहमीं यायचे, आणि तुकोबा तर सदोदित त्यांच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, चिंतनीं, असायचे. संतांनीं नुसत्या मानवतेचा प्रचार केला नाहीं, तर मानवांच्या समतेचा प्रचार केला हें लाडांना विशेष आवडायचें. संतांचीं वचनें नेहमीं गुणगुणाऱ्या एका म्हाताऱ्या भाजी-वालीची गोष्ट त्यांनीं मला एकदां मोठ्या रसाळ शब्दांत सांगितली. त्यावेळीं ते कुठल्या तरी जिल्ह्याचे कलेक्टर होते, आणि जिल्ह्याच्या मुख्य शहरांत माणसांनीं ओढायची रिक्षा सुरू होणार अशी बातमी सर्वत्र पसरली होती. लाडांच्या बंगल्यावर भाजी द्यायला येणाऱ्या म्हातारीला ही बातमी कळली. एके दिवशीं

सकाळीं ती भाजी द्यायला बंगल्यावर आली तेव्हां भाजी देऊन झाल्यावर तिनें नोकराला 'साहेब घरांत आहेत का ? माझं त्यांच्याशीं थोडें काम आहे,' म्हणून सांगितलें. साहेबांशीं या भाजीवालीचें काय काम म्हणून तो नोकर कांकूं करूं लागला.

म्हातारीनें दरडावून त्याला साहेबांना बोलवायला सांगितलें. नोकरानें भीतभीत लाडांना तिचा निरोप सांगितला. लाडांना आश्चर्य वाटलें. ते बाहेर येऊन, 'काय ग, काय पाहिजे ?' म्हणून तिला विचारूं लागले.

'तुम्ही कलेक्टर म्हणजे तुमच्या हातांत खूपच अधिकार आहे, नाहीं का ! ' ती लाडांना म्हणाली. "कां ग ?" लाड उद्‌गारले. 'नाहीं म्हणजे,' ती म्हणाली, 'असं बघा साहेब, माणसानं माणसाला ओढीत न्यायचं हें कांहीं शोभत नाहीं माणसाला. आपल्या अधिकारांत तेवढ्या माणसांनीं ओढायच्या गाड्या इथं येऊं देऊं नका तुम्हीं, साहेब !' 'बरं बरं, बरोबर आहे तुझं म्हणणं' असें म्हणून लाडांनीं तिला जायला सांगितलें. लाडांचे म्हणणें असें होतें कीं सामान्य मराठी माणसांत ही जी रगेल लोकशाहीची वृत्ति आहे तिचें बरेचसें श्रेय तुकाराम आणि इतर मराठी संतांना दिलें पाहिजे.

मराठी संतांचा विशेष हा कीं सर्वच चांगलें – तुम्ही चांगले, आम्ही चांगले, चोर चांगले, साव चांगले, – असल्या भुक्कड भलावणीला ते साधुत्व समजत नसत. असल्या भुसभुशीत भलेपणानें दुबळे दुबळेच राहतात आणि त्यांच्या उरावर बसलेले बलिष्ठ बलिष्ठच राहतात. भगवंतांनीं ज्याप्रमाणें भगवद्‌गीतेंत म्हटलें आहे कीं, 'मी केवळ साधूंच्या परित्राणाकरतांच जन्म घेतों, असं नाहीं तर दुष्कृतांच्या विनाशाकरतांही;' त्याप्रमाणेंच आमचे मराठी संतहि सज्जनांच्या पुरस्काराइतक्याच हिरीरीनें दुर्जनांचा धिक्कारहि करतात. विठ्ठलाचें नांव घेतांना अमृत स्रवणारी तुकोबांची वाणी, दांभिकांची आठवण झाल्याबरोबर, 'तुका म्हणे ऐशा नरा । मोजुनि माराव्या पैजारा' असा अस्सल मराठी हिसका दाखवते. मराठी संतांचें मराठीपण यांतच आहे.

मराठी संतांनीं प्रवृत्ति शिकवली कीं निवृत्ति शिकवली असा मोठा बाद आहे. त्या वादांत सत्य कुठेंहि असो, एका गोष्टीबद्दल मुळींच दुमत होणार नाहीं. अत्यन्त प्रतिकूल परिस्थितींत ज्ञानेश्वर, नामदेवापासून तों तुकोबा-रामदासांपर्यंत सर्व संतांनीं आमची मराठी मायबोली जिवंत ठेवली, इतकेंच नव्हे तर अत्यन्त संपन्न केली. कोणत्याहि राष्ट्राची किंवा प्रदेशाची अस्मिता बहुतांशानें त्याच्या भाषेंतून प्रकट होते. माणसें मरतात, भाषा राहते. अनेक संकटें आलीं, तरी मराठी भाषा संतांनीं राखली आणि समृद्ध केली. मराठी संतांच्या या सांस्कृतिक कामगिरीवर लोकमान्य टिळकांनीं एका लेखांत अचूक बोट ठेवलेंय. 'ज्यांना उत्कटतेनें कांहीं वाटत नाहीं ते लोक क्षुद्र, त्यांची भाषा क्षुद्र, त्यांचें वाङ्मय दरिद्री; ज्यांच्यापाशीं उत्कटतेनें

सांगण्यासारखें कांहीं आहे त्यांचीच भाषा समृद्ध होते. त्यांचेंच वाङ्मय संपन्न होतें' असें सांगून, या लेखांत लोकमान्यांनीं म्हटलें आहे कीं, मराठी संतांजवळ उत्कटतेनें सांगण्यासारखें पुष्कळच होतें, म्हणूनच ते मराठी भाषा सुंदर, सोज्वळ आणि संपन्न करूं शकले. मराठी भाषेचा म्हणजेच मराठी अस्मितेचा नंदादीप मराठी संतांनीं तेवता ठेवला आणि तेजस्वी केला हें त्यांचें सांस्कृतिक कार्य कोण बरें विसरेल ? असो. या विषयाचें सांगोपांग विवेचन आजचे विद्वान वक्ते आतां आपणांसमोर करतीलच.

—ध्वनिक्षेपण दिनांक : २९ मार्च, १९५८

• • •

मराठी संतांचें सांस्कृतिक कार्य

गं. बा. सरदार

माझ्या आजच्या व्याख्यानाचा विषय, 'मराठी संतांचें सांस्कृतिक कार्य' हा आहे. महाराष्ट्रांतील संतांच्या कार्याचें मूल्यमापन करतांना मध्ययुगीन भारताच्या जीवनशिल्पांत संतमंडळाचें जें एक विशिष्ट स्थान होतें तें आपण प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. आपल्या भारतांतच नव्हे तर जगांतील बहुतेक सर्व देशांत (मध्ययुगीन समाज हा रूढिग्रस्त, स्थितिशील व धर्मपरायण होता.) तरीदेखील युरोपमध्यें तत्त्वज्ञानाची आणि राज्यशास्त्राची कांहीं प्रमाणांत कां होईना स्वतंत्रपणें वाढ होऊं शकली. राज्यसंस्था, धर्मसंस्था आणि विज्ञानप्रवृत्ति यांच्यांत झगडे झाले. तेथील विचारवंतांना बायबलइतकेंच ॲरिस्टॉटलचेंहि महत्त्व वाटत होतें. हिंदुस्थानांत मात्र अठराव्या शतकाच्या अखेरपर्यन्त शिक्षण, साहित्य, तत्त्वज्ञान, कायदा, नीति, इत्यादि सर्व क्षेत्रांत धर्माचें वर्चस्व अबाधित होतें. धर्म व संस्कृति हीं एकरूप मानलीं जात. म्हणून त्या काळांत जे धर्मप्रवक्ते होऊन गेले, त्यांनींच सांस्कृतिक मूल्यांचीहि जोपासना केली. शंकररामानुजांसारखे सत्यमीमांसक, मेधातिथि-विज्ञानेश्वरांसारखे धर्मशास्त्रज्ञ आणि ज्ञानेश्वर-तुकारामप्रभृति संत ह्या त्रिवर्गाचा आपल्या समाजजीवनावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. ह्याखेरीज हरिदास, पुराणिक व भिक्षुक यांचेंहि खेडचांपाडचांत प्रस्थ होतें. पण धर्मकृत्य हें त्यांचें उदरनिर्वाहाचें साधन झाल्यानें त्यांचें स्थान हें नेहमींच दुय्यम राहिलें.

तेव्हां आतां आपण तत्त्वमीमांसक, धर्मशास्त्रज्ञ व संत त्यांचीं कार्यक्षेत्रें व त्यांचे परस्परसंबंध विचारांत घेऊं. तत्त्वज्ञाचें आवाहन बहुतांशीं तर्कबुद्धीला असतें. कोणतीहि विचारप्रणालि तर्कदृष्ट्या सुसंगत आहे किंवा नाहीं याची तो छाननी करील. पण ह्या विचारांना भावबुद्धीची किंवा क्रियाशीलतेची जोड आहे कीं नाहीं हा प्रश्न तत्त्वज्ञानाच्या कक्षेंत येत नाहीं. वास्तविक पाहतां भारतीय तत्त्वविचिकित्सेची प्रेरणा विविध तापांपासून मुक्त किंवा कैवल्यप्राप्ति असल्यानें आपल्या तत्त्वनिरूपणांत साध्यसाधनविवेकहि येतो. परंतु एकदां तर्कबुद्धीचें माध्यम पत्करल्यावर अभावितपणें मूळ उद्देश बाजूला पडून अनेकदां तत्त्वचर्चा म्हणजे बुद्धीची नुसती कोरडी करामत बनते. तसेंच शास्त्रीपंडित कोणतेंहि कृत्य शास्त्राला धरून आहे किंवा नाहीं यांचा निर्णय देतील. पण कृत्य खऱ्याखुऱ्या

निष्ठेनें घडलें किंवा राजदंडाच्या अथवा जातिबहिष्काराच्या भीतीनें घडलें याची शहानिशा ते करणार नाहींत. संतांची दृष्टि तत्त्वज्ञ व शास्त्रीपंडित यांच्याहून अगदीं निराळी आहे. तत्त्वसिद्धान्तांच्या तर्कशुद्ध मांडणीपेक्षांहि तीं तत्त्वें साधकांनीं आत्मसात केलीं आहेत कीं नाहींत हें ते अगोदर पाहतील. विहित कर्माच्या तपशीलापेक्षां कर्त्याच्या मनोवृत्तीकडे ते अधिक लक्ष पुरवितील. तत्त्वमीमांसा काय किंवा आचारधर्म काय, ह्यांचें अंतिम उद्दिष्ट व्यक्तीचा संपूर्ण विकास हेंच होय. तें विफल होऊं नये म्हणून धर्मजीवनाचें अंतरंग निकोप व निर्मळ राखणें हें संतांना अगत्याचें वाटतें. मतामतांच्या गलबल्यांत पुष्कळदां सत्यान्वेषणाची दृष्टि लुप्त होते. विधिनियमाच्या जंजाळांत कित्येकदां खऱ्या धर्मभावनेचा कोंडमारा होतो. अशा वेळीं संत बाह्य अवडंबराचा निषेध करतात, आणि विचार, भावना, आणि कृति यांच्या एकात्मतेवर भर देतात. स्थितिशील समाजांत धर्मप्रवणतेमुळें सामाजिक संस्था अनादि व ईश्वरनिर्मित आहेत, अशी श्रद्धा बळावते. व ह्या संस्थांना स्वतःसिद्ध पावित्र्य लाभतें. संतांच्या श्रद्धाहि त्यांच्या काळच्या श्रद्धांहून वेगळ्या नव्हत्या. म्हणून सामाजिक संस्थांची त्यांनीं चिकित्सा केली नाहीं हें खरें आहे. पण कोणत्याहि संस्था यशस्वी होण्यासाठीं ज्या उदार व व्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता असते, त्याचा ते आवर्जून पुरस्कार करतात. अंतर्जीवन आणि बाह्य जीवन यांमधील फारकत, व्यक्तीव्यक्तीमधील दुजाभाव, जातीजातींमधील भेदाभेद, मतामतांतील संघर्ष, पंथोपपंथांतील पूर्वग्रह नाहींसे करण्याची त्यांची धडपड होती. स्वतःचें शुद्ध आचरण आणि उपदेश हीं त्यांचीं साधनें. यांच्याद्वारें त्यांनीं सत्यनिष्ठा, सौजन्य, सहिष्णुता, निःस्पृहता, उदारता इत्यादि गुणांचे लोकांना धडे दिले. सुसंवाद, ऐक्य व समरसता यांचा त्यांनीं अव्याहत प्रचार केला. कांहीं नवें घडविण्याची त्यांची मनीषा नव्हती. मात्र लोकांच्या मनावर उदात्ततेचे संस्कार घडवून व्यक्तिजीवनांतील आणि समाजजीवनांतील सत्त्व, कस टिकवून धरण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. संतांच्या भूमिकेचा हा आशय व तिच्या मर्यादा ध्यानांत घेऊनच महाराष्ट्रांतील संतांच्या कार्याचें समालोचन केलें पाहिजे.

महाराष्ट्रांत संतपरंपरेचा उदय ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला, आणि ही परंपरा सतराव्या शतकाच्या अखेरपर्यन्त जोमानें चालू राहिली. ह्या अवधींत जैन, नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त व रामदासी या संप्रदायांनीं महाराष्ट्र ही आपली कर्मभूमि मानली. अकराव्या शतकापर्यन्त तरी मराठीला प्रगल्भ दशा प्राप्त झाली नव्हती. यादवांच्या दरबारांत तिला राजभाषेचा मान मिळाला. पुढें जेव्हां चक्रधरांनीं आपला महानुभाव पंथ स्थापन केला, तेव्हां ती या पंथाची धर्मभाषा बनली. चक्रधर-ज्ञानेश्वरांच्या काळांत जरी महाराष्ट्रांत स्वराज्य होतें, तरी दक्षिणेंतील राजघराण्यांच्या आपापसांतील कलहामुळें यादवांची

राजसत्ता विस्कळीत व कमजोर झाली होती. हेमाद्रि-बोपदेवप्रभृति पंडितांनीं निष्प्रभ होत चाललेल्या वैदिक परंपरेला सावरून धरण्याचा यत्न केला. पण त्यामुळें यज्ञयाग, व्रतें-उद्यापनें यांना उत्तेजन मिळून कर्मठपणाचें बंड अतोनात माजलें. यादवांच्या आश्रयाला उत्तरेंतील अनेक व्युत्पन्न पंडित येऊन राहिले होते. पण त्यांच्या पांडित्यांत स्वतंत्र प्रज्ञेचा अभावच होता. तरी देखील विद्या, कला, साहित्य इत्यादि बाबतींत महाराष्ट्राची संस्कृति इतर प्रांतांच्या मानानें संपन्न होती. मात्र, ही संस्कृति सिंघण रामदेवासारख्या किंवा हेमाद्रि-बोपदेवांसारख्या उच्चवर्णीयांची होती. तिचा व्याप पांच-पंचवीस शहरांपुरताच मर्यादित होता. बाकी शेंकडों खेड्यापाड्यांतून अज्ञानाचें व अंधःश्रद्धेचें साम्राज्य पसरलें होतें. ज्ञानेश्वरांनीं आपल्या वाङ्मयांत, 'नागर' शब्द सुसंस्कृत या अर्थानें जागोजाग वापरला आहे. उलट, 'गांवढा' हा शब्द मागासलेला या अर्थानें योजला आहे. खेड्यांतील लोकांत अनेक क्षुद्र देवतांचें पूजन सर्रास चालू होतें. तुकाराम-नामदेवांच्या अभंगांत या देवतांचीं नांवें आहेतच. पण महानुभावांच्या स्थानपोथींत तत्कालीन महाराष्ट्रांतील १५३ देवतांचे उल्लेख आहेत. ह्या महाराष्ट्रांत जैन व नाथपंथांना बरीच मान्यता असावी. तामिळनाड, आंध्र व कर्नाटक ह्या प्रदेशांत पूर्वीच जैनांनीं आपलें बस्तान बसविलें होतें. पण महाराष्ट्रांतहि पैठण, एलिचपूर, कोल्हापूर, इत्यादि शहरांतून त्यांचीं केन्द्रें होतीं. जैनांची वस्ती मुख्यतः शहरांतून होती. नाथपंथीय योग्यांचा संसार मात्र सर्वत्र होता. त्या काळच्या महाराष्ट्रांत नाना पंथांचा व मतांचा सुळसुळाट होता. एकीकडे सनातनी वैदिकांचें कर्मकांड, दुसरीकडे बहुजनसमाजांतील क्षुद्र देवताभक्ति, आणि तिसरीकडें जैन महानुभावांचा यतिधर्म, एकीकडे शांकर-अद्वैत मत, दुसरीकडे नाथपंथीय अद्वयानंद-वैभव, आणि तिसरीकडे माध्व-महानुभावांचें द्वैत मत, एकीकडे वर्णाश्रम-धर्माची बंदिस्त चौकट, दुसरीकडे शाक्तांसारख्या पंथाचा अनाचार व तिसरीकडे गुरुमार्गांतील अनिर्बंधपणा. ह्या निरनिराळ्या प्रवृत्तींचें बलाबल जोखून आणि हंसक्षीरन्यायानें त्यांचा उच्चतर पातळीवर समन्वय साधून महाराष्ट्राला एक सुश्लिष्ट व सर्वस्पर्शी प्रेरणा देण्याचें कार्य ज्ञानेश्वर-प्रभृति संतांपुढें होतें. तें त्यांनीं कितपत व कसें पार पाडलें हें आपणांस पाहावयाचें आहे.

वैदिक आणि अवैदिक अशा दोन्ही पंथांचे अनुभव ज्ञानेश्वर-एकनाथादि संतांनीं विचारांत घेतले. काळाचीं पावलें न ओळखणाऱ्या सनातनी शास्त्री-पंडितांच्या बंदिस्तपणांत धर्मनिष्ठेपेक्षां औदासीन्याचाच भाग जास्त होता. उलट अवैदिक पंथांच्या बंडखोरींत विवेकाऐवजीं आततायीपणाचेंच प्राबल्य होतें. संतांना परंपरेची अंधभक्ति आणि रूढिदास्य नकोच होतें. पण निर्घृण रूढींचें उच्चाटन करतांना समाजजीवनांतील सातत्य भंगूं नये आणि परंपरेंतील सत्त्वांश

नष्ट होऊ नये म्हणून ते नेहमीं जागरूक राहिले. शास्त्रग्रंथांतील उणीवा दाखवतांना किंवा विधिनिषेधाचें स्तोम कमी करतांना शास्त्रनिष्ठेचा पाया उखडला जाणार नाहीं याची त्यांनीं विशेष खबरदारी घेतली. या ठिकाणीं येशू ख्रिस्ताच्या एका वचनाची आठवण होते. त्याचा आशय ज्ञानेश्वरप्रभृति, संतांच्या धोरणांतील आशयांशीं तंतोतंत जुळणारा आहे.

"Think not that I am come to destroy the law, or the prophets; I am not come to destroy, but to fulfil." [१]

जुना मार्ग उध्वस्त करण्यासाठीं आमचा जन्म नाहीं. पुर्वसूरींच्या कार्याविरून बोळा फिरविण्याचा आमचा उद्देश नाहीं, तर ऋषिप्रणीत शास्त्रांना सार्थता आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आम्हीं वकुंठवासी । आलों त्याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्तावया ॥ [२]

'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते ।' [३] या गीतेंतील श्लोकाचें विवरण करतांना ज्ञानेश्वरांनीं खालील ओंवी लिहिली आहे.

जे आजि तूं अर्जुना एथ । करावया शास्त्रें सार्थ ।
जन्मलासि बलार्थ । धर्माचेनि ॥ [४]

धर्माचरणाच्या जोरावर शास्त्रांना सार्थता आणण्याकरितांच खरोखर तूं सांप्रत येथें जन्मला आहेस' असा ह्या ओंवीचा भावार्थ आहे. त्यावरून ज्ञानेश्वरादि संतांचें हृद्गत स्पष्ट होतें.

समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील लक्षावधि लोकांना एकत्र आणण्याची महाराष्ट्रांतील संतांची मनीषा होती. पण सगळ्यांची कुवत सारखी नाहीं. प्रत्येकाची प्रकृति भिन्न आहे. जातीजातींच्या पातळींत फरक आहे. म्हणून सर्वांना एका विशिष्ट पंथाच्या चाकोरींत डांबून ठेवणें शक्य नाहीं व श्रेयस्करहि नाहीं याची सर्वांना जाणीव होती. म्हणून स्वतंत्र पंथ उभारून आपला सवता सुभा स्थापण्याचा खटाटोप त्यांनीं केला नाहीं. रूढ मार्गच त्यांनीं उचलून धरला. रूढ मूल्यांना त्यांनीं मान्यता दिली. वारकरी पंथासारख्या एका लोकप्रिय संप्रदायाच्या द्वारें त्यांनीं समाजांत नवें चैतन्य, नवा उत्साह निर्माण केला. बाह्य उपचारांपेक्षां अंतस्थ भावनेला त्यांनीं महत्त्व दिलें. उपासनेंत तंत्र गौण आहे. भक्तीचा

---

१ New Testament : St. Matthew–5–17
२ तुकारामबोवांच्या अभंगांची गाथा (नवी सरकारी प्रत), ५२०
३ भगवद्गीता, अ. १६ ओ. २४
४ ज्ञानेश्वरी, (संपा. वि. का. राजवाडे, शके १८३१), १६–४६१

जिव्हाळा, चित्ताची शुद्धता, मनाची एकाग्रता, सदाचार आणि भूतदया ह्यांवर परमेश्वराची कृपा अवलंबून आहे.

(१) चित्तचित्ता ग्वाही । उपचारे चाड नाहीं । [५]

(२) अंतरींची घेतो गोडी । पाहें जोडी भावाची ।। [६]

हाच त्यांच्या एकंदर उपदेशाचा इत्यर्थ आहे. अनेकत्व राखून संतांना लोकांत ऐक्यभाव निर्माण करावयाचा होता. म्हणून रूढ मार्गांतील विविध उपासना-पद्धतींची, उपचारांची आणि संकेतांची त्यांनीं हकालपट्टी केली नाहीं. फक्त त्यांच्यांतील जडत्व काढून टाकून त्यांना एका नव्या आध्यात्मिक जाणिवेच्या, एका नव्या उदात्त भक्तिकल्पनेच्या सूत्रांत गुंफण्याची त्यांनीं शिकस्त केली. मात्र ह्या बाबतींत एक पथ्य त्यांनीं कसोशीनें सांभाळलें. ज्यामुळें समाजांतून बाजूला पडण्याची किंवा कायमचे बहिष्कृत होण्याची पाळी येईल असें धोरण त्यांनीं चुकूनसुद्धां स्वीकारलें नाहीं.

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिका नोहावें । लोकांप्रति ।। [७]

सिद्ध पुरुषानें देखील अलौकिकत्व मिरवूं नये, आपलें कर्तव्यकर्म सोडूं नये, आणि लोकांत राहून लोकहित साधावें. अशा तऱ्हेची कार्यपद्धति वारकरी संतांना अभिप्रेत होती.

मराठी संतवाङ्मयांत वेदांबद्दल नितांत श्रद्धा दिसून येते. ज्ञानेश्वरीच्या प्रारंभींच मंगलाचरणांत ज्ञानदेवांनीं वैदिक परंपरेचें स्तोत्र गाईलें आहे. त्यांत श्रुति, स्मृति, पुराणें, षड्दर्शनें, काव्यें, नाटकें, ह्या सर्व ज्ञानशाखांचा समावेश केलेला आहे. ज्याला ज्याला आत्महिताची चाड असेल, त्यानें त्यानें श्रुतिमाऊलीला शरण गेलें पाहिजे.

तैसा अशेषां पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था ।
तेणें श्रुतिस्मृति माथा । बैसो धापे ।। [८]

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल, तर श्रुतिस्मृतींच्या आज्ञा शिरोधार्य मानल्या पाहिजेत असा ज्ञानेशांचा स्पष्ट अभिप्राय आहे. एकनाथ हे तर बोलून चालून पैठणसारख्या पुरातन क्षेत्रांत राहणारे उच्चवर्णीय भगवद्भक्त. त्यांनीं वेद प्रमाण मानले असल्यास नवल नाहीं. पण बहुजनसमाजांतील नामदेव-तुकारामादि संतांच्या अभंगांतहि त्यांच्या वेदविषयक पूज्यबुद्धीचे पुरावे जागोजाग आढळतात.

---

५ तु. गा. २०६८. ६ तु. गा. ३५
७ ज्ञा. ३–१६९. ८ ज्ञा. १६–४५६

(१) वेदांवेगळे कर्म करी । मनीं पाखंड धरी ।
तो पाचिजे अघोरीं । चिरकाळवरी ॥[९]

(२) अनादि निर्मळ वेदांचें जें मूळ । परब्रह्म सोज्वळ विटेवरी ।[१०]

(३) वेदशास्त्र नाहीं पुराण प्रमाण–तयाचें वदन नांव लोका ।[११]

याप्रमाणें मराठी संतांनीं वैदिक परंपरेचा वारसा निःसंकोचपणें स्वीकारलेला आहे. पण त्याबरोबरच त्या सर्वांनीं वैदिक कर्मकांडांतील सकामतेचा आणि यज्ञांतील पशुहिंसेचा कडाडून निषेध केला आहे. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत अहिंसेचें निरूपण करतांना ज्ञानदेवांनीं जैनांच्या आत्यंतिक अहिंसेप्रमाणें याज्ञिकांच्या हिंसेचाहि खरपूस समाचार घेतला आहे. वेद प्रमाण मानले, म्हणून त्यांतील प्रत्येक गोष्ट निर्बुद्धपणें ग्रहण केली पाहिजे असें नाहीं.

जरी वेदें बहुत बोलिलें । विविध भेद सूचिलें ।
तऱ्ही आपाणहित आपुलें । तेचि घेणें ॥[१२]

याचा अर्थ वेदांना वरकरणीं मान देऊन ज्यानें त्यानें मनःपूत वागावें असा नाहीं.

वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोका नाहीं येरा ॥

शब्दच्छल करणाऱ्या वेदपाठकांना वेदाचें रहस्य कळत नाहीं, आणि इतरांना वेदाध्ययनाचा अधिकार नाहीं. म्हणून सद्यःस्थितींत वेदांतील कोणता भाग ग्राह्य आणि कोणता भाग त्याज्य हें आत्मानुभवी संतांच्याकडूनच जाणून घेतलें पाहिजे.

वाचा बोलो वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥[१३]

वेदांचें अध्ययन आणि संतांचें अनुसरण ह्या दोन्ही गोष्टींवर सारखाच भर देऊन मराठी संतांनीं जुन्या नव्या प्रवृत्तींचा मेळ घातला आहे. त्यांनीं वेदांची प्रतिष्ठा राखली, आणि वेदार्थनिर्णयाच्या जुन्या पठडींतील दोषहि दाखवून दिले.

आठव्या शतकानंतर दक्षिणेंत धार्मिक व सांस्कृतिक प्रबोधनाची एक प्रचंड लाट उसळली. ह्या आंदोलनांत शंकरप्रभृति भाष्यकार, विज्ञानेश्वरप्रभृति शास्त्रकार जैन, नाथ व लिंगायत या पंथांचे प्रवक्ते आणि शैव व वैष्णव संप्रदायांतील संत ह्या सर्वांनीं भाग घेतला. ह्यांतून प्रादेशिक भक्तिपंथांचा उदय आणि देशभाषांचा उत्कर्ष ह्या दोन प्रभावी व प्रगतिपर घटना घडून आल्या. महाराष्ट्रांत चक्रधरस्वामींनीं महानुभाव पंथाची स्थापना करून ह्या प्रबोधनकार्याची मुहूर्तमेढ रोवली. ह्या पंथांतील आचार्यांनीं मराठींत अनेक उत्कृष्ट गद्यपद्यात्मक ग्रंथ लिहिले आहेत. मराठी भाषा व महाराष्ट्र देश यांबद्दल महानुभावीय लेखकांनीं जागोजाग आपुलकी व्यक्त केली आहे. पण पुढें ह्या पंथानें गुप्त

---

९ सकलसंतगाथा (आवटेप्रत, शके १८४५), नामदेव, १८३१
१० स. सं. गा., चोखामेळा, २. ११ तु. गा. २१८६. १२ ज्ञा. २–२६०
१३ तु. गा. २६०

सांकेतिक लिपींचा आश्रय केला. लोकजीवनाच्या प्रवाहापासून महानुभाव दूर फेकले गेले, आणि त्यांचें वाङ्मय हें केवळ पंथीय वाङ्मयच बनून राहिलें.

महानुभाव पंथाच्या स्थापनेनंतर अवघ्या तीसचाळीस वर्षांतच वारकरी संतांचें कार्य सुरू झालें. ज्ञानेश्वर-नामदेवांनीं स्वतंत्र पंथ न काढतां विठ्ठलोपासनेचा प्रसार केला आणि वारकरी पंथाच्या निशाणाखालीं महाराष्ट्रांत भागवतधर्माचें देशव्यापी मंदिर उभें केलें. जैन, नाथ, लिंगायत, यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांनीं देशभाषेचा पुरस्कार केला.

दाऊ वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृताही चुकी ठेवी । गोडिसेपणें ।।[१४]

आम्ही मराठी भाषा अशा तऱ्हेनें उपयोगांत आणूं कीं, त्यामुळें साहित्याला लावण्याची नव्हाळी प्राप्त होईल, एवढेंच नव्हे तर मराठी शब्दाच्या नादमाधुर्यामुळें अमृतालाहि उणेपणा येईल. मराठी संतांनीं अध्यात्मग्रंथांच्या व भक्तिगीतांच्या द्वारें ही आपली प्रतिज्ञा खरी करून दाखविली, आणि बहुजनसमाजाला आपल्या मायबोलीच्या सामर्थ्याची व सौंदर्याची प्रचीति आणून दिली. देशभाषेच्या ह्या अभिमानांतून हळूहळू प्रादेशिक अस्मिता आकारूं लागली आणि त्यामुळें सामाजिक एकीकरणाच्या कार्याला चालना मिळाली. महानुभावीय वाङ्मयांत तत्कालीन महाराष्ट्राचें वर्णन आलें आहे. त्यांत महाराष्ट्रांतील उपप्रदेशांचा उल्लेख करून त्यांना 'खंडमंडळ' ही संज्ञा दिली आहे. "देश म्हणजे खंड-मंडळ, किंचित् किंचित् भाषेचा पालट असें म्हणौनि खंडमंडळें म्हणावीं ।। पर अघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे ।[१५]

ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांतहि ज्ञानदेवांनीं, महाराष्ट्रमंडळ ।[१६] असा उल्लेख केला आहे.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती ही कीं, चक्रधर-ज्ञानेश्वरांच्या काळीं महाराष्ट्रांत अनेक मराठी बोली होत्या, पण एक सुस्थिर मराठी भाषा नव्हती. ह्या वेगवेगळ्या बोलींत लोककथा व लोकगीतें रचलीं जात असतीलच, पण त्यांना लोकनिविष्ट वाङमयाची प्रतिष्ठा मिळूं शकली नाहीं. तसेंच जातिसंस्था व ग्रामसंस्था यांच्या स्वयंकेंद्रितपणामुळें आणि साचेबंदपणामळें खेड्यांतील सामान्य जनतेचें जीवन इतकें संकुचित बनलें होतें कीं, ह्या लोकसाहित्याचा प्रसार त्या त्या जातीपुरता किंवा त्या त्या प्रदेशापुरताच मर्यादित राहिला. निरनिराळ्या प्रदेशांतील बहुजनसमाजाच्या दृष्टीनें सांस्कृतिक विनिमयाचा

---

१४ ज्ञा. १३–११५१

१५ चक्रधरसिद्धान्तसूत्रें (संपा. भवाळकर, नेने), उपोद्घात, पृ. २

१६ ज्ञा. १८–१७८१

प्रश्नच कधीं उपस्थित झाला नाहीं. पंढरीची वारी पूर्वीदेखील चालू होती. दूरदूरचे लोक तेथें नियमानें जात होते. पण त्यांच्या हा धर्मोत्सवाला अजून वैचारिक अधिष्ठान मिळालेलें नव्हतें. त्यांच्या भक्तिभावनेंत समानधर्मित्व आलेलें नव्हतें. वारकरी संतांनीं मराठींत ग्रंथरचना केली. त्यांच्या ग्रंथांचीं गांवोगांव पारायणें होऊं लागलीं. वारकऱ्यांच्या फडांत कीर्तनें व निरूपणें रंगूं लागलीं. ह्यांतून सगळचा महाराष्ट्रीयांची एक वाङ्मयीन भाषा तयार झाली. एक सांस्कृतिक माध्यम अस्तित्वांत आलें. मात्र त्या त्या प्रदेशांतील बोलीचें दैनंदिन व्यवहारांतील स्थान होतें तसेंच कायम राहिलें. तसेंच वारकरी संतांनीं प्रादेशिक श्रद्धास्थानांचे सतत गोडवे गाऊन त्यांचें महत्त्व वाढविलें. विठ्ठल, पंढरपूर, आळंदी, पैठण, चंद्रभागा, इंद्रायणी, ज्ञानेश्वरादि संत यांच्याभोंवतीं पावित्र्याचें वलय उत्पन्न झालें. उपास्य दैवत, सांप्रदायिक ग्रंथ, तीर्थक्षेत्रें, गुरुपरंपरा आणि संतमंडळ यांमधून वेगवेगळचा जातींत व थरांत ऐक्यभाव निर्माण होऊं लागला. मात्र प्रादेशिक श्रद्धास्थानांचा गौरव करतांना अखिल भारतीय श्रद्धास्थानांची महती मराठी संतांनीं कमी होऊं दिली नाहीं. उपनिषदें, गीता, भागवत, रामायण, महाभारत व कबीर-तुलसीदास प्रभृति परप्रांतीय संत, यांच्याबद्दल मराठी संतांनीं नेहमीं पूज्यबुद्धि दाखविली आहे. भारतीय संस्कृतीच्या विशाल छत्राखालींच त्यांनीं प्रादेशिक पृथगात्मतेला वाव करून दिला.

आतां आपण संतांच्या साहित्यविषयक कामगिरीचा परामर्श घेऊं. संतवाङ्मयाचें समालोचन करतांना केवळ कालदृष्ट्याच नव्हे तर गुणदृष्ट्याहि ज्ञानेश्वरांचें नांव प्रथम उच्चारावें लागतें. ज्ञानेश्वर हे अनुभूतिवादी, आत्मसाक्षात्कारवादी कवि होते. त्यांच्या साहित्यांत विषय हा अगदीं गौण आहे. परंतु आशयाचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या व्यक्तित्वांत आणि वाङ्मयांत आत्मानुभुति आणि सौंदर्यानुरक्ति हीं अगदीं एकजीव झालेलीं आहेत. म्हणून ज्ञानेश्वर कवि आहेत, पण कालिदासासारखे कवि नाहींत. ते तत्त्वज्ञ आहेत, पण शंकराचार्यांसारखे तत्त्वमीमांसक नाहींत. कालिदास आणि शंकराचार्य हे आपापल्या क्षेत्रांत अप्रतिमल्लच आहेत. पण ज्ञानेश्वरांची व त्यांची जात एक नाहीं, ज्ञानेश्वरांचा पिंडच खास निराळा आहे.

वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वींहि परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥ १७

ह्या ओंवींत परतत्त्वस्पर्शामुळें साहित्य सर्वश्रेष्ठ ठरतें असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. हा परतत्त्वस्पर्श हेंच त्यांच्या काव्याचें उगमस्थान होय. 'अमृतानुभव' व 'चांगदेव पासष्टी' ह्या ग्रंथांचा आशय तर स्पष्टच आहे. 'भावार्थदीपिके'-

---

१७ ज्ञा. १८–२४५

मागील प्रेरणाहि आत्मानुभावाचा आविष्कार हीच आहे. गीतार्थग्रथन केवळ एक निमित्त आहे.

मग आर्तीचेनि वोरसें । गीतार्थग्रथन मिसें ।
वर्षलों शांतरसें । तो हा ग्रंथु ।। १८

गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें समाधिधन म्हणजेच नाथपंथांतील अद्वयानंद-वैभव मीं या ग्रंथांत श्रोत्यांना सुपूर्त केलें आहे असा ज्ञानेश्वरांचा दावा आहे. समाधिधन म्हणा किंवा आत्मतत्त्व म्हणा, हें स्वभावतःच शब्दातीत आहे. 'साचचि बोलावें नोहे शास्त्र' १९ अव्यक्त व अतींद्रिय आहे, एवढेंच नव्हे तर तें अचिंत्य आहे, तें अबुद्धिगम्य आहे, आणि तें अनिर्वचनीयहि आहे. हचा आत्मतत्त्वाचें निरूपण हेंच ज्ञानेश्वरांच्या काव्याचें प्रयोजन आहे. ज्ञानेश्वरांची भूमिका वादकुशल भाष्यकाराची नसून अभिजात कलावंताची आहे. त्यांचें तत्त्वनिरूपण हें श्रोत्यांना विश्वासांत घेऊन त्यांच्यासमवेत केलेलें तत्त्वान्वेषणच आहे. त्यांच्या वाङ्मयांत वादाची खडाजंगी नाहीं. वक्ता आणि श्रोता यांच्यांतील संवाद, सामरस्य हयांवरच त्यांच्या वाङ्मयाची उभारणी आहे. त्यांची निरूपणपद्धति अनुमानाची नसून आंतरप्रतीतीची आहे, शब्दचिकित्सेची नसून सहअनुभूतीची आहे. त्यांच्या साहित्याचें आवाहन श्रोत्यांच्या कुशाग्र बुद्धीला नसून त्यांच्या हळुवार चित्तवृत्तीला आहे, म्हणून संस्कृत भाष्यग्रंथांचा सांचा डोळ्यांपुढें ठेवून ज्ञानेश्वरीचें रहस्य हस्तगत होणार नाहीं. तसेंच एखाद्या खंडकाव्याचा किंवा महाकाव्याचा मानदंड स्वीकारूनहि ज्ञानेश्वरींतील सौंदर्याचें मोजमाप करतां येणार नाहीं. कारण अंतःस्फूर्तीखेरीज इतर कोणत्याच शास्त्राचा ज्ञानेश्वर मुलाहिजा ठेवीत नाहीत.

अर्थु बोलाची वाट न पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये ।
भावाचा फुलौरा होतु जाये । मतीवरि ।।२०

असा त्यांच्या निरूपणाचा एकंदर थाट आहे.

ज्ञानेश्वर हे तत्त्वचिंतक कवि होते, तसेंच ते सिद्धप्रज्ञ योगी होते.

तिए सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें, मनचि सारस्वते दुभें ।।२१

असा परमार्थक्षेत्रांतील त्यांचा अधिकार होता. सामान्य जनांना अध्यात्माची गोडी लावण्यासाठीं त्यांनीं रुक्ष वेदान्त काव्यमय भाषेंत सांगितला ही कल्पनाहि चुकीची आहे. ज्ञानेश्वरांना प्रतीत होणारें आत्मतत्त्व हें निव्वळ सत्तारूप आणि चिन्मय नाहीं; तें आनंदमय, रसमय व सौंदर्यपूर्ण आहे. म्हणून त्यांच्या अनुभूतीचा आविष्कार हा नितांत रमणीय झालेला आहे.

---

१८ ज्ञा. १८–१७४०. १९ ज्ञा. १५–५४३.
२० ज्ञा. ९–२७ २१ ज्ञा. ६–४५२

अद्वयानंदस्पर्शें । दिठी रसमय जाली असे ।।[२२]

परतत्त्वस्पर्शानें पुलकित झालेल्या प्रतिभेचे नवे नवे उन्मेष हाच ज्ञानेश्वरांचा साहित्यांतील कलात्मकतेचा गाभा होय. 'भावार्थदीपिके' च्या रूपानें त्यांनीं गीतेवर हें देशीकार लेणें चढविलें, तें जगांतील साक्षात्कारवादी काव्याचें एक उत्तुंग शिखर आहे. मराठी भाषेला व महाराष्ट्र संस्कृतीला ज्ञानेश्वरांची ही अमोलिक देणगीच आहे.

नामदेव-तुकारामादि संतांचे अभंग हें संत-साहित्याचें दुसरें वैशिष्ट्यपूर्ण अंग होय. सांप्रदायिक विषयांवरील ठराविक ठशाचे अभंग सोडल्यास बाकीच्या अभंगांतून त्या त्या संताचे व्यक्तिविशेष उत्कटत्वानें प्रतिबिंबित झाले आहेत. प्रत्येक अभंग म्हणजे त्यांच्या अंतःकरणांतील एक उर्मीच आहे. 'अंतरींचे घावे स्वभावें बाहेरी'[२३] अशा अंतःस्फूर्तीनें उसळलेले भावतरंग, सहजतेनें स्फुरलेल्या विचारलहरी असेंच त्यांच्या अभंगांचें स्वरूप आहे. त्यांत कारागिरीचा, कृत्रिमतेचा लवलेशहि नाहीं. 'कोरडया उतरी । नका गौरवूं वैखरी ।'[२४] अशी ते परमेश्वराची प्रार्थना करतात. आणि

अनुभवें आलें अंगा, । तें या जगा देतसें ।
नव्हती हाततुके बोल, । मूळ ओल अंतरींची ।।[२५]

अशा शब्दांत आपल्या अभंगवाणींतील जिवंतपणाची ते ग्वाही देतात. शब्दांची चमत्कृति, कल्पनेची कसरत, रचनेची चतुराई म्हणजे काव्य नव्हे. अशी कविता क्षणभर वाचकाला भुरळ घालील, पण त्याच्या अंतःकरणाचा ठाव घेऊं शकणार नाहीं. भावकाव्य म्हणजे कविहृदयाचें स्पंदन, कविमनाचें दर्शन, ह्या दृष्टीनें नामदेव-तुकारामांच्या कांहीं अभंगांची तरी उत्कृष्ट भावकाव्यांत गणना होईल.

आपल्या अभंगांतील गोडवा आणि वेधशक्ति हीं भावनेच्या ओलाव्यांतून, अंतरींच्या उमाळ्यांतून आलेलीं आहेत याची त्यांना जाणीव होती म्हणून–

सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुची येतो ।[२६]
जोडिलीं अक्षरें । नव्हतीं बुद्धीचीं उत्तरें ।
तुका म्हणे झरा । आहे मुळींचा चि खरा ।[२७]
गर्जो हरीचे पवाडे । मिळो वैष्णव बागडे ।
पाझर रोकडे काढूं पाषाणामध्यें ।।[२८]

आमच्या शब्दाशब्दांत सत्याचा कस आहे, भक्तिप्रेमाचा रस आहे, आणि पाषाणालाहि पाझर फोडण्याची अद्भुत शक्ति आहे, असे आत्मविश्वासाचे उद्गार

---

२२ ज्ञा. १८–१५८६. २३ तु. गा. २८९. २४ तु. गा. २५९१
२५ तु. गा. २८४५. २६ तु. गा. २७०६.
२७ तु. गा. ३५०० २८ तु. गा. २३०२

त्यांच्या तोंडून वारंवार निघतात. त्या काळीं फाजील नियमबद्धतमेमुळें व अलंकारांच्या अतिरिक्त हव्यासामुळें संस्कृत साहित्य कृत्रिम व नीरस बनलें होतें. नामदेव आणि तुकाराम हे बहुजनसमाजांतील कवि असल्यानें त्यांच्यावर संस्कृत-साहित्यशास्त्राचें यत्किंचितहि दडपण नव्हतें. म्हणून काव्याच्या अंतरंगाला प्राधान्य देणारी व कवीच्या व्यक्तित्वाची कदर करणारी अभंग वाङ्मयाची एक स्वतंत्र परंपरा त्यांनीं मराठी साहित्यांत निर्माण केली.

ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्याहून एकनाथांची मनोरचना अगदीं भिन्न होती. त्यांची दृष्टि नेमस्तपणाची व समन्वयशीलतेची होती. कोणत्याहि एकाच प्रवृत्तीचा परमोत्कर्ष त्यांच्या स्वभावांत आणि वाङ्मयांत सहसा आढळत नाहीं. शुक-व्यास-वाल्मिकींचें आर्ष काव्य, कालिदासप्रभृतींचें अभिजात काव्य आणि नामदेवादि संतांचें भक्तिकाव्य यांचा समन्वय साधून एकनाथांनीं मराठी साहित्याला एक नवीन वळण लावलें. अध्यात्मनिरूपण, प्रदीर्घ कथाकाव्य, आख्यानकाव्य, अभंग, गौळणी, पदें, भारुडें, इत्यादि स्फुटरचना अशा विविध प्रकारचें साहित्य निर्माण करून त्यांनीं मराठी भाषेला ऐश्वर्य प्राप्त करून दिलें. अंतःस्फूर्ति आणि बाह्य सजावट, भक्तिभाव आणि पांडित्य, तत्त्वबोध आणि मनोरंजन यांची त्यांनीं सारखीच बूज राखली. निरनिराळ्या प्रकृतींच्या व अभिरुचींच्या लोकांना त्यांनीं आपल्या साहित्याच्या द्वारें बौद्धिक व भावनात्मक खाद्य पुरविलें.

ज्ञानी निवती परमार्थबोधें । पंडित निवती पदबंधें ।
लोक निवती कथा-विनोदें, । ग्रंथसंबंधें जग निवे ॥[२९]

'अधिकार तैसा करूं उपदेश' [३०] हें संतांच्या निरुपणपद्धतीचें 'वर्म' एकनाथांच्या वाङ्मयांत दिसून येतें.

मुद्रणकलेच्या अभावीं संरक्षण आणि प्रसार यांच्या सोयीसाठीं सगळेंच जुनें मराठी वाङ्मय पद्यांत लिहिलें गेलें, तरी शिवकालापूर्वीच मराठी साहित्यांत गद्यगुण आणि काव्यगुण यांच्यांतील फरक स्पष्ट होऊं लागला होता. दासोपंत, शिवकल्याण व वामन हे गद्य प्रकृतीचे लेखक होत. मुक्तेश्वर, तुकाराम, व रघुनाथ पंडित यांना काव्य-प्रकृतीचे लेखक म्हणतां येईल. मुकुंदराजांनीं तर्कमुद्रा आणि रसिकमुद्रा, असे लेखनपद्धतीचे जे दोन प्रकार कल्पिले आहेत, ते सोळाव्या शतकापासून मराठी साहित्यांत अधिक उठावदारपणें दृष्टीस पडतात. रामदास हे निष्ठावंत प्रवक्ते, जातिवंत शिक्षक, यशस्वी व संघटक प्रभावी प्रचारक होते. त्यामुळें साहजिकच त्यांच्या वाङ्मयांत उत्कृष्ट गद्याचे गुण प्रकर्षानें आढळतात. त्यांची गद्यशैली रांकट, खडबडीत, पण सरळ, रोखठोक आणि दमदार आहे.

---

२९ भावार्थ रामायण, बालकांड, १४-१८३

३० तु. गा. ३३१५

तिच्यांत 'गौल्य' व गुळमुळीतपणा कुठें नाहीं. 'सहज बोलतां विवेक। प्रगट होय।' [३१] अशा तऱ्हेची त्यांच्या विवेचनाची धाटणी आहे. 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें, मळमळीत अवघेचि टाकावें।' [३२] असें त्यांच्या वाणीचें जणु कुलव्रतच होतें. त्या त्या विषयाचा बारीकसारीक तपशील देत देत श्रोत्यांच्या मनावर सबंध निरूपणाचा एकच एक ठसा उमटविण्याची रामदासांची हातोटी विलक्षण आहे. ज्याला आपण, 'लेखनांतील वक्तृत्व' म्हणूं, आणि स्वतः रामदास ज्याला 'गद्यघोष' [३३] असें म्हणतात तो गुण रामदासांच्या अनेक समासांतून ओतप्रोत भरून राहिलेला आहे.

ज्ञानेश्वर हे अद्वैतनिष्ठ आहेत. पण त्यांचें अद्वैत शांकर कीं शांभव या प्रश्नांसंबंधीं दोन्हीं बाजूंचीं मतें आग्रहानें मांडलीं जातात. ज्ञानेश्वरांच्या साहित्यांतून एखादा दार्शनिक सिद्धान्त किंवा सुसंबद्ध मतप्रणाली शोधून काढतां येईल असें वाटत नाहीं. कारण ते साक्षात्कारवादी कवि होते. ज्ञानेश्वर हे तत्त्वज्ञ असले तरी शंकर, रामानुज, केंट व हेगेल यांच्यासारखे ते तत्त्वज्ञमीमांसक नव्हते. ज्ञानेश्वरांचे ग्रंथ आध्यात्मपर आहेत हें खरें, पण त्यांनीं आपल्या विषयाची मांडणी तर्कपद्धतीनें केलेली नाहीं. त्यांची दृष्टि व्यवच्छेदक नाहीं, तर समावेशक आहे. विश्वाचें मूलतत्त्व केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, किंवा द्वैत यांसारख्या कोणत्याहि वादाच्या चौकटींत बसवितां येणार नाहीं, अशी त्यांची धारणा आहे. विशिष्ट मतांचें खंडन किंवा मंडन यांकडे ज्ञानेश्वरांचा ओढा नाहीं. सिद्धानुवाद म्हणजे स्वतःसिद्ध आत्मानुभवाचा आविष्कार हेंच त्यांच्या साहित्याचें उद्दिष्ट आहे, म्हणून ते अनुमाना-ऐवजीं उपमानाची कास धरतात. अमृतानुभवांतील 'शिवशक्तिसमावेशनमन' हें हें पहिलें प्रकरण घेतलें, तर शिवशक्तिसंबंध स्पष्ट करतांना ते तर्कशुद्ध युक्तिवाद करीत नाहींत. एकामागून एक उपाय योजतात, दृष्टान्त देतात.

पैं शून्य जें दावावे जाले। ते बिंदुले एक केलें।
तेसें अद्वैत दावावे बोले। द्वैतचि कीजे ।। [३४]

अद्वैताचें विवेचन म्हटलें, तरी द्वैताशिवाय गत्यंतर नाहीं. द्वैत नाहीं, तर बोलणेंच खुंटलें. म्हणून द्वैताच्या परिभाषेंत अद्वैताची प्रतीति आणून द्यावयाची, जें शब्दातीत आहे, तें शब्दांतून ध्वनित करावयाचें, जें निर्विकल्प आहे, त्याची कल्पनेच्या साहाय्यानें ओळख पटवून द्यावयाची, आणि जें अतींद्रिय आहे त्याचा शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध या इंद्रियगम्य संवेदनांच्या विविध रूपांतून प्रत्यय घडवावयाचा, ह्या प्रेरणेंतून ज्ञानेश्वरांचें साक्षात्कारवादी काव्य निर्माण झालेलें आहे. म्हणून ते म्हणतात :

---

३१ दासबोध, १४–३–३४. ३२ दास. १९–६–१५
३३ मनाचे श्लोक, ८९. ३४ ज्ञा. १३–८८३

तेणें कारणें मी बोलेन । बोली अरूपाचें रूप दावीन ।
अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियाकरवीं[३५] ।।

प्रतिभाबळानें अद्वैताचें वातावरण तयार करावयाचें आणि श्रोत्यांच्या मनावर ऐक्यभावाचा आणि अभेदबुद्धीचा संस्कार घडवावयाचा एवढेंच कार्य ज्ञानेश्वरांना साधावयाचें होतें. त्यांच्या साहित्यांत सुसंगत जीवनदृष्टि आहे, पण साचेबंद तत्त्व-सिद्धान्त नाहीं. बाकीच्या संतांची जीवननिष्ठा ज्ञानेश्वरांहून भिन्न नाहीं. एकनाथांनीं आपल्या ग्रंथांत ज्ञानेश्वरांची विचारप्रणाली प्रमाण मानली आहे. तुकारामादि संतांचे अभंग तर निरनिराळ्या वृत्तींतून निर्माण झालेले आहेत. भक्तिसुखाचा उदोउदो करतांना तुकाराम 'अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ।'[३६] 'अद्वैतीं तो । माझें नाहीं समाधान ।।'[३७] असे उद्‌गार काढतात. पण तत्त्वचिंतनाच्या पातळीवरून—

अग्निकर्पुराच्या मेळीं । काय उरली काजळी ।
तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ।।[३८]

अशा शब्दांत ते आपला अद्वैतानुभव व्यक्त करतात. अशा परस्परविरोधी वचनांचा मेळ घालतांना संतवाङ्मयाची वैचारिक आणि भावनात्मक बैठक ध्यानांत घेतली पाहिजे. नुसत्या सुटचासुटचा विधानांची चिरफाड करण्यानें आपली दिशाभूल होण्याचा मात्र संभव आहे.

विश्वाच्या मुळाशीं एकच अनादि, अनंत व अनाकलनीय परतत्त्व आहे अशी सर्व संतांची दृढ श्रद्धा आहे. हें परतत्त्व, हा परमात्मा, 'जगदुन्मीलना-विरलकेलिप्रिय'[३९] असा आहे. जगद्रूपानें सतत प्रकट होण्याची क्रीडा त्याला अत्यंत प्रिय आहे. परमात्म्यापासून जग कसें उत्पन्न झालें, याचें विवेचन करतांना ज्ञानेश्वरांनीं दूध आणि दही, बीज आणि वृक्ष, रज्जु आणि सर्प, शुक्ति आणि रजत, पाणी आणि लाटा, सोनें आणि अलंकार, असे सर्व तऱ्हेचे दृष्टान्त दिले आहेत. पण ज्यांत परमात्मा आणि जग यांचें संपूर्ण ऐक्य अभिप्रेत आहे असें पाणी व लाटा, चंद्र व चंद्रिका, सूर्य आणि प्रभा, गूळ आणि गोडी हे चिद्विलासवादाचे दृष्टान्तच त्यांना अधिक समर्पक वाटतात. जगांत जें जें कांहीं घडतें तें तें परमात्म्याच्या सत्तेनें व इच्छेनें घडतें.

याचेनि चि स्वभावें । हें होत जात आघवें ।[४०]

विश्वरूपानें व्यक्त होणें आणि पुन्हां स्वस्वरूपांत विलीन होणें हा परमात्म्याचा स्वभावच आहे. त्याच्याहून हें जग भिन्न नाहीं.

१. हे आंतु बाहिरि मियां कोंदलें । जग निखिल माझेंचि ओतलें ।[४१]
२. तेसें विश्व एणें नांवें । हें मी चि पै आघवें ।।

---

३५ ज्ञा. ६–३६. ३६ तु. गा. ७३७. ३७ तु. गा. ३७५४
३८ तु. गा. २४८४. ३९ ज्ञा. १८–४. ४० ज्ञा. २–१७८. ४१ ज्ञा. ९–२९८

आतां चंद्रबिंब सोलावें । न लगे जेंवि ।।४२

३. द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियेलें देवें ।।४३

विश्वीं विश्वंभर, जगीं जगदीश, जनीं जनार्दन व भूतीं भगवंत असे वाक्प्रयोग संतवाङ्मयांत जागोजाग आढळतात. परमात्म्याच्या प्राप्तीसाठीं जगाचा त्याग करण्याची आवश्यकता नाहीं.

जालेनि जगें मी झांकें । तरि जगत्वें कोणु फांकें ।
कीलेवरि माणिके । लोपिजे काइ ।।
म्हणौनि जग परौते । सारुनि पाहिजे माते ।।
तेसा नव्हे उखिते । आघवें चि मी ।।४४

लाटांवर लाटा उसळल्या, म्हणून पाणी आच्छादिलें जात नाहीं, ज्वाळांनीं अग्नि दृष्टिआड होत नाहीं, तेजांनीं माणिक लोप पावत नाहीं. त्याप्रमाणेंच जगामुळें मीहि झांकला जात नाहीं. आतां पाणी व अग्नि यांचें एकत्व सत्य आहे. पण लाटा आणि ज्वाळा यांचें अनेकत्वहि मिथ्या नाहीं. पण किती झालें तरी हे एकदेशीय दृष्टान्त आहेत. त्यांवरून चिद्वस्तूची संपूर्ण कल्पना कशी येणार ?

न फुटतां बीज-कणिका । माजी विस्तारे बटु असिका ।
तरी अद्वैत फांका । उपमा आधी ।।४५

बीजाचा कण न फुटतांच त्याला वटवृक्षाचें रूप धारण करतां आलें, तर अद्वैतरूप आत्मतत्त्वाच्या विकासाला त्याची उपमा देतां येईल. म्हणून द्वैत आणि अद्वैत ह्या परस्परसापेक्ष द्वंद्वाच्या पलीकडे परमात्मतत्त्व आहे असा ज्ञानेश्वरादि संतांनीं निष्कर्ष काढला आहे.

जें एकचि नव्हे एकसरें । दोघां दोपण नाहीं पुरें ।।४६

शिव आणि शक्ति, परमात्मा आणि जग, हीं एक आहेत असें म्हणतां येत नाहीं, आणि त्यांच्यांत द्वैत किंवा दुजा भाव आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. म्हणून वस्तुगत भेद मिथ्या आहे यावर अवास्तव भर न देतां मराठी संतांनीं दृष्टिगत भेद असत्य व हानिकारक आहे, आणि त्याचें निर्मूलन केल्याशिवाय परमात्मप्राप्ति नाहीं, हें तत्त्वच आवर्जून सांगितलें.

१. तेंवि नानाविध व्यक्ती । आनानें नांवें आनानी वृत्ती ।
ऐसें जाणती भेदलां भूतीं । अभेदा मातें ।।४७

२. तें सुख येणें चि देहें । प्राये पाखालणिया लाहे ।
जो भूत वैषम्यें नोहे । विषमबुद्धी ।।४८

---

४२ ज्ञा. १४–३७४. ४३ तु. गा. २९३२. ४४ ज्ञा. १४–१२२, १२६
४५ अमृतानुभव, ७–१४९. ४६ अमृतानुभव, १–४
४७ ज्ञा. ९–२५१. ४८ ज्ञा. १३–१०७०

भूतवैषम्यामुळें ज्याच्या बुद्धींत भेदभाव उत्पन्न होत नाहीं, त्याला परमात्मसुख पाय धुण्यासाठीं म्हणजे विपुलतेनें मिळतें अशा अर्थाची ही ओंवी आहे.

मराठी संतांनीं अद्वैततत्त्वाचा पुरस्कार केला, अभेदबुद्धीचा आग्रह धरला. पण द्वैतकल्पनेवर त्यांनीं संपूर्ण बहिष्कार घातला नाहीं. उसळत्या लाटांनीं पाण्याची शोभा वाढते, त्याप्रमाणें चिद्विलासांतून भासमान होणाऱ्या द्वैतामुळें अद्वैतानुभवाची, अभेदभक्तीची गोडी वाढते असा त्यांनीं निर्वाळा दिला आहे.

द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगें आपण ।
भेदु तंवतंव दुण । अभेदासी ॥[४९]

विश्वात्मैक्यबुद्धि अंगीं बाणली असतां द्वैतदशेच्या अंगणांत अद्वैत राबूं लागतें. जों जों भेद वाढतो, तों तों अभेदबुद्धि दुणावते. म्हणून संतांच्या मतें परमात्मतत्त्वांत द्वैत नाहीं, आणि अद्वैतहि नाहीं. ते ह्या द्वंद्वाच्या पलीकडे आहे. द्वैताद्वैतातीत आहे.

मग द्वैताद्वैतातीत । मींचि आत्मा एक निभ्रांत ।
हें जाणोनि आपणें येथ । अनुभवी रिघे ॥[५०]

वष्णवाची भक्ति प्रायः द्वैतनिष्ठ आहे. शैवांच्या अद्वैत मतांत योगाला प्राधान्य आहे. आणि शांकर अद्वैताची परिणति सर्वकर्मसंन्यासपूर्वक ज्ञाननिष्ठेंत झालेली आहे. पण मराठी संतांनीं अद्वैत आणि सगुणभक्ति यांचीच सांगड घातली.

१. तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदु रे ।
अनुमानें ना अनुमानें ना । श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ॥[५१]

२. सगुणी निर्गुणी एकचि आवडी । चित्तीं दिली बुडी चिदानंदी ॥[५२]

[अद्वैतनिष्ठ, कर्मप्रधान, भक्तियोग ही मराठी संतांची जीवनविषयक निष्ठा आहे. देव आणि भक्त, गुरु आणि शिष्य, स्वामी आणि सेवक, माता आणि बालक, साध्य आणि साधक यांच्यांतील संवाद, सामरस्य हेंच त्यांच्या विचारसरणींतील मूळ सूत्र आहे.

आतां भेदु जरि मोडे । तरि प्रश्नोत्तर कां पडे ।
ना भेदूं चि तरि जोडे । संवादसुख का ॥
ऐसें बोलतां दुजेपणें । संवादें द्वैत जें गीलणें ॥[५३]

भेदाशिवाय संवाद संभवतच नाहीं; पण भेदबुद्धि बळावली, तर संवादांत स्वारस्य उरत नाहीं. म्हणून सुसंवादानें द्वैत गिळण्याचा, समरसतेनें भेद विरविण्याचा मार्गच संतांच्या दृष्टीनें सर्वोत्तम आहे.]

[मराठी संतांनीं सगुणभक्तीचा प्रसार केला, पण त्याबरोबरच त्यांनीं समाजां-

---

४९ अमृतानुभव, ९–२९. ५० ज्ञा. (कुंटेप्रत) १८–१२०५
५१ स. सं. गा. ज्ञानदेव, ५. ५२ ज्ञानेश्वरांची प्रभावळ, (संपा. पांगारकर) नामदेव, ३७. ५३ ज्ञा. १८–१५७८

तील क्षुद्र देवताभक्तीवर सपाटून कोरडे ओढले. विश्वाचा निर्माता व नियंता असा परमेश्वर एकच आहे. विठ्ठल हाच तो देवाधिदेव होय. त्याच्या निष्काम भक्तींत जीवाचें जन्मसाफल्य आहे. इतर देवतांची सकाम भक्ति ही खरी भक्ति नसून भक्तीचें तें केवळ विडंबन होय. क्षुद्र देवतांची ही भक्ति अज्ञान, भीति व संकुचित स्वार्थ ह्यांवर आधारलेली होती. पवित्र भावनेचा अशा तऱ्हेनें बाजार मांडणें यासारखें दुसरें दुष्कृत्य नाहीं. आज एक तर उद्यां दुसराच. अशा रीतीनें रोज नित्य नवे देव पुजणाऱ्या चवचाल व संधिसाधू भक्तांची मनोवृत्ति गांवाच्या वेशींत पाल ठोकून बसलेल्या वेश्येच्या मनोवृत्तीइतकीच निंद्य आहे असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. तुकारामाचा एक अभंग येथें उद्धृत करतों :-

नव्हे जाखाई जोखाई । मायाराणी भेसाबाई ॥
वळिया माझा पंढरिराव । जो या देवांचाहि देव ॥
रंडी चंडि शक्ति । मद्यमांसातें भक्षिति ॥
बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठी देव ॥
गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥
मुंज्या म्हैसासुरे । हे तो कोण लेखी पोरे ॥
वेताळे फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥
तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥[५४]

ह्या अभंगावरून क्षुद्र देवताभक्तींतील अनिष्ट प्रवृत्तींची कल्पना येईल. तसेंच उपासनेचा ओघ बहुदेववादाकडून एकेश्वरवादाकडे आणि सकामतेकडून निष्कामतेकडे वळविण्याची संतांची धडपडहि त्यामधून स्पष्ट दिसून येते. क्षुद्र देवतांचे संतांनीं वाभाडे काढले. पण कुलधर्म व कुलाचार यांचे संस्कार लोकांच्या मनांत किती खोलवर रुजले आहेत याचीं त्यांना जाणीव होती. म्हणून समाजातील अनिष्ट रुढीवर व अंधश्रद्धेवर प्रहार करतांना त्यांनीं पुष्कळच तारतम्य राखलें. कुलदैवतांच्या पूजेअर्चेला हरकत घेतली नाहीं. पण ही भक्ति कमी प्रतीची आहे, विठ्ठलोपासनाच सर्वश्रेष्ठ आहे, असा एकनिष्ठेचा व अनन्यभावाचा त्यांनीं सतत डांगोरा पिटला.

विठोबा परतें दैवत आहे म्हणती । ऐसे श्रुतिस्मृति जरी बोलती ।
तरी ते अपशब्द कानीं पडों न द्यावे । पाखंडी म्हणती जरी उगेचि असावें ॥[५५]

मात्र मराठी संतांच्या अनन्यनिष्ठेंत ख्रिस्ती किंवा इस्लामी एकेश्वरवादाचा कडवेपणा नाहीं. एक तर अद्वैतनिष्ठेमुळें त्यांच्या भक्तिपंथांत असहिष्णुतेचा भाग साहजिकच कमी होता. आणि त्यांतच त्यांनीं भारतांतील शैव आणि वैष्णव ह्या प्रमुख संप्रदायांचें ऐक्य घडवून आणण्याचें धोरण स्वीकारलें. हरि आणि

---

५४ तु. गा., २३८४. ५५ स. सं. गा. नामदेव, ३७५

हर यांपैकीं कोणत्याहि एका दैवताचा त्यांनीं आग्रह धरला नाहीं. फक्त ईश्वर-विषयक उच्च कल्पना आणि भक्तिभावांतील सात्त्विकता आणि निष्कामता ह्या दोन गोष्टींवरच त्यांनीं जोर दिला. त्यामुळें महाराष्ट्रांत शैव आणि वैष्णव पंथांचे झगडे झाले नाहींत.

किंबहुना विठ्ठलाच्या रूपांत शिव आणि विष्णु ह्या दोन्ही देवतांचा समावेश झालेला आहे अशी मराठी संतांची श्रद्धा होती.

१ शिव मस्तकीं धरिला । भेद भक्तांचा काढिला ।।[५६]

२ हरिहरां भेद नाहीं । करूं, नये वाद ।।
एकाएकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ।।[५७]

३ विठोनें शिरीं । वाहिला देवराणा ।।[५८]

सगुण निर्गुणांचा मेळ घालणें, हरिहरांचें ऐक्य साधणें, आणि क्षुद्रदेवतांचा वडेजाव कमी करणें ह्या तिन्ही बाबतींतील संतांचें कार्य फार महत्त्वाचें आहे.

संतांचा दृष्टिकोन परमार्थनिष्ठच होता. पण परमार्थांतील पारलौकिकाचें प्रस्थ अंशतः कां होईना त्यांनीं कमी केलें. स्वर्ग, वैकुंठ व मोक्ष हे लाभ त्यांनीं तुच्छ मानले. सहजभक्ति, अभेदभक्ति ही मुक्तीपेक्षांहि श्रेष्ठ आहे.

'चौं ही पुरुषार्था शिरीं भगति जैसी ।।[५९]

असें त्यांचें मत होतें. त्यांच्या जीवननिष्ठेंत भक्ति ही केवळ साधन नव्हती, तर साध्य-रूपहि होती. म्हणून भक्तिसुखासाठीं पुन्हां पुन्हां जन्म घेण्याची संतांची तयारी होती.

१ तुका म्हणे अवघे जाले एकमय । परलोकींची चाड काय आम्हां ? ।[६०]

२ मोक्षपदें तुच्छ केलीं का या कारणें । जन्म घेणें युगायुगीं ।।
न लगे वैकुंठ न वांछूं कैलास । सर्वस्वाची आस देवापायीं ।।[६१]

इत्यादि संतवचनांतून हाच अभिप्राय व्यक्त होतो. संसारांतील दुःखांना किंवा आपत्तींना कंटाळून परमार्थाकडे वळणें संतांना मान्य नव्हतें, तर प्रपंचांत राहूनच भक्तिसुखाचा आस्वाद घेणें, जीवनांतील संकटांनीं चित्त विचलित होऊं न देतां आत्म-साक्षात्काराचा आनंद लुटणें म्हणजेच परमार्थसिद्धि असें त्यांच्या उपदेशाचें सार आहे.

मराठी संतांच्या भक्तिसंप्रदायानें महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या धर्म-जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून दिलें. संकुचित ग्रामजीवनाच्या ठराविक चाकोरींत पिढ्यान् पिढ्या खितपत पडलेल्या शूद्रातिशूद्रांना त्यांनीं अंतर्मुख बनविलें. आणि त्यांच्या अंतःकरणांत आत्मोन्नतीची प्रेरणा निर्माण केली. अठरापगड जातींच्या लोकांसाठीं ज्ञानेश्वरप्रभृति संतांनीं मोक्षसुखाचें अन्नछत्र घातलें. 'सकळांसी

---

५६ ज्ञा. प्रभा., जगमित्र नागा, ६. ५७ तु. गा. १२४
५८ मनाचे श्लोक ८४. ५९ ज्ञा. १८–८६४
६० तु. गा. ८८४. ६१ तु. गा. १७१७

येथें आहे अधिकार।'[६२] भागवतधर्माच्या विशाल मंदिरांत हा ब्राह्मण, हा शूद्र, हा अंत्यज असा भक्तिप्रपंच नव्हता. 'नाहीं वर्ण धर्म याती। नामीं अवघीचि सरती।'[६३] हिंदु समाजाच्या दैनंदिन व्यवहारांत कुळ, जाति आणि वर्ण यांच्या उच्चनीचभावाचें व सोवळ्याओवळ्याचें फारच स्तोम माजलें होतें.

घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ।।
सर्व भावें दीन । तुका म्हणे याति हीन ।।[६४]

१ हीन याति माझी देवा । कैसी घडेल तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीतीं ॥[६५]

२ आदिअंतीं अवघा विटाळ संचला । सोवळा तो झाला कोण न कळे ॥[६६]

उच्च वर्णीयांची अहंमन्यता आणि तुसडेपणा यांमुळें ज्यांचीं मनें व्यथित झालीं होतीं, ते शूद्रातिशूद्र साहजिकच वारकरी पंथाकडे ओढले गेले. पांडुरंग भावाचा भुकेला आहे, तो जातपात पाहत नाहीं, आणि वर्णभेदहि मानीत नाहीं. ज्ञानेश्वरांपासून चोखामेळ्यापर्यंत सर्व जातींचे भक्त त्याला सारखेच प्रिय आहेत. म्हणून विठ्ठलसंप्रदायांत उच्च-नीचभावाची उपाधि नाहीं, जन्मसिद्ध विषमतेची बाधा नाहीं.

१ उंच निंच कांहीं नेणें हा भगवंत । तिष्ठे भावभक्त देखोनियां ॥[६७]

२ तोचि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यांत ॥[६८]

मराठी संतांच्या भक्तिपंथांत समदृष्टीला अग्रस्थान आहे. 'पंढरीसी नाहीं कोणा अभिमान। पाया पडे जन एकमेका ॥'[६९] आपला संबंध सामाजिक व्यवहारच त्या काळीं भेदबुद्धीनें ग्रासलेला होता. संतांनीं परमार्थाच्या प्रांतापुरतें कां होईना, पण ऐक्याचें व समतेचें वातावरण निर्माण केलें. त्यामुळें बहुजनसमाजाला त्यांच्या पंथाविषयीं एकदम आपुलकी वाटली. निरनिराळ्या जातींतील हजारों लोक ह्या संप्रदायांत सामील झाले.

वारकरी पंथांत वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही थरांतील संत होऊन गेले. ज्ञानेश्वर-एकनाथादि उच्चवर्णीय संतांची प्रेरणा दलितोद्धाराची आहे, तर नामदेव-तुकारामांसारख्या बहुजनसमाजांतील संतांची प्रेरणा आत्मोन्नतीची आहे. दलितोद्धार आणि आत्मोन्नति ह्या दोन्ही प्रेरणा एकमेकींपासून अगदीं विलग आहेत असें नाहीं. पण कोणत्या थरांत कोणती प्रेरणा प्रबल आहे एवढ्या दृष्टीनेंच वरील वर्गीकरण केलें आहे. मराठी संतांनीं स्त्री शूद्रांना आत्मप्राप्तीसाठीं, 'रामकृष्ण' या बीजमंत्राचा सोपा व साधा मार्ग सांगितला. याचा अर्थ भक्ति म्हणजे नुसतें नामसंकीर्तन, नुसता टाळकुटेपणा असा नाहीं. बहुजनसमाजाला अध्यात्माची

---

६२ तु. गा. २८७४. ६३ त. गा. २३९१. ६४ तु. गा. २७६६
६५ स. सं. गा., चोखामेळा, १२९. ६६ स. सं. गा., चोखामेळा, ८४
६७ तु. गा. २८२०. ६८ तु. गा. २९२८. ६९ तु. गा. २४९०

गोडी लावण्यासाठीं संतांनीं साधनाच्या सोपेपणावर पुनःपुन्हां भर दिला आहे. पण परमार्थसीपानाची पहिली पायरी म्हणजे कांहीं आत्मानुभवाचें अत्युच्च शिखर नव्हे. संतांच्या प्रचारपद्धतींतील अर्थवाद किंवा खुलावट आणि विचार-सरणींतील तत्त्वभेद यांचें तारतम्य संतवाङ्मयाच्या समीक्षकांनीं ओळखलें पाहिजे. भक्ति ही मराठी संतांची सर्वंकष जीवन निष्ठा आहे. तत्त्वबोध, भावशुद्धि, स्वधर्माचरण, नीतिनिष्ठा, सौजन्य आणि भूतदया, ह्या सर्व गोष्टींचा त्यांच्या भक्तियोगांत त्यांनीं अंतर्भाव केलेला आहे.[७०] जैन आणि महानुभाव ह्या पंथांवर मात करून आणि शांकर अद्वैतमताला मुरड घालून त्यांनीं अध्यात्मजीवनांतील यतिधर्माचें, संन्यासमार्गाचें बंड मोडून काढलें. ईश्वर आणि जग, आत्मा आणि देह, ज्ञान आणि कर्म, सिद्धावस्था आणि व्यवहार यांच्यामध्यें तमःप्रकाशवत् विरोध नाहीं. एकाच्या प्राप्तीसाठीं दुसऱ्याचा त्याग आवश्यक नाहीं असें त्यांनीं निःसंदिग्धपणें प्रतिपादिलेलें आहे. निवृत्ति व प्रवृत्ति, वैराग्य व कर्तव्यनिष्ठा, धर्म व नीति, भक्ति व भूतदया यांची त्यांनीं सांगड घातली. साधकानें आत्मशुद्धीसाठीं व सिद्धानें लोकसंग्रहार्थ कर्में केलींच पाहिजेत असा त्यांचा आदेश आहे. मात्र

"येर मातें नेणोनि भजन । तें वायां चि गा आनीआन ॥
म्हणोनि कर्माचें डाले ज्ञान । तें निर्दोष होआवे ॥"[७०]

अशा शब्दांत त्यांनीं ज्ञाननिष्ठेचा, विवेकशीलतेचा पुरस्कार केला आहे. त्या-बरोबरच ज्ञानाला स्थैर्य लाभावें, आणि बुद्धीला तेज चढावें म्हणून वैराग्याची शिकवण दिली आहे.

परितेचिं लीला परजवे । तैसे वैराग्याचे नीचनवें ॥
अभंग बल होआवे । बुद्धीस गा ॥[७१]

संतांनीं शूद्रातिशूद्रांना तत्त्वचिंतनाचे पाठ देऊन त्यांना आपल्या अंतःसामर्थ्याची प्रचीति आणून दिली, आणि प्रतिकूल परिस्थितींतहि आपलें मन खंबीर ठेवण्याचा आणि आपलें भलेंपण टिकवून धरण्याचा त्यांनीं लोकांना उपदेश केला. कर्म, ज्ञान, ध्यान आणि भक्ति ह्यांपैकीं कोणत्याहि एका योगापेक्षां योगबुद्धीवरच मराठी संतांचा कटाक्ष होता. मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीला ज्ञानांतील डोळस-पणा, ध्यानांतील एकाग्रता, कर्मांतील शुचिता, आणि भक्तींतील समर्पणशीलता ह्या चारही गोष्टींची सारखीच आवश्यकता आहे, असें त्यांचें मत होतें.

अशा रीतीनें निरनिराळ्या प्रवृतींचा समन्वय करून मराठी संतांनीं महा-राष्ट्रांत अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची एक उदार व प्रगतिशील विचारप्रणाली अस्तित्वांत आणली. मात्र त्यांच्या ह्या कार्याचें मूल्यमापन करतांना महाराष्ट्रांतील परिस्थितीच्या मर्यादा नीट ध्यानांत घेतल्या पाहिजेत. ह्या मर्यादा केवळ महा-

---

७० ज्ञा. ९–३४६. ७१ ज्ञा. १५–२३२

दा. क्र. ८७५१

राष्ट्राच्या नव्हे, तर सबंध भारताच्या किंबहुना एकंदर आशिआई समाजाच्या स्थितिशीलतेंतून निर्माण झाल्या होत्या. मराठी संतांना आधुनिक अर्थानें 'धर्मसुधारक' म्हणतां येणार नाहीं.

१ धर्माचें पाळण । करणें पाषाण-खंडण ॥[७२]
२ जे पुडुती पुडुती पार्था । हे सकल लोकसंस्था ॥
रक्षणीय गा सर्वथा । म्हणौनिया ॥[७३]

संतांची भूमिका ही वस्तुतः धर्मरक्षणाचो, धर्मसंस्थापनेची आहे. युरोपमधील विशिष्ट सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळें तेथील धर्मसुधारणेचें स्वरूप अगदीं वेगळें बनलें होतें. ल्यूथरची धर्मसुधारणा कांहीं प्रमाणांत कां होईना औद्योगिक व राजकीय क्रांतीच्या पूर्वतयारीस कारणीभूत झाली. आपल्या साचेबंद समाज-व्यवस्थेमुळें येथील धार्मिक आंदोलनाला क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झालें नाहीं. जुन्या समाजव्यवस्थेचा पाया खणून काढण्याऐवजीं ह्या समाजव्यवस्थेमुळें गांजलेल्या दलित वर्गाला दिलासा देणें, परिस्थितीचे आघात शांतपणें सहन करण्याइतकें नैतिक बळ त्यांच्यामध्यें निर्माण करणें, कर्मजडतेमुळें व अंधश्रद्धेमुळें काजळलेली त्यांच्या अंतःकरणांतील मानवतेची ज्योत पुन्हां प्रज्वलित करणें हें कार्य मराठी संतांनीं कसोशीनें पार पाडलें. संतांचें हें सांस्कृतिक कार्य त्यांच्या काळांत प्रभावी ठरलें यांत नवल नाहीं. पण इंग्रजी अमदानींत पाश्चात्य विद्येच्या संस्कारामुळें जेव्हां महाराष्ट्रांत सांस्कृतिक प्रबोधन सुरू झालें, तेव्हां न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या आधुनिक सुधारणावादाच्या प्रवक्त्यानेंहि एकनाथ-तुकारामादि संतांच्या कार्यापासूनच स्फूर्ति घेतली. यावरून संतांच्या कार्यांतील दूरगामी संजीवक सामर्थ्याची साक्ष पटते.


ज्ञानेश्वरप्रभृति संतांचा भागवत धर्म आणि रामदासांचा महाराष्ट्र धर्म यांच्या विचारप्रणालींत तसा कांहीं मूलगामी फरक नाहीं. अद्वैतनिष्ठा, भक्तिमार्ग व वर्णाश्रम यांना दोघांचीहि सारखीच मान्यता होती. रामदासांनीं महाराष्ट्रांत रामोपासनेचा प्रचार हिरीरीनें केला. त्यांच्या पूर्वी एकनाथांनींहि रामचरित्राचें रहस्य विषद करून सांगितलें होतें. मात्र भागवतधर्मीय संतांना जी 'प्रवृत्ति' तत्त्वतः संमत होती तिचा प्रत्यक्ष व्यवहारांतील तपशील रामदासांनीं ठसठशीतपणें व परिणामकारकतेनें लोकांपुढें मांडला. स्वराज्योन्मुख झालेल्या महाराष्ट्राच्या राजकीय ध्येयवादाला समर्थांचें 'प्रपंचबोध' व 'राजनीति' यांचें निरूपण उपोद्बलक ठरलें. आपल्या साहित्याच्या व संप्रदायाच्या द्वारें त्यांनीं महाराष्ट्रांतील ब्राह्मण-क्षत्रियांना स्वाभिमानाचा, स्वार्थत्यागाचा, प्रयत्नवादाचा व शिस्तबद्ध संघटित प्रतिकाराचा संदेश दिला.

—ध्वनिक्षेपण, दिनांक २९ मार्च, १९५८

• • •

७२ तु. गा. २१३६. ७३ ज्ञा. ३–१६८




REFBK-0009759